म. ग्रं. सं. ठाणे

अधिव प्रकाशन संस्था

मुंबई विश्वविद्यालयाचें नारायण परमानंद पारितोषिक मिळालेला प्रबंध

# आधुनिक भारताचें निर्मिती आणि पार्श्वभूमी

RFFBK-0006283

अधिकार प्रकाशन २

# आधुनिक भारताचे निर्माते
## आणि
# त्यांची पार्श्वभूमि.

क्र. ६२८३

: लेखक :

ह. रा. प्रभु

RFFBK-0006283

अधिकार प्रकाशन संस्था.

७९ हिंदु कॉलनी, दादर.

: संचालक :
एम्. आर. गांवकर
वामन राधाकृष्ण

: प्रकाशक :
वामन राधाकृष्ण
७९ हिंदु कॉलनी
दादर, मुंबई १४.

( पुढील आवृत्तीचे सर्व हक्क लेखकाच्या स्वाधीन )

लेखनकाल—

रविवार आषाढ कृष्ण १३, १९९८ ( दि. ९-८-१९४२ )
ते
बुधवार भाद्रपद शुक्ल १४, १९९८ ( दि. २३-९-१९४२ )

किंमत साडेतीन रुपये.

: मुद्रक :
शांताराम कान्होजी टांककर
हिंदमाता प्रिंटिंग प्रेस,
जेरबाई वाडिया रोड, परेल,
मुंबई, १२.

# विइलास—

# ‘ पार्श्वभूमि ’

जगांतील कोणत्याही गोष्टीला व्यक्त दशेंत यायला पार्श्वभूमि लागतेच, ही प्रस्तुत प्रबंधांतील मध्यवर्ती कल्पना, मग हा प्रबंध तरी याला अपवाद कसा ठरेल ?

मुंबई विश्वविद्यालयानें, १९४२ सालच्या ‘ नारायण महादेव परमानंद पारितोषिका’साठीं The Formative Influences in the Lives of some Leading Modern Indian Social Reformers, हा विषय ठेवला. तोच या प्रबंधाची पार्श्वभूमि घडवायला कारणीभूत झाला.

ज्याकरितां हा प्रबंध लिहिण्यांत आला, तें दोनशें रुपयांचें पारितोषिक मिळविण्याचें कार्य त्यानें पार पाडलें. बरोबर पंधरा महिन्यांच्या दीर्घ कालावधी-नंतर मुंबई विश्वविद्यालयाकडून त्याला पारितोषिक मिळाल्याचें जाहीर करण्यांत आलें. तसेंच विश्वविद्यालयाचे विद्वान प्राध्यापक डॉक्टर घुर्ये यांच्या मार्गदर्शक-त्वाखालीं, तो पुस्तकरुपानें प्रसिद्ध करण्यासही परवानगी देण्यांत आली. ‘ अधिकार प्रकाशन संस्थे’चे उत्साही चालक श्री. वामनराव राधाकृष्ण यांच्या धाडसामुळें, तो आज वाचकांसमोर येऊं शकत आहे.

“ आधुनिक भारताचे निर्माते आणि त्यांची पार्श्वभूमि ” हें जरी नांव या प्रबंधाला देण्यांत आलें असलें, तरी फक्त निवडक अशाच आधुनिक भारताच्या निर्मात्यांचा यांत समावेश करण्यांत आला आहे. अर्थात या प्रबंधांत हाताळलेला विषय अजून पूर्ण झालेला नाहीं. पाश्चात्य देशांत हिंदुधर्माची जोरदार तुतारी फुंकणारे स्वामी विवेकानंद, आर्यसमाजाचे संस्थापक स्वामी दयानंद, विश्वप्रेमी कविवर्य रवींद्रनाथ टागोर, ‘राष्ट्रीय स्वयंसेवक संघा’चे प्रेरक व अनेक हिंदु तरुणांचें स्फूर्तिस्थान होऊन बसलेले डॉक्टर हेगडेवार, ‘ रायवादा’चे जनक एम्. एन्. राय, ‘ मुस्लिम लीग’चे सूत्रधार कायदे–इ–अझाम जिन्हा, आणि ‘ हिंदुमहासभे’चे पंचप्राण सावरकर, या महापुरुषांचाही हातभार भारताला आजचें स्वरुप यायला खास लागला आहे. या सर्व क्रांतदर्शी वीरांच्या जीवन-क्रमांचा विचार करुन, राजा राममोहन रायपासून आजपर्यंत, भारतांत जे जे

विचारप्रवाह आणि तत्त्वज्ञान उगम नि प्रसार पावले, त्याचा भारतावर काय परिणाम झाला हें पाहिल्याशिवाय, आणि ' आजचा भारत ', 'उद्यांच्या भारता' साठीं कोणत्याप्रकारची पार्श्वभूमि बनवून ठेवीत आहे, हें जाणून घेतल्याशिवाय हा निश्चय हातावेगळा करतां येणार नाहीं याची मला पूर्ण जाणीव आहे. त्याच-करितां मी या प्रबंधाचा दुसरा भाग लिहिण्यास घेतला आहे.

डॉक्टर घुर्ये यांनीं ज्या मला कांहीं बहुमोल सूचना केल्या, इतकेंच नव्हे तर आपला अमूल्य वेळ खर्चीं घालून, त्या मला पटवून देण्याचे परिश्रम घेतले, त्याबद्दल त्यांचे आभार मानावे तितके थोडेच आहेत.

रामनारायण रुइया महाविद्यालयाचे कर्तव्यदक्ष, उत्साही ग्रंथपाल श्री. कृ. न. भागवत यांचा निर्देश केल्याशिवाय, प्रस्तुत प्रबंधाच्या पार्श्वभूमीला केव्हांच पूर्तता येणार नाहीं. मला हवीं असलेलीं पुस्तकें—ग्रंथालयांत जरी नसलीं, तरीसुद्धां कुठून तरी पैदा करुन तीं मला झटपट पुरविण्यांत त्यांनीं जी तत्परता दाखविली आहे, आणि सद्या दाखवित आहेत, त्याबद्दलची कृतज्ञता कोणत्या शब्दांत व्यक्त करावी, हा एक मोठा प्रश्न मला पडलेला आहे.

माझे आवडते प्राध्यापक न. र. फाटक यांचे आभार मात्र कोणत्या शब्दांनीं मानावे हेंच मला समजत नाहीं. खरें बोलायचें म्हणजे, आभार मानण्याचा माझा हा ' शिष्टपणा ' त्यांना कितपत रुचेल हा प्रश्नच आहे. म्हणून मी हें धाडसच करीत नाहीं. ज्या बेफिकीरपणानें आपण ज्ञानकोशाचा उपयोग मन मानेल तसा करतों, त्याचप्रमाणें, या ' खादीच्या वेष्टनांतील चालत्या बोलत्या ज्ञानकोशाचा ' मी उपयोग केलेला आहे, आणि करीतही आहे. मला ठाऊक आहे, त्यांच्या चिकित्सक दृष्टीला या प्रबंधांत अनेक दोष आढळून येतील. पण नम्रपणें मी त्यांना एवढेंच सांगूं इच्छितों कीं, त्यांच्यासुद्धां दृष्टीला ' निर्दोष ' वाटेल अशा प्रकारची ' कृति ' माझ्या हातून व्हावी, ही मी महत्त्वाकांक्षा बाळगीत आहे.

बुधवार कार्तिक शुक्ल १,<br>
२००१ विक्रम संवत्.<br>
१८-१०-४४.

ह. रा. प्रभु

# अनुक्रमणिका


पार्श्वभूमि पृष्ठ

प्रकरण १ लें १

विषय–प्रवेश

प्रकरण २ रें २२

आधुनिक भारतीय आद्य सुधारकांचे अग्रणी राजा राममोहन राय

प्रकरण ३ रें ३७

महाराष्ट्रांतील सर्वांगीण सुधारणेचे आद्य जनक

सरदार गोपाळराव हरि देशमुख उर्फ लोकहितवादी

प्रकरण ४ थें ५६

आधुनिक भारताचे पितामह महर्षि दादाभाई नवरोजी

प्रकरण ५ वें ६९

स्वतंत्र भारताचे द्रष्टे न्यायमूर्ति रानडे

प्रकरण ६ वें ८५

आधुनिक महाराष्ट्रांतील सुधारकांचे अध्वर्यु

गोपाळ गणेश आगरकर

प्रकरण ७ वें १०१

स्वातंत्र्य केसरी लोकमान्य टिळक

प्रकरण ८ वें ११६

आधुनिक भारतीयांचे हृदयसम्राट

महात्मा गांधी

प्रकरण ९ वें १३१

उपसंहार

# प्रमुख संदर्भ ग्रंथ.


| | | |
|---|---|---|
| १ | आधुनिक भारत ... .... | आचार्य शं. द. जावडेकर |
| २ | आजकालचा महाराष्ट्र ... ... | पाध्ये व टिकेकर |
| ३ | ' नवयुग धर्म ' .... .... | स. कृ. फडके |
| ४ | ' लोकहितवादी ' चरित्र .... | कृ. ना. आठल्ये |
| ५ | लोकहितवादींची शतपत्रें ... | ( संपादक – टिकेकर ) |
| ६ | दादाभाई नवरोजी ... ... | प्रा. ना. सी. फडके |
| ७ | न्यायमूर्ति रानडे ... ... | प्रा. न. र. फाटक |
| ८ | न्यायमूर्ति रानडे आठवणी ... | श्री. रमाबाई रानडे |
| ९ | स्वतंत्र भारताचे द्रष्टे न्या. रानडे ... | द. गो. कर्वे |
| १० | आगरकर चरित्र ... ... | प्रा. मा. द. अळतेकर |
| ११ | आगरकर निबंध संग्रह ... ... | |
| १२ | टिळक चरित्र ... ... | न. चिं. केळकर |
| १३ | लो. टिळकांचे केसरीमधील लेख ... | |
| १४ | नागरिक नीति ... ... | श्री. पुणतांबेकर |


## — इंग्रजी —


| | | |
|---|---|---|
| १ | राजा राममोहन रॉय —पत्रें ... ... | ( संपादक–मुजुमदार ) |
| २ | राजा राममोहन रॉय चरित्र ... ... | एन्. सी. गांगुली |
| ३ | दादाभाई नवरोजी ... ... | मसानी |
| ४ | प्राचीन आणि अर्वाचीन भारत ( India Old & New ) ... ... | व्हॅलेंटाईन चिरोल |
| ५ | गांधीजी आणि त्यांचें तत्त्वज्ञान ... | सी. एफ्. अँड्र्यूज |
| ६ | सत्याचे प्रयोग (आत्मचरित्र) ... ... | म. गांधी |
| ७ | गांधीजींचे लेख व भाषणें ... ... | (संपादक-नटसेन) |

# आधुनिक भारताचे निर्माते

## आणि

## त्यांची पार्श्वभूमि.

"असत्यांतून सत्याकडे, अज्ञानांतून प्रकाशाकडे, जडजीवनांतून आध्यात्मिक जीवनाकडे, स्वार्थपरतेंतून परोपकाराकडे मनुष्याला घेऊन जाणें हा सुधारणेचा हेतु असला पाहिजे...खरे सुधारक उच्च नीतितत्त्वें, विवेकाचें परीक्षण, सद्बुद्धि, खरें सुखदुःख व उपयोग यांकडे लक्ष देतात. त्यांना गत-गोष्टीची प्रीति अथवा द्वेष नसतो, आणि नव्या गोष्टीची हांव व वासना नसते. ते परंपरा, परिस्थिती व प्राप्तव्य यांचा योग्य विचार करतात; व आपला सुधारणेचा मार्ग उच्च, नैतिक व आध्यात्मिक तत्त्वानुसार ठरवितात. त्यांच्यामधें मुख्य विचार, समाजाच्या आवश्यकता व त्याचें खरें हित हाच असतो. ते खरें ज्ञान व अनुभव, सद्विवेक व सत्भावना यांच्या सहाय्यानें आपला सुधारणेचा मार्ग ठरवितात. व त्याप्रमाणें चळवळ करतात......अगोदर सामाजिक सुधारणा, का अगोदर राजकीय सुधारणा, का अगोदर आर्थिक सुधारणा, का अगोदर धार्मिक सुधारणा, का अगोदर शैक्षणिक सुधारणा अशा प्रकारचे अवास्तव व आग्रहमूलक प्रश्न अनेकवेळां उत्पन्न होतात. त्यावेळेस एवढी जाणीव ठेवली पाहिजे कीं समाजाची सुधारणा सर्वांगानीं व्हावयाला पाहिजे. एका अंगाला औषध देऊन इतर अंगें कुजत ठेवतां येत नाहींत. समाजाची सुधारणा सर्वांगानीं केली तर त्याची प्रगति होते, नाहींतर कोणतीच विशिष्ट सुधारण यशस्वी होत नाहीं. हीं अंगें एकमेकांना आधार असून पोषक आहेत. समाजपुरुषाला सर्वांगानीं पुष्ट केला पाहिजे."

— 'नागरिक नीति' —

# प्रकरण १ लें.

## विषय-प्रवेश.

थोर विभूति ही कांहीं जन्मतःच थोर नसते. आजपर्यंत होऊन गेलेल्या कुठल्याही थोर पुरुषाच्या चरित्राचें सूक्ष्म अवलोकन केल्यास, हीच गोष्ट आपणांस आढळून येईल. इतर सामान्य जनाप्रमाणेंच प्रारंभीं कांहीं दिवस त्याच्या आयुष्याचा प्रवाह संथपणें वाहत चाललेला असतो. तो जेव्हां आपल्या आयुष्याला स्वतंत्रपणें सुरवात करतो, तेव्हां बाकींच्यापेक्षां त्याच्यांत कांहीं डोळ्यांत भरण्यासारखें विशेष आढळून येतें, अशांतलाही प्रश्न नाहीं. परंतु लौकरच आपल्या अलौकिक कर्तृत्वाच्या जोरावर एखाद्या किरकोळ निर्जीव ओढ्याप्रमाणें वहात असलेल्या आपल्या संथ आयुष्यप्रवाहाला विशाल नि अफाट सागराचें स्वरूप आणून तो आपलें नांव अजरामर करून घेतो. तो जो सामान्यांतून असामान्यांत जातो तो केवळ आपल्या कर्तृत्वानें ! पौर्वात्यांच्या हृदयांत कायमचे आदराचें स्थान मिळवून बसलेला, अहिंसेचा भक्त नि शांतिरसाचा पुतळा बुद्ध, किंवा अर्वाचीन काळांतील केवळ बुद्धाचाच अवतार असे तेजस्वी भारतपुत्र महात्मा गांधी यांचीं उदाहरणें घ्या. आज जरी बुद्धाच्या चरित्राला, त्याच्या जन्मापासूनच नव्हे, तर त्याचा या जगांत प्रवेश होण्याच्या आधींपासूनच, हजारों अद्भुत कथा, त्याच्या अंध भक्तांकडून चिकटविल्या जात असल्या, तरी राजपुत्र सिद्धार्थांत, त्याच्या लहानपणापासून इतरांपेक्षां कांहीं अलौकिक गुण दृग्गोचर होत होते असें कोणताही इतिहासतज्ज्ञ म्हणणार नाहीं. फार तर, एकलकोंड्या स्वभावाचा, आपल्याच विचारांत नेहमीं गुंग होऊन बसून बाह्य जगाची विस्मृति पडणारा, लहान सहान गोष्टी मनाला लावून घेऊन दुःखानें सुस्कारे सोडणारा असा एक विक्षिप्त तरुण गडी म्हणून तो कदाचित जनतेच्या डोळ्यांत भरलेला असेल. परंतु पहिल्याप्रथम त्यांच्या हृदयांत त्याला विशेष असें स्थान केव्हांच मिळालें नाहीं. हीच गोष्ट महात्माजींची ! आपल्या उज्वल चारित्र्यानें त्यांनीं आज साऱ्या जगाला दिपवून टाकलें आहे. हिंदवासियांकरितां त्यांनीं केलेला अतुल स्वार्थत्याग, त्यांनीं सोसलेली विलक्षण झीज, आणि भारताला

पारतंत्र्याच्या दुःसह वेडींतून आणि साम्राज्यशाहीच्या लोभी मगरमिठींतून सोडविण्यासाठीं सत्य आणि अहिंसा या दोन शस्त्रानिशीं, आध्यात्मिक राष्ट्रवादाच्या भक्कम पायावर त्यांनीं घडवून आणलेला भारतीय सत्याग्रह–संग्राम वगैरेनीं त्यांना आज आधुनिक भारताच्या हृदयाचे खरेखुरे सम्राट बनाविलें आहे. अखिल मानव जातीच्या हिताची त्यांना असलेली तळमळ आणि कळकळ यांनीं आज त्यांना साऱ्या जगाचें आदरस्थान बनविलें आहे. परंतु त्यांच्या पूर्वायुष्याकडे जर नजर फेकली तर आपणाला काय दिसून येतें? किती साधेपणानें त्यानीं आपल्या आयुष्याला आरंभ केला होता! सत्याचा पुजारी, समतेचा प्रेमी, शांततेचा पाईक, असा एक भावनावश तरुण याच्यापलीकडे मोहनदासाकडे कोणी पाहिलें नसेल!

आतां पौर्वात्यांवरून पाश्चिमात्यांच्या इतिहासांवर जरी एकच धांवता दृष्टिक्षेप केला तरीही थोर पुरुषांच्या बावतींत वरील विधानच सत्य असलेलें दिसून येईल. आपल्या अद्वितीय शौर्यानें, अगाध बुद्धिमत्त्वानें आणि विलक्षण मुत्सद्दीपणानें कांहीं काळ युरोपचा कर्दनकाळ बनलेला नेपोलियन बोनापार्ट, किंवा आपल्या शुद्ध विचारसरणीच्या आणि निष्कलंक आचरणाच्या जोरावर धार्मिक जगांत आमूलाग्र क्रांति घडवून आणणारा मार्टिन ल्यूथर अगर आपल्या अचाट डावपेचांनीं, कुटिल राजनीतीनें आणि बुद्धीला अगम्य अशा कृत्यांनीं साऱ्या जगाचा विषय होऊन बसलेले चालू जगद्व्यापी क्रांतींतील मुख्य नायक हिटलर मुसोलिनी घ्या! नेपोलियनला विद्यार्थीदशेंत एक किरकोळ शरीरप्रकृतीचा, चलाख बुद्धीचा आणि केव्हां केव्हां उधारी करून फेरीवाल्या बाईकडून फळें विकत घेणारा मुलगा याच्यापेक्षां जास्ती महत्व नव्हतें. बुद्धिप्रामाण्यावर अधिक विश्वास असलेला धर्मशास्त्राचा एक चिकित्सक विद्यार्थी या पलीकडे ल्यूथरला प्रथम कोणी पाहिलें नाहीं. अघळ पघळ बडबडणारे भावनातिरेकी बोलके राघू यांच्या व्यतिरिक्त हिटलर मुसोलिनीकडे कोणी गंभीरपणें पाहिलें नाहीं.

सारांश विवेकानंदाच्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे कुठल्याही प्रसिद्ध पुरुषाचें चरित्र पाहिल्यास असें दिसून येतें कीं, आपल्यामध्यें गुप्त रूपानें वास करीत असलेल्या विश्वांतील सर्व शक्ति त्यांनीं व्यक्त दिशेला आणल्यामुळेंच ते

आपलें नांव अमर करूं शकतात. ‘ उद्धरेदात्मनाऽऽत्मानम् ’ ही गीतेची उक्ती त्यांच्या आयुष्याचें ध्येयवाक्य असतें. आपल्या कृतीनें ते जनतेच्या हृदयांत स्थान मिळवीत असतात.

सामान्य कोटींतून असामान्य कोटींत जावयाला एखाद्या व्यक्तिला त्याचे कर्तृत्वच कारणीभूत होत असतें. हें जरी खरें असलें तरी हें कर्तृत्त्व व्यक्त दशेला यायला या कर्तृत्ववृक्षाला सुवासिक आदर सुमनें नि सुमधुर कीर्तिफलें यावयाला, आणखी एका महत्त्वाच्या गोष्टीची आवश्यकता असते. कर्तृत्वाला बहर यावयाला, कर्तृत्वाला राष्ट्राच्या इतिहासांत अढळ स्थान मिळावयाला, कर्तृत्वाला जनताजनार्दनाचीं मनें आपणाकडे खेंचून घेणें शक्य व्हावयाला योग्य “ पार्श्वभूमी ” ची जरूरी असते. रवींद्रनाथ म्हणतात, “ मानवी जीवित हें दिव्याच्या ज्योतीसारखें आहे. ज्योत संथपणानें थोडासाच प्रकाश बाहेर फेंकांत तेवत असली, तरी या ज्योतींत साऱ्या विश्वाला प्रकाश पुरविण्याची अगर दाह देण्याची शक्ति गुप्तपणें वसत असते. मानवाला ईश्वरानें ही जीवित ज्योत बहाल केली आहे. ईश्वर म्हणतो, ‘बा मानवप्राण्या, या ज्योतीचा तूं हवा तसा उपयोग कर ! अज्ञानाचा अंधःकार ज्ञानाच्या प्रकाशानें ह्या ज्योतीला जसा नाहींसा करतां येईल तसाच आपल्या कृतीनें लोकांचें स्वास्थ्य हिरावून घेऊन त्यांच्यांत हाहाकार उडवून देणें ही या ज्योतीला अशक्य नाहीं, हें नेहमीं ध्यानांत ठेव”. पण योग्य परिस्थितीच्या अभावीं, योग्य पार्श्वभूमि न मिळाल्यामुळें ही ज्योत जागच्या जागींच विझून जाणें तेवढेंच शक्य आहे, हेंही याबरोबरच आपणाला मान्य करावयला नको काय ? म्हणूनच मानवी जीविताला समर्पक उपमा द्यावयाचीच झाली तर ती उत्तम जातीच्या बीजांची देतां येईल. बीजांत मोठें झाड व्हायचें, लोकांना सुवासिक फुलें आणि रसयुक्त फळें पुरवावयाचें सामर्थ्य गुप्तपणें वसत असतें हें कबूल ! परंतु हें बीज योग्य सुपीक भूमीवर पडलें, योग्य प्रमाणांत त्यांना पाणी मिळालें, त्याला हवी अशी हवा मिळाली आणि शास्त्रीय रीतीनें त्याची काळजीपूर्वक जोपासना झाली तरच जगास त्याचा उपयोग व्हावयाचा ! मानवी कर्तृत्वाचेंही असेंच नाहीं का ?

शिवाजी जर आज विसाव्या शतकांत जन्मला असता तर त्यानें काय केलें असतें ? प्रश्न जरी वेडगळपणाचा भासला तरी किती मनोरंजक उत्तरें निघूं

शकतील त्याच्यांतून ! कुणी सांगावें ? कदाचित बंडाळी केल्याबद्दल आपल्या तरुणपणांतच चांफेकर बंधूप्रमाणें फांशीही गेला असता ! अगर लॉर्ड सिंहाप्रमाणें ब्रिटीश साम्राज्यशाहीचा आजन्म मिंधा सेवक होऊनही राहिला असता ! या गौरवर्णीय राज्यकर्त्यांच्या कारभाराला भुलून जाऊन तो त्यांचा भाट बनणें जितकें शक्य होतें, तितकेंच तो त्यांचा अट्टल वैरी बनून त्यांना या देशांतून कायमचें हांकलून लावण्यासाठीं, हिंदुमुसलमानांची एकी करून, त्यांच्याविरुद्ध एक अभेद्य फळी उभारण्याचा प्रयत्न यशस्वी करून दाखविणारा महात्मा म्हणून ओळखला जाणें अशक्य नव्हतें. कोणत्याही थोर व्यक्तीच्या बाबतींत वरील प्रमाणेंच प्रश्न उपस्थित केल्यास कितीतरी गमतीदार उत्तरें त्याच्यांतून निघतील ! गांधीजी शिवाजीच्या काळीं जन्मले असते तर तुकाराम बुवांच्या वळणावर गेले असते असें कोण छातीठोकपणानें सांगू शकेल ? प्रति शिवाजीही झाले असते कदाचित् ! किंवा समजा विसाव्या शतकांतच पण युरोपांत जर गांधीजींचा जन्म झाला असता तर त्यांच्या आयुष्याला कोणतें वळण लागलें असतें ? हिटलर मुसोलीनीला खालीं मान घालावयाला लावतील अशा प्रकारची अनान्वित•कृत्यें करणारे झोटींग ते कशावरून बनले नसते ? त्याचप्रमाणें भरतभूमीनें हिटलर मुसोलिनीला जन्म दिला असता तर एकतर ते पक्के अहिंसावादी बनले असते, किंवा कायमचे अंदमानचे रहिवासी तरी झाले असते ! सांगण्याचा उद्देश काय, तर एखाद्या व्यक्तीला जनतेपुढें यावयाला त्याच्या कर्तृत्वाइतकीच त्याची पार्श्वभूमीही कारणीभूत होत असते !

हें विधान अधिक स्पष्ट केलें पाहिजे. एखाद्या व्यक्तीच्या हस्तें जेव्हां समाज अगर राष्ट्र किंवा अखिल मानव जात सुधारली जाते तेव्हांच त्या व्यक्तीला लोकांच्या दृष्टीनें महत्त्व येतें. तेव्हांच ती व्यक्ती जनतेकडून पूजिली जाते. समाज हा राष्ट्राचा प्राण असल्यामुळें आपण पहिल्यांदा त्याचेंच उदाहरण घेऊं. समाज म्हणजे तरी काय ? मानवानें पाहिलें कीं, आपण एकाकी राहून भागणार नाहीं; आपलें जीवन अधिक सुखी, अधिक सुरक्षित करावयला आपण एकमेकांवर विश्वास ठेवला पाहिजे. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे आपण परस्परावलंबी प्राणी आहोंत ही गोष्ट त्यानें ओळखली. मनुष्याचा कांहीं कारणास्तव एकत्र झालेला व कांहीं विशिष्ट हेतू सिद्धीस नेण्यासाठीं परस्परांशीं

आपण होऊन स्वखुषीनें संबद्ध झालेला समूह अशी आपणाला समाजाची आटोपशीर व्याख्या करतां येईल. समाजाचे स्वरूपही नेहमीं बदलणारें असतें. प्रत्येक समाजांत जुनें तें सोनें म्हणून पुराण्या गोष्टींना चिकटून राहाणारा जसा एक वर्ग असतो तसाच नवें तें हवें म्हणून अंधपणानें पुढे पुढें जाण्याचा प्रयत्न करणाराही दुसरा एक वर्ग असतो. या दोन्ही वर्गांचा योग्य मिलाफ घडून आला तरच समाजाला चांगले दिवस लाभतात. पुष्कळदां असें घडून येतें कीं, समाजांत अनीति माजते; दुष्ट विचार फोंफावतात; सगळीकडे सांवळा गोंधळ सुरू होतो. अशा वेळीं समाजाला योग्य वळण लावावयाला एखाद्या कर्तबगार व खंबीर व्यक्तीची जरूरी भासते. समाजाची वरील परिस्थितीच अशी व्यक्ती निर्माण करते. अर्थात जेव्हां अशा अव्यवस्थित व विस्कळित झालेल्या समाजाला ती व्यक्ती योग्य मार्गावर आणून सोडते तेव्हां ती सहाजीकच समाजाची धुरीण बनते. परंतु हें धुरीणत्व त्याच्या गळ्यांत पडावयाला, वरील प्रकारची जी पार्श्वभूमि समाजानें उत्पन्न केलेली असते, तीच कारण होते, हें सहज लक्षांत येईल.

राष्ट्राचेंही असेंच आहे. एखाद्या राष्ट्राला जेव्हां अवनति प्राप्त होते, जेव्हां तें राष्ट्र अधोगतीला जाऊं लागतें, जेव्हां त्या राष्ट्राची संस्कृति कोलमडून पडण्याची वेळ येते, जेव्हां त्या राष्ट्राचें चारित्र्य तेजोहीन बनून लुप्त होण्याच्या मार्गास लागलेलें असतें, त्या वेळीं ही परिस्थितीच असा एक सामर्थ्यवान् पुरुष उत्पन्न करते कीं तो आपल्या कर्तृत्वाच्या जोरावर सहज लीलेनें त्या राष्ट्राला सावरून धरून त्याचा उद्धार करूं शकतो.

वरील विवेचनावरून असा एक सिद्धांत बसवितां येईल कीं, ज्यांना म्हणून आपण 'देशभक्त' ' राष्ट्रवीर ' 'स्वातंत्र्यवीर' 'समाजसुधारक' 'महात्मा' वगैरे आदरार्थक नांवांनीं ओळखतों, त्यांना या पायरीला आणून पोंचवायला त्यांच्या मागची परिस्थिती ऊर्फ ' पार्श्वभूमि ' कारणीभूत होत असते. ही पार्श्वभूमीच त्यांना राष्ट्रकारणांत अगर समाजकारणांत भाग घ्यावयाला लावीत असते. लहानपणांत त्यांच्या मनावर आपल्या भोंवतालच्या परिस्थितीचें जें वेगवेगळ्या वेळीं हरएक प्रकारचे संस्कार उमटलेले असतात तेच संस्कार त्यांचे कर्तृत्व व्यक्त दशेला आणण्यास सहाय्यभूत होतात.

उदाहरणानीं हें विधान समजावयाला अधिक सुलभ जाईल. बुद्धाच्या वेळची परिस्थिती डोळ्यासमोर आणा! जन्मतःच राजपुत्र सिद्धार्थ हा अत्यंत भावनावश! एक दिवस त्याच्या सावत्र भावानें, मजेकरतां तीर मारून खालीं पाडलेल्या कबूतराची शोचनीय अवस्था पाहून तो कितीतरी रडला! इतकें हळवें हृदय त्याचें! आईच्या वात्सल्यानें त्यानें त्या कबूतराची शुश्रूषा करून त्याला बरें केलें. नेहमीं कलहाचा तिरस्कार करणारा तो मितभाषणी या कबूतराच्या हक्काच्या बाबतींत मात्र आपल्या भावाशीं पुष्कळ भांडला! एका प्रसंगीं साधें प्रेत दृष्टीस पडल्यावर किती गांगरला आणि गंभीर झाला तो! मानवी जीवितांच्या क्षणभंगुरत्वाचा विचार करतां करतां कित्येक रात्री त्यानें झोंपेविना घालविल्या! खाण्यापिण्याची तर त्याला शुद्धीच राहिली नाहीं! जमीन नांगरतांना शेतकऱ्यानें आपल्या बैलाला छडीनें मारलेले नेहमींच्या जीवनातलें कृत्य त्यानें मनाला किती लावून घेतलें! जीवन कलहांतील एका प्राण्याची दुसऱ्या प्राण्यावर चाललेली आवश्यक जबरदस्तीसुद्धां त्याला किती दुःख देत असे! अशा या भावनावश तरुणाला जेव्हां आपल्या भोंवती धर्माच्या नांवाखालीं घातला जाणारा सांवळा गोंधळ दृष्टीस पडला तेव्हां त्या धर्माविषयीं त्यानें विटून जाऊन, व हा धर्म आपली ऐहिक तशीच पारमार्थिक भूक भागविण्यास असमर्थ आहे असें पाहून नवीन मार्ग शोधून काढण्याचा प्रयत्न करणें साहाजिकच नव्हतें काय? जातिभेदाच्या दुष्परिणामानें एका विशिष्ट वर्गालाच–ब्राह्मण जातीलाच ज्ञानसागरांत अवगाहन करतां येईल. इतर वर्गातील लोकांना तसें करण्याची कितीही इच्छा असली, तरी पूर्ण मनाई होती. बरें, हा वर्ग तरी जबाबदारीनें आपलें कार्य पार पाडीत होता काय? मुळींच नाहीं! धर्मांत मंत्रापेक्षां तंत्रें अधिक बोकाळलीं होतीं. यज्ञाच्या नांवाखालीं हजारों निरपराधी निष्पाप प्राण्यांचा नित्य फडशा उडत असलेला पाहून प्रचलित धर्माविरुद्ध बुद्धाचें मन बंड करून उठलें. ब्राह्मणांची बुवाबाजी, धर्माचा अत्याचार, जातीभेदानें पसरविलेला असंतोष वगैरेनीं सिद्धार्थाच्या कोमल भावना चेतावल्या गेल्या आणि आपणांतील घाण काढून टाकण्यासाठीं त्या काळच्या समाजानें जगाला बुद्ध दिला.

समता, स्वातंत्र्य, समृद्धता, बंधुत्व वगैरे उच्च तत्त्वांच्या निशाणाखालीं

पुकारल्या गेलेल्या राज्यक्रान्तीनें साऱ्या फ्रान्स देशाला हवालदिल करून सोडलें. रक्तपात, खून, चोऱ्या, मालमत्तेचा नाश, दडपशाही इत्यादि सैतानशाहींचीं भावंडें सगळीकडे हैदोस घालूं लागलीं. कुणी कुणाला पुसेना नी कुणाची पर्वा करीना! मानव जातीला काळिमा लावणारीं कृत्यें सहज लीलेनें लोक करतांना दृष्टीस पडूं लागले! फ्रेंच राजकारणाचा वारू लगामाविरहित सुटला! तो कुठें जातो, कुठल्या खड्डयांत उडी घेतो, कुठें आपला कपाळमोक्ष करून घेतो, कांहींच लोकांना समजेना. प्रत्येक दिवशीं, नव्या नव्या अत्याचारांना ऊत येत होता. एकाचा पायपोस दुसऱ्याच्या पायांत अशी सगळीकडे परिस्थिती उत्पन्न झाली. जीविताची खात्री कोणी देऊं शकत नव्हता; लुटालुटीनें सगळीकडे हाहाकार उडाला होता; बेबंदशाहीचा कहर झाला; पण थांबा! घाबरूं नका! याच राज्यक्रांतीनें हां हां म्हणतां तो पहा एक वीर बनविला! परिस्थिती आटो-क्यांत आणून सगळीकडे स्थिरस्थावर करण्याचें कार्य पार पाडण्यासाठींच त्याचा जन्म होता.

होय; तीच ती सडपातळ भेदक डोळ्यांची मूर्ति! नेपोलियन तिचें नांव! फ्रेंच राज्यक्रांन्तीनें त्याचें जीवितकार्य ठरविलें, त्याला पुढें आणलें; लोकांचा नेता बनविलें आणि अखिल युरोपाला घाबरविलें.

आणि युरोपांतील ती धार्मिक क्षेत्रांत चाललेली अंदाधुंदी! अरे बापरे! भरत खंडांत तरी धर्माच्या नांवाखालीं फक्त जनावरांचेच--मनुष्याशिवाय इतर प्राण्यांत आत्म्याचा मागमूसही नसल्यामुळें, त्यांची हत्या करण्यास मुळींच हरकत नाहीं, असें आकाशांतील बाप्पानुयायांचे प्रामाणिक मत असल्यामुळें मानवी जठराग्नि शमविण्यासाठीं ज्यांची आजतागायत त्यांच्याकडून दररोज हजारोंनीं कत्तल होते—बळी घेतले जात! आणि तेहीं विशेष कारणपरत्वें! पण इकडे! सगळेंच कांहीं और! धर्मगुरु मांगाला लाजवण्यासारखीं कृत्यें करूं लागले. खरें पाहिलें तर धर्मगुरुनीं वित्ताला त्याज्य मानायला हवें, पण इथें पाहिलें तर वित्त म्हणजे त्यांचा प्राणच होऊन बसलेलें! राजकारणांतसुद्धां त्यांची लुडबूड. दुसऱ्यांवर आपलीं गंजलेलीं मतें लादण्याचा कोण अट्टाहास! काय म्हणे तर खिस्ती धर्माचा जो एकुलता एक धर्म ग्रंथ बायबल तोसुद्धां वाचण्याचा हक्क नाहीं लोकांना! मग त्याचा अर्थ लावण्याची गोष्ट तर बाजूलाच राहिली!

वरें, यांनीं तरी आपल्या कर्तव्याप्रमाणें वायबलचा सखोल अभ्यास केला होता म्हणावयाचें, तर तेंही नाहीं ! कर्तव्य वगैरे जाणण्याची शुद्ध होती कोणाला ? हरतऱ्हेचे अनेक विलास सोडून येथें लक्ष द्यावयला फुरसत तरी कोणाला होती म्हणा ! आपलें अज्ञान बाहेर पडूं नये म्हणूनच तर त्यांचा एवढा खटाटोप चालला होता ! आपल्या कृष्ण कृत्यांबद्दल चर्चा करण्याचा, अगर जाब विचारण्याचा लोकांना मुळींच धर्मानें अधिकार दिला नाहीं असें त्यांचें मत ! याविरुद्ध जावयाचें जर एखाद्यानें धाडस केलेंच तर त्या विचाऱ्याची पुरी कंबख्ती भरलीच म्हणून समजावयाचें ! मग तो मरेपर्यंत धर्मगुरूंच्या अचाट धर्मजाचांतून जिवंत सुटणें शक्यच नव्हतें. धर्माच्या नांवावर लोकांना हवी तशी छळण्याची जणूं काय यांना ईश्वरदत्त सनदच मिळाली होती ! काय तो त्यांचा नाचरंग ! काय तो त्यांचा बादशाही ऐषआराम ! काय ती त्यांची विषयासक्ति ! काय ती त्यांची व्यसनाधीनता ! जगांतील सर्व दुर्गुणांचे जणूं काय पुतळेच ! धर्माच्या बाबतींत जनता कायमची अंधारांतच खिचपत पडायची म्हणून केलेले काय ते त्यांचे भगीरथ प्रयत्न ! बिचाऱ्यांना काय ठाऊक कीं म्हातारीनें आपला कोंबडा झांकून ठेवण्याचे कितीही प्रयत्न केले तरी दिवस उगवायचा थोडाच राहातो !

धर्मगुरूंच्या अत्याचारांनीं असे हताश होऊं नका ! ख्रिस्ती धर्माच्या क्षितिजावर सुधारणेचा पहाटेपूर्वीचा मंगल शुक्रतारा केव्हांच उगवला होता ! धर्मात माजलेल्या अनेक ढोंगांचें आणि मूर्ख समजुतींचें उच्चाटन करण्याचा प्रयत्न करणारा मार्टिन ल्यूथर लोकांचा आदर्श बनत होता ! धर्मगुरूंच्या अनन्वित कृत्यांमुळें निर्माण झालेल्या पार्श्वभूमीवर त्यानें पदार्पण केलें.

शिवाजी आणि रामदास यांच्या उदयापूर्वी महाराष्ट्राची तरी काय स्थिति होती ? मुसलमानांच्या अरेरावी राजकारणामुळें सगळीकडे बेबंदशाही माजली होती. हिंदूंच्या छळाला पारावार नव्हता. लुटालूट, मारहाण, जाळपोळ, सर्रास चालू होती. आपणावर कोण राज्य करीत आहे, आपणावर कुणाचा अंमल चालू आहे, याची कुणालाच जाणीव नव्हती. हिंदुधर्माची, हिंदूंच्या पवित्र धर्मग्रंथांची त्यांच्या चालीरीतींची, त्यांच्या देवादिकांची चेष्टा नि निंदा यवनी लोक बिन-

धोक करीत. स्त्रियांच्या विटंबनेला तर मर्यादाच नव्हती. गाईंचें रक्त रस्त्यावर हमेश सांडलें जात असे, तरी या कृत्याचा जाब कोणीच विचारायला धजत नव्हता. दुर्दैवाची गोष्ट म्हणजे या सुलतानशाहीच्या चिखलांत हिंदु जनता रुतून गेली होती, इतकेंच नव्हे तर याच स्थितींत ती सुख मानायला लागली होती. शहाजीसारखे शूर मुत्सद्दी लोक अन्यायाचा प्रतिकार करून स्वतंत्र होण्याची अंगांत पूर्ण धमक असतांनासुद्धां अस्थानीं आपली स्वामिभक्ति दाखवून महाराष्ट्राच्या पारतंत्र्याच्या बेड्या अधिकाधिक दृढ करायला मदत करीत होते. रामदासांच्या शद्बांत जरासा फरक करून सांगावयाचें म्हणजे, "सगळे बुद्धीपासून चळले। आचारापासून भ्रष्टले।" अशी स्थिती साऱ्या महाराष्ट्राची झाली होती. याला कांहीं अपवाद नव्हते असें नाहीं; कित्येक तरुणांचें रक्त अन्यायाविरुद्ध व जुलुमाविरुद्ध उसळे. पण त्यांना योग्य म्होरक्यांची उणीव होती. या असह्य परिस्थितीनेंच शिवाजीला स्फूर्ति दिली. लहानपणापासून यवनांकडून गाईंची होत असलेली कत्तल, बहुजन समाजाची श्वानवृत्ती, यवनी धर्माचें हिंदुधर्मावर होत असलेलें आक्रमण पाहात आल्यामुळें शिवाजीच्या हृदयांत जो त्वेष उत्पन्न झाला, त्या त्वेषानेंच हिंदुपदपादशाही स्थापन करायला त्याला चेतविलें. आत्मतेज विसरलेल्या असल्या समाजाला पाहूनच रामदासानीं आपलें जीवितकार्य आंखलें. यवनी राज्यकर्त्यांच्या कारभारानें महाराष्ट्रावर जी एक अवकळा पसरली होती, त्या अवकळेनेंच लोकांत जागृति करण्याचा रामदासाला संदेश दिला.

हिटलर मुसोलिनींचीं ध्येयें व तत्त्वें अननुकरणीय असतील, परंतु एकानें मृतप्राय पडलेल्या जर्मनीला जगातील अत्यंत प्रबळ राष्ट्र बनविलें तर दुसऱ्यानें आपल्या अभिनव राज्यपद्धतीच्या जोरावर इटलीभर नवचैतन्याचें वारें वाहविलें; याबद्दल त्यांच्या शत्रूंचेंसुद्धां दुमत होणार नाहीं. व्हर्सेलच्या तहाचे सूत्रधार जे फ्रान्स ब्रिटनचे कावेबाज मुत्सद्दी, जर्मनी आतां शतको शतकें तरी डोकें वर काढूं शकणार नाहीं या मनोराज्यांत गुंग होते! खरोखरच त्यांनीं जर्मनीची तशीच स्थिती करून टाकली होती. पण थोड्याच वर्षांच्या आंत त्यांचे डोळे उघडायचे होते. महायुद्धानंतर या तहाच्या राक्षसानें जी

एक विशिष्ट परिस्थिती जर्मनींत निर्माण केली, ती परिस्थितीच हिटलरला सर्वाधिकाराचीं सूत्रें हातांत घ्यायला उपयोगी पडली.

भरतखंड गोंधळला होता. पारतंत्र्याच्या बेड्या तोडण्याचा मार्गच मुळीं त्याला सांपडत नव्हता. सशस्त्र क्रान्ती फोल आहे हें जरीं त्याला पटत होतें तरी निःशस्त्र राजकारणाची पुरती ओळखसुद्धां झाली नव्हती. परंतु या राष्ट्रीय आपद्धर्माच्या पार्श्वभूमीवरच महात्माजी अवतरले.

या सर्व उदाहरणांवरुन वरील विधान कसें खरें आहें हें समजून येईल. किंबहुना याच्याही पुढें जाऊन असें म्हणतां येईल कीं, वेगवेगळ्या काळीं समाजांत किंवा राष्ट्रांत जे कांहीं पेंचप्रसंग उत्पन्न होतात, त्यांतून शीरसलामत बाहेर पडतां यावें म्हणून हा समाज किंवा राष्ट्र थोर विभूतींना जन्म देतो. केवळ या परिस्थितीमुळेंच हे पुरुष थोर पदास पोंचतात असा मात्र याचा अर्थ नव्हे; परंतु थोर पुरुषांच्या आयुष्याला विशिष्ट वळण लागायला त्यांच्या मनावर भोंवतालच्या परिस्थितीचे जे ठसे उमटलेले असतात ते कारणीभूत होतात हें खास !

हेंच दुसऱ्या शब्दांत सांगायचें म्हणजे एखाद्या व्यक्तीला सामान्यांतून असामान्य कोटींत न्यायला, तिच्या अंगांतील उपजत गुण व तिचें अलौकिक कर्तृत्व जरी कारण असलें, तरी तिचें व्यक्तिमत्त्व इतरांपेक्षां उच्च प्रकारचें घडविण्याच्या बाबतींत ती व्यक्ती ज्या समाजांत वावरत असेल, त्या समाजांतील आचारविचार व्यवहारांचा, त्याच्या आर्थिक व्यापाचा, त्याच्या शास्त्र व कला यांच्या उपासनेचा, त्यांत चालू असलेल्या धर्म व नीतिविषयक कल्पनांचा, त्याच्या विशिष्ट कायदेकानूंचा, व सर्वांत महत्त्वाचा म्हणजे त्याच्यांतील जीवनविषयक तत्त्वज्ञानाचा फार मोठा भाग असतो. ज्या संस्कृतींत ही व्यक्ती लहानाची मोठी झालेली असते त्या संस्कृतीची छाप तिच्या चारित्र्यावर कमी अधीक प्रमाणांत बसलेली असते; तिच्या आयुष्यांतील महत्त्वाच्या घडामोडींच्या मागें वरील सर्व गोष्टीनें घडवलेली ' पार्श्वभूमी ' असते.

आणि ही दृष्टी पुढें ठेवूनच आपणाला आधुनिक भारतीय समाजाच्या

क्षितिजावर सतत प्रकाशत असलेल्या कांहीं तेजस्वी ताऱ्यांच्या पार्श्वभूमीची ओळख करून घ्यावयाची आहे.

आधुनिक भारतीय समाजसुधारकांच्या पार्श्वभूमीचा विचार करण्या-पूर्वी प्राचीन आणि मध्ययुगीन भारतीय समाजसुधारकांच्या कार्याचें अगदीं थोडक्यांत सिंहावलोकन करून घेणें योग्य होईल. असें करण्यांत दुहेरी हेतु आहे. एक तर आधुनिक भारतीय समाजसुधारकांनीं प्रचलित केलेलीं तत्त्वें बहुतांशीं प्राचीन नि मध्ययुगीन यांच्या तत्त्वावर आधारलेलीं आहेत. दुसरें म्हणजे असे केल्यानें भारतांतील सबंध विचार नि समाजक्रान्तीचे एक ओझरतें दर्शनही आपणांस होईल.

निरिच्छ, निःस्वार्थी, आणि त्यागी अशा पूज्य ऋषींनीं जतन करून ठेव-लेल्या पवित्र वेदांच्या या भरतभूमींत, कृष्णानें गीतेच्या द्वारें कर्मयोगाचा धडा घालून दिला. बुद्धाच्या सरळ, सोप्या, आकर्षक नि हृदयाला भिडून जाणाऱ्या शब्दांनीं बौद्ध धर्माला जन्म देऊन वैदिक धर्मावर पसरलेली धूळ दूर केली. भारताला सदैव ललामभूत होऊन बसलेल्या राजा अशोकानें बौद्ध धर्माचा अंगीकार केला, आणि त्याचा सर्वत्र प्रसार करण्याचा विडा उचलला. त्याच्या कारकिर्दींत सर्व बाजूंनीं भारताचा उत्कर्ष झाला. बौद्ध धर्माच्या अंकुशानें जागा झालेला वैदिक धर्म डोळे चोळीतच बसला नाहीं तर शंकराचार्यांच्या रूपानें त्यानें साऱ्या भरतखंडांत जागृति घडवून आणली. यावर कांहीं काळ लोटला; संस्कृत भापा मागें पडूं लागली; प्राकृत भापा प्रचारांत आल्या; यवनांच्या स्वाऱ्यांनीं देश हादरूं लागला. जनतेच्या ज्ञानसूर्यावर अज्ञानाची नि आलस्याची अभ्रें येऊं लागलीं. अशा तेजोहीन बनलेल्या लोकांना ज्ञानेश्वरांनीं प्राकृत भांड्यांतून घरोघर गीतामृत पाजून त्यांच्या धार्मिक भावना उद्दीप्त केल्या. तुकारा-मानें संसार करूनही परमार्थ कसा साधतां येतो हें सामान्य जनांस समजावून देऊन त्यांच्या सद्भावना चेतविल्या. पण रामदास याच्याही पुढें गेले. त्यांनीं खरी परिस्थिती ओळखली. परिस्थितीनेंच त्यांना काय केलें पाहिजे हें शिकविलें असें म्हणणें जास्त सयुक्तिक होईल. सत्त्वहीन झालेल्या लोकांना सतेज करून सोडायला त्यांनीं जितेंद्रिय तेजाचा पुतळा मारुति आणि नीतिमत्तेचा मूर्तिमंत अवतार राम या दोन देवांच्या भक्तीचा प्रसार केला. या मार्गानें लोकांचें

शारीरिक तसेंच मानसिक व नैतिक बळ वाढवून "केल्यानें होत आहे रे। आधीं केलेंचि पाहिजे !" हा महामंत्र त्यांना दिला. "जनीं मरोनी उरावें कीर्तिरूपें !" या त्यांच्या उपदेशानें तरुणांच्या हृदयांत नवजीवन ओतलें. "धर्मासाठीं मरावें......मरतां मरतां घ्यावें राज्य आपुलें" या स्फूर्तिदायक शब्दानीं तारुण्याचा वन्ही चेतवून म्लेंच्छ लोकांचें "बहुता दिवसांचें माजलेलें बंड" मोडून टाकून 'मराठा तितुका मेळवून' आणि 'महाराष्ट्र धर्म' वाढवून सगळीकडे हिंदुपदपादशाही स्थापण्याच्या महत्त्वाकांक्षेचें बीज त्यांनीं साऱ्या महाराष्ट्रभर पेरलें. शिवाजीनें त्यांची महत्त्वाकांक्षा सफल केली. परंतु शिवाजीनंतरच भारतभूच्या स्वातंत्र्यसूर्याला पुढें होणाऱ्या खग्रास ग्रहणाचें दुहीच्या रूपानें वेध लागायला प्रारंभ झाला. याबरोबरच समाजाच्याही प्रगतीला खंड पडल्याप्रमाणें झालें. ध्येयाचा विसर, जहागिरीची हाव, स्वजना-वरील अविश्वास व परकीयांवरील फाजील विश्वास, दैववादावर भिस्त, उच्च शीलाचा अभाव, नीतीकडे दुर्लक्ष आणि कुकर्माकडे धांव, सुखलोलुपतेची अवास्तव वाढ वगैरे राष्ट्रविघातक दुर्गुणांनीं भारताच्या तेजोभंगाला सुरवात झाली. मध्यंतरीं पहिले बाजीराव, माधवराव, रामशास्त्री वगैरे कांहीं तुरळक तेजस्वीं रत्नें चमकून गेलीं. पण भारतावर परकीयांच्या हपापलेल्या अफाट लोभाचे जे गडद कृष्णमेघ येत होते ते दूर सारायला यांचा फारसा उपयोग झाला नाहीं. अमावास्येचा गडद अंधकार मध्येंच चमकलेल्या विजेनें अधिक भीषण नि भयानक वाटतो. वरील पैकीं कुणालाच भारताला सांवरून धरणें शक्य न झाल्यामुळें, अशांतलाच प्रकार झाला. शेवटच्या ऐषआरामीं रंगेल पेशव्यांच्या अमदानींत तर सर्व हिंदुस्थानभर नामर्दपणाला जणूं काय ऊत आल्याप्रमाणें झालें होतें. अशी परिस्थिती असतांना पेशवाईचा अस्त झाला. हें साल १८१८ होतें. इथूनच भारतीय समाजाच्या आधुनिक इतिहासाला प्रारंभ होतो.

आधुनिक इतिहासाला जरी सुरवात झाली, तरी भारतांत आधुनिक युगाला मात्र या वेळेपासूनच आरंभ झाला असें म्हणतां येणार नाहीं. निराशेचें भयानक साम्राज्य साऱ्या हिंदुस्थानभर पसरलें होतें. एकूणएक हिंदवासीयांची स्थिती भांबावल्याप्रमाणें झाली होती. एवढीशी श्वेतवर्णीयांची व्यापारी कंपनी

ती काय ! पहिल्यान्दां कुणाचें लक्षसुद्धां गेलें नाहीं तिच्याकडे ! पोट भरायला इतक्या लांबून आलेले बिचारे लोक, म्हणून त्यांच्याकडे पुष्कळजण सहानुभूतीनेंच पहात ! आणि ही मूठभर लोकांची कंपनी थोडक्याच अवधींत आपल्या चंचुप्रवेशाचें मुसलप्रवेशांत रूपांतर करतें ती काय ! सारेंच विलक्षण ! लोकांची स्थिती विजेचा धक्का बसल्याप्रमाणें झाली. काय होतें आणि झालें काय, या विचारांनींच साऱ्या हिंद जनतेला मूढावस्था प्राप्त झाली. केवळ विद्युद्गतीनें कंपनीनें हिंदुस्थानांत आपल्या राज्याचा डोलारा उभारला. कुटिल राजनीति, भेदनीति, फसवेगिरी, विश्वासघात, वगैरे राज्यशास्त्राला संमत असलेलीं साधनें त्यांनीं वापरलीं असतील, पण किती चपळाईनें नि चातुर्यानें त्यांनीं हें सारें केलें! हां हां म्हणतां एवढें मोठें राष्ट्र त्यांनीं जेव्हां आपल्या घशाखालीं उतरवून इकडच्या लोकांवर आपली सत्ता गाजवायला प्रारंभ केला, आणि सगळीकडे आपण केलेले कायदे कानू जारी केले तेव्हां खरोखरच लोकांनीं आश्चर्यानें व विस्मयतेनें तोंडांत बोटें घातलीं ! बाकी लहान मुलांप्रमाणें, वेळींच तीं बाहेर काढण्याचें भान पुष्कळ दिवस न राहिल्यामुळें इंग्रजांचें मात्र बरेंच फावलें. जनतेच्या या बधिरावस्थेचा, सगळीकडे स्थिरस्थावर करून सर्वांवर आपली पूर्ण छाप बसविण्याच्या बाबतींत मात्र या नूतन धूर्त राजकर्त्यांनीं भरपूर फायदा घेतला. ज्यांच्यासमोर एकाकाळीं इंग्रज मान देण्यासाठीं व• आदर दर्शविण्यासाठीं आपल्या माना वांकवत असत तेच इंग्रज त्यांच्याकडून क्षुल्लक बाबतींत नाकदुऱ्या काढून घेऊं लागले ! ज्यांना खूष करण्यासाठीं पुष्कळदां इंग्रजांच्या खिशाला चट्टा बसे, त्याच एतद्देशियांवर, इंग्रजांची मर्जी सुप्रसन्न राखण्याकरितां मोठमोठ्या रकमा उकळण्याचा प्रसंग आला. ज्यांचा पाहुणचार लाभला तर आपणाला जे मोठे धन्य म्हणून समजत, तेच इंग्रज, आज त्याच जहागिरदारांवर आपल्या इच्छा लादून त्यांच्याकडून हक्कानें वाटेल ते वसूल करून घेऊं लागले! काय हा काळाचा महिमा ! धन्यांच्या नशिबांत नोकर व्हायचें आलें, आणि नोकराच्या कामाला सुद्धां नालायक असलेले हे लोक धनी होऊन बसले ! असें विपरीत कां व्हावें ?

दुर्दैव आणखी काय ? नशिबापुढें कुणाचें चालणार ? विधिघटना अगाध आहे ! खरोखर कलियुगाला सुरवात झाली ! लोक वैतागानें आपणाशींच

पुटपुटत. केव्हां केव्हां दैवाला दोष देऊन हताशपणें सुस्कारेही सोडीत. आपणांत मुरलेल्या दोषामुळेंच ही विकट परिस्थिती प्राप्त झालेली आहे हें फारच थोडक्यांना ठाऊक होतें इतक्या खोलांत जायला हवी असलेली विचार शक्ति तर केव्हांच लुप्तप्राय झाली होती. घटोत्कची मायाबाजाराला फिक्कें पाडणाऱ्या या परिस्थितीमुळें उत्पन्न झालेल्या स्तिमितावस्थेंत अजून लोक होते. यांत भर टाकायलाच कीं काय, आगगाड्या, तारायंत्रें वगैरे नवीन नवीन शोध त्यांना धक्के देत होते. 'चाक्या म्हसोबा' तर त्यांच्या कल्पनाशक्तीच्या बाहेरचा होता. कित्येकांनीं त्याला नवस करायलाही कमी केलें नाहीं. कांहीं तरी जादु-टोण्यामुळें किंवा पूर्वपुण्याईनें हीं साधनें गोऱ्या लोकांना प्राप्त झालेलीं आहेत, आणि केवळ यांच्याच जोरावर ते एवढ्या मोठ्या हिंदुस्थानावर आपला अंमल चालवूं शकतात असें म्हणण्यापर्यंत कांहीं लोकांची मजल गेली होती. अशा प्रकारच्या कल्पना एकदां डोक्यांत ठाण मारून बसल्यावर, या अमानुष लोकांचा प्रतिकार करण्याची गोष्ट कुणाला सुचणेंच शक्य नव्हतें! पेशवाईच्या अगर त्याच्या अगोदरच्या काळांत, कांहीं तरी शौर्याची कामगिरी बजावून किंवा आणखी कोणत्याही तऱ्हेनें आपल्या अंगांतील कर्तबगारी दाखवून एखादें वतन अगर जहागिरदारी मिळविण्याची महत्त्वाकांक्षा बाळगायला पुष्कळ अवसर होता. परंतु इंग्रजी अमदानींत तें मुळींच शक्य नव्हतें! हरिनामाची ढाल पुढें करून व चकाट्या पिटीत बसून मिष्टान्न खाण्याचे ब्राह्मणांचे बाजीरावी दिवस आतां मागें पडले होते. सामान्य जनतेला 'कारकुनांच्या कारखान्याकडे' वळण्याव्यतिरिक्त दुसरा मार्ग राहिला नव्हता. अंगांतील हुशारी दाखविण्याचे हें एकच क्षेत्र मोकळें राहिलें होतें. गडबड करून देशांतील स्वास्थ्यास धोका आणण्यासारखे व राजकर्त्यांच्या कार्यांत व्यत्यय आणण्यासारखे जे होते, त्यापैकीं पुष्कळांना चाणाक्ष इंग्रजांनीं हरप्रयत्नांनीं आपल्या मार्गांतून दूर केलें; कांहींना पेन्शनी भाकरीचा तुकडा घालून गप्प करण्याचा प्रयत्न केला. हा हजारों बंधनांनीं युक्त असलेला शिळा भाकरीचा तुकडा चघळीत रहाण्यांत त्यांना फार मोठें स्वारस्य वाटत होतें असें नाहीं. पण ते तरी काय करणार? बरें बहुजन समाजाकडे आशेनें पहाण्यांत कांहींच अर्थ नव्हता. तो नुसता

जिज्ञासाशून्य व निष्क्रिय होऊन बसला होता. सारांश या वेळीं अखिल भारताला चैतन्यविरहित दगडी पुतळ्याचें स्वरूप आलें होतें.

या पुतळयाला नवचैतन्य आणण्याचें, याच्यांत जीव घालून याला सजीव, चालता बोलता नि तडफदार करण्याचें ज्या ज्या महाभागांनीं या वेळेपासून आजतागायत प्रयत्न केले, त्यापैकीं कांहींच्या चारित्र्याच्या पार्श्वभूमीचा विशिष्ट पद्धतीनें या निबंधांत आपणाला विचार करावयाचा आहे.

पण याच्या अगोदर इ. स. १८१८ पासून १९४२ पर्यंतच्या साधारण सव्वा शतकाच्या काळांत भारतानें अगदीं नैराश्य युगापासून, साऱ्या जगाला सत्याग्रही राष्ट्रीय क्रांतिकार्याचें नवीन तत्त्वज्ञान शिकविण्याची पात्रता येईपर्यंत, जी आपली प्रगति करून घेतली, तिचें अवलोकन करूं; कारण या भल्या मोठ्या कालखंडांत, अज्ञानाच्या घोर निद्रेंतून भारत हळुहळू जागृतावस्थेंत कसा आला व त्याला आपल्या परिस्थितीचें खरें स्वरूप कसें समजून आलें, त्याचप्रमाणें स्वसामर्थ्याची त्याला कशी व कोणत्या तऱ्हेनें जाणीव झाली, आणि साऱ्या जगाला एक नवीन तत्त्वज्ञान शिकविण्याची आपणांत पात्रता आहे असें वाटण्याइतका त्याच्यांत आत्मविश्वास कोणी, कसा व केव्हां उत्पन्न केला, या सर्वांबद्दलचा इतिहास समावलेला आहे.

आंकडेवारीच्या भाषेंत बोलायचें म्हणजे इ. स. १८१८ पासून १८८५ पर्यंत काल हा निराशेचा, अस्पष्ट असंतोषाचा, अनुकरणाचा, पुष्कळदां अंधानुकरणाचा–असह्यतेचा व परावलंबनाचा गेला म्हणावयास हरकत नाहीं. पण या काळांतलि नैराश्याचा अंधकार हा भारतांत कायमचें ठाण मारून बसण्याकरतां आला नव्हता. हा पहाटेपूर्वीचा काळोख होता. रम्य उषःकालाचीं चिन्हें याच काळांत दृग्गोचर झालीं. ब्रिटिशांवर प्रसन्न असलेल्या विज्ञानशास्त्राला आपण पारखे असल्यामुळेंच आपली ही स्थिती झाली, अशी समजूत करून घेतल्यामुळें ब्रिटिशांच्या अनुकरणांत आपलें हित आहे असें त्या काळच्या समाज सुधारकांचें मत होतें. धर्मसुधारणेनें, सामाजिक सुधारणेनें, शैक्षणिक सुधारणेनें आपली आर्थिक आणि राजकीय सुधारणा सहजासहजीं घडून येईल, असें मानणारा एक वर्ग या काळीं भारतीय समाजाला जागृत करावयाला उपयोगीं पडला. ब्रिटिशांशीं सर्व बाबतींत सहकार्य करण्यांतच भारताच्या उत्कर्षाचीं बीजें सांठवलेलीं

आहेत असा त्यांचा दृढ विश्वास होता. या वर्गाचे अध्वर्यु म्हणून, उत्तरहिंदुस्थानांत राजा राममोहन राय व दक्षिणेकडे सरदार गोपाळराव हरि देशमुख उर्फ 'लोकहितवादी' यांचा प्रामुख्यानें उल्लेख करतां येईल. विधवा-विवाह चालू करणें, सतीची चाल बंद करणें, लोकांत चालू परिस्थितीबद्दल विचार पसरविणें, बाह्य जगाची ओळख करून घेण्याची इच्छा लोकांत उत्पन्न करणें, आणि धार्मिक बाबतींत एक विशिष्ट 'सुवर्णमध्य पंथ' काढणें ही या वर्गाची समाजसुधारणेच्या दृष्टीनें केलेलीं कामें म्हणून सांगतां येईल. लोकांत जागृति करून आपल्या मतांचा प्रसार करण्यासाठीं वर्तमानपत्रांचा उपयोगही याच कालापासून करण्यांत येऊं लागला. या कार्यास हातभार लावण्याचें कार्य ज्या व्यक्तींनीं केलें, त्यांचा नामनिर्देश केला पाहिजे. 'दर्पण' साप्ताहिक व 'दिग्दर्शन' मासिक काढून आपल्या सुधारकी विचारांचा जनतेंत प्रसार करणारे, व नवमतांना पसरविण्याचा प्रयत्न करणारे बहुभाषी बाळशास्त्री जांभेकर, मराठीचे सुप्रसिद्ध व्याकरणकार व जातिभेदांचें उच्चाटन करूं पाहणाऱ्या 'परमहंस मंडळी' नामक एका गुप्त संस्थेचे जनक दादोबा पांडुरंग तर्खडकर, धर्मबाह्य कृत्यें करण्यांतच पुरुषार्थ मानणारे व 'सुखदायक राज्यप्रकरणीं' निबंधाचे कर्ते विष्णुबुवा ब्रह्मचारी, ब्राह्मणविरोधी पण हाडाचा सच्चा समाजसेवक ज्योतिबा फुले, देवेंद्रनाथ वगैरे या व्यक्ति होत.

इ. स. १८१८ ते १८७५ च्या काळाला 'न्यूनगंडा'चा काळ असें म्हणतां येईल. परंतु १८७५ पासून ही स्थिती निवळली. न्यूनगंडाचा जरी कायमचा अस्त झाला नाहीं तरी या वेळेपासून १८९५ पर्यंत भारतीय समाजांतील प्रमुख व्यक्तींना स्वत्वाची ओळख पटूं लागली. भारतीय संस्कृतिबद्दलचा अभिमान, आपल्या भावी कर्तृत्वाबद्दल आशावाद व सुधारलेल्या स्वतंत्र राष्ट्रांच्या मालिकेंत जाऊन बसण्याची दुर्दम्य इच्छा, वगैरे शुभ लक्षणांनीं दुमदुमलेलें युग असा याचा उल्लेख करतां येईल. बंगाल, पंजाब, मद्रास आणि महाराष्ट्र या प्रांतांत प्राचीन संस्कृतीच्या अभिमानाच्या पायावर देशसुधारणा करण्याचे विचारसंप्रदाय निर्माण झाले. आर्य समाज, थिऑसफी आणि महाराष्ट्र धर्म इत्यादि विचारसंप्रदाय याच हेतुपूर्ततेसाठीं प्रचारांत आले. भारतीय संस्कृतीचें खरेंखुरें तत्त्वमंथन याच काळांत झालें. "खरी उन्नति व्हावयाची

असेल तर प्रथम उन्नत धर्माचा प्रसार झाला पाहिजे. जोपर्यंत धर्मजागृति झाली नाहीं तोपर्यंत देशास या खटपटींत खरें यश यावयाचें नाहीं. प्रथम आत्म्याचीच उन्नति झाली पाहिजे. ( भांडारकर लेख व व्याख्यानें पृष्ट ३४२ ) ........ तुमचीं धर्मविषयक ध्येयें जर उच्च प्रकारचीं नसलीं तर सामाजिक, राजकीय अगर आर्थिक क्षेत्रांत तुमची प्रगति होणें कदापिही शक्य नाहीं. " ( न्यायमूर्ति रानडे ) असें म्हणणारा रानड्यांचा 'नेमस्त प्रागतिक पंथ,' "भारतीय आर्य-संस्कृतीच्या आंतून पोखरलेल्या जरठ वटवृक्षांत कांहींच त्राण उरलेलें नाहीं ! तें आंतून अगदीं शुष्क झालें आहे व त्याचें खोड व फांद्या डळमळूं लागल्या आहेत. याला आतां असेंच उभें ठेवण्यास व यापासून नवीन शाखांचा उद्भव होऊन यास फिरून नवीनावस्था आणण्यास एकच उपाय आहे. तो कोणता म्हणाल तर त्याची खूप खच्ची करून त्यास अर्वाचीन कल्पनांचें भरपूर पाणी द्यायचें ! असें केलें तरच त्याचें पूर्व स्वरूप पूर्ण नष्ट न होतां त्यापासून नूतन शाखावृत वृक्ष अस्तित्वांत येईल पण तसें न केलें तर त्यावर प्रस्तुतकाळीं चोहोंकडून जे तीव्र आघात होत आहेत त्याखालीं तें अगदीं जेर होऊन जाऊन अखेरीस जमिनीवर उलथून पडेल.........मूळ प्रकृति म्हणजे भारतीय आर्यत्व न सोडतां या पाश्चिमात्य नवीन शिक्षणाचा व त्याबरोबर ज्या नवीन कल्पना येत आहेत त्यांचा आम्हीं योग्य रीतीनें अंगीकार करीत गेलों तरच आमचा निभाव लागणार आहे." असें प्रतिपादणारा, आगरकरांचा विवेकवाद, बुद्धिप्रामाण्यवाद, आणि समतावाद या त्रयींवर आधारलेला 'जहालराष्ट्रवाद' आणि "स्वतंत्रतेचा किंवा राष्ट्रीयत्वाचा अभिमान म्हणून जो कांहीं जोम आहे, तो जोपर्यंत जागृत असतो, तोंपर्यंत समाजरचना कशीही असली तरी त्यांतील दोष राष्ट्राच्या उन्नतीस अथवा भरभराटीस आड येत नाहींत. पण एकदां का तो जोम नाहींसा झाला म्हणजे तेच दोष रावणाच्या धनुष्याप्रमाणें छातीवर बसून जगांतल्या लोकांची उपहास्यता होण्यास कारण होतात ! तात्पर्य विशिष्ट समाज-रचनेपेक्षां, लोकांमध्यें एकप्रकारचा आपल्या संस्थांबद्दल व देशाबद्दल अभिमान जागृत ठेवण्याची प्रत्येक देशकल्याणाकरितां झटणाऱ्या माणसानें आधीं तजवीज ठेविली पाहिजे" (टिळकांचे केसरीमधील लेख भाग ४), या मताचा चिपळूणकर, टिळक, राजवाडे वगैरे प्रभृतींचा 'स्वाभिमानी राष्ट्रवाद', या सर्वांचा या

काळांत फार मोठा संघर्ष घडून आला. याचा परिणाम सर्व भारतभर नव चैतन्यमय स्फूर्तीचे वारे वाहाण्यांत झाला. मराठी भाषेच्या शिवाजीनें काढलेल्या निबंधमालेनें तर लोकांच्या नुकत्याच उपजलेल्या स्वाभिमानाच्या वेलीला तेजस्वी विचारांचें भरपूर पाणी घालण्याचें काम उत्तम प्रकारें तडीस नेलें. आपल्या देशाला दुर्दिन यायला विज्ञानाशीं असलेला आपला परकेपणा हेंच केवळ कारण नसून, मुख्य कारण इंग्रजांचें भारतावरील पद्धतशीर आर्थिक आक्रमण आहे, ही गोष्ट या कालांतच पहिल्या प्रथम जनतेच्या डोळ्यांसमोर आणण्याचें महत्कार्य दादाभाई नौरोजी यांनीं केलें. न्यायमूर्ति रानडे यांनीं त्यांचेंच व्रत पुढें चालवून राष्ट्रीय अर्थशास्त्राच्या पायावर नेमस्त प्रागतिक राजकारणाची मुहूर्तमेढ रोवली. " बोले तैसा चाले " ही उक्ती सार्थ करणाऱ्या सार्वजनिक काकांच्या स्वदेशी व्रतानेंही लोकांना अननुभूत असा एक धक्का दिला. भारताच्या धार्मिक क्षेत्रांतसुद्धां याच काळांत बऱ्याच मोठ्या घडामोडी झाल्या. बंगाल प्रांतांतील जे सुशिक्षित लोक ब्राह्मसमाजान्वयें, केशव चंद्रांच्या नेतृत्वाखालीं अजाणतां ख्रिस्ती धर्माकडे झुकत होते, त्यांना मागें खेंचून धरण्याचें काम रामकृष्ण परमहंसांनीं केलें. त्यांचा पट्ट शिष्य विवेकानंद यांनीं तर आपल्या अमोघ वक्तृत्वाच्या जोरावर साऱ्या जगाचें हिंदुधर्माकडे आणि त्यांतील तत्त्वज्ञानाकडे लक्ष वेधून घेतलें. आणि इकडे दयानंद स्वामींनीं आपल्या आर्य समाजाद्वारें हिंदुसमाजाला आक्रमक स्वरूप देण्याचा कसोशीनें प्रयत्न केला. बालविवाह, स्त्रीदास्य, जन्मसिद्ध अस्पृश्यता वगैरे समाजांतील अनेक दोषांचा प्रतिकार प्रत्यक्ष कृतीनें करण्यास याच कालांत सुरवात झाली. भारताच्या सामाजिक सुधारणेची बौद्धिक पार्श्वभूमि तयार करण्याचें महत्कार्य जर कोणी केलें असेल तर तें डॉ. रामकृष्ण भांडारकरांनीं. कुठलीहि सुधारणा चिरकाल टिकायची असेल तर ती भावनेपेक्षां "शास्त्रशुद्ध" पायावर आधारलेली असली पाहिजे, हें मर्म त्यांनीं ओळखलें !

भारताच्या इतिहासांतील अत्यंत महत्त्वाचें वर्ष म्हणजे १८८४साल. याचवर्षी राष्ट्रसभेची प्राणप्रतिष्ठा झाली ! हिंदुस्थान आणि इंग्लंड यांमध्यें जो राजकीय संबंध घडून आलेला आहे तो परमेश्वरी प्रसादाचें फल असून, तो निरंतर टिकविण्यांतच भारताचें खरेंखुरें हित सांठवलेलें आहे अशी जी भोळी समजूत

इ. स. १८१८ ते १८७५ च्या दरम्यान बोकाळलेली होती ती नाहींशी करण्याचे कसून प्रयत्न जर केव्हां झाले असतील तर ते याच काळांत ! कायदेशीर चळवळींचे व जहाल राष्ट्रवादाचे जनक लोकमान्य टिळक या कालखंडाच्या शेवटीं जनतेसमोर आले.

यापुढील १९२० पर्यंतच्या काळाला टिळक-युग म्हणावयाला मुळींच हरकत नाहीं.

या पंचवीस वर्षाच्या अवधींत भारत किती पुढें गेला !—

आगरकरांनीं पेटविलेली समाज सुधारणेची ज्योत टिळकांनीं जरी राजकारणावर अधिक भर दिला तरी न विझतां, अधिकाधिक प्रज्ज्वलित होत चालली. भारत-भूषण तसेच राजमान्य गोखल्यांनीं त्यागी लोकांचा आश्रम ऊर्फ 'भारत सेवक समाज' याच काळांत स्थापन केला. जनतेंत नवविचार फैलावत होते. संघटनेचें महत्त्व त्यांना कळून चुकलें होतें. सर्व अनर्थांचें मूळकारण पारतंत्र्य आहे याची त्यांना जाणीव झाली होती. 'स्वराज्य हा प्रत्येकाचा जन्मसिद्ध हक्क आहे' हा महामंत्र लोकमान्यांकडून त्यांना शिकविण्यांत आला होता. भारतीय संस्कृतीची सर्वांगीण उन्नति करण्यासाठीं कितीतरी प्रयत्न केले गेले. अनेक शैक्षणिक संस्था स्थापन झाल्या. सारांश १८१८ सालीं ज्या भारतीय समाजाची स्थिती निर्जीव अशा धातूच्या ओतलेल्या पुतळयाप्रमाणें झाली होती ती स्थिती या टिळक-युगांत पूर्ण लुप्त होऊन या पुतळयांत जीव ओतण्यांत आला. आधुनिक भारतीय समाजपुरुषाला चालता बोलताच नव्हे तर चांगला धडधाकट बनविण्याचा मान टिळकांकडे जातो.

थांबा ! भारताच्या क्षितिजावर एक दैदिप्यमान तारा उगवला होता. त्याच्याकडे लक्ष द्या ! १९२० पर्यंत चालू असलेल्या सर्व विचारप्रवाहांचा गोड संगम घडवून आणून, त्यांतून एक नवीन क्रांतिशास्त्र तयार करून जनतेसमोर ठेवणाऱ्या एका महान् व्यक्तीला भारतभूनें जन्म देऊन आपलें सुवर्णभूमि हें नांव सार्थ केलें होतें.

ही महान् व्यक्ति म्हणजे महात्मा गांधी !

आपल्या अहिंसा, सत्याग्रह वगैरे अगदीं हृदयाला जाऊन भिडणाऱ्या अमोल शस्त्रांनीं त्यांनीं हां हां म्हणतां साऱ्या जनतेचीं मनें काबीज केलीं.

हिंदुस्थान खडखडीत जागा होऊन व धट्टाकट्टा बनूनच राहिला नाहीं तर महात्माजींनीं त्याला झटपट कामाला लावलें. त्याला आत्मबलाचें महत्त्व पटलें. स्वतःच्या पायावर उभा राहाण्यास तो शिकला. सत्य आणि अहिंसा या दोन तत्त्वांवर विश्वास ठेवून, त्यांना मार्गदर्शक केल्यास आपला केव्हांही, कुठेंही, कुठल्याहि परिस्थितींत, कोणत्याही बाबतींत अधःपात होणें शक्यच नाहीं हें तत्त्वज्ञान साऱ्या जनतेंत फैलावून त्या बरहुकूम त्यांना कार्य करण्यास लावण्यासाठीं महात्माजींनीं आपलें सारें आयुष्य वेंचलें आहे.

गांधीजींच्या कार्याचा भारतावर काय परिणाम झाला हें आज आपण जाणतोंच आहोंत. नैतिक बळ वाढविल्याशिवाय, आणि कसल्याही चळवळीचा पाया आध्यात्मावर उभारलेला असल्याशिवाय कोणत्याही क्षेत्रांतील सुधारणा यशस्वी होणें अशक्य हें त्यांनीं जनतेला समजावून दिलें. मानवी जीविताचें अंतिम ध्येय गांठायला, पाश्चात्त्य संस्कृति कुचकामाची असून सर्वांनीं पौर्वात्यांच्याचकडे धांव घेतली पाहिजे, हें त्यांनीं आपल्या कृतीनें पटवून दिलें आहे.

महात्माजींनीं भारतीय समाजांत पवित्र जागृति घडवून आणून त्याला सतेज नि शीलवान् बनण्याचा प्रयत्न केला. या कालांतील दयानंद सरस्वतींचें आक्रमक तत्त्व जोरानें अंमलांत आणून हिंदुमहासभेनें, हिंदुसमाजांत केलेली एकमार्गी अप्रतिम संघटना, स्वातंत्र्यवीर सावरकरांनीं भारताकरितां सोसलेली झीज, कविवर्य रवीन्द्रनाथांच्याद्वारें भारताच्या नैतिक तेजाची आणि विश्वव्यापी तत्त्वज्ञानाची जगभर पसरलेली प्रभा, भारतमातेचे अंधभक्त सुभाषचंद्र बोस यांनीं तिच्या प्रीत्यर्थ केलेली कामगिरी, त्यागमूर्ति जवाहिरलालांचें कार्य वगैरे लक्षांत घेतां या युगाला गांधीयुग म्हणण्याऐवजीं ‘ आत्मप्रत्ययाचें, जागृतीचें नि संघटनेचें युग ’ म्हणणेंच जास्त सयुक्तिक होईल.

आधुनिक भारतीय समाजाच्या प्रगतीच्या इतिहासाचें थोडक्यांत अवलोकन करून या निबंधाची पार्श्वभूमि तर आपण एकदांची तयार केली. आतां मुख्य विषय जो ‘कांहीं सुप्रसिद्ध आधुनिक भारतीय समाजसुधारकांची पार्श्वभूमि’ त्याकडे वळूं.

ही पार्श्वभूमि समजून घेतांना राजा राममोहन राय, सरदार गोपाळराव हरि देशमुख उर्फ लोकहितवादी, महर्षि दादाभाई नौरोजी, न्यायमूर्ति रानडे, गोपाळ गणेश आगरकर, लो. टिळक, महात्मा गांधी यांचा क्रमशः विचार करूं.

# प्रकरण २ रें.

## आधुनिक भारतीय आद्य सुधारकांचे अग्रणी

## राजा राममोहन राय

"माझ्या मनाला जें योग्य वाटतें, तें विचारांत, उच्चारांत आणि आचारांत आणतांना मी कुणाचीही पर्वा करणार नाहीं."

राजा राममोहन राय.

"या युगाच्या आरंभीं पाश्चात्त्य शिक्षणानें नास्तिक व पाखंड वादाची अशी भयंकर लाट या देशांत उसळली होती कीं, तिनें कित्येकांच्या मताप्रमाणें लौकरच सर्व देश आक्रमून हिंदुधर्म आमूलाग्र उखळून काढला असता. परंतु ईश्वराच्या अचिन्त्य नियतीमुळें त्यावेळीं राजा राममोहन राय हा एक अलौकिक पुरुष निर्माण झाला. व त्यानें एकेश्वरी पंथ नामक एक नवीन लाट उत्पन्न केली त्यामुळें पुढें येणारी आपत्ति टळली."

( नवयुग धर्म-स. कृ. फडके )

"त्यांनीं ( राजा राममोहन ) जें काम केलें त्याच्याशीं तुमच्या आमच्या सारख्या शेंकडों लोकांच्या कामाची तुलना केली तर त्यांनीं केलेलें काम फारच अधिक आहे असें मानावें लागतें. ते एकाच काळीं सामाजिक सुधारक होते, एका थोर धर्म संस्थेचे संस्थापक होते, व तसेच ते महान् राजकारणी पुरुषही होते. हे तिन्ही प्रकारचे उद्योग त्यांच्या ठिकाणीं अशा रीतीनें एकवटून चालत असत कीं, सध्यां आपल्यांत जे श्रेष्ठ पुरुष आहेत त्यांना आपल्या कर्तव्याकडे पाहून लाजच वाटली पाहिजे."

न्यायमूर्ति रानडे.

एक बालक मोठ्या चौकस बुद्धीनें आणि जिज्ञासायुक्त डोळ्यांनीं आपल्या आजोबांच्या चाललेल्या शिवलिंग पूजेकडे लक्ष लावून पाहाण्यांत अगदीं गर्क होऊन गेला होता. त्याचे ते टरटरीत डोळे, सरळ नाक, कपाळावर लोंबकळत भुरुभुरु उडणारे काळेभोर कुरळे केस आणि आल्हाददायक उफळणारें बाल्य, कुणाचेंही लक्ष एका क्षणांत आपल्याकडे वेधून घ्यायला पूर्ण समर्थ असल्याची ग्वाही देत होतें. त्याचा प्रत्येक अवयव त्याच्या अवखळ-पणाची साक्ष देत होता. तसं पाहिलें तर तो कांहीं वयानें फारसा मोठा दिसत नव्हता. फारतर सात आठ वर्षाचा असेल! परंतु त्याच्या नसानसांतून चापल्य नुसतें ओसंडत आहे असा भास होत होता. अगदीं तन्मयतेनें आणि एकाग्र-तेनें तो आपल्या आजोबांची पूजा करतांना चाललेली प्रत्येक कृति पाहात होता. त्याला बाह्य जगाची शुद्ध नव्हती. आपली आई तारिणीदेवी जवळ बसलेली आहे हें सुद्धां तो विसरला होता. श्यामभट्टाचार्यांच्या भक्तीनें प्रसन्न होऊन साक्षात् ईश्वरच या बालयोग्याच्या रूपानें, त्यांच्या पूजेचा स्वीकार करण्यासाठीं आला तर नसेल, असा विचार या बालकाला पाहून कुणाच्याही मनांत खास उत्पन्न झाला असता.

"शंभो ऽ ऽ ऽ ऽ!" श्यामभट्टाचार्यांनीं मोठ्यानें घोष केला. साहाजिकच त्यांचें लक्ष पूजेकडे टक लावून पाहात असलेल्या आपल्या नातवाकडे गेलें. त्याची ती तन्मयता पाहून कदाचित् हा आपली शाक्तपंथीय धर्मगुरूची गादी मोठ्या उज्ज्वलतेनें नि तत्परतेनें चालवील असा एक आशादायक विचारसुद्धां त्यांच्या मनांत ओझरता येऊन गेला असेल. मोठ्या कौतुकानें आणि अभिमानानें त्यांनीं आपल्या जवळच्या ताटातलें एक विल्वपत्र घेतलें आणि तें पुढें करून ते म्हणाले, "बाळ, हें विल्वपत्र घे, आणि ह्या कैलासपति शिवलिंगावर तें अर्पण कर पाहूं. तुला फार फार मोठं व्हायचं आहे ना? मग देवाला एक साष्टांग नमस्कार घाल बघूं!"

बालक या शब्दांनीं एकदम भानावर आला. एखाद्या यांत्रिक बाहुली-प्रमाणें त्याचा हात तें बिल्व पत्र घ्यावयाला पुढें आला. त्यानें तें विल्वपत्र घेतलें. पण......

बिल्वपत्र शिवलिंगावर वहाण्यास मात्र त्याचा हात पुढें आला नाहीं. या दगडाला नमस्कार कशाला करावयाचा, त्याची पूजा कां करावयाची, त्याला निरनिराळ्या वस्तू कां अर्पण कराव्या वगैरे अनेक विचारांनीं या बालकाचें मन भरून गेलें होतें कीं काय कोणास ठाऊक ! पण कांहीं न बोलतां त्यानें तें बिल्वपत्र फक्त कुस्करून टाकलें.

नातवाची ही अवलक्षण कृति पाहून श्यामभट्टाचार्यांना केवढा मोठा धक्का बसला ! त्यावेळीं त्यांना काय ठाऊक कीं हा बालक पुढें साऱ्या समाजाला पुष्कळ धक्के देण्यासाठींच जन्मला होता. नातवाच्या या अनपेक्षित कृत्यानें तो कडवा शिवभक्त अगदीं चिडून गेला. आपली मुलगी वैष्णव धर्मीयाला देण्याचा मूर्खपणा केल्याबद्दल स्वतःवर चरफडलासुद्धां पुष्कळ ! आपला नातू पित्याच्या वळणावर जाऊन वैष्णव पंथाचा कट्टा उपासक तर होणार नाहीं ना, या विचारानें तर त्यांच्या अंगाची लाहो लाही झाली. त्रीनेत्रधारीच्या भक्ताला शोभेल अशा मोठ्या क्रोधानें ते कडाडले, " तूं कोणत्याही पंथांत न रहातां दुसऱ्या धर्मात जाशील."

आजोबांची निराशा करणारा हा बालक म्हणजेच भारतांत सर्वांगीण सुधारणेची आधुनिक ज्ञानज्योति पेटवण्याचा पहिला मान ज्यांच्याकडे जातो ते राजा राममोहन राय होत.

'मुलाचे पाय पाळण्यांत दिसतात' या म्हणीप्रमाणें लहानपणांत आजोबांच्या मनाचा विरस करणाऱ्या या बालकानें आपल्या कृतीनें मोठेपणीं कितीतरीजणांच्या आपल्या विषयींच्या अपेक्षांचा भंग केला. हिंदुधर्माभिमानी तर त्यांच्या बाबतींत पूर्ण निराश झाले होते. राजा राममोहन रायाला त्यांनीं वाळींत टाकण्यासही कमी केलें नाहीं. आकाशांतील बाप्पाच्या पवित्र शास्त्राचा जगभर प्रसार करण्याच्या उदात्त (?) हेतूनें प्रेरित होऊन आलेले मिशनरी पाद्री केवढ्या आशाळभूत नजरेनें त्यांच्याकडे पहात होते. ! त्यांची जवळ जवळ खात्रीच झाली होती कीं, केव्हांतरी एक दिवस हा भावनावश गृहस्थ ख्रिस्ती मेंढरांच्या कळपांत दाखल होणार ! येशू ख्रिस्तासंबंधीं वेळोवेळीं राम मोहनांनीं काढलेले प्रशंसोद्गार ऐकून तर त्यांना वाटलें कीं, सावज पक्कें जाळ्यांत सांपडलें. आतां फक्त बाप्तिस्माचा विधी होण्यापुरताच स्वर्ग दोन बोटें दूर राहिला होता !

राममोहनसारख्या सुशिक्षित, प्रतिष्ठित विद्वान् गृहस्थानें ख्रिस्ती धर्माचा स्वीकार करणें म्हणजे काय कमी महत्त्वाची गोष्ट होती? हा ख्रिस्ती धर्माचा भला मोठा विजय ठरणार होता. ख्रिस्ती धर्मानें हिंदुधर्मावर केलेली कुरघोडी म्हणून ही गोष्ट ओळखली जाणार होती. ख्रिस्ती धर्म हा हिंदुधर्मापेक्षां सरस आहे हें सिद्ध करायला पाद्र्यांना कितीतरी सोपें जाणार होतें! आणि सर्वात्र महत्त्वाचें म्हणजे राममोहनचें हें धर्मांतर आणखी कित्येकांना येशूच्या कळपांत येण्याची स्फूर्ति देण्यास कारणीभूत होण्याचा संभव होता. पण हाय! मिशनरी बुवांचे हे मनांतले मांडे मनांतच जिरले! त्यांचीं हीं मनोराज्यें पूर्ण धुळीस मिळालीं. ख्रिस्ती धर्मावर कांहीं बाबतींत राममोहननें केलेल्या निर्भीड टीकेमुळें पाद्र्यांनीं निराश होऊन त्यांचा कायमचा नाद सोडला. तरीसुद्धां थोडीबहुत जी आशा तग धरून होती ती ब्राह्मसमाजाच्या स्थापनेनें पूर्ण जळून खाक झाली. कित्येकवेळां आपल्या मतांकरितां इंग्रजांसही दुखविण्यास राममोहननें मुळींच कमी केलें नाहीं.

राजा राममोहनच्या चरित्राचें जरी वरवर अवलोकन केलें तरी त्यांचा जीवितप्रवाह हा एकसारखा धडपडत, धडाडीनें, बेदरकारपणानें आणि बेफामपणानें वहात गेला असल्याचें चटकन लक्षांत येतें. त्यांची धर्मसुधारणा घ्या, समाजसुधारणा घ्या, अगर इतर कोणत्याही क्षेत्रांतलि त्यांच्या एखाद्या विशिष्ट कामगिरीवर दृष्टिक्षेप करा; प्रत्येक ठिकाणीं त्यांच्या अंगांतील निर्भय बेडरपणा स्पष्ट दृष्टोत्पत्तीस येतो. जिकडे म्हणून त्यांना कांहीं वैगुण्य आढळलें तें नाहींसें करतांना त्यांनीं जगाची पर्वा केली नाहीं, कोण काय म्हणतात इकडे पाहिलें नाहीं आणि लोकनिंदेला भीक घातली नाहीं.

परंतु त्यांचा आयुष्याला ज्या परिस्थितीनें असें वळण लावलें त्या परिस्थितीची ओळख करून घेतल्याशिवाय, त्यांच्या जीवितकार्याचें योग्य आकलन होणार नाहीं. राजा राममोहनचें जीवनरहस्य समजावून घ्यायचें असल्यास, पहिल्या प्रथम या त्यांच्या पार्श्वभूमीकडे आपण वळलें पाहिजे व तिनें त्यांच्या जीवनावर कसे कसे परिणाम केले इकडे लक्ष पुरवलें पाहिजे.

पहिल्यांदा राममोहन हे समाजाच्या पुढें आले ते धार्मिक क्षेत्रांतील चळवळ्ये म्हणून! आजसुद्धां सामान्य जनतेच्या मनांत ब्राह्मसमाजाचे संस्था-

पक या नात्यानें त्यांना अधिक मोठें स्थान आहे. धर्मानें हें जें राममोहनचें लक्ष सर्वाआधीं ओढून घेतलें त्याला कारणेंही तशींच महत्त्वाचीं होतीं.

इ. स. १७७२ साल, म्हणजे ज्या वर्षीं राममोहनचा जन्म झाला तो काळ पूर्ण अंदाधुंदीचा नि धामधुमीचा होता. राममोहनची मातृभूमि जी बंगाल तिची अवस्था तर अत्यंत शोचनीय झाली होती. मोंगलांच्या पडतीचे ते दिवस होते ! एक अस्तास जाणाऱ्या व एक उदयास येणाऱ्या अशा दोन परस्पर विरोधी राज्याधिपतींच्या छत्राखालीं लोक अगदीं भरडून निघत होते. नीति-- अनीतीचा विचार न करतां कोणत्याही मार्गानें धन मिळविणें हें ज्यांचें ध्येय, अशा लोभी इंग्रज व्यापाऱ्यांचा एतद्देशीय भोळ्या लोकांना, हजारों क्लृप्त्यांनीं नि दरेक उपायांनीं, पिळून काढण्याचा पद्धतशीर प्रयत्न चालू होता. गुप्त घराण्यांतलि देशद्रोही पेढीवाल्यांसारखे आणखी कित्येक हरीचे लाल या त्यांच्या उद्योगांत सक्रिय मदत करून, आपला नीच कार्यभाग उरकून घेण्यांत मोठा पुरुषार्थ मानीत होते ! जमीनदारांना आपल्या साऱ्याशिवाय दुसरें कांहींच दिसत नव्हतें. त्यांच्या तावडींत सांपडलेल्या बिचाऱ्या कुळांचें सर्व बाजूंनीं अक्षरशः शोषण चाललें होतें. धर्माच्या बाबतींत तर विचारण्याची सोयच नव्हती. हिंदुधर्माच्या उदात्त स्वरूपाचा केव्हांच अस्त झाला होता. हिंदुधर्मांतील उच्च तत्त्वांची जागा अज्ञानानें आणि अंधश्रद्धेनें बळकावली होती. भक्तीवर आधारलेला वैष्णव पंथ विषयसुखांत मग्न झाला होता, तर शाक्तपंथांत तामसी वृत्तीनें कहर उडवून दिला होता. देवदेवतांच्या पवित्र देवळांत गरीब मुक्या निरपराधी जनावरांच्या रक्ताचा नेहमीं पाट वाहात असे ! प्रतापचंद मुजुमदारांच्या शब्दांत सांगायचें म्हणजे, " साऱ्या बंगाल इलाख्यांतील अर्धे बोकड एकट्या दुर्गादेवीलाच लागत. " हें तिच्या प्रतिस्पर्धी देवतांच्या भक्तांना कसें रुचायचें ? तेही ईर्षेला पेटून आपल्या दैवतांना बोकडच नव्हे, तर रेडे, कोंबड्या वगैरे इतर वेगवेगळ्या प्राण्यांचें रक्त अर्पण करून, त्यांचा रुचिपालट करीत. राजा कृष्णचंद्र राय नांवाच्या एका देवीभक्तानें तर आपल्या आराध्य देवतेस खुष करण्यासाठीं ६३५८९ बकरे गुणोत्तर वाढीनें बळी दिले. अशा प्रकारें आपल्या भक्तीचें प्रदर्शन करण्याची लोकांमध्यें अहमहमिका चालू होती. धर्माच्या नांवाखालीं मद्यमांस सेवन करून साधेल तसा अनाचार करण्यांतच

कित्येक आपणाला धन्य मानून घेत होते. खुद्द राममोहन रायांच्याच कुलाकडे पाहिल्यास, पहिल्यांदा धर्माकडे ते कां वळले हें सहज समजून येईल. राममोहनची आई कट्टया शाक्तपंथीयाची मुलगी, तर त्यांचा बाप वैष्णवशिरोमणि वज्रविनोद यांचा चिरंजीव ! या दोन्ही पंथांची जी नेहमीं खडाजंगी चाले, ती लहानपणापासून अवलोकनांत आल्यामुळें, एकाच धर्मीयांचा आपापसांत कलह निर्माण करणाऱ्या या धर्माचाच त्यांना वीट येणें साहाजिकच होतें. अशा वेळीं सदेह स्वर्गारोहण करण्याच्या मोहक कल्पनेला बळी पडून, जगन्नाथाच्या रथाखालीं अगर गंगेच्या जलांत पुष्कळजण देह समर्पण करीत असलेले पाहून आत्महत्या करण्यास अनुमोदन देणाऱ्या या धर्माचाच त्यांना अत्यंत तिरस्कार वाटूं लागला. एखाद्या शस्त्राचा दुरुपयोग करणाऱ्यावर न रागावतां त्या शस्त्रावरच दांत ओठ खाण्यापैकींच हा कांहींसा उतावळेपणाचा नि अपक्वपणाचा प्रकार होता असें म्हटल्याशिवाय राहावत नाहीं, ही गोष्ट निराळी.

लहानपणांत धर्माच्या बाबतींत उत्पन्न झालेल्या या चलबिचलीचें मोठ्या वादळांत रूपांतर केव्हां झालें असेल तर तें त्यांना अरबी नि फारशी भाषेचें ज्ञान झाल्यावर ! मुसलमानी धर्माचें कुराण, ताब्रिज, रूमी प्रभृती, सुफी पंथाच्या कवींचे ग्रंथ, ॲरिस्टॉटल, युक्लिड इत्यादिकांच्या वाचनानें तर त्यांच्या मनांत अतिशयच गोंधळ उडवून दिला. प्रथम हिंदुधर्माचें पूर्ण ज्ञान करून घेऊन, त्यांतील खऱ्या तत्त्वांचा—रुढींचा नव्हे—अभ्यास केल्याशिवाय, इतर धर्मांत अवगाहन करण्याचा अव्यापारेषु प्रयत्न केल्यामुळें या भावनावश तरुणाची जी एक प्रकारची स्थिती झाली, त्या स्थितींतूनच पुढें ब्राह्मसमाजाचा उगम झाला असें म्हणण्यास हरकत नाहीं. योग्य मार्गदर्शकाशिवाय त्यांनीं हें जें इतर धर्मांचें धांवतें वाचन केलें, त्यामुळें आधींच तत्कालीन हिंदुधर्मांतील आचारामुळें कलुषित झालेलें त्यांचें मन अधिकच बुचकळ्यांत पडलें. तारुण्यसुलभ उतावळेपणानें त्यांनीं एक मूर्तिपूजेचा निषेध करणारा निबंध पारशी भाषेंत लिहिला.

इकडे एक महत्त्वाची गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे. विचार अगर मतें पक्कीं असोत अगर कच्चीं असोत, मनाला एकदां पटलीं म्हणजे, मोठ्या धैर्यानें कुणाला न कचरतां राममोहन तत्काल तीं आचरणांत आणीत, कदाचित त्यांत

दोष आढळलेच—अर्थात त्यांना—तर ते काढून टाकण्यासही तयार नसत असें नाहीं. हेंच त्यांचें वैशिष्ट्य होय ! मनाला जें पटेल त्याला शेवटपर्यंत दृढ चिकटून राहावयाचें हा त्यांचा बाणा होता. मूर्तिपूजा–विरोधकाची भूमिका स्वीकारल्यामुळें त्यांना आपल्या साऱ्या आप्तांचा विरह सहन करावा लागला. आईबापांच्या प्रेमाला त्यांना कायमचें पारखें व्हावें लागलें. याच्या अगोदर ते पाटणा येथें विद्यार्जनाला असतांना एकदां आजारीपणांत वैद्यांच्या सल्ल्यावरून त्यांनीं मांसरस सेवन केल्याचें जेव्हां त्यांच्या वडिलांना कळलें होतें तेव्हांच त्यांना गृहत्याग करावा लागला होता; पण ते डगमगले नाहींत.

बौद्धधर्मांत मूर्तिपूजेसंबंधीं काय सांगितले आहे हें प्रत्यक्ष अनुभवानें पहाण्यासाठीं ते तिबेटांतही गेले ! याला म्हणतात खरी जिज्ञासावृत्ति ! मात्र इकडेही त्यांच्या नशिबांत निराशाच ठेविली होती. धर्मविषयक तळमळ लागलेल्या या आधुनिक बुद्धाचें समाधान तिबेटांत जाऊनही झालें नाहीं. उलट तिबेटी लोकांच्या जीवनांत व धर्मांत लामाचें असलेलें अवास्तव प्रस्थ पाहून त्यांच्या धर्मभोळेपणाचा राममोहनना अगदीं वीट आला. तिबेटसारख्या दूरच्या नि परक्या देशांत ते आलेले ! तिबेटी लोकांच्या वेडगळ धार्मिक समजुतींबद्दल कांहींही वाटलें तरी त्या बद्दलचें मत मनांतल्या मनांत ठेवण्याचा व्यवहारीपणा दाखवावयाचा तर तेंही नाहीं ! मनांत जें दिसलें तें या महाशयांनीं तडफातडफी बोलूनही टाकलें. कितीही उदारमतवादी असला तरी त्याला आपल्या धर्मावर कुणीही प्रामाणिक टीका केलेलीसुद्धां सर्वसाधारणतः आवडत नसते. मग अडाणी तिबेटी लोकांची काय कथा ! राममोहनच्या सुदैवानें कांहीं तिबेटी स्त्रिया मध्यें आल्यामुळें ते थोडक्यांत देहदंडांतून बचावले ही गोष्ट निराळी.

प्रचलित हिंदुधर्म, बौद्धधर्म, मुस्लिमधर्म, खिस्तीधर्म वगैरेंच्या अखोल अभ्यासानें गोंधळून गेलेल्या राममोहनच्या मनःस्थितीनें ब्राह्मसमाज स्थापण्याच्या कल्पनेला कसा जन्म दिला हें पहाणें कमी मनोरंजक होणार नाहीं.

नुकत्याच पारशी आणि अरबी भाषांशीं तोंडओळख झालेल्या राममोहननीं एकाच झटक्यांत कुराण वाचून टाकलें. कुराणांतील उथळ तत्त्वज्ञान समजण्यासही भारतीय तत्त्वज्ञानाइतकें अवघड नव्हतें. मुख्यत्वें त्यांतील मूर्तिपूजनाच्या खंडनानें, त्यांच्या काळजालाच हात घालून त्यांना आकर्षून घेतलें. पण हळुहळू त्यांची बुद्धि

प्रगल्भ होऊं लागली! याच सुमारास उदरनिर्वाहार्थ डिग्वीसाहेबांशीं शिरस्तेदारांचें काम करतांना इंग्रजी भाषेशीं त्यांचा संबंध आला. थोडक्याच दिवसांत आंग्ल भाषेंतही ते पूर्ण पारंगत झाले. यामुळें साहाजिकच अनेक पाश्चात्त्य विचारप्रवाहांशीं त्यांचा संपर्क घडून आला. स्वतंत्रपणें विचार करून कोणत्याही विषयांत ते अगदीं खोल जाण्यास शिकले. "महमंद पैगंबराला ईश्वराचा प्रेषित मानलें तर आपोआपच त्यानें स्थापिलेला धर्म सत्य ठरतो. याचा अर्थ बाकीचे सर्व विद्यमान धर्म म्हणजे थोतांड अर्थात् त्याज्य समजायचे. पण असें होणें शक्य आहे का? पैगंबराच्या पूर्वीपासूनच कित्येक वर्षें चालू असलेले अनेक धर्म खोटे म्हणणें शहाणपणाचें कसें ठरेल? जगांतील प्रत्येक धर्म आपली महती गायचा प्रयत्न हा करायचाच! प्रत्येक धर्मानें आपलें श्रेष्ठत्व ठरविण्यासाठीं आणि तें दुसऱ्यावर लादण्यासाठीं प्रयत्न केलेला आढळतो. आपला संप्रदाय वाढविण्यासाठीं सर्व धर्मांतील लोकांनीं सरसकट खोटेनाटे प्रयत्न केले आहेत. हिंदुधर्मच कदाचित याला अपवाद ठरेल! भोळ्या आणि श्रद्धाळु लोकांस फसवून त्यांची दिशाभूल करण्यासाठीं आपल्या धर्मसंस्थापकांच्या गळ्यांत त्यांच्या अभिमान्यांनीं जबरदस्तीनें अनेक अद्‌भुत चमत्कार घातले आहेत. ज्याच्यावर अमानुषता व कर्तुमकर्तुम् सामर्थ्य लादलें गेलें नाहीं असा एकही धर्मसंस्थापक नाहीं. कोणी आकाशांतून उडून जातो, कोणी अंतराळांतच भ्रमण करीत असतो, कोणी मेलेल्यास जिवंत करतो, तर कोणी सजीवास नुसत्या हुंकारानें अगर दृष्टिक्षेपानें मारून किंवा जाळून टाकतो, कोणी थडग्यांतील प्रेतांना खडखडीत जागा करतो, तर कोण बारा मास भक्तांची हरेक प्रकारची सेवा करण्यांतच गुंग होऊन जातो. मुसलमान धर्म याला अपवाद नाहीं; ख्रिस्ती धर्म या दोषापासून सोंवळा आहे असेंही नाहीं; हिंदुधर्म तर अचाट कृत्यांनीं भरून गेला आहे. सारांश कोणत्याही धर्मांत राम नाहीं म्हणायचा! मग सत्य धर्म कोणता? अशा प्रकारचे कितीतरी बुचकळ्यांत टाकणारे प्रश्न राममोहनना सारखे बेचैन करीत. त्यांच्या बुद्धीला प्रौढत्व येत असल्याचें हें सुचिन्ह होतें. अशा प्रकारची त्यांच्या मनाची स्थिती असतांना केवळ धर्माबद्दलचा चर्चारूपानें विचार करून आपलीं धर्मविषयक मतें निश्चित करण्यासाठीं 'आत्मीय सभा' स्थापण्यांत आली. या सभेचे मुख्य प्रेरक राममोहन असून, द्वारकानाथ ठाकूर, नंदकिशोर बोस वगैरे तरुण विचारांची मंडळी ही

प्रेरणा उचलून धरणारे होते. प्रत्येक धर्माची काळीच बाजू अधिक ठळकपणें दिसून आल्यामुळें राममोहनच्या आत्म्याला समाधान लाभत नव्हतें. आत्म्याला शांत करायला कोणता तरी धर्म हवा होता. मग कोणत्या धर्माचा स्वीकार करावा ? आत्मीय सभेंतील प्रत्येक सभासदाला कोणताही धर्म निर्दोष दिसत नसे ! प्रत्येक धर्म दोषांचें आगरच दिसे ! हा काळ राममोहनच्या आयुष्यांत फार महत्त्वाचा होता. क्षणोक्षणीं त्यांचे विचार बदलत होते. सुकाणू वगैरे सर्व शाबूत असलेल्या वादळांत सांपडलेल्या जहाजाप्रमाणें त्यांचें मन हेलकावे खात होतें. क्षणांत ते ख्रिस्ती धर्माकडे झुकत तर दुसऱ्याच क्षणीं इस्लामही त्यांच्या मनाला भुरळ घाली. ख्रिस्ती धर्माची सामुदायिक प्रार्थनेची पद्धत त्यांना जितकी आवडे तितकीच मुसलमानी धर्मांचीं तत्त्वेंही त्यांना प्रिय वाटत. हिंदुधर्माचा पुष्कळ बाबतींत जरी त्यांना तिटकारा आला होता तरी तो खुद्द धर्माचा नसून धर्माच्या नांवाखालीं चाललेल्या ढोंगांचा म्हणावा लागेल. याला तिटकारा म्हणण्याऐवजीं वैताग म्हणणेंच जास्त सयुक्तिक होईल. म्हणूनच कितीही टीकेचे ताशेरे झाडले तरी त्यांच्यानें हिंदुधर्माचा प्रत्यक्ष त्याग मात्र करवला नाहीं हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. त्यांचें एक मन हिंदुधर्मातील दोष दाखवी, तर दुसरें मन--ज्यामध्यें हिंदुधर्मावरील प्रेम गुप्तरूपानें वास करीत होतें--इतर धर्मातील त्यांच खळगे दाखवी. यामुळेंच कुठल्याही दुसऱ्या धर्माकडे ते वळूं शकले नाहींत. मन तर हिंदुधर्मावरहुकुम कांटे-कोरपणानें वागावयास तयार नव्हतें. मनाला पटत नसणाऱ्या गोष्टींनीं समाधान लाभणें अशक्यच ! मग कोणत्या धर्माची त्यांनीं कास धरावी ?

याच वेळीं आपल्या कल्पनेप्रमाणें एक आदर्श नवयुग धर्म स्थापण्याची त्यांना स्फूर्ति यावयाला एक महत्वाचें कारण घडलें.

ख्रिस्ती धर्म प्रचारकांनीं हिंदुधर्मावर आणलेल्या संक्रांतीनें राममोहनना 'आतां कांहीं तरी केलें पाहिजे' ची जाणीव करून दिली. आपल्या पवित्र धर्माचा प्रसार करण्याचें कंकण बांधून आलेले लोक ते ! ते सत्यासत्याची पर्वा कशाला करतील ? ख्रिस्ताच्या अनुयायांच्या संख्येंत भर पडली कीं झालें त्यांचें काम ! मग असें करतांना कोणतीहि कुटील नीति वापरली तर त्यांत काय बिघडलें ? धर्मप्रसाराचें पुण्य (?) एवढें जबरदस्त कीं या पुण्यसागरांत

कितीहि पापें सपशेल बुडून जातात ही त्यांची प्रामाणिक समजूत! अशी स्थिती असतांना अज्ञ व रानटी—त्यांच्या दृष्टिकोनांतून—हिंदवासियांना खरा धर्म दाखवून त्यांचा उद्धार करण्याच्या सदिच्छेनें आलेले हे ख्रिस्ती बाबा नीतिअनीतींची चाड कशाला बाळगतील? यांच्याच धर्मबंधूंच्या अनन्वित कृत्यांनीं आधींच दारिद्र्य बोकाळलें! अशा या दारिद्र्यावस्थेंत मदतीची लालूच दाखवून संकटग्रस्त गरिबांना ख्रिस्ती जाळयांत ओढून घेण्याचे अश्लाघ्य प्रयत्न नेहमीं चालत असत. एकाला नोकरीचें आश्वासन, तर दुसऱ्याला लग्नाचें आमिष, तर तिसऱ्याला इनामाचें वचन वगैरे धर्मांतराकडे नेणारे कितीतरी मार्ग ते अवलंबीत! कित्येकांना अडचणीच्यावेळीं द्रव्याच्या द्वारें मदत करून मग ते वेळेवर न फेडल्याच्या सबबीवर त्याला धाकधपटा दाखवून त्याच्याकडून कर्जनिवारणार्थ धर्मांतराचा मोबदला घेण्यासही ते मागें पुढें पहात नसत! सारांश संकटग्रस्तांना ते जी मदत करीत ती भूतदयेनें प्रेरित होऊन नसे; तर फाजील धर्मप्रेमानें अंध झाल्यामुळें! एवढेंच करून ते थांबले नाहींत, तर मूर्तिपूजा करणारा हिंदुधर्म खोटा, निंद्य, कुचकामाचा, अर्थात् त्याज्य आहे हें सिद्ध करण्यास ते पुढें सरसावले. हिंदुधर्मावर वाटेल तसा खोटानाटा आरोप करण्यास ते कचरत नव्हते. केव्हां धर्माची निंदा, तर केव्हां देवांची नालस्ती, तर केव्हां धर्मविषयक पवित्र समजुतींचें विडंबन करून, ख्रिस्ती धर्माचें श्रेष्ठत्व लोकांवर बिंबविण्याचा प्रयत्न त्यांच्याकडून नित्य चाले. हिंदुधर्माची त्यांनीं पर्वा तरी कां करावी? हिंदुधर्म पोरका झाला होता. त्याचा पाठीराखा कोणी नव्हता. राज्यकर्ते बोलून चालून परधर्मीय! पाश्चात्यांच्या अघटित विक्रमानें, सुशिक्षित म्हटल्या जाणाऱ्या हिंदु लोकांना, आपल्या चाली रीति, आपली संस्कृति, आपला धर्म, वगैरे सर्व कांहीं अग्राह्य नि तिरस्करणीय वाटायला लागलें होतें.

हिंदुधर्माबद्दल जरी राममोहनना फारसा जिव्हाळा वाटत नव्हता, तरी त्यांतील वेदांत वगैरे गहन विषयांबद्दल त्यांना अत्यंत अभिमान वाटत असे. ख्रिस्ती मिशनऱ्यांची कृत्यें त्यांना सहन झालीं नाहींत. ज्यांनीं हिंदुस्थानांतील चार पावसाळेसुद्धां पुरते पाहिले नाहींत आणि ज्यांना संस्कृत भाषेचा नुसता गंधही नाहीं अशा लोकांना हिंदुधर्माबद्दल बोलण्याचा मुळींच अधिकार नाहीं,

आणि त्याच्यावर टीका करण्याचा तर नाहींच नाहीं असें त्यांना वाटे. मिशनऱ्यांच्या छिद्रान्वेषणबुद्धीचा धिक्कार करून, धर्मांतराच्या या चळवळीला उद्देशून राममोहन आपल्या एका लेखांत म्हणतात, "धर्मासंबंधीं तटस्थता राखण्याचें आपलें धोरण ब्रिटिश सरकारनें जाहीर केलें आहे. असें असूनसुद्धां जितांच्या धर्माची उघड उघड निंदा करून जेत्यांच्या धर्माचा प्रसार करण्याचा प्रयत्न करणें म्हणजे जाहीर केलेल्या धोरणाचा खून पाडणें नव्हे काय? हिंदु व मुसलमान धर्मांचीं फक्त वैगुण्यें दाखविण्याकरितांच व्याख्यानबाजी करणें हें अधमपणाचें आहे. धार्मिक वृत्तीचें हें खास लक्षण नव्हे. ऐहिक सुखाची लालूच दाखवून धर्मांतर करविणें ही मोठ्या शरमेची गोष्ट आहे. धर्माला या योगानें लांछन येतें ही साधी गोष्ट पाद्रीबुवांना कशी समजून येत नाहीं कोणास ठाऊक!' ('राजा राममोहन राय'–एन्. सी. गांगुली)

या स्थितींत तेल ओतण्यासाठींच कीं काय डेरोझिओ नांवाचा एक तरुण प्राध्यापक हिंदु कॉलेजांत आला. त्याचीं सारीं मतें कांहीं और होतीं. व्यक्तिस्वातंत्र्याबद्दलच्या त्याच्या कल्पना भलत्याच होत्या. पाशवी इच्छांचें कोडकौतुक पुरविण्यांत साऱ्या जीविताचें ध्येय सांठवलेलें आहे असें या महाशयास वाटे. इंग्रजी शिक्षणाचा अंमल चढल्यामुळें कानांत वारा जाऊन चौंफेर उड्या मारणाऱ्या वासराप्रमाणें स्थिती झालेल्या, आणि स्तिमितावस्थेंत चांचपडत असलेल्या कितीतरी तरुणांना त्यानें हां हां म्हणतां आपणाकडे आकर्षून घेतलें. गोमांसभक्षण, मद्यप्राशन वगैरेंचा पुरस्कार करणारा आणि सर्व प्रचलित धर्मांची आणि त्यांतील देवादिकांची भंबेरी उडवून देण्यांत कृतकृत्य मानणारा असा एक वर्ग त्याच्या नेतृत्वाखालीं होऊं घातला होता.

या सर्व बेजबाबदार वृत्तीला आळा घालण्याकरितां व बहकलेल्या लोकांना शुद्धीवर आणून योग्य मार्गदर्शन करण्यासाठीं राममोहननीं एक नवीन पंथ काढण्याचें ठरविलें. त्यांच्या मतांशीं संमत असलेल्या अनेक मित्रांनींही त्यांना प्रोत्साहन देऊन सक्रिय मदत करण्याचें अभिवचन दिलें. आणि ब्राह्मसमाजाची स्थापना झाली. (इ. स. १८२८). "हिंदु धर्माची सुधारणा करावी, एकेश्वरी धर्मतत्त्वांचा प्रचार सर्वत्र करून सर्व धर्मांचें अंतरंग एकच आहे हें दाखवून द्यावें आणि जगांतील धर्मभेदांचा अंधार नष्ट करणाऱ्या सार्वत्रिक विश्वधर्माच्या

सूर्याचा प्रकाश सर्वत्र पसरवावा, अशी त्यांची थोर महत्त्वाकांक्षा होती."
( आधुनिक भारत )

राममोहनांच्या आयुष्यावर धर्माचे कसकसे संस्कार होत गेले आणि त्याचा काय परिणाम झाला हें आपण पाहिलें. हिंदूंचें उपनिषदांतील वेदांतशास्त्र आणि पाश्चात्यांची भौतिक दृष्टी यांचा समन्वय व्हावा असें त्यांस वाटे. लोक-शिक्षणाकडे जेव्हां ते वळले, तेव्हां या दृष्टीनेंच पाश्चात्य विद्येवर त्यांनीं अधिक भर दिला. हिंदुस्थानांत प्रचलित असलेलें धर्मविषयक, वेदांतविषयक, स्मृति-विषयक, व्याकरणविषयक, परमार्थविषयक शिक्षण, भौतिक शिक्षणाची जोड मिळाल्याशिवाय कुचकामाचें आहे असें त्यांनीं प्रतिपादलें. असें करण्यांत आपल्या देशाची सुधारणा व्हावी हाच एक त्यांचा निर्मळ हेतु होता. नाहीं तर त्यांनीं स्थापिलेल्या 'वेदांत कॉलेज' मधील सारें शिक्षण मातृभाषेंतूनच-बंगालीं-तूनच देण्यांत यावें असा त्यांचा कटाक्ष असल्याबद्दलचें सर्वश्रुतच आहे. त्यांनीं जी ग्रंथसंपत्ति निर्माण केली तीही बंगालीमधूनच !

राममोहनांच्या जीविताच्या पार्श्वभूमीचा दुसरा महत्वाचा घटक म्हणजे स्त्रियांची त्या काळची स्थिति !

तिबेटांतील लोकांच्या धर्मवेडामुळें जेव्हां राममोहनांच्या प्राणावर बेतली होती तेव्हां तिबेटी स्त्रियांच्या प्रेमळ अंतःकरणामुळेंच त्यांची सुखरूप सुटका होऊं शकली हें ते विसरलें नव्हते. याचवेळीं अखिल स्त्री जातीबद्दल त्यांच्या मनांत आदर उत्पन्न झाला. स्त्री समाजाची सर्व बाजूंनीं उन्नति आणि कल्याण करण्याचा प्रयत्न करण्याचें त्यांनीं ठरावेलें.

खरोखरच त्या काळच्या स्त्रियांची स्थिती अत्यंत अनुकंपनीय झाली होती. त्यांना स्वतःचें असें अस्तित्वच नव्हते मुळीं ! कन्या विक्रय खुशाल चाले. त्यांना समजूं लागण्यापूर्वीच पडद्याच्या आड त्यांचें आयुष्य लोटण्यांत येई. सूर्याचे किरण सर्वगामी म्हणतात; पण ते सुद्धां या दुर्दैवी रूढींत रुतलेल्या स्त्रियांजवळ पोंचण्यास धजत नसत. मग विचारा ज्ञानसूर्य तरी काय करणार यांच्या बाबतींत ? बहुपत्नीकत्वाच्या चालीनें तर त्यांच्या दुःखांत अधिक भर घातली होती. साठ वर्षांचा वृद्ध तरुण, नात शोभणाऱ्या मुलीचें बोट धरून सप्तपदी करीत असलेला हमखास दिसून येई. नवऱ्याच्या मृत्युनंतर त्याच्या

पत्नीनें जाळून घेऊन प्राणत्याग करणें ही विधिलिखिताइतकीच ठरलेली गोष्ट होती. राममोहनच्या कोमल मनाला जर कोणत्या गोष्टीनें धक्का दिला असेल, कोणत्या गोष्टीनें जर ते अधिक चिडून गेले असतील, तर ते या सतीच्या चालीनें ! ही दुष्ट चाल समाजांतून कायमची बंद करून टाकण्यासाठीं त्यांनीं अविश्रांत खटपट केली. सतीच्या चालीचे पूर्ण निर्मूलन व्हायला त्यांचे श्रमच कारणीभूत झाले, असें म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं. सतिच्या बाबतींत त्यांनीं एवढें लक्ष घालायला एक कारणही घडलें.

त्याचें असें झालें ! त्यांचा वडील भाऊ जगमोहन जेव्हां वारला तेव्हां त्याची तरुण पत्नी प्रेताबरोबर सती जाण्यास तयार झाली. त्या काळची चालच तशी होती ! राममोहननीं तिचें मन वळविण्याची आपणांकडून होईल तितकी पराकाष्ठा केली. पण छे: ! ती कांहीं आपल्या निश्चयापासून ढळली नाहीं. कदाचित् लोकनिंदेला, जनापवादाला व अपकीर्तीला घाबरून तिनें त्यांच्या म्हणण्याला रुकार दिला नसेल. परंतु चितेच्या ज्वाळा अंगाला झोंबल्यावर तिचा निश्चय बदलला. मोठ्यानें किंकाळी फोडून तिनें जेव्हां बाहेर पडण्याचा प्रयत्न केला तेव्हां तिच्याभोंवतीं जमलेल्या धर्ममार्तंडांनीं आणि तिच्या आप्तांनीं तिला तसें करूं न देतां उलट बांबूनें ढोंसून आंत घातलें व तिच्या आरोळ्या ऐकूं येऊं नयेत म्हणून ढोलकीं वगैरे वाजवण्यास आरंभ केला. राममोहनच्या प्रत्यक्ष डोळ्यांसमोर हा हृदयद्रावक प्रकार घडला. त्यांनीं प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला. पण त्यांना कोण दाद देणार ! त्याचवेळीं या दुष्ट चालीचा त्यांनीं नायनाट करण्याची प्रतिज्ञा केली. या प्रसंगानें राममोहनांचे मन हळहळून गेलें, तरी लोकांना हें नेहमींचेंच झालें होतें. सती जाणाऱ्या स्त्रियांच्या मृत्यूमुळें मालमत्तेचा वारसाहक्क प्राप्त होण्यासारखा जर संभव असला तर मग कित्येक पाषाणहृदयी लोक या दुर्दैवी स्त्रियांवर सती जाण्यासाठीं जबरदस्ती करीत. त्यांच्या सर्व प्रयत्नांनीं त्या वळल्याच नाहींत तर भांगेसारखा मादक पदार्थ पेयांतून अजाणतां पाजून बेशुद्धावस्थेंत स्त्रियांना चितेबरोबर जाळल्याचीं उदाहरणेंही घडत.

या सर्व गोष्टींचा परिणाम राममोहनच्या मनावर झाला असल्यास काय आश्चर्य ! आपल्या कांहीं सुधारक मित्रांच्या मदतीनें ही घातकी चाल बंद

करून टाकण्याचा त्यांनीं अगदीं कसून प्रयत्न केला. सरकारला या बाबतींत हात घालण्याबद्दलची विनंति करणारा त्यांनीं जो एक अर्ज सादर केला होता त्यावरून ' सतीनें ' त्या काळांत अमानुषत्व कसें गांठलें होतें, हें समजून येईल. ते या अर्जाच्या शेवटीं म्हणतात. " कोणत्याही शास्त्राच्या दृष्टीनें सतीच्या चालीचें समर्थन करतां येणार नाहीं. सतींत आणि आत्महत्येंत कांहींच फरक नाहीं. सर्वांत वाईट गोष्ट म्हणजे कांहीं लोक या राक्षसी चालीचा आपल्या पोळीवर तूप ओढण्यासाठीं उपयोग करतात. सती जाणाऱ्या स्त्रीचे निकट वारसदार हे तर पुष्कळदां तिचें मन वळवण्यासाठीं हजारों उपाय योजतात. पतिविरहामुळें उत्पन्न झालेल्या दुःखाच्या आवेगांत पुष्कळ स्त्रिया सती जाण्याचा अविवेकानें निश्चय करतात. पण आयत्यावेळीं तो बदलण्याचा त्यांनीं प्रयत्न केला तरी त्यांचें आप्त आणि इतर भाईबंद मात्र त्यांस तसें मुळींच करूं देत नाहींत. चितेला बांधून अगर काठ्यांनीं ढोसून ते तिला बाहेर येऊं देत नाहींत. अशा प्रकारची कित्येक उदाहरणें आम्हांस ठाऊक आहेत. जगांतील कोणत्याही लोकांच्या दृष्टिकोनांतून या सर्व प्रकारांकडे पाहिलें तरी हे सर्व खुनाचेच प्रयत्न आहेत असें आमचे नम्र मत आहे."— ( गांगुली " राजा राममोहन राय " पृष्ठें ३२-३३ )

त्यांच्या या प्रयत्नांचें फळ ' सतीप्रतिबंधक ' कायद्यानें दिलें. याशिवाय स्त्रियांना वडिलार्जित मालमत्तेंत वारसाहक्क मिळवून देण्याबाबत त्यांनीं बरीच खटपट केली. बहुपत्नीकत्वाच्या रुढीविरुद्धही त्यांनीं बरेंच लोकमत जागृत केलें.

जातिभेदामुळें राष्ट्रहिताला बाध येतो, राष्ट्रीय भावनेला जातिसंस्था विघातक आहे हें त्यांनीं ओळखलें होतें. मात्र प्रत्यक्ष असें या बाबतींत त्यांच्या-कडून कार्य घडून आलें नाहीं. बंगालमध्यें त्या काळांत, प्रत्येक क्षेत्रांत जें एक शैथिल्य पसरलें होतें, त्यामुळें जातीभेदाची प्रखरता त्यांना तितकीशी भासली नसेल. तरीसुद्धां एका पत्रांत त्यांनीं पुढीलप्रमाणें उद्गार काढले आहेत, " हिंदु लोक ज्याला धर्म म्हणतात व ज्या पद्धतीनें त्याचें आचरण करतात ती पद्धतच मुळीं राष्ट्राला विघातक ठरणारी आहे. अनेक जाती उपजाती निर्माण करणाऱ्या या धर्मानें त्यांची राष्ट्रभावना नष्ट केली आहे. आणि असंख्य धार्मिक विधि-विधानें व सोंवळ्या ओंवळ्याचें नियम यांच्या योगानें कोणतेंही मोठें साहस

करण्याची धमक त्यांच्यांत राहिलेली नाहीं.–निदान राजकीय हित व सामाजिक सुख यासाठीं तरी त्यांच्या धर्मांत कांहीं बदल होणें अवश्य आहे असें मला वाटतें." ( "आधुनिक भारत"वरून )

राममोहनरायांना ब्रिटिश राज्य हें ईश्वरीकृपेचें जरी फळ वाटत नव्हतें, तरी भारतीयांचा हा जो इंग्रजाशीं संपर्क घडून आलेला आहे, तो भारताला पोषक होईल असें त्यांचें मत होतें. याचें कारण त्यांच्या पूर्वायुष्यांतच सांपडूं शकेल. त्याकाळीं इंग्रजांच्या भौतिक सामर्थ्यामुळें सारेच दिपून गेले होते. ब्रिटिश लोक मानवी सुधारणेच्या आघाडीवर आपणालाही घेऊन जातील अशी पुष्कळांची भोळी आशा होती. इंग्रजांच्या आगमनामुळें भारताची सर्वांगीण भरभराटच चालू आहे असें त्यांना वाटत होतें. खोलवर विचार करण्याची शक्तीच नव्हती कुणांत ! ब्रिटिशांच्या बाह्य भपक्यानें व शिस्तीनें ते अगदीं भुलून गेले होते. अशी सगळीकडे परिस्थिती असतांनासुद्धां लॉर्ड हेस्टिंग्जच्या कारकिर्दींत, नागरिकांच्या स्वातंत्र्यावर गदा आणणाऱ्या वर्तमानपत्रांवरील अनेक निर्बंधांमुळें, ब्रिटिशांबद्दलच्या राममोहनच्या निष्ठेला बराच धक्का बसला असें म्हटल्यास चालेल. मुद्रणनिर्बंधाला विरोध दर्शविण्यासाठीं त्यानीं आपलें वर्तमानपत्रच बंद करून टाकलें.

वरील सर्व विवेचनावरून बंगालवर सर्व बाबतींत जी एक प्रकारची ग्लानि आली होती ती दूर करायला राममोहन कसे कारणीभूत झाले आणि त्यांना कोणत्या पार्श्वभूमीनें जनतेसमोर आणलें हें सहज कळून येईल. त्यांच्यानंतर, जिवंत सती अशा ज्या विधवा, त्यांचा पुनर्विवाहाच्याद्वारें उद्धार करण्याची प्रथा पाडणारे समाजसुधारक ईश्वरचंद विद्यासागर, बाबू शशीपाद बानर्जी वगैरेनीं आपली स्फूर्ति राममोहनपासून घेतली, असें म्हटल्यास वावगें होणार नाहीं.

बंगाल जागृत होत असतांना महाराष्ट्र कांहीं स्वस्थ बसला नव्हता. भारताच्या इतिहासाचें अवलोकन करतांना एक गोष्ट प्रामुख्यानें नजरेस येते. ती म्हणजे बंगाल आणि महाराष्ट्र या मानवी रत्नांच्या खाणींनीं वेळोवेळीं आपलीं मूल्यवान् रत्नें भारतमातेला अर्पिलीं आहेत.

# प्रकरण ३ रें.

## महाराष्ट्रांतील सर्वांगीण सुधारणेचे आद्यजनक सरदार गोपाळराव हरि देशमुख उर्फ लोकहितवादी

" इतके श्रम जे केले ते लोकांस त्यांची वास्तविक स्थिती कशी आहे ती कळावी, त्यांनीं सुधारावें, त्यांस इहलोकी सुखवृद्धि व्हावी, परलोकाचें साधन घडावें, व आपले बहुतकाळापासून दृढग्रह झाले आहेत, त्यांपैकीं कांहीं अविचारानें व मूर्खपणानें जमलेले आहेत ते कमी व्हावेत, किंवा नाहींसे व्हावेत, इतक्याच हेतूनें मी यथामतीनें व स्वेच्छेनें वेतनावांचून श्रम केले आहेत......माझी सर्वजनांस एवढीच विनंति आहे कीं तुम्ही सर्व विचार करण्यास लागा......तुमचे शेजारीं काय होत आहे याचा विचार करा......सारासार पाहा, परंपरा आंधळयांची माळ लावली म्हणून तीच चालवूं नका......सर्व लोकांची जूट असूं द्या, आपसांत फूट नसावी हें ध्यानांत वागवा......सर्व देशाची काळजी प्रत्येकजणानें करावी. राज्य कसें चाललें आहे व राजा कोण, त्याची वर्तणूक कशी हें पाहात जा. माहितगार व्हा......नित्य कांहीं तरी सर्व देशांचें कल्याण केल्याशिवाय एक दिवस जाऊं देऊं नका......विद्या केली तर त्या प्रमाणें वागणूक पाहिजे, नाहींतर विद्या व्यर्थ आहे. विद्येचें सार्थक रोजगार नव्हे. फक्त पोटच भरणारी ती विद्या नव्हे, ती मजुरी आहे. विद्या म्हणजे ज्ञान, जेणें करून मनुष्य निर्मळ होतो, विचारी होतो, समर्थ होतो.......माझें मागणें सर्व लोकांस आहे कीं, जें लिहिलें त्याचा विचार करून पहा. तुमच्या चांगल्या वांचून त्या लिहिण्याचा हेतु नाहीं. तुमचें कल्याण व्हावें म्हणून मी झटतों. व तुमच्या चुका वगैरे उघड करून दाखविण्यांत तुम्हांस रागरोष येईल हें मी मनांत आणलें नाहीं. कारण कीं, माझी उत्कंठा तुमच्या सुधारणेकडे फार आहे. माझें अंतःकरण सगळें तिकडे आहे......जाणें तुमची सेवा एकनिष्ठेनें व निष्कपटपणानें केली त्याजवर तुमची इतराजी नसावी. " 'शतपत्रांचा इत्यर्थ—'

—लोकहितवादी—

" लोकहितवादी हे स्वदेशहितार्थ उद्योग करूं लागल्यास आज सुमारें चाळीस वर्षें होत आलीं. इतक्या काळांत देशस्थिती सुधारण्याच्या निमित्तानें ज्या ज्या उलाढाली झाल्या त्या सर्वांत हे आपल्या नामाभिधानाप्रमाणें प्रामुख्यानें वागत आले आहेत. अद्यापहि त्यांचें उतारवय झालें असतां व राजसेवेचा भार त्यांच्या डोईवरून उतरला असतां, त्यांचा लोककल्याणनिमित्तक उद्योग अव्याहत चालू आहे.........ऐन साठीच्या अंमलांतही प्रस्तुत ग्रंथकाराचे ठिकाणीं नाउमेदीचे व सुस्तपणाचे उद्गार आढळत नाहींत. देशहितार्थ उलाढाल करण्याविषयीं हव्यास, ग्रंथरचना, सभापांडित्य वगैरे विषयांची त्यांची हौस हीं सर्व नव्या दमाच्या तरुणबांडांतही आढळणार नाहींत अशी या वयातींत पुरुषाचे ठायीं आज घटकेला तरतरीत आहेत. लोककल्याणानिमित्त सतत दीर्घकाळ परिश्रम करणें व कामाविषयीं सदोदित उत्साह बाळगणें या गोष्टींच्या संबंधानें सर्वांनीं व विशेषतः आमच्या अलीकडील कमकुवत मंडळींनीं रावबहादुरांचा कित्ता घेणें अत्यंत उचित होय. "

लोकहितवादींच्या मतांचे कट्टे शत्रू
**विष्णुशास्त्री चिपळूणकर**

बंगाल्यांत सर्वांगीण सुधारणेचा पाया राममोहननीं घातला, तर महाराष्ट्रांत हें कार्य सरदार गोपाळराव हरी देशमुख उर्फ लोकहितवादी यांनीं केलें. श्री आणि सरस्वती यांची सहसा मैत्री जडलेली दिसून येत नाहीं. कदाचित दैवयोगानें झालीच तर सरस्वती लक्ष्मीच्या पूर्ण कह्यांत जाते. फक्त जाड्या विद्वतेशिवाय, सारासार विचारशक्ती, विवेकबुद्धि, निगर्वीपणा, पीडितांबद्दल अनुकंपा वगैरे आपल्या अंगांतलि सद्‌गुणांनां या संगतिदोषामुळें ती विसरून गेलेली पुष्कळदां आढळून येतें. थोडक्यांत सांगायचें म्हणजे श्री आपल्या प्रतापानें सरस्वतीचें स्वतंत्र अस्तित्वच जवळ जवळ नाहींसें करून टाकते. पण लोकहितवादींच्या बाबतींत मात्र सुदैवानें असें घडून आलेलें दिसून येत नाहीं. तसें पाहिलें तर परिस्थितीच्या मानानें त्यांच्या जागीं जर दुसरा कोणी असता तर थोड्याशा कष्टानें प्राप्त झालेल्या अफाट वैभवांत लोळत पडण्याचें सोडून

त्यांच्याप्रमाणें इतर सामाजिक चळवळींत पडण्याचें विकृत श्राद्ध करण्याचा नसता खटाटोप त्यांनें मुळींच केला नसेल ! गोपाळरावांचें वैशिष्ट्य तें हेंच ! समाजांतील अनेक दोष व त्यापसून उद्भवलेले घातुक परिणाम पाहून त्यांच्यानें स्वस्थ बसवेना. हे दोष नाहींसें करण्यासाठींच त्यांनीं आपल्या सुप्रसिद्ध ' शतपत्रांना ' जन्म दिला. त्यांतील कुठलेंही पत्र घ्या ! त्यांत प्रतिभा नसेल ! शब्दालंकारांची रेलचेल उडालेली दिसून येत नसेल ! मालगाडीसारखीं मोठमोठ्या संस्कृत भाषाप्रचुर वाक्यांचा त्यांत सुकाळ नसेल ! भाषेंत शास्त्री बुवांच्या लेखणींतील कसब नसेल ! गनिमी कावा तर त्यांच्या लेखणींत नाहींच नाहीं ! पण इतकेंही असून त्यांतील प्रत्येक शब्द हृदयाला जाऊन भिडतो. कारण प्रत्येक शब्दांत जिवंतपणा आहे. ग्रंथांत भर पाडावी म्हणून गोपाळरावानीं लिहिलें नाहीं. कांहीतरी शब्दास शब्द जोडून लेखक बनावें या हेतूनें प्रेरित होऊन, कागद शाई पुढें ठेवून प्रतिभेला आळवण्याचा प्रयत्न करणारानें खरडलेलें हें लिखाण नव्हे ! भावना अनावर झाल्या, हृदय उघडें केल्याशिवाय राहवेना, विचारानां वाट करून दिल्याशिवाय बसवेना, म्हणून गोपाळराव लेखणीकडे वळले. आणि याचमुळें शतपत्रांत ते आपलें हृदय ओतूं शकले ! असें करतांना त्यानीं, " कशाचीही अपेक्षा, आशा किंवा इच्छा धरली नाहीं. " ( शतपत्रांक १०० ) आपणाला जें योग्य वाटलें तें, "विचार करून काळजीनें" त्यानीं लोकांपुढें मांडलें. ज्या कारणांमुळें या शतपत्रांना त्यांच्या लेखणीला प्रसवावें लागलें, तीं कारणेंच त्यांच्या सामाजिक आयुष्याच्या मार्गें उभीं होतीं. या कारणांच्या पार्श्वभूमीमुळेंच ते समाजसुधारक बनवले गेले. जिनें त्यानां समासुधारणेच्या चळवळींत ढकलून त्यांच्याकडून महत्त्वाची कामगिरी करून घेतली त्या त्यांच्या पार्श्वभूमीकडे आतां वळूं.

गोपाळराव हे खानदानी सरदार घराण्यांतले ! इंग्रजी राज्य आल्यामुळें या घराण्याला सुखाचे दिवस लाभले असेंही म्हणतां यावयाचें नाहीं. उलट इंग्रजी अमदानीचे प्रताप मात्र आपल्या पिढिजाद जहागिरीला मुकून लहानपणींच त्यांना भोगावे लागले. बाकी याचें उट्टें आपल्या सबंध हयातींत बड्या बड्या हुद्याच्या जागा पटकावून त्यांनी काढलें, ही गोष्ट निराळी. कोंकणांतून येऊन पेशव्यांच्या दरबारांत जे ' सिद्यांचे ' ' देशमुख ' झाले, आणि "श्रीमं-

तांचा पक्ष सोडून सर्व लोकांनीं एलफिन्स्टन साहेबास येऊन भेटावें. यास दोन महिन्यांची मुदत ठेविली आहे. तेवढ्यांत जो कोणी येणार नाहीं त्याची पुढें कोणत्याही प्रकारची तजवीज होणार नाहीं," हा पेशवाई हस्तगत झाल्यावर नवीन राज्यकर्त्यांनीं काढलेला जाहिरनामा धाब्यावर बसवण्याचा स्वाभिमान-पणा ज्यांनीं दाखविला त्या बाणेदार देशमुख घराण्यांचें रक्त गोपाळरावजींच्या अंगांत खेळत होतें. परंतु तरवारीचें पाणी दाखवून अंगांतील तेज प्रगट करण्याचे दिवस मायाप दयाळू इंग्रज सरकारच्या बहुत कृपेमुळें मागें पडले होते. आतां आपली हुशारी दाखविण्याचें एकच क्षेत्र होतें. 'चाकरीचे' कारखाने हेंच तें क्षेत्र ! कांहीं न करतां बसण्यापेक्षां हा मार्ग उत्तम होता यांत संशय नाहीं. गोपाळरावांनाही परिस्थितीनें याच मार्गाकडे वळविलें. दुसरीकडे कुठेंही न पाहातां " आपलें काम भलें कीं आपण भलें " या नात्यानें केवळ याच मार्गाला जर ते शेवटपर्यंत चिकटून राहिले असते तर जुन्या पिढींतील एक बडे अंमलदार म्हणून त्यांच्या एक दोन आप्तांशिवाय फारच थोड्यांच्या स्मरणांत ते राहिले असते ! पण असें व्हायचें नव्हतें.

लहानपणापासून जिज्ञासावृत्ति, चौकसपणा वगैरे गुण त्यांच्या अंगांत उपजत होते, किंवा त्यांनीं ते पैदा तरी केले होते असें त्यांच्या चरित्रावरून म्हणावें लागतें. नाहींतर त्यांचा व्रतबंध झाला त्यावेळीं त्यांचें वय फार तर पांच सहा वर्षांचें असेल. अशा या वयांत खडतर संध्या बोकांडी बसल्याबद्दल एखाद्याची कंबरच खचायची ! पण या महाशयांनीं आपल्या उपाध्यायांचीच कंबर खचवण्याचा प्रसंग आणला. एक दिवस हे राजेश्री आपणाला संध्येचा अर्थ सांगा म्हणून हट्ट धरून बसले ! दुसऱ्याच ' अर्थावर ' नजर ठेवून संध्या पढविणाऱ्या बिचाऱ्या उपाध्यायांना संध्येचा अर्थ थोडाच ठाऊक होता ! आणि या अर्थाशीं त्यांचे कर्तव्यही नव्हतें. पाठांतराच्या दिव्यांतून एखादा विद्यार्थी न कंटाळतां शिरसलामत बाहेर पडून अर्थाकडे वळेल हें त्यांच्या दृष्टीनें केवळ अशक्य कोटींतलेंच होतें. गोपाळरावांची अध्याय वगैरे पाठ करण्याची तडफ नाविन्यांतून उत्पन्न झालेली आहे आणि त्यामुळें थोड्याच दिवसांत ती विरून जाईल असें त्यांस पहिल्याप्रथम वाटत होतें. पण अनुभव आला वेगळाच ! वरील एकाच प्रश्नानें कांहीं गोपाळरावांची जिज्ञासा शमविण्यासारखी नव्हती !

गायित्री मंत्राचा अर्थही त्यांना हवा होता! प्राणायामांत नाक दाबून धरल्यानें काय होतें हेंही जाणण्याची त्यांची अनावर इच्छा होती. "अस्राय फट" म्हणून जोरानें टाळी कां वाजवायची हा तर त्यांच्यापुढें मोठाच प्रश्न होता. या सर्व प्रश्नांच्या मारामुळें हतवीर्य झालेल्या उपाध्येबुवांना केव्हां एकदां यांच्या कचाट्यांतून सुटतों असें झाल्यास काय नवल? हीच गोपाळरावांच्या अंगातील जिज्ञासावृत्ति, मिळेल तेथील ज्ञानाचे कण गोळा करून, 'स्वाध्याय' 'जातिभेद' 'आश्वलायन गृह्यसूत्र' 'राजस्थानचा इतिहास' 'गुजराथचा इतिहास' वगैरे त्यांनीं जनतेच्या समोर ठेवलेल्या ग्रंथांत दिसून येत नाहीं असें कोण म्हणेल? सत्यशोधनाच्या या नैसर्गिक तळमळीमुळेंच त्यांची चौकस दृष्टी आपल्या प्रचलित समाजस्थितीकडे वळली.

किती निराशामय वातावरण पसरलें होतें चोंहीकडे! आपापसांतील दुही, अनाचार व अनावर सुखलोलुपता, यामुळें राज्य गमावण्याचा प्रसंग आला याची जाणीव कुणालाच नव्हती. आपण अधोगतीकडे जात आहोंत, दिवसेंदिवस आपली परिस्थिती विकट होत चालली आहे, सगळीकडे निष्क्रियता पसरली आहे, याची शुद्ध कुणालाच असल्यासारखी दिसत नव्हतें. ज्यांच्या पूर्वजांनीं एकाकाळीं देशाच्या मोठमोठ्या कामगिऱ्या बजावण्याच्या पायीं, आपलें रक्त अर्पण केलें होतें, आणि ज्यांच्यापैकीं एकांत खुद्द गोपाळरावांचें घराणेंही होतें, ते सरदार लोक आतां आपली कालक्रमणा कोणत्या रीतीनें करीत होते? शौर्याची उपासना चालवून? विद्याव्यासंग वाढवून? कीं जनतेंत जागृति नी संघटन घडवून? छेः! मुळींच नाहीं. अशा प्रकारचीं कृत्यें आतां त्यांनीं कां म्हणून करायचीं? तीं यथासांग पार पाडायला सात हजार मैलांवरून देवानें पाठविलेले गोरे लोक असतांना त्यांनीं हा उपद्व्याप करून आपला सुखासुखीं जीव पाहिजे म्हणून ह्या भानगडींत कां घालायचा? "इतके सरदार आहेत यांपैकीं एकजणास आणून पाहिलें कीं, हा गृहस्थ कोणत्या उपयोगी पडेल? मला वाटतें कीं या पृथ्वीवर कोणतेंही काम त्याचे लायख सांपडावयाचें नाहीं. कारण कीं पंचवीस वर्षांपासून त्याचे वृद्धापकाळास आरंभ होतो......किती एकांस चाळीसावे वर्षीं धरावयास दुसरे लोक लागतात. स्वतः लिहिणें पुसणें तर कोणासही येत नाहीं. सर्वांस वकील व कारभारी

पाहिजेत. ज्यांस वकील व कारभारी नाहींत त्यांनीं दरबारांत जाण्याचे दिवशीं एखादा मजुरदार करून तरी बरोबर नेला पाहिजे. यजमानास बोलावयाचें माहीत नाहीं......कारकुनांनी पिसें लावून कावळा करितात तसा करून एजंटास भेटवावा. हे अमके म्हणून सांगावें. परंतु खासे पाहिले म्हणजे नंदी किंवा शुद्ध नर्मदेतलें बाण. लिहितां येत नाहीं; बोलतां येत नाहीं; वेड्यासारखे दिसतात. उठण्याची वेळ झाली म्हणजे महाराजांस उठा म्हणोन देखील सांगितलें पाहिजे.... कारकुनानें म्हणावें, "आज साहेब फार खुप होता. आपल्यापाशीं फार बोलला. इतकें कोणापाशीं तो बोलत नाहीं" मग यजमानानीं म्हणावें, "वा! आमचा दिवाणजी हुशार आहे."......घरांत व्यवस्था पाहिली म्हणजे दरबारापेक्षां अधिक. पण वाण्याची उचापत आणि सराफाचें कर्ज; त्यास व्याज शेंकडा पंचवीस रुपये......कामगार व कारकून हे लोक सरदारांस सहज बुडवतात......त्यांस उजाडल्या मावळल्याची खबर नाहीं. व योग्यता कांहीं नाहीं. व्यापाराच्या कामांत उपयोग नाहीं. विद्वान नाहींत. चाकरी करण्यास बळकट नाहींत. सरासरी जिवंत मात्र असतात." (पत्र क्रमांक ४९) "त्यांस जर कोणी वेडे म्हटलें तर त्यांस राग येतो. ते उत्तर करतात कीं, आम्हीं पेशवाईंत लाखों रुपये मिळविले व फौजा बाळगिल्या त्या आम्हीं मूर्ख म्हणून बाळगिल्या नाहींत......ते पूर्वीं लंगड्या गाईंत वासरूं प्रधान म्हणून शहाणे होते. परंतु आतां नाहींत. त्यांज-मध्यें पराक्रम, विद्या व शौर्य नाहीं. लिहिण्या वाचण्याची भ्रांति; प्रवास ठाऊक नाहीं; परदेश ठाऊक नाहीं; व लढाईची कला ठाऊक नाहीं......जसा कोणी मेला म्हणजे वृषोत्सर्ग सोडतात, तशी मराठ्यांची राजधानी गेली, आणि बाजीरावचे नांवाचे इंग्रजांनीं पोळ सोडले; म्हणजे इंग्रजांनीं कोणास जहागिरी व कोणास पेन्शनें दिलीं आहेत, तीं ते खातात आणि पोळासारखे फिरतात. या प्रमाणें त्यांची अवस्था आहे." ( पत्र क्रमांक ३० ) आदर्श म्हणून ज्या वर्गाकडे पाहायचें त्या भिक्षुक, ब्राह्मणांच्या वर्गानें तर खास ताळतंत्रच सोडून दिला होता. धर्माच्या नांवावर बसून खावयाची व चकाट्या पिटून वेळ घालविण्याची त्यांना संवय झालेली. विद्येचा कोणाला गंध नव्हता. लोकहितवादींनीं याकाळच्या ब्राह्मण लोकांचें किती सुंदर चित्र रेखाटलें आहे पहा! "पूर्वींपासून ब्राह्मणांची समजुत अशी पडली आहे कीं, आम्हीं पृथ्वीवर देव आहोंत, व देवही आमचे

हातीं आहेत व आमचे आशिर्वादानें व शापानें पाहिजे तसें होईल. पृथ्वीवर आमच्या इतके शहाणे लोक कोणीच नाहींत व आमच्या देशाशिवाय पृथ्वीवर कांहीं देश नाहींत. इंग्रज लोक हे समुद्रांतील बेटांतलि माकडांसारखीं मनुष्यें इकडे आलीं आहेत." ( पत्र क्रमांक ५ ) वरें हीं माकडें डोक्यावर चढून, केंस उपटून, प्राणांतिक वेदना देऊं लागलीं तरी यांची स्थितप्रज्ञता ढळावी ? "कोणी म्हणतो व्रतचंडी, कोणी म्हणतो अभिषेक, याप्रमाणें हे आळशी लोक स्वस्थ जेवण, दक्षिणा घेतात आणि बसतात. धर्माचें रक्षण करीत नाहींत; लोकांस धर्मार्थी, धर्मतत्पर करावें तें नाहीं; फक्त आपलें पोट आणि यजमानाची स्तुति अशीं मात्र ते आळशी लोक कामें करतात.......द्रव्य खर्च केल्यास सर्व दोष दूर करून देऊं असें ते म्हणतात. तेली असला म्हणजे त्याला सांगतात, तूं आपल्या घाण्याची पुजा केलीस म्हणजे तेल फार निघेल. असें म्हणून त्याजपासून चार रुपये काढतात. कुंभारास म्हणतात, आंव्याची पुजा करावी म्हणजे विटा चांगल्या निघतात. आणि शेतकरी कुणब्यास म्हणतात, तुझ्या दाण्याची रास करून तिची पुजा करावी म्हणजे तुला बरकत येईल." ( पत्र क्रमांक ७२ ) सारांश त्या काळच्या चारी वर्णांच्या स्थितीचेंही लोकहितवादींच्या शब्दांत थोडक्यांत पुढीलप्रमाणें वर्णन करतां येईल. "सांप्रत जे ब्राह्मण आहेत तें नांवाचे आहेत; व ब्राह्मणपणा फक्त कुळांत आला आहे, गुणांत नाहीं....... आतां दुसरा वर्ण क्षत्रिय...तो हल्लीं असा कोणी नाहीं. शूरत्व या मुलुखांतून गेलें, परदेशचे लोक राज्य करतात. क्षत्रिय धर्माचा लवलेश देखील राहिला नाहीं. हिंदुस्थानांत रजपूत आणि मराठे आहेत ते क्षत्रियच आहेत. पण जसे हल्लींचे ब्राह्मण आहेत तसेच ते निस्तेज व हतवीर्य आहेत. यांस लढावयाची बुद्धी मात्र राहिली आहे......तस्मात ब्राह्मण व क्षत्रिय हे दोन्हीही वर्ण नाहींत......आतां तिसरा वर्ण वैश्य.....परंतु त्यांनीं आपला धर्म सोडून दिला. व्यापार ते करते तर परकीय लोक इकडे येऊन व्यापार करते ना ! परंतु असें झालें......वैश्यवर्णही बुडाला. याप्रमाणें तीनही वर्णांचा अभाव झाला. आणि चौथा वर्ण शूद्र तेवढा शिल्लक राहिला......सांप्रत जितके लोक हिंदुस्थानांत आहेत तितक्यांचा एक वर्ण मला दिसतो कीं, हे सर्व शूद्र आहेत. इतर वर्णांची नांवें मात्र घेतात. परंतु त्यांचे गुण व कर्म नाहीं." ( पत्र क्रमांक २३ )

जनतेंत वेडगळपणाच्या समजुती मात्र प्रबळ होत चालल्या आहेत. " वास्तविक पाहिलें तर पहिले जुने लोक आहेत ते शुद्ध बैल आहेत. त्यांस खाण्याचें व पिण्याचें मात्र ज्ञान आहे. व ते जनावरांसारखे कर्म करतात, परंतु माणसांसारखे कांहीं करीत नाहींत......कोणी म्हणतो पृथ्वी कमलपत्रासारखी आहे. कोणी म्हणतो यवन हे पूर्वीपासून आहेत. परंतु त्यांस कांहीं देश नाहीं. समुद्रांत कांहीं लहान जागा आहे तेथें त्यांचा वास आहे. पृथ्वीचा अंत हिमालयाजवळ आहे; व पृथ्वीभोंवतीं सात बेटें आहेत. समुद्र दह्यांचे व दुधाचे आहेत......इंग्रज कोठले हें कांहीं त्यांस ठाऊक नाहीं. व अलीकडे इंग्रजानीं ज्ञान किती वाढविलें आहे याची त्यांस खबर नाहीं." (पत्र क्रमांक ३०) ज्या जुन्या समजुती लोकहितवादींच्या काळांतील समाजांत धुडगुस घालीत होत्या त्यांचा थोडासा मासला तर पाहा !... "ब्राह्मणाशिवाय अन्य वर्णानीं विद्या करूं नये....सर्व गोष्टी नशीबानें घडतात. शहाणपण व उद्योग याचा उपयोग नाहीं......संस्कृत विद्येखेरीज बाकीच्या विद्या व भाषा नरकाचें साधन आहे.......स्त्रियांना विद्या शिकवूं नये. कारण व्यभिचार अधीक वाढेल.......स्त्रियांचा पुनर्विवाह करूं नये कारण कीं जिच्या प्रारब्धीं सुख असेल तिचा नवरा मरणार नाहीं. जी अभागी तिचा मरतो......त्यांनीं पुनर्विवाह केला तर धर्म बुडेल व ब्राह्मणांची अब्रू जाईल". (पत्र क्रमांक ८; १३)

लोकहितवादींनीं स्वतंत्रपणें जेव्हां आपल्या आयुष्यास आरंभ केला तेव्हां सगळीकडे वरील प्रकारची स्थिती होती. ही स्थिती नाहींशीं करून सगळया लोकांना विद्येचें व ज्ञानाचें महत्त्व पटवून द्यावें म्हणून नुकत्याच निघालेल्या भाऊ महाजनांच्या ' प्रभाकर ' साप्ताहिकाचे द्वारें आपले विचार जनतेपुढें मांडण्याचें त्यांनीं ठरविलें.

वर्तमानपत्रांच्या द्वारें सुधारकी मतांचा प्रसार करण्याचा लोकहितवादींचा विचार सहजस्फूर्त होता असें म्हणतां येणार नाहीं. किंबहुना त्यांच्या अगोदर होऊन गेलेल्या बाळशास्त्री जांभेकरांकडून त्यांनीं ही स्फूर्ति घेतली असें म्हटल्यास चालेल. त्यांच्या विचारांना नवीन वळण लावायला व समाज सुधारणेकडे त्यांचे लक्ष वेधायला 'दर्पण' व 'दिग्दर्शना'च्या द्वारें जांभेकरांनीं केलेलें कार्य व तसेंच तत्कालीन ज्योतिबा फुले, दादोबा पांडुरंग, वगैरेंची समाजसुधारणे-

विषयींची चाललेली धडपड, हीं सर्वस्वीं कारण आहेत असें जरी विधान करतां येणार नाहीं, तरी यांचा इष्ट परिणाम त्यांच्या मनावर झालाच असला पाहिजे! नाना विषयांचा अभ्यास करणाऱ्या, नऊ भाषा आत्मसात् करणाऱ्या, इतिहास, गणित, मानसशास्त्र, व्याकरण वगैरे निरनिराळ्या विषयांवर स्वत: लेखन करणाऱ्या, विधवाविवाहाचा पुरस्कार करणाऱ्या आणि ख्रिस्ताळलेल्या श्रीपाद शेषाद्रींस त्यांच्या इच्छेनुसार पुनः हिंदु करून घेऊन आपले सुधारकी विचार प्रत्यक्ष कृतींत आणणाऱ्या बाळशास्त्री जांभेकरांनीं, लोकहितवादींस स्फूर्ति दिली यांत आश्चर्य कसलें?

देशाच्या अवनतीची कारणमीमांसा करण्याची संवय गोपाळरावांनीं विद्यार्थी दशेंत लावून घेतली होती असें त्यांच्या चरित्रकारांच्या म्हणण्यावरून दिसतें. आपल्या लोकांनीं देशाला हलाखीचे दिवस आणलेले आहेत अशी त्यांची लिहायला वाचायला येऊं लागल्यापासूनच समजूत होऊन बसली होती. "ब्राह्मणांनीं राज्य गमावलें तें अंगांत शौर्य किंवा बंदुकीचा नेम मारण्याचें कौशल्य नसल्यामुळें, असें तुम्हीं मुळींच समजूं नका! केवळ ऐक्य नसल्यामुळें त्यांचें राज्य गेलें." असें खणखणीत उत्तर, त्यांच्या निशाणकौशल्यावर खूष होऊन, "ब्राह्मण लोक निशाण मारण्यांत इतके हुशार होते तर त्यांनीं आपलें राज्य कसें घालविलें बुवा?" असा विनोदगर्भित, कुत्सितपणाचा शेरा मारणाऱ्या एका बड्या ब्रिटिश अंमलदाराला त्यांनीं दिलेलें—आणि यावेळीं ते फक्त सतरा अठरा वर्षांचे होते—सर्वश्रुतच आहे. या शोधकबुद्धीला नंतर पाश्चात्य शिक्षणाचें पाणी मिळाल्यावर तींत अधिकाधिक विवेचकशक्ती दृग्गोचर होऊं लागली.

लेखांच्या द्वारें आपले विचार लोकांपुढें ठेवावे हा विचार जरी गोपाळरावांच्या डोक्यांत फार दिवसांपासून घोळत होता तरी त्याला तोंड फुटलें, 'इंग्रजी लोकांच्या व्यक्तीमात्राच्या गैरसमजुती विषयींच्या' पत्राच्या द्वारें!

त्यावेळीं पुण्यास एका ब्राह्मण कोतवालाची, लोकांवर जुलूम केल्याची व त्यांच्याकडून लांच खाल्ल्याचीं वगैरे अनेक कृष्णकृत्यें उघडकीस आल्यामुळें सरकारनें कोतवालीसारख्या महत्त्वाच्या आणि जबाबदारीच्या जागांवर ब्राह्मण म्हणून ठेवायचे नाहींत व त्यांच्या ऐवजीं ख्रिश्चनांची नेमणूक करायची असें

ठरविलें. एका व्यक्तीच्या गुन्ह्याचा वचपा सर्व जातीवर काढणें खरोखरच अन्यायाचें होतें! गोपाळरावानां हें सहन झालें नाहीं. आणि त्यांचें वर उल्लेखिलेलें पहिलें पत्र बाहेर पडलें.

पण लवकरच आत्मनिरीक्षणावर त्यांची दृष्टी वळली. आमच्या लोकांत मुरलेले दोष काढून टाकण्यासाठीं त्यांनीं आपली लेखणी सरसावली. पहिल्यांदा ते बालविवाहाच्या दुष्परिणामाकडे वळणें साहजिकच होतें. खुद्द त्यांचेंच लग्न, ते फक्त सात वर्षांचे असतांना, चार वर्षांच्या वधूशीं झालें होतें. 'लहानपणच्या लग्नापासून अडचणी' त्यानीं जनतेसमोर मांडल्या. "लहानपणीं बापांनीं आपली मुलें शहाणी केलीं तर कित्येक शहाणीं निघतील आणि लग्न हें केव्हांतरी त्यांचे स्वसामर्थ्यानें घडेल." त्यानीं लिहिलें होतें. "परंतु मुलास रोजगारधंदा नाहीं, शहाणपण नाहीं, व पुढें कसा निघतो याचा अंकुर दिसत नाहीं, तों त्याचे गळ्यांत मुलगी बांधून जोखिमांत घालावा व त्याची विद्या, आयुष्य सर्व बुडवावें यांत काय लाभ होतो? लग्न बापानें केलें म्हणजे त्यांत काय मोक्षसाधन आहे? ज्याचा तो आपले पराक्रमानें करील तर फार चांगलें; आणि मोठेपणीं लग्न झालें, म्हणजे लग्नासंबंधीं शपथा व वचनें साक्षीनिशीं व ईश्वरास स्मरून घ्यावीं लागतात तीं पुरुषाचे मनांत सार्थ वागतील, आणि त्याप्रमाणें तो वर्तेल; परंतु लहानपणीं हें सिद्धीस जात नाहीं व खाण्यापिण्याची सोय झाल्यापूर्वीं स्त्री व मुलें गळ्यांत पडतात. मग त्यानें पोटास मिळवावें किंवा स्त्रीचे बरोबर राहावें?......जो विद्या करण्याचा काळ व ज्या वयांत शरीर बळकट व्हावयाचें त्या समयीं पुत्र, संसारी व मुलांबाळांचा धनी होतो. मग त्याची विद्या तरी कशी संपूर्ण होईल? आणि शरीरांत जोम कसा येईल?" बालविवाहाची ही समाज घातक चाल "दूर करण्याकरितां आपले सारख्यांनीं भगीरथ प्रयत्न केला पाहिजे. वारंवार लोकहितसंबंधीं मजकूर आपण प्रगट केल्यास कालें करून तरी त्या गोष्टी हृदयांत ठसून नीति आणि धर्म यांचें स्थापन होईल." (पत्र क्रमांक २)

याप्रमाणें भगीरथ प्रयत्न त्यांनीं केलेही! सामाजिक सुधारणेच्या एखाद्या विशिष्ट अंगाला मात्र ते कधींच चिकटून राहिले नाहींत. त्यांच्या इतर लिखाणांत जो सर्वप्रकारच्या विषयांना हाताळण्याचा त्यांचा हव्यास दिसून येतो,

तोच समाजसुधारणेच्या बाबतींतही ! खरोखर त्यांच्या लेखणीला, 'सर्वस्पर्शी' म्हणणें योग्य ठरेल. ही जुन्या काळांतील तडिग आजीबाई समाजसुधारणेच्या एकाही अंगांत आपलें नाक खुपसल्याशिवाय राहिली नाहीं ! 'शिमग्याचा दुराचार' पाहून तिला तिडीक उठली ! 'शाक्त मार्गाचे' तिनें वाभाडे काढले. 'जुन्या समजुतींना' तिनें जोराचा धक्का दिला. 'ब्राह्मणांच्या आचारांची' तिनें सडकून हजेरी घेतली.' 'हिंदुस्थानांतील इंग्रजी राज्याचा विचार' करून 'इंग्रजी राज्यापासून झालेले लाभ' कोणते हें तिनें पाहिलें; तसेंच, 'हिंदुस्थानच्या पराधीनतेचीं कारणें' शोधून काढण्याचाही तिनें स्तुत्य प्रयत्न केला. 'राज्यसुधारणे' बद्दलचीं आपलीं मतें जनतेपुढें मांडून, आणि कांहीं काळ तरी 'इंग्लिश राज्याची आवश्यकता' हिंदुस्थानला आहेच आहे, असें प्रतिपादून, स्त्रिया राजकारणांत कुचकामाच्या आहेत हें आपल्या कृतीनें मात्र तिनें अजाणतां सिद्ध करून दाखविलें. पण ही गोष्ट सोडून दिली तर ही बया विलक्षण तर खरीच ! हिचा संचार प्रत्येक ठिकाणीं असे ! हिच्या बटव्यांत नसलेली अशी कोणतीच चीज नव्हती ! मोठ्या शास्त्रीबुवांचा आव आणून हिनें, 'चार वर्णांचीं सांप्रतची स्थिती', 'वैराग्य', 'स्नानसंध्या' 'वर्णविचार', 'भक्ति कर्म आणि ज्ञान', 'मन हेंच ईश्वरी-शास्त्र' वगैरे आपल्या आंवाक्याबाहेरच्या गहन विषयांचें निरूपण करण्यासही कमी केलें नाहीं. 'हिंदुलोकांच्या व्यापारा' सारख्या अर्थशास्त्रविषयक प्रश्नावरही ती आपलें मत प्रदर्शित करण्यास कचरत नसे. देशाची सर्व बाजूंनीं सुधारणा करण्याचा जणुं काय तिनें चंगच बांधला होता ! पण ती जी अमर झाली ती हे केवळ हजार व्याप केले म्हणून नसून, स्वजातीविषयीं—स्त्रीसमाजाविषयीं तिनें जी जागृति घडवून आणिली त्यामुळें ! "लग्नाविषयीं विचार" करूनच ती थांबली नाहीं, तर 'विधवापुनर्विवाहाकडे' ती वळली. 'स्त्रियांची स्थिती' सुधारण्याचे तिनें जे आटोकाट प्रयत्न केले त्यांनींच तिला अजरामर करून टाकलें.

लोकहितवादींच्या लिखाणांत स्वदेशी, बहिष्कार, स्वराज्य, स्वदेशप्रेम, लोकसत्ता वगैरे विविध विषयांची रेलचेल असेल ! पण त्यांच्या कार्याला खरें महत्त्व आहे तें या करितां नसून, पुनर्विवाहाविषयीं लोकमत तयार करून बालविधवांविषयीं त्यांनीं जी जनतेंत अनुकंपा आणि सहानुभूति उपन्न केली

त्या करितां होय! त्यांना हें सर्व सुखासुखी करतां आलें असें मात्र कोणी समजूं नये.

स्वामी रामतीर्थांनीं ज्यांना एकदां 'जिवंत सती' म्हणून संबोधिलें होतें, त्यांची स्थिती अत्यंत करुणास्पद झाली होती! अगदीं लहानपणांत विवाह होत असल्यामुळें केव्हां केव्हां नवऱ्याचें पुरतें तोंड पाहाण्यापूर्वींच जगाचा कसलाच अनुभव नसलेल्या कोंवळ्या मुलीवर वैधव्यदुःखाचा डोंगर कोसळे. गळ्यांत मंगळसूत्र कशाला घातलें गेलें, आणि तें आतां कशाला तोडण्यांत येतें, आपणाला फुटक्या कपाळाची म्हणून कशाला संबोधितात वगैरे कितीतरी प्रश्न त्या घातकी चालीला बळी पडलेल्या अजाण मुलींच्यापुढें उभे राहात. मात्र कुंकूं आणि केस या जन्मसिद्ध अलंकारांवर जेव्हां घरांतील आप्त म्हणणाऱ्या लोकांकडून गदा घालण्यांत येई तेव्हां तिला आपणावर आलेल्या प्रसंगाच्या दारुण भीषणतेची खरी कल्पना येई! आयुष्यांतील ज्या काळांत वसंत ऋतूला आरंभ होतो त्याच तारुण्य काळांत तिच्या आयुष्यांत मात्र उन्हाळा सुरू होई! तिच्या आकांक्षा.....! पण विधवांना आकांक्षा, वासना व इतर विकार असतात असें म्हणणेंसुद्धां मूर्खपणाचें ठरलें गेलें असतें त्या काळांत! तिच्या नवऱ्या-बरोबर तिचें अस्तित्वही पूर्ण लुप्त झालें. आतां देहाला किंमत नाहीं! घरांतील मोलकरणीचें काम करून खस्ता खात दिवस काढण्याइतकीच त्यांची किंमत! मजुरी म्हणाल तर घरांतील लहान थोर सर्व मंडळींची कुजकीं बोलणीं! विधवांनीं तेल वगैरे घालून केंस———कांहीं अपरिहार्य कारणामुळें वपन करण्याचें राहिलें तर———विंचरणें महापाप! त्यांनीं अलंकार घालायचे नाहींत; नवीन कपडे वापरायचे नाहींत; उंबरठ्याबाहेर पाय काढायचा नाहीं; घरांतील मंगल कार्याच्यावेळीं अडगळीच्या काळोख्या खोलींतून बाहेर पडायचें नाहीं.......! आणि हें सर्व कां? तिनें असा कोणता गुन्हा केला होता कीं तिला जगांतील सर्व सुखांपासून दूरदूर अलिप्त ठेवण्यांत यावें? नवरा मरणें हा तिचा का दोष होता? या सर्व प्रश्नांचीं उत्तरें तिला कोण देणार? जाच असह्य झाला म्हणजे रडणें, किंवा विष खाऊन अगर विहिरींत उडी घेऊन प्राणत्याग करणें या दोन गोष्टींशिवाय तिच्या हातांत कांहींच नव्हतें! विष्णुशास्त्री चिपळुणकर एवढे कर्मठ! पण त्यांना सुद्धां विधवांची ही असहाय्यता पहावली नाहीं. "......ज्या वैधव्य

दुःखाची वेदना सहन न होऊन बिचाऱ्या स्त्रियांनीं सुष्ट दुष्ट कसाही नवरा असला तरी आपल्या पातिव्रत्य धर्मास जागून अंगावर शहारा येणाऱ्या रितीनें त्याच्या चितेवर आपल्या देहाची आहुती द्यावी, किंवा तसें न झालें तर आमरणान्त त्याच्याकरितां केवळ तपस्व्याच्या वृत्तीनें राहावें, त्याच महादुःखा-बद्दल त्यांचा कळवळा कुणास येत नाहीं. इतकेंच नव्हे, तर त्यांच्याच प्रारब्ध-दशेचें तें फळ असें म्हणून त्यांचा उलटा छळच होण्यास आरंभ होतो; हा प्रकार आमच्या देशास अत्यंत लांछनरूप होय यांत संशय नाहीं......स्त्रियांचें वैधव्य हें जर त्यांच्या अशुभत्वास कारण, तर बाप, भाऊ, बहीण वगैरे कोणी मेल्यानें त्यांच्या नातेवाईकांचें तरी तोंड कां बघावें.?" [निबंध माला, पृष्ट २०४]

विधवांची ही स्थिती पाहून लोकहितवादींचें मन बंड करून उठलें. पाश्चात्य शिक्षणामुळें समानतेचें महत्त्व समजून आलेल्या त्यांच्या बुद्धीला समाजांतील हा धडधडीत अन्याय कसा सहन व्हायचा ? विधवांची स्थिती सुधरायची असेल तर त्यांना शिक्षण देऊन पुनर्विवाहाकडे वळविलें पाहिजे हें त्यांनीं ओळखलें ! विकारांना बळी पडून कुमार्गाकडे वळलेल्या विधवा स्त्रियांना त्यांच्या व्यभिचाराबद्दल दोष देणें कितपत रास्त होईल ? वासनांवर ताबा ठेवतां येणें ही कांहीं सोपी गोष्ट नाहीं ! मोठमोठ्या विचारवंतानांसुद्धां तें शक्य नाहीं. मग या अननुभवी, अजाण, ज्यांची सर्व बाजूनें कुचंबणा होई, अशा तरुण विधवांची काय कथा ! अशा रितीनें समाजांत अनाचार माजले तर त्याचा दोष कोणाकडे ? विधवांकडे कीं त्यांना पुनर्विवाहाचा रस्ता मोकळा करून न देणाऱ्या अंध धर्ममार्तंडांकडे ? विधवा विवाहाला नसते अडथळे उत्पन्न करणाऱ्या या लोकांचीच गोपाळरावजींनां अधीक चीड आली. " हे सर्व शास्त्री, जुने लोक मेले म्हणजे हें सर्व (पुनर्विवाह, केशवपनबंदी वगैरे) लौकर होईल." त्यानीं तळमळून उद्गार काढले. जनतेचें मत पुनर्विवाहाकडे वळावें म्हणून त्यानीं हरेक युक्तीप्रयुक्तीनें आपले त्यासंबंधींचे विचार लोकांच्या पुढें मांडले. विधवांचा प्रश्न त्यांच्या हृदयाला कसा लागून गेला होता हें त्यांच्या त्याविषयक लिखाणावरून सहज समजून येईल. त्यांच्या प्रत्येक शब्दांत कळकळ आणि तळमळ कशी ओतप्रोत भरली आहे तें पहा !"......सांप्रत आपले लोकांमध्यें हा केवढा अनर्थ आहे कीं, स्त्रियांस पति वारल्यावर पुनरपि लग्नें

करूं देत नाहींत! ईश्वरानें स्त्री व पुरुष सारखे उत्पन्न केले व उभयतांचे अधिकार सम समान आहेत असें असतां, पुरुषास पुनर्विवाहाची आज्ञा आणि स्त्रियांस मात्र मनाई हा केवढा जुलुम आहे? चार शहाणे लोक मनावर घेऊन हें कार्य करतील तर किती एक जीव विनाकारण दुःखांत व अपराधांत पडत आहेत त्यांचे संरक्षण होईल; परंतु हें भाषण साधारण लोकांचे कर्णीं पडेल म्हणजे त्यांस असें वाटेल काय? नाहीं. ते म्हणतील आम्हीं भूदेव; आमचें शास्त्र ईश्वरोक्त आहे; त्याचें उल्लंघन आम्ही करणार नाहीं. आणि काशीपासून रामेश्वरापर्यंत ब्राह्मणांचा दवदबा आहे तो जाऊन लोक थट्टा करतील; व जुने चालीस विरुद्ध येईल.'' आणखी ते म्हणतात कीं 'त्यांत काय आहे? ज्या स्त्रीच्या नशिबीं सुख नाहीं तिचाच नवरा मरतो'......परंतु त्यांस असें समजत नाहीं कीं, आमच्या ज्या कन्या त्यांचे रक्षण करण्याचा आमचा धर्म असून, त्यांचा असा घात करूं नये....अहो लोकांनों, तुम्ही आपल्या कन्येचा वध करणोर आहांत......मी तुम्हांस पुसतों कीं, जेव्हां तुम्हीं आपल्या जांवयाचे मरणाची खबर ऐकतां आणि तुमची कन्या तर लहान, तिचें आणि जांवयाचें अजून दर्शन झालें नाहीं; असें असतां या लहान अर्भक बालकाविषयीं तुम्हीं आपले मनांत निष्ठुरपणा कां आणतां? आणि आपले कन्यांस तुमचे तुम्हींच खाटीक कां होतां बरें? अरे, परकी लोक यांनीं जर तुमच्या कन्या रस्त्यांतून जातांना पाहिल्या तर त्यांची अवस्था पाहून अंतःकरण चरचरां भाजतें आणि दया उत्पन्न होती; परंतु तुम्ही आईबाप, भाऊबंद, शहाणे व विचार करणारे, व बरें वाईट जाणणारे,असें असून तुमच्या घरांतील अनर्थ तुमच्यानें दूर कसा होत नाहीं? (पत्र क्रमांक १०) ......अरे! अरे! काय हे दुष्ट चांडाळ ब्राह्मण आहेत!......गरीब, तरुण, दुर्भाग्य स्त्रिया यांचे हाल पाहून या चांडाळांस दया येत नाहीं. पुनर्विवाहाची गोष्ट कोणी बोलला तर त्यांस वाटतें कीं, हा कोणी राक्षस धर्म बुडविणारा आहे. (पत्र क्रमांक ९९)......अहो, जिचा नवरा मरतो तिचा अधःपात होतो, ती दुःखी होते; आणि तुम्ही तशा अवस्थेंत निर्दयपणानें तिचे केंस काढतां, आणि तिचे अंगावरचे दागिने काढून घेतां! हा काय धर्म आहे?......तुम्ही दुष्ट म्हणून तिला दुसरा नवरा करून देत नाहींत. [पत्र क्रमांक ७०]......बारा, पंधरा, वीस, तीस वर्षांच्या पोरींचे गळे

६२८५

कापतात हें पाहून अंत:करण खवळून न जाईल काय ? ( पत्र क्रमांक ४ )......
याजकरितां माझें ऐका, आणि स्त्रियांस पुरुषांसारखे अधिकार आहेत असें ठरवा, आणि हा धर्म चालू करा. स्त्रियांनीं विद्या करावी. ज्ञानतेपणीं पुरुषाचें व स्त्रीचें लग्न व्हावें हें चांगलें. आणि जिचा नवरा मरेल तिनें खुशी असल्यास दुसरा करावा. ( पत्र क्रमांक ७० )" हृदयांतील रक्तानें हे शब्द लिहिलेले नाहींत असे कोण म्हणेल ?

लवकरच उक्ती प्रमाणें कृती करण्यासही गोपाळरावजी मोठ्या जोरानें पुढें सरसावले !

ज्योतिबा फुल्यांनीं जरी शेणवी जातीतील पहिला पुनर्विवाह घडवून आणण्याचें श्रेय मिळविलें होतें तरी महाराष्ट्रांत गाजला तो 'सप्तर्षी' नीं दिनांक पंधरा जून १८६९ सालीं मुंबईत घडवून आणलेला दुसरा पुनर्विवाह ! आपल्या लिखाणानें पुनर्विवाहाला पूर्ण संमत असल्याचें ज्यांनीं वेळोवेळीं जाहीर केलें होतें त्या गोपाळरावांचें नांव या सप्तर्षींत असणें सहजप्राप्तच होतें. न्यायमूर्ति रानडेही यांपैकीं एक होते. समाजाला धडा घालून देण्याच्या इच्छेनें प्रेरित झालेल्या या मंडळीनें एक पुनर्विवाह जाहीरपणें करवून आणण्याचें ठरविलें ! याला होतां होईल तों मोठें जाहीर स्वरूप येऊन त्याची प्रसिद्धी व्हावी ही सप्तर्षींतील प्रत्येकाची इच्छा होती ! लौकरच सर्व सिद्धता घडून आली ! किती लोकांची या कार्याला सहानुभूति मिळते हें पाहाण्यासाठीं ठिकठिकाणच्या लोकांना निमंत्रणपत्रिकांच्या स्वरूपाचीं छापील पत्रें रवाना झालीं. या पत्राच्या शेवटीं रानडे, लोकहितवादी प्रभृति सात जणांचीं नांवें असून शिरोभागीं इंग्रजी Secret च्या धर्तीवर 'गुप्त' असें लिहिण्यांत आलें होतें. सुधारणेचें हें पाऊल पुढें टाकतांना या मंडळीनें किती सावधगिरी बाळगली होती हें या नमुनेदार पत्रावरून दिसून येईल.

पत्राचा आरंभ एका मोरोपंती थाटाच्या श्लोकानें करण्यांत आला होता !

विधवोद्वाहार्थ तुम्हीं, साह्य खरें जरी कराल करवाल ।
धैर्य व्हालचि बुध हो तद्‌दु:खाद्रीस कराल करवाल ॥

लक्षांत राहाण्यासारखा पुढील मजकूर पाहा,–" आज कित्येक वर्षे विधवा विवाहाविषयींची वाटाघाट होऊन त्याच्या सशास्त्रतेविषयीं वगैरे

ग्रंथही प्रसिद्ध झाले. परंतु त्याचा अजून प्रचार पडला नाहीं. तो पडण्याचीं हल्लीं चिन्हें दिसत आहेत. हल्लीं एका विधवा कन्येचा विवाह होण्याची सिद्धता झाली आहे. आणि तो निर्विघ्नपणें सिद्धीस जाईल असें दिसतें. वधुवर चित्पावन जातीचे असून वधूचें पालन करणारा या कामास पुढारी आहे. वधूचें वय सोळा वर्षांचें असून तिच्या वयाच्या नवव्या वर्षी प्रथम वर गत झाला. अद्यापि केशादी अलंकार जसेच्या तसेच आहेत...... वराचें वय तेवीस वर्षांचें असून विद्याखात्यांत त्यास नोकरी आहे. वर आणि वधू यांचें गोत्रादि सर्व घटित मिळतें व दोन्ही पक्षाकडून पूर्ण तयारी आहे. तेव्हां अशा प्रसंगीं विधवा विवाह पक्षाच्या लोकांनीं सर्वांशीं मदत करून यशाचा विडा उचलावा एतदर्थ ही आपणांस प्रार्थना आहे......या प्रसंगीं आपणाकडून खालीं लिहीलेल्या प्रकारांपैकीं कोणत्या प्रकारची मदत या कामास होईल हें मेहेरबानीनें खुलासेवार कळविण्यांत यावें. [१] लग्न समारंभास आपण मुंबईंत येऊन वधुवरांबरोबर अन्नव्यवहार करूं शकाल किंवा नाहीं ? आपणास रजा मिळण्याची जरूरी असल्यास ती घेऊन आलें पाहिजे; तसें न घडेल तर आपण आपले कुटुंबांपैकीं कोणी पाठवाल कीं नाहीं ? [२] लग्नसमारंभास पुरुषांप्रमाणें स्त्रियांचीही आवश्यकता असते; तेव्हां आपली सहकुटुंब येण्याची सोय आहे अगर नाहीं ? [३] मुंबईस लग्नसमारंभास नच येण्याचें जमलें तर लग्नसमारंभांत ज्या गृहस्थांचा व वधुवरांचा अन्नव्यवहार झाला असेल त्यांपैकीं कोणा एकाबरोबर आपण अन्नव्यवहार कराल कीं नाहीं?......कोणत्याही प्रकारें आपणांस असह्य संकटांत घालावें असा आमचा हेतु नाहीं. परंतु विधवादुःखाश्रुमार्जनाच्या कामांत आपणाकडून मदत होईल तितकी आपण सद्‌गदित अंतःकरणानें कराल असें समजून हें विनंतिपत्र पाठविलें आहे......खालीं सही करणारांशिवाय दुसरेही बहुत संभावित गृहस्थ या कामांत पुढारी आहेत" [ कृ. ना. आठल्ये कृत 'लोकहितवादी']

या विनंतिपत्रांत वधूवरांचीं नांवें देण्यांत आलीं नव्हतीं. कोणत्या स्थळीं लग्न समारंभ पार पाडला जाईल याचाही उल्लेख केला नव्हता. या गोष्टी आमंत्रण पत्रिकेकरितां राखून ठेविल्या होत्या. वधूच्या आप्तांचें उत्पन्न मात्र खुलासेवार देण्यांत आलें होतें. त्याचप्रमाणें लग्नसमारंभास येऊन अन्नव्यवहार

करण्याची ज्यांस इच्छा आहे परंतु पैशांच्या अडचणीमुळें शक्य नाहीं अशा सद्‌गृहस्थांस जाण्यायेण्याचा खर्च देण्याचीही तयारी दाखविली होती.

ठरलेल्या दिवशीं पुनर्विवाह घडून आला! बहिष्काराची बावटळ उडाली! जाज्ज्वल्य धर्माभिमानी पंडितांच्या मोठ्या सभा होऊन या सप्तर्षींवर आणि त्यांच्या फंदांत पडलेल्या इतर लोकांवर बहिष्कार घातल्याचे ठराव पास करण्यांत आले! शृंगेरी आणि संकेश्वर येथील मठाधिपती शंकराचार्यांकडून या बहिष्कारास अनुमोदन मिळालें! विधवाविवाह शास्त्रसंमत आहे किंवा नाहीं हें ठरविण्यासाठीं एक जंगी सभा भरवून रथीमहारथींचा एक कडाक्याचा वादही झाला! बहुतेकांनीं प्रायश्चिताच्या ढालीखालीं आपलें रक्षण करून घेतलें! गोपाळरावही याला अपवाद ठरले नाहींत.

येवढें मात्र खरें कीं, सप्तर्षींच्या इच्छेप्रमाणें या पुनर्विवाह–प्रकरणाला भरपूर प्रसिद्धी मिळाली!

समाज सुधारणेच्या दृष्टीनें लोकहितवादींचें कार्य महत्त्वाचें असतांनासुद्धां जनतेच्या हृदयांत त्यांना कायमचें स्थान कां मिळूं शकलें नाहीं याची कारण-मीमांसा वरील पुनर्विवाह प्रकरणावरून सहज करतां येण्यासारखी आहे. थोड-क्यांत सांगायचें म्हणजे ते जेवढे पट्टीचे 'कलमबहादूर' होते तेवढे 'कर्मधीर' नव्हते! कदाचित् तत्कालीन समाजाचाही तो दोष असेल! समाजांतील खांच-खळगे गोपाळरावानां दिसत! ते बुजवून कसे काढावे हेंही त्यानां ठाऊक असे! पण समाजसुधारणा 'गुप्तपणें' करतां येत नाहीं हें मात्र ते शिकले नव्हते, असें त्यांच्या चरित्रावरून म्हणावें लागतें. जातिभेदाचा नाश करण्यासाठीं काढलेल्या 'गुप्त परमहंस मंडळी' ची कथा तर सगळ्यांना ठाऊक आहेच! अंधसमजुतींवर त्यांनीं आपल्या लेखणीचे कोरडे ओढले. पण जननिंदेचा आणि बहिष्काराचा ओघ स्वतःविरुद्ध येतांच प्रायश्चित्त घेऊन मोकळे होण्यासही त्यांनीं कमी केलें नाहीं.

यावरून लोकहितवादींनीं केलेलें कार्य कमी महत्त्वाचें आहे असें मात्र नाहीं! ज्याकाळीं बालविवाहविरुद्ध ब्र काढायला कोणी धजत नसे त्या काळीं पुनर्विवाह करावा म्हणून प्रतिपादणें कमी धाष्टर्याची गोष्ट नव्हती. विद्या म्हणजे पोट भरण्याचें साधन अशी परिस्थिती उत्पन्न झालेली असतांना, ज्ञाना-

करतां, सत्यशोधनाकरितां तिचा उपयोग करणें आणि दुसऱ्यास करावयास लावणें खास प्रशंसनीय ठरेल. सगळीकडे सुकाळलेल्या 'प्रारब्ध वादाचा' धि:कार करून 'प्रयत्न वादाची' जनतेंत तरफदारी करणें खरोखर अभिनंदनीय होतें. सामान्य जनता देशाविषयीं पूर्ण विसरून गेली असतांना, देशाच्या अपकर्षाची योग्य कारणमीमांसा करून, कोणत्या मार्गानें गेलें असतां देशास भरभराटीचे दिवस येतील याबद्दल लोकांस विचार करावयास लावणाऱ्या लोकहितवादींना महाराष्ट्रांतील आद्य सुधारकाचा मान देणें योग्य नाहीं का ठरणार ?

जिकडे जिकडे म्हणून त्यांना ज्ञानकण दिसले, तें त्यांनीं वेंचून घेतले, आत्मसात् केले, आणि लोकांसही सढळ हातानें वांटून दिले. फ्रेंच राज्यक्रांतीची बातमी त्यांनीं ऐकिली. त्याविषयींची सगळी माहिती गोळा केली. हिंदुस्थानचा उत्कर्ष लोकशाहीच्या स्थापनेंत आहे असा निष्कर्ष काढला.

'आजकालचा महाराष्ट्र' कारांच्या शब्दांत लोकहितवादींच्या मतांचा आराखडा आणि त्यांच्या शिकवणीचें सार देणें योग्य ठरेल. "सर्वजण एकाच ईश्वराचीं लेंकरें आहेत; सर्वांना सारखें लेखावें......स्त्रियानां पुरुषांसारखे अधिकार असावेत व त्यांना पुनर्विवाह, शिक्षण वगैरे बाबतींत स्वातंत्र्य मिळावें; जातिजातींतील विषमता नष्ट व्हावी व सर्व जातींनां सारखें शिक्षण व सारखे अधिकार मिळावे; प्रजासत्ताक राज्यपद्धति अंमलांत यावी व प्रजेचे हक्क सरकारच्या हक्कांहून अधिक असावे; धर्म प्रकरणीं बुद्धीला प्रामाण्य द्यावें व परिस्थित्यनुरुप शास्त्रें बदलावीं; एकेश्वरपंथ स्वीकारावा; आळशीपणा, अज्ञान, व मूर्खपणा याचा त्याग करून उद्योगप्रियता वाढवावी; शिक्षणप्रसार करावा; ऐदीपणा, चैन व परावलंबीपणा सोडावा; आर्थिक अनवस्थेंतून देशाची सुटका करण्यासाठीं स्वदेशी व बहिष्कार यांचा पुरस्कार करावा; यांत्रिक पद्धति स्वीकारून नवीन उत्पादन साधनांचा प्रसार करावा; एकत्र राहाण्याच्या पद्धतीचा त्याग करून विभक्त पद्धती स्वीकारावी; डामडौल टाकून साधेपणानें राहावें; प्रामाणिकपणा व सचोटी या गुणांचा संचय करावा आणि विशेषत: स्वदेशावर प्रेम करावें."

राजा राममोहन आणि लोकहितवादी या दोहोंच्या चरित्राकडे पाहिल्यास एक गोष्ट आपणांस स्पष्टपणें दिसून येते. दोघांनांही प्रथम आपल्याच लोकांतली

दोष दिसले. ते सुधारण्याचाही त्यांनीं प्रयत्न केला. राममोहनांप्रमाणेंच लोकहितवादींनांही कांहीं बाबतींत इंग्रजी आगमन हिंदुस्थानच्या बऱ्यासाठीं, ईश्वरी संकेतानुसार घडून आलेलें आहे असें वाटत होतें. लोकहितवादी इंग्रजांवर भाळले होते असें मात्र मुळींच म्हणतां येणार नाहीं. उलट एक दिवस असा उजाडेल कीं, " त्यावेळीं अमेरिकेंत झालें तसें होऊन हे लोक ( हिंदी ) आपल्यास स्वतंत्र करून घेतील. आणि इंग्रजांस सांगतील कीं, तुम्हीं आपल्या देशास जावें. आतां आमचे देशाचा कारभार आम्हांस चांगला करतां येतो. तुमचें गुरुत्व नको. तुम्ही पाहिजेतर व्यापारापुरतें इकडे येत जा. आमचे प्रजेचें जसें आम्हीं रक्षण करतों तद्वत् तुमचेंही करूं परंतु तुमचें वर्चस्व नको." ( पत्र क्रमांक ५४ ) हा त्यांचा विश्वास होता.

जांभेकर प्रभृतींनीं बनवून ठेवलेल्या पार्श्वभूमीचा लोकहितवादींनीं जसा उपयोग करून घेतला त्याप्रमाणेंच लोकहितवादींनीं फैलावलेल्या विचारांची तात्विक भूमिका, त्यांच्या नंतरच्या पिढींतील भारतीय समाजाच्या क्षितिजावर झळकलेल्या न्यायमूर्ति रानड्यांच्या कर्तृत्वामागें होती.

आधुनिक भारताला सुधारणेच्या योग्य मार्गावर ज्यांनीं आणून सोडलें त्या स्वतंत्र भारताच्या दोन द्रष्ट्यांकडे आतां वळूं.

महर्षि दादाभाई नवरोजी, व सर्वांगीण सुधारणेचे धुरीण न्यायमूर्ति रानडे हेच ते दोन द्रष्टे !

# प्रकरण ४ थें.

## आधुनिक भारताचे पितामह–महर्षि दादाभाई नवरोजी

“ पारतंत्र्याच्या मोहांधकारांत चांचपडणाऱ्या आणि त्यांतच आनंद मानणाऱ्या आपल्या अज्ञानी देशबांधवांच्या अंतकरणांतील ज्ञानप्रदीप त्यांनीं ( दादाभाई नवरोजी ) प्रज्ज्वलित केला, आणि या ब्रिटिशांच्या मायावी साम्राज्यांत आपले कोट्यावधि देशबांधव दारिद्र्यानें आणि उपासमारीनें मरत आहेत व या मोहांधकाराच्या काळरात्रींत आम्हीं असेच घोरत पडलों तर अखेर आम्हां सर्वांचाच त्यांत विनाश होणार आहे, याचें ज्ञान त्यांनींच भारतीयांना प्रथम करून दिलें. इतकेंच नाहीं तर आपणांवर येणारी ही भावी आपत्ती टाळण्यास कोणत्यादिशेनें प्रयत्न केले पाहिजेत, त्याचेंही त्यांनीं लोकांना शिक्षण दिलें; त्यामार्गानें जाणाऱ्यांचे नेतृत्व केलें; आणि आयुष्याच्या अखेरीस पुढील पिढीला स्वकर्तव्याचें दिग्दर्शन करून मातृभूमीच्या ऋणांतून ते मुक्त झाले. यामुळेंच त्यांना ‘राष्ट्र पितामह’ ही थोर आणि असाधारण पदवी प्राप्त झालेली आहे. ”

आधुनिक भारत–आचार्य जावडेकर.

“ हिंदुस्थानाला आपलें गतवैभव प्राप्त करून द्यायचें असेल, जगांतील सर्वांत मोठ्या व सुधारलेल्या राष्ट्रांच्या मालिकेंत पूर्वीप्रमाणें अभिमानानें स्थान हिंदुस्थानाला मिळवून द्यायचें असेल, हिंदुस्थानाला जगांतील एक प्रमुख, प्रबल आणि संपन्न राष्ट्र बनवायचें असेल, तर एकी करा, चिकाटी धरा, शांततेच्या मार्गानें सतत चळवळ चालू ठेवा, आणि स्वराज्य संपादा. आज जे लक्षावधि देशबांधव दारिद्र्यांत होरपळत आहेत, त्यांना त्यांतून सोडवण्याचा, दुष्काळाला व प्लेगाला जे बळी पडत आहेत, त्यांना त्यांतून वांचविण्याचा, आणि जे कोट्यवधि लोक भुकेकंगाल स्थितींत अर्धपोटीं जीवन कंठीत आहेत, त्यांना त्यांतून मुक्त करण्याचा हाच एकमेव मार्ग आहे. ”

दादाभाई नवरोजी.

" You are a fool ! " पॅजेटसाहेब एकदम ओरडून म्हणाले. " अगदींच कसें रे तुला कांहीं कळत नाहीं ? मूर्ख आहे झालं ! " परंतु या ओरडण्यांत रागापेक्षां प्रेमच अधिक व्यक्त होत होतें. ज्या व्यक्तीला हे शब्द उद्देशून होते, त्या व्यक्तीबद्दल मनांत वसत असलेल्या गाढ सहानुभूतीनें या शब्दांना जन्म दिला होता. हे शब्द अंतःकरणांतील ओलाव्यानें ओथंबत असल्यामुळें, त्यांचा नैसर्गिक कठोरपणा केव्हांच लुप्त होऊन, त्याची जागा लोण्याच्या मधुरत्वानें घेतली होती. मुलानें एखादा विचित्र हट्ट पुरा करण्याची गळ घालावी, आणि त्या हट्टाचा होणारा अपायकारक परिणाम जाणून, त्याच्या प्रेमळ मातेनें त्याला आवरण्याचा प्रयत्न करावा, व असें करतांना तिनें वैतागानें काढलेल्या शब्दांच्या माग जें वात्सल्य उभें असतें, तेंच वात्सल्य या शब्दांच्या मागें होतें. सारांश या शब्दांचा उगम क्रोधांतून झाला नव्हता. प्रेमांत त्यांचें उगमस्थान होतें.

प्रिन्सिपॉल पॅजेटसाहेबांसमोर, एक किरकोळ शरीरप्रकृतीची, साधारण हाडपेराची आणि मध्यम उंचीची तरुण व्यक्ति उभी होती. हिचा विशाळ भालप्रदेश आणि डोळ्यांत चमकणारें तेज पाहून, यांत कांहींतरी विशेष असामान्यत्व आहे, हें चटकन कुणाच्याही लक्षांत आलें असतें. पॅजेटसाहेबांच्या आकस्मिक-वैतागाला कारणीभूत झालेली हीच ती छोटी मूर्ति !

आणि तसं पाहिलें, तर पॅजेटसोहबांनीं तरी कां वैतागून जाऊं नये ? आपला आवडता नि तीक्ष्ण बुद्धिमत्तेचा हा शिष्य, केवळ कारकुनशाहीच्या खर्डेघाशींत आपलें आयुष्य घालविण्याची परवानगी मागायला आलेला हें त्यांना कसें सहन व्हावें ? या तरुणाच्या उज्ज्वल भविष्यकाळाबद्दल त्यांना आशाच नव्हे तर खात्री होती. म्हणूनच त्यांनीं त्या तरुणाला अगदीं निक्षून सांगितलें, "हें बघ नवरोजी, तूं ही नोकरी धरावीस, हें मला केव्हांही पसंत होणार नाहीं. या बाबतींत माझी संमति तर तुला कधींच मिळणें शक्य नाहीं. "

पॅजेटसाहेबांच्या या शब्दांनीं आपलें काम केलें. कारकूनशाहींत शिरण्याचा आपला बेत त्या तरुणानें बदलला. आणि.........

हा तरुण म्हणजे आधुनिक भारताचे पितामह दादाभाई नवरोजी !

दादाभाईंचें कॉलेजांतील शिक्षण नुकतेंच संपलें होतें. आपल्या अचाट बुद्धिसामर्थ्याची व अध्ययनप्रेमाची चुणूक त्यांनीं आपल्या सर्व प्राध्यापक

मंडळींस व इतर सहाध्यायांस दाखविली होती. बाह्य जगाचा विसर पाडणाऱ्या पवित्र विद्यामंदिरांतून बाहेर पडून त्यांनीं आतां व्यवहारिक जगाच्या रंगभूमीवर पदार्पण केलें होतें. बॅरिस्टरीचा अभ्यास करण्यासाठीं युरोपांत जायचें पुष्कळांनीं त्यांना सुचविलें होतें. आणि तें त्यांच्याही मनांत होतें. परंतु पैशांच्या अभावीं तें शक्य नव्हतें हेंही ते ओळखून होते. आतांपर्यंतचें त्यांचें सारें शिक्षण, इतरांच्या मदतीवर व त्यांना सतत मिळालेल्या शिष्यवृत्त्यांवर झालें होतें; पण यापुढें तेंही शक्य नव्हतें. सर जमशेटजी सारखे श्रीमंत नि दानशूर गृहस्थ जरी दादाभाईंना मदत करायला पूर्ण समर्थ होते, तरी तशी त्यांची इच्छा दिसून येत नव्हती. याचें कारणही उघड होतें. आतांपर्यंत विलायतेस जाऊन आलेल्या कितीतरी पारशी तरुणांचीं उदाहरणें त्यांच्या डोळ्यांसमोर होतीं. ज्यांच्या भविष्य काळाबद्दल अत्यंत आशादायक लक्षणें दिसून येत होतीं असे कितीतरी तरुण, युरोपचें पाणी चाखल्यामुळें, मतिभ्रष्टांप्रमाणें वागत होते. कांहीं महाशयांनीं स्वधर्माचा त्याग करून, खिस्ती धर्म स्वीकारला होता. कांहीं मदिरादेवतेचे निस्सीम भक्त झाले होते, तर आणखी कांहींनीं गौरांगनेच्या तावडींत सांपडून, आपल्या आयुष्याचें पूर्ण मातेरें करून घेतलें होतें. सारांश, आतांपर्यंत युरोपांत जाऊन आलेल्या लोकांत, आपला धर्म, संस्कृति व नीति यांवर सर्वस्वीं पाणी सोडून, स्वैराचाराच्या पूर्ण आहारीं गेलेल्या लोकांचाच अधिक भरणा होता. सर जमशेटजी, भाऊ दाजी, कामा वगैरेंना दादाभाईच्या हुशारीबद्दल किंवा सच्छीलाबद्दल खात्री नव्हती असें नव्हे. पण काय नेम सांगावा ? त्यांचीं अनुभवी मनें म्हणत. तरुणांचीं मनें म्हणजे सागरावरील लाटा ! केव्हांही स्थिरत्व नसायचें त्यांना ! त्यांच्या मतांबद्दल तर विचारायचीच सोय नाहीं......जणूं तेरड्याचा रंग. केव्हां कोणतें स्वरूप धारण करतील, हें मुळींच समजायचें नाहीं. कदाचित् अशाप्रकारच्या अस्थानीं आशंकानींही, दादाभाईला युरोपांत पाठविण्याच्या विचारापासून त्यांना परावृत्त केलें असेल. दादाभाईचें शील असें लेचेपेचें नाहीं हें त्यांना त्यावेळीं कसें समजायचें ? भविष्यकाळांत पाहाण्याचें सामर्थ्य त्यांच्यांत थोडेंच होतें ! कांहीं का असेना ! एवढें मात्र खरें कीं, दादाभाईंचे एक चहाते, व त्यावेळचे 'बोर्ड ऑफ डायरेक्टर्स'चे अध्यक्ष आर्स्किन पेरी, हे अर्धा खर्च द्यायला तयार असतांना सुद्धां, इतरांच्या

मदतीच्या अभावीं, त्यांना विलायतेला जाणें कांहीं शक्य झालें नाहीं. आपल्या पुढील आयुष्यांत, युरोपच्या यात्रेला, बागेंत जाऊन फुलें तोडून आणण्याइतकेंच महत्त्व राहील, याची त्यांना त्यावेळीं काय कल्पना ?

आतां त्यांच्यासमोर एकच मार्ग होता. शिक्षण घेणें हें फक्त एखादी बऱ्या पगाराची नोकरी मिळविण्यासाठीं, असेंच त्याकाळचे सर्वसाधारण सर्व लोक मानीत असत. हाच 'महाजनांचा' पंथ स्वीकारण्याचें दादाभाईंनीं ठरविलें. कदाचित युरोपला पुढील शिक्षणक्रमाकरितां जातां येत नाहीं, असें दिसून आल्यामुळें उत्पन्न झालेल्या निराशेची नि वैतागाची ही प्रतिक्रियाही असावी. लवकरच थोड्याशा प्रयत्नांनीं सेक्रेटरिअेट मध्यें दरमहा एकशें–चाळीस रुपयांची नोकरी त्यांच्यापुढें चालून आली. त्यांनीं ही नोकरी पत्करण्याचें ठरविलें.

पण विधिसंकेत दुसराच होता. प्रत्येक बाबतींत सूक्ष्म विचार करण्याची जी संवय त्यांनीं लहानपणापासून लावून घेतली होती, तिनें यावेळीं त्यांना हात दिला. कदाचित् नोकरी करण्याचा हा जो आपण तडकातडफी निश्चय केला त्यांत कांहीं तरी वावगें असल्याबद्दलची रुखरूख, त्यांच्या मनाला लागली असावी ! आपल्या प्रिय प्रिन्सिपॉलचा—पॅजेटसाहेबांचा--सल्ला घेण्याचें त्यांनीं ठरविलें. त्यांना खात्री होती कीं, पॅजेटसाहेब आपणाला योग्य काय तें सांगितल्याशिवाय मुळींच राहणार नाहींत ! केवळ तेच एक आपणाला योग्य मार्ग दाखवायला समर्थ आहेत !

दादाभाईंची पॅजेटसाहेबांबद्दलची अपेक्षा फोल ठरली नाहीं.

"तूं असली नोकरी करावी हें मला केव्हांही मुळींच पसंत होणार नाहीं" या पॅजेटसाहेबांच्या कळकळीच्या शब्दांनीं, दादाभाईंचे डोळे उघडले. नोकरी करण्याचा त्यांचा निश्चय पार जमीनदोस्त झाला. यावेळीं, विद्यार्थीदशेंत आपण केलेल्या मोठमोठ्या आकांक्षांची आठवण त्यांना झाली असेल ! हॉवर्ड साहेबांचें चरित्र वाचून झाल्यावर, लोकसेवेचें व्रत आमरण चालू ठेवण्याची आपण जी मनांतल्यामनांत प्रतिज्ञा केली होती, तिचेंही स्मरण त्यांना झालें असेल ! क्लार्कसनचें 'गुलामांचा व्यापार' [ Clarkson's The Slave Trade ] हें पुस्तक वाचून, गरीबांचे हाल दूर करून सगळीकडे समतेचें,

सुखाचें, समाधानाचें नि शांततेचें साम्राज्य स्थापण्याचा आपण केलेला निश्चय या कारकुनी पेशांत पडून का पार पडणार आहे असेंही त्यांना वाटलें असेल !

दादाभाईंच्या आयुष्यांतील हा अत्यंत महत्त्वाचा क्षण होता ! खुद्द त्यांच्याच शब्दांत सांगावयाचें म्हणजे—" जर का त्यावेळीं मी या नोकरीच्या जाळ्यांत सांपडलों असतों तर देशसेवेंत आयुष्य घालविण्याच्या माझ्या साऱ्या कल्पना, कारकुनशाहीच्या खर्डेघाशींत पूर्ण विलीन झाल्या असत्या ! "

असें व्हायचें नव्हतें ! भारतमातेच्या मनांत या आपल्या पुत्राकडून फार मोठी सेवा करून घ्यायची होती. कचेरीच्या चार भिंतींच्या मर्यादित जागेंत कुजत पडण्यासाठीं दादाभाईंचा जन्म नव्हता.

भोंवतालच्या समाजाची स्थिति, त्यांना आलेले अनुभव आणि त्यांनीं विद्यार्थीदशेंत केलेलें वाचन आणि मनन, यांच्या पार्श्वभूमीवर त्यांची पुढील उज्ज्वल जीवितकथा घडली गेली असें म्हटल्यास मुळींच अतिशयोक्ति होणार नाहीं.

सदाचारी, सच्छील नि धर्मभीरु उपाध्यायांच्या घरीं दादाभाईंचा जन्म झालेला ! कडक धार्मिक वातावरणांत त्यांचें लहानपण गेलेलें ! पाप, पुण्य हे शब्द अगदीं पाळण्यांत असल्यापासून त्यांच्या परिचयाचे झालेले ! त्यांत दादाभाईंचा स्वभाव पडला जन्मतःच भावनावश नि विचारी ! त्यांच्या विद्यार्थीदशेंत एकदां शाळेंतील दोन मुलांचे भांडण झालें. पहिल्या झपाट्यांत दोघेही गुद्यांवर आले. पण लवकरच एकमेकांची शक्ती अजमावूनच कीं काय ते गुद्यांवरून शब्दांवर गेले ! मुद्यांचा तर येथें प्रश्नच नव्हता. एकमेकांना किळसवाण्या अपशब्दांचे ते अहेर करूं लागले. दादाभाई जवळच होते. खरं पाहिलें तर तेही इतरांप्रमाणेंच विद्यार्थी ! इतरांप्रमाणेंच त्यांनींही अजून बाल्याची सीमा ओलांडली नव्हती ! कोणत्याही दोघांची जुंपल्यास, इतर मुलांना फुकट गम्मत पहावयाला मिळाल्यामुळे काय आनंद होतो, ह्या भांडणांत तेल ओतण्याचा आपल्या चिमुकल्या बुद्धीचा कमी अधिक शक्तीप्रमाणें त्यांच्याकडून कसा कसून प्रयत्न करण्यांत येतो, हें सर्वांना ठाऊक आहेच ! भांडणाला प्रोत्साहन देणाऱ्या या कृत्यांत दादाभाईंनीं भाग घेतला असता तर तो कांहीं मोठा गुन्हा ठरला असता असें नाहीं. बालमानसशास्त्रास धरूनच ती गोष्ट झाली असती. पण

या बालयुद्धांत भाग घेणें तर दूरच राहो; उलट त्यांत वापरण्यांत येणारे ते अपशब्द ऐकून दादाभाईंना फार दुःख मात्र झालें. इतकें किळसवाणे शब्द उच्चारणें म्हणजे केवढें पाप! असले घाणेरडे शब्द त्यांच्या तोंडातून बाहेर पडतात तरी कसे? आपली वडील मंडळी याचकरतां का आपणाला शाळेंत पाठवते? एकमेकांत दुरुत्तरें बोलण्यासाठीं व भांडण्यांत वेळेचा दुरुपयोग करण्यासाठीं का आपण शाळेंत येतों? छट्! बाकीचीं मुलें काय पाहिजे तें करोत! आपण मात्र जन्मांत कधीं तोंडांतून अपशब्द म्हणून काढायचा नाहीं. त्यांच्या या विचाराचें निश्चयांत रूपांतर झालें. त्यांची दृष्टी वर गेली. सूर्य अस्तास जात होता. क्षितिजाखालीं जाणाऱ्या त्या सूर्यबिंबाला साक्ष ठेवून त्यांनीं मनांतल्या मनांत प्रतिज्ञा केली. "केव्हांही जिभेला अपशब्दांचा म्हणून विटाळ होऊं द्यायचा नाहीं!"

ही प्रतिज्ञा त्यांनीं आपल्या पुढील आयुष्यांत किती कांटेकोरपणानें पाळली, हें त्यांचें चरित्र ठाऊक असणाऱ्यांना तरी विशद करून सांगण्याची आवश्यकता नाहीं! त्यांच्या 'युरोपांतील व्यापारा'च्या बाबतींत तर कितीतरी मनस्तापाचे प्रसंग आले! बडोद्याची दिवाणगिरी म्हणजे तर नुसती सुळावरची पोळी होती! रेसिडेंट 'कर्नल फेअर' रूपी 'डिमोक्लसची तलवार' त्यांच्या मानेवर नेहमीं लटकत असायची! मृत खंडेरावाच्या पक्षपाती लोकांचीं कृष्णकारस्थानें, दरबारांतील दादाभाईंचा द्वेष करणाऱ्या गटांच्या भानगडी, वगैरे त्यांचा मार्ग अधिकाअधिक बिकट करून टाकीत होते. यावर कळस म्हणजे खुद्द संस्थानाधिपती मल्हारराव गायकवाड यांचा विक्षिप्त लहरी व चंचल स्वभाव! या सगळ्यांच्या कृत्यांमुळें कितीतरी गंभीर मनस्तापाचे पेंचप्रसंग उद्भवले. पण दादाभाईंचा सयंम विलक्षण. त्यांनीं आपल्या मनाची शांति किंचितसुद्धां ढळूं दिली नाहीं. त्यांच्या जागीं जर दुसरा तिसरा कोणी मिळमिळीत माणूस असता, तर त्यानें आपल्या जिवाचा काय त्रागा करून घेतला असता! आपल्या हाताखालच्या लोकांना कसें अगदीं त्राही त्राही करून सोडलें असतें! परंतु स्वतः जळफळणें, अगर बड्याचें तेल वांग्यावर काढण्याच्या पद्धतीनें दुसऱ्यावर आग पाखडणें हा दादाभाईंचा मुळीं स्वभावच नव्हता. एखादी गोष्ट अगदींच असह्य झाली, अगर एखाद्या व्यक्तीचा त्यांना अनावर

राग आला तरी ते फक्त 'आग लागो त्याला' [confound it] असें म्हणत. अस्ताला जाणाऱ्या सूर्यबिंबाला साक्षी ठेवून केलेल्या प्रतिज्ञेचा तर हा परिणाम नसेल?

दादाभाईंच्या धर्मबुद्धीला विशालत्व देण्याचें, आणि त्यांच्या मनोवृक्षाला सुविचारांचें पाणी घालून, तो फोंफविण्याचें कार्य 'फिरदोसीचा शाहनामा' 'झोरास्टरच्या भक्तांचीं कर्तव्यें' व व्याटचें [Wyatt] चें 'मानसशिक्षा' [Improvement of the Mind]' या तीन ग्रंथांनीं केलें म्हटल्यास चालेल. 'पवित्र विचार, पवित्र उच्चार, व पवित्र आचार' या झोरास्टरच्या उपदेशाचें सार त्यांच्या मनावर पक्कें बिंबलें. एखाद्या विषयाचा अगर गोष्टीचा पूर्ण साधक-बाधक विचार केल्याशिवाय, त्याविषयीं कांहीं बोलायचें नाहीं, अगर कांहीं करायचें नाहीं, हें व्याटनें त्यांना शिकविलें.

धार्मिक वृत्ति दादाभाईंच्या स्वभावांत इतकी आंतवर रुजली होती कीं, त्यांना आधुनिक धर्माचा अवतार म्हणणें वावगें होणार नाहीं. आपल्यासारखेंच जगही सरळ आहे, असें या भोळ्या बुद्धिमान माणसाला वाटे. कोणत्याही माणसाच्या शीलाबद्दल अगर प्रामाणिकपणाबद्दल शंका घेणें हें हलक्या मनोवृत्तीचें लक्षण आहे, असें ते म्हणत. परंतु या त्यांच्या सांबवृत्तीचा फायदा मात्र त्यांनीं स्थापन केलेल्या 'ईस्ट इंडियन असोसिएशनच्या' [East Indian Association]च्या एका युरोपिअन नोकरानें, हिशेबांत अफरातफर करून भरपूर घेतला; आणि अशा रितीनें दादाभाईंच्या खिशाला बराच मोठा चट्टा बसला! दुसऱ्या एका प्रसंगीं तर, त्यांची 'दादाभाई नवरोजी आणि कंपनी' चालू असतांना, सट्टयांच्या आहारीं गेलेल्या डॉक्टर बरजोरजी कूपर नांवाच्या एका पारशी व्यापाऱ्याला, देणदारांच्या जाचांतून सोडवण्यासाठीं ते जामीन राहिले, व आपल्या या कृत्यानें स्वतःलाच डुबाडून घेऊन बसले! बरजोरजी शेटला कर्ज फार आहे, त्यानें ही स्थिती धनलोभाला बळी पडून सट्टे खेळल्यामुळें, स्वतःवर जाणून बुजून ओढवून घेतली आहे, तरी त्याला थारा देणें अगर कोणत्याही प्रकारची मदत करणें योग्य होणार नाहीं, असें पुष्कळ हितचिंतकांनीं दादाभाईंना विनाविलें. पण हा धर्माचा अवतार आपल्या निश्चयापासून किंचितसुद्धां ढळला नाहीं. बस्स्! गृहस्थ आपल्या जातीचा

आहे, आणि तो संकटांत सांपडून, परदेशांत असाह्य स्थितींत असतांना, त्याच्या दुसऱ्या जात नि रक्तभाईनें त्याला मदत न करणें अधमपणाचें होईल, असें त्यांनां वाटलें. बाकी, ही हरिश्चंद्रवृत्ति कृतींत आणल्याबद्दल मात्र त्यांना जबर किंमत द्यावी लागली. बरजोरजींचें लठ्ठ देणें दादाभाईंना फेडणें भाग पडलें. राज्याचा वारस वांचविणाऱ्या पन्नादाईला ज्याप्रमाणें आपल्या पोटच्या गोळ्याला बळी द्यावें लागलें, त्याचप्रमाणें आपल्या जात नि देशभाईच्या अब्रूचें आणि पतीचें रक्षण करण्यास पुढें सरसावलेल्या दादाभाईंना आपल्या कंपनीचें आयुष्य संपुष्टांत आणावें लागलें.

एवढें मात्र कबूल केलें पाहिजे कीं, या व्यापाराच्या दगदगींतून सुटल्यामुळेंच दादाभाईंना आपलें सारें लक्ष, हिंदुस्थानविषयक राजकीय नि सामाजिक चळवळीकडे पूर्ण केंद्रीभूत करतां आलें. केव्हां केव्हां वाईटांतून चांगलें निघतें म्हणतात, तें असें.

'झोरास्टरच्या भक्ताचीं कर्तव्यें' दादाभाईंच्या अंगांत किती मुरलीं होतीं हें त्यांनीं १८५१ सालीं स्थापिलेल्या "धर्ममार्गदर्शक" नांवाच्या मंडळावरून समजून येईल! बंगालांतील राममोहनच्या नेतृत्वाखालीं स्थापन झालेल्या ब्राह्मसमाजानें, धर्मात सुधारणा घडवून आणण्याचा हा सुवर्णमध्य गांठण्याची स्फूर्ती दिली होती कीं काय कुणास ठाऊक! धर्मनियमांचें उल्लंघन न करतां किंवा धर्माशीं फटकून न वागतां, त्यांत बोकाळलेल्या बालविवाहासारख्या घातुक व अनवश्यक रूढींना अर्धचंद्र देण्याचा प्रयत्न करणें, हें या मंडळाचें मुख्य ध्येय होतें. यावेळीं त्यांचें वयही फारसें नव्हतें. ऐन गद्धेपंचवीशीचा काळ! परंतु कांहींतरी सार्वजनिक चळवळ करण्यास त्यांचें मन आतुर झालेलें! क्लार्कसनचा 'गुलमांचा व्यापार' व हॉवर्ड साहेबांचें चरित्र त्यांना थंड बसूं देत नव्हतें. एखादें सार्वजनिक कार्य अंगावर घ्यावें, राष्ट्राची उन्नति करण्याच्या कार्याला आपणही थोडाफार हातभार लावावा, लोकांचीं दुःखें हरण करण्यासाठीं प्रयत्न करावे, धार्मिक व सामाजिक क्षेत्रांत कांहींतरी नवीन सुधारणा घडवून आणाव्या, असे हजारों प्रकारचे विचार त्यांना बेचैन करून टाकीत!

दुसऱ्यांच्या मदतीमुळें आपण उच्च शिक्षण घेऊं शकलों, हें दादाभाई विसरले नव्हते. लोकांचें–अर्थात समाजाचें हें ऋण फेडावयाचें आपलें कर्तव्य

आहे, याची त्यांना पक्की जाणीव होती. समाज सुधारणा तर करावयाची! पण तिला कोठून आरंभ करावयाचा हा प्रश्न होता. समाजांत अज्ञान पसरलें होतें. पारशी धर्मात अनेक वृथा आचारविचार थैमान घालीत होते. बालविवाहासारखे अनेक अनिष्ट प्रकार रूढी होऊन बसल्या होत्या! स्त्री म्हणजे पुरुषांचा गुलाम, त्याच्या हुकुमांची ताबेदार, तिला स्वतंत्र असें अस्तित्वच नाहीं ही समजूत दृढ होऊं घातली होती.

सरते शेवटीं पुष्कळ विचारमंथनानंतर स्त्रीशिक्षण देण्याच्या चळवळीपासून सामाजिक कार्यास आरंभ करण्याचें त्यांनीं ठरविलें. आपल्या कांही समविचार तरुणांच्या साह्यानें त्यांनीं लौकरच "ज्ञानप्रसारक सभा"——वाङ्मय व शास्त्र याची चर्चा करणारें मंडळ—( Student's Literary & Scientific society )—काढलें. मराठी व्याकरणाचे आद्यजनक दादोबा पांडुरंग हे या सभेचे पहिले अध्यक्ष. घराच्या ओसरीवर मुलींची शाळा सुरू झाली. दादाभाई मनापासून शिकवूं लागले.

लहानपणीं आपल्या बालमित्रांना भोवतालीं जमवून त्यांना हरतऱ्हेच्या गोष्टी सांगण्यांत रंगून जाणाऱ्या दादाभाईनीं आपल्या विचारांचा आणि सुधारकी मतांचा प्रसार करून जनतेंत जागृति घडवून आणण्यासाठी 'रास्तगोफ्तार'--सत्यवादी या नांवाचें साप्ताहिक सुरू केलें.

दादाभाईच्या अफाट कार्याचा आढावा प्राध्यापक फडक्यांच्या शब्दांत देणें योग्य होईल. "दादाभाईनीं समाजाची व राष्ट्राची जी सेवा केली ती खरोखरच अपूर्व होय. त्यांचें कार्य इतकें विविध होतें कीं, हिंदुस्थानविषयक अमुक एक प्रश्न त्यांच्या चळवळीच्या कक्षेबाहेर राहिला असें झालें नाहीं. सामाजिक, धार्मिक, राजकीय—सर्व प्रश्नांची चर्चा अंगावर घेऊन, त्यांनीं बहुजनसमाजास मार्ग दाखविला. 'विविधता' ही त्यांच्या कार्यातील विशेष गोष्ट होती........गगनचुंबी इमारत ज्यांच्या आधारावर उभी असते, ते मोठमोठे दगड पायाच्या भगदाडांत गडप होऊन लोकांच्या दृष्टीला दिसेनासे होतात. पण त्यांचें महत्त्व केवढें असतें! हीच गोष्ट दादाभाईच्या सामाजिक कार्याची आहे."[ ना. सि. फडके-दादाभाई नवरोजी ]

दादाभाईच्या जीवितकार्याची चर्चा करण्याचें हें स्थळ नव्हे. तरीसुद्धां त्याची साधारण रुपरेखा पुढील दृष्टांतावरून सहज समजून घेतां येईल.

समजा, एखाद्याला विशिष्ट स्थळीं पोहोंचावयाचें आहे. या स्थळाविषयीं सगळी कांहीं माहिती त्याला आहे. परंतु एकच अडचण आहे. या स्थळाला कोणत्या मार्गानें जाऊन पोंहचेल, हें मात्र त्याला मुळींच ठाऊक नाहीं. जाण्याची इच्छा तर अनावर आहे. भोंवतालीं सगळीकडे खोल दऱ्या, अजस्र पर्वत, अफाट जंगल, मोठमोठे वृक्ष व कांटेखुटे पसरलेले आहेत. पण या सर्वांची पर्वा न करतां, या स्थळीं पोंहचण्यासाठीं तो महासायासानें व मोठ्या धडाडीनें आपला मार्ग आक्रमीत असतो. प्रत्येक खेपेला जेव्हां जेव्हां त्याला नवीन मार्ग दिसतो, तेव्हां तेव्हां त्याचें हृदय आनंदानें भरून येतें. त्याला वाटतें, "छान, सरते शेवटीं सांपडला बुवा एकदांचा खरा मार्ग! आतां मी माझ्या इच्छित स्थळीं सुखरूप जाऊन पोंहचेन." पण हाय! त्याच्या पुष्कळ आशा फोल ठरतात. अनेकदां निराशाच त्याच्या पदरांत पडते. प्रगति केल्यासारखी वाटली तरी त्याचें इच्छित स्थळ तसेंच दूर आणि काळोखांत राहातें. आपण त्याच्याजवळपास पोंहचलों आहे कीं त्यापासून दूरदूर जात आहे हेंही त्यास समजेनासें होतें. पण तो खचत मात्र नाहीं. निराशेनें तो आपलें 'साध्य' मध्येंच सोडून देत नाहीं. कितीदां जरी मार्ग खुंटल्यामुळें त्याला मागें परतावें लागलें तरी 'एका कोळ्याचें घर' या कवितेंतील त्या प्रयत्नवादी कोळ्याप्रमाणें, पुन्हां पुन्हां दुप्पट उत्साहानें आपला मार्ग आक्रमण करण्यास तो पुढें सरसावतो. त्याला पक्की खात्री असते कीं, केव्हां ना केव्हांतरी बरोबर मार्ग सांपडेल, व आपण इच्छिलेल्या स्थळीं जाऊन पोंहचूं शकूं! आणि खरंच एक दिवस विजयश्री त्याला माळ घालते. त्याला मार्ग सांपडतो.

दादाभाईंचें चरित्रही हुबेहूब असेंच नाहीं का? वर वर्णन केलेल्या आशावादींत आणि त्यांच्यांत किती साम्य आहे! आपल्या 'देशबांधवांना सुखी करणें,' 'आपल्या समाजाला सर्व बाजूंनीं सामर्थ्यवान् करणें,' आणि 'आपल्या देशाची सर्वांगीण उन्नति करणें' ही त्यांची जाऊन पोंहचण्याचीं इच्छित स्थळें! तीं हस्तगत करायला त्यांनीं कितीतरी मार्ग स्वीकारले. बुद्धिमत्ता, मिळालेलें शिक्षण, आणि वाचनापासून मनावर झालेला परिणाम, हे

त्यांचे वाटाडे ! ह्यांच्या मदतीवर विसंबून, त्यांनीं मार्ग आक्रमण्यास आरंभ केला. स्त्रीशिक्षणासाठीं शाळा काढली. ज्ञानप्रसारासाठीं 'वाङ्मय व शास्त्र यांची चर्चा करणारी मंडळी' स्थापन केली. चैतन्यमय उत्साहवर्धक नव-विचार समाजांत पसरून त्याला आलेलें मांद्य दूर करण्यासाठीं, 'रास्तगोफ्तार'च्या द्वारें जनतेपुढें सत्य गोष्टी ठेवल्या. 'साक्रेटीस व डायोजिनिस यांचे संवाद' जनतेला समजावून देऊन त्यांच्या दृष्टिकोनांना विशालत्व देण्याचा प्रयत्न केला. पारशी धर्मावर अनावश्यक रूढींचीं पुटें बसलीं होतीं, तीं दूर करण्यासाठीं, 'धर्ममार्गदर्शक मंडळाला' जन्म दिला. व्यापाराच्या निमित्तानें युरोपांत जाऊन तिकडील ज्ञानकण जमा केले. इंग्रजच केवळ व्यापारांत हुशार आहेत असें नव्हे, हिंदी लोकसुद्धां त्यांच्याच लायकीचे आहेत, हें जगाला सिद्ध करून दाखविण्याची त्यांची महत्त्वाकांक्षा होती. हिंदी लोकांत कर्तबगारी आहे, विश्वासूपणा आहे, आणि व्यापारांत सर्वांत महत्त्वाची बाब जी पत, ती तर त्यांच्यांत पूर्णपणें वास करीत आहे, हें त्यांना जगाच्या निदर्शनास आणून द्याव-याचें होतें. पण युरोपांत दुसऱ्याच गोष्टींनीं त्यांचें मन आकर्षून घेतलें. आतां-पर्यंत आपण आक्रमिलेले मार्ग जरी प्रगतिकारक होते, तरी त्यांच्यामुळें आपण लौकर इच्छित स्थळीं जाऊन पोंहचणार नाहीं हें त्यांना कळून चुकलें. हिंदु-स्थानच्या अवनतीला मुख्य कारण इतर कोणतेंही नसून, राज्यकारभाराच्या 'हक्काची उणीव' हें त्यांना समजलें. याचवेळीं १८५७ च्या संग्रामानें सामान्य जनतेच्या असंतोषाला वाचा फुटली. लौकरच महाराणीसरकारांकडे हिंदुस्था-नच्या राज्यकारभाराचीं सूत्रें आलीं. दादाभाईंचा आनंद काय वर्णावा ! त्यांना वाटलें आतां आपणांला खरा मार्ग सांपडला. इच्छित स्थळीं पोंहचायला आतां मात्र शक्य होईल. पार्लमेंटांत हक्कांकरितां हक्कानें भांडूं. इंग्रजांच्या न्याय-प्रियतेवर त्यांचा केवढा अढळ विश्वास होता ! पण त्यांना या बाबतींत अनुभव आला तो वेगळाच ! "समकालीन परीक्षांचें बिल" (Simultaneous Examination) ज्याकरितां दादाभाईंनीं आपलें सारें वजन खर्ची घातलें होतें—पार्लमेंटाकडून जरी पास झालें, तरी हिंदुस्थान सरकारचा बागुलबुवा पुढें करून, लॉर्ड किंबर्लीनें जेव्हां त्याला केराची टोपली दाखविली, तेव्हां इंग्रजां-विषयींच्या दादाभाईंनीं बांधलेल्या उच्च कल्पनांना फार मोठा धक्का बसला.

इंग्रजी राजनीतिबद्दलचा पक्का तिरस्कार जर त्यांना केव्हां वाटूं लागला तर तो कर्झनशाहींत. हिंदुस्थानांतील द्रव्याचा अनेक मार्गांनीं शोष करण्यासाठीं ब्रिटिश साम्राज्यशाहीनें निर्माण केलेल्या राक्षसी हस्तकांचा तर त्यांना पुरा वीट आला. पण त्यांच्या सुदैवानें मध्यंतरीं त्यांना योग्य मार्ग दाखविला होता. हा जरीं मोठा राजमार्ग नसून एक लहानशीच वाट होती, तरी या वाटेनें मात्र आपण इच्छित स्थळीं सहज जाऊन पोंहचूं असा सरतेशेवटीं त्यांच्या मनांत विश्वास उत्पन्न झाला.

इसवी सन १८८५ सालीं स्थापन झालेली राष्ट्रसभा हीच ती वाट !

तीनदां दादाभाईंच्या गळ्यांत राष्ट्रसभेनें अध्यक्षपदाची माळ घातली. तरुण भारत त्यांना 'वृद्धपितामह' (G. O. M. Grand Old Man) म्हणून प्रेमानें व आदरानें संबोधूं लागला. त्यांना कळून आलें, आपणाला मार्ग मिळाला, पण या मार्गानें इच्छित स्थळीं पोहोंचेपर्यंत आपण जिवंत राहणार नाहीं. पण निराश होण्याचें त्यांना मुळींच कारण नव्हतें. त्यांनीं पेटविलेली तेजस्वी विचारांची ज्योत, पारशी मंदिरांतील 'पवित्र अग्नीप्रमाणें' सतत पेटत ठेवण्यास पूर्ण समर्थ असलेले कितीतरी वीर भारतानें तयार केले होते. दादाभाईंनीं त्यांच्याकरितां 'पार्श्वभूमी' तयार करून ठेवली. सरतेशेवटीं कां होईना, पण त्यांना योग्य मार्ग सांपडला होता. या मार्गाचा ते पूर्ण उपयोग करून घेऊं शकले नाहींत, तरी पुढील पिढीला हा मार्ग दाखवून देण्याचें महत्कार्य त्यांनीं केलें. इसवी सन १९०६मधील राष्ट्रसभेच्या अधिवेशनाच्यावेळीं अध्यक्षपदावरून भाषण करतांना, आपल्याला आलेल्या, ब्रिटिशांबद्दलच्या कटु अनुभवांचा उल्लेख करून, अर्ज व विनंत्यांचा आपण विक्रम करणारा असूनसुद्धां, त्यांची साधी पोंच मिळण्याशिवाय कांहींएक फायदा झाला नाहीं, असें उघड उघड जनतेस त्यांनीं सांगितलें. "........मला पहिल्याप्रथम प्रांजलपणें कबूल करूं द्या. मी माझ्या प्रयत्नांना सुरवात केलेल्या दिवसापासून, आजपर्यंत इतके कांहीं निराशेचे प्रसंग माझेवर आले आहेत कीं, माझ्या जागीं दुसरा कोणी असता, तर त्याचें काळीज एकतर फुटून गेलें असतें, किंवा मला अशीही भीति वाटते कीं, त्यानें बंडही केलें असतें......माझ्या जीवनाचा धर्म होऊन बसलेला जो गुण 'चिकाटी' त्याचा मी आधार घेतल्यामुळेंच हताश झालों नाहीं."

शेवटीं त्यांनीं सांगितलें, "......चळवळ करा, चळवळ करा, अखंड चळवळ करा ! मात्र लक्षांत ठेवा ही चळवळ शांतता मार्गाची असायला हवी. हिंदुस्थानचा प्रत्येक कानाकोपरा या चळवळीनें भारून गेला पाहिजे......प्रत्येक हिंदी माणसानें आपल्या देशासाठीं आत्मयज्ञ करायला आज पुढें सरसावलें पाहिजे. देशासाठीं सर्वस्वाची होळी करण्याची आज वेळ आली आहे. तोंड मिटून बसण्याची वेळ मागें गेली. आपण थंड राहिलों, तर राज्यकर्त्यांना वाटतें कीं, आम्हीं आहोंत त्या स्थितींत पूर्ण सुखी आहोंत. म्हणून आमचीं दु:खें चळवळीच्याद्वारें जगाच्या दृष्टीस आणा.......प्रत्येक हिंदवासीयाला त्याचे हक्क काय आहेत तें समजावून द्या.........."

हाच तर तरुण भारताला त्यांना संदेश द्यावयाचा नव्हता ?

# प्रकरण ५ वें.

## स्वतंत्र भारताचे द्रष्टे

## — न्यायमूर्ति रानडे —

" महाराष्ट्र देश म्हणजे त्यावेळीं एक थंड गोळा होऊन पडला होता. या थंड गोळ्याला कोणत्या तऱ्हेनें ऊब दिली असतां तो पुन्हां सजीव होईल व हातपाय हालवूं लागेल याचा रात्रंदिवस एकसारखा विचार करून अनेक दिशांनीं, अनेक उपयांनीं, अनेक रीतींनीं त्यास पुन्हा सजीव करण्याचें दुर्धर काम अंगावर घेऊन, त्याकरतां जीवापाड जर कोणी मेहनत केली असेल तर ती प्रथमतः माधवरावजींनींच केली, असें म्हटलें पाहिजे. व आमच्या मतें हेंच त्यांच्या थोरवीचें किंवा असामान्य मोठे-पणाचें मुख्य चिन्ह होय......धर्मव्यवस्था, समाजसुधारणा, उद्योगधंदे, शिक्षण, राजकीय व्यवस्था वगैरे सर्व बाबतींत आम्हीं मागें आहोंत व या सर्व गोष्टींत सुधारणा झाल्याखेरीज, इतर सुधारलेल्या राष्ट्रांची आपणास बरोबरी करतां यायची नाहीं, असा त्यांचा पक्का ग्रह झालेला होता...... सारांश महा-राष्ट्रांत जर कांहीं आजमितीस जोम आढळून येत असला, त्यांतील वक्ते व लेखक जर निर्भयपणें सार्वजनिक गोष्टींची चर्चा करीत असले, तर तें माधवरावजींच्या पंचवीस वर्षांच्या दीर्घोद्योगाचें फळ होय, असें म्हणण्यास कोणतीही हरकत नाहीं......"

— लो. टिळक —

'न्या. रानडे' मृत्यु लेख.

आपणां सर्वांस हवें असणारें संक्रमण कोणतें? त्यांत बंधनें नकोत, स्वातंत्र्य हवें; भोळसटपणा नको, श्रद्धा हवी; जन्मप्राप्त पदवी नको, समाज भूमिकेवरलि व्यवहार हवा; जबरदस्ती नको, युक्तिवाद हवा; विस्कळीतपणा नको, संघटना हवी; अत्याग्रह नको, सहिष्णुता हवी; आंधळा दैववाद नको, आत्मप्रत्यय हवा; सामाजिक विकासाचा माझा अर्थ हा आहे——मग तो व्यक्तीच्या दृष्टीनें असो कीं वर्गाला अनुलक्षून असो."

— न्यायमूर्ति रानडे —

मा. द. गो. कर्वे, यांच्या 'स्वतंत्र भारताचे द्रष्टे' यावरून.

भारताची सर्वांगीण सुधारणा कशी व्हावी याबद्दलचे सर्वव्यापक आणि सर्वस्पर्शी विचार आपल्या लेखांच्याद्वारें, लोकहितवादींनीं जनतेसमोर ठेवले. सामाजिक, राजकीय व आर्थिक अवनतींतून डोकें वर काढण्याचा मार्ग त्यांनींच प्रथम दाखवून दिला. स्वदेशी चळवळीचें महत्त्वही त्यांनींच विशद केलें. लोकहितवादींनीं पेरलेल्या या नवविचारांच्या बीजांचें संगोपन दादाभाईंनीं स्वतंत्ररीत्या, उत्कृष्टपणें केलें. हिंदुस्थानांतील संपत्तीच्या ओहोटीला लागलेलीं कारणें, त्यांनीं आपल्या सखोल अभ्यासाच्या जोरावर शोधून काढलीं. हिंदुस्थानांतून बाहेर जाणाऱ्या अलोट संपत्तीच्या ओघाला पायबंद घातल्याशिवाय, त्याला चांगले दिवस लाभणें अशक्य हें त्यांना कळून चुकलें. ही दृष्टि विचारांत घेऊनच त्यांनीं आपलें धोरण आखलें.

लोकहितवादींनीं केलेला उपदेश प्रत्यक्ष आचरणांत आणून त्याचा पुरस्कार, प्रचार व संघटना करण्यासाठीं, आणि दादाभाईंनीं हिंदुस्थानची हलाखी दूर करण्याबाबत मांडलेले विचार जनतेस सुलभपणें समजावून देण्यासाठीं, एक खंबीर व्यक्ती पुढें आली. तिनें लवकरच आपल्या कर्तृत्वाच्या जोरावर लोकांच्या मनांत आदराचें स्थान मिळविलें.

आधुनिक महाराष्ट्रीय समाजकारणाचा आणि राजकारणाचा पाया घालण्याचें श्रेय ज्यांच्याकडे बिनतक्रार देण्यांत येतें व ज्यांना 'स्वतंत्र भारताचे द्रष्टे' म्हणून ओळखण्यांत येतें, ते न्यायमूर्ति रानडे म्हणजेच ही व्यक्ति !

एखादा उथळ वृत्तीचा हजरजबाबी चिकित्सक उसळून म्हणाले, "...... काय हो, महाराष्ट्रांतील बारीकसारीक चळवळींविषयीं बोलायचें असो अगर अखिल हिंदुस्थानांतील सामाजिक, राजकीय आर्थिक किंवा धार्मिक बाबींबद्दल बोलायचें असो, प्रत्येक ठिकाणीं तुम्हीं हा जो न्यायमूर्ति रानड्यांचा उदो उदो करतां, त्यांत कांहींतरी खरोखरच अर्थ आहे का ? खरीच का त्यांची एवढी मोठी योग्यता आहे ? मला तरी बुवा हें पटत नाहीं. आणि पटणारही नाहीं. बाकी रानडे नशिबवान खरे ! राजशाही ऐषआरामी वळणाचें राजकारण, समाजकारण आणि धर्मकारण करण्यांत त्यांचा हात कुणाच्यानेंही धरवणार नाहीं. आयुष्याच्या शेवटच्या घटकेपर्यंत, बड्या हुद्याच्या, लठ्ठ पगाराच्या सहजसिद्ध मानाच्या जागेला चिकटून राहिले, आणि इतकेंही करून, 'देशभक्त' 'समाज-

सुधारक ' ' धर्मसुधारक ' वगैरे कितीतरी आदरार्थक पदव्या लोकांकडून गळ्यांत घालून घेऊन बसले ! यांना म्हणावें खरे ' पदवीधर मुकटमणि ' ! 'सर्वे गुणाः कांचनमाश्रयन्ते ' या सुप्रसिद्ध उक्तीप्रमाणें कदाचित् त्यांच्या हयातींत, त्यांचें प्रस्थ माजणें शक्य झालें असेल ! पण आजपर्यंत त्यांच्या मोठेपणाचें दडपण तुमच्या मनावर कां असावें, हेंच मला समजत नाहीं. हूं कीं चूं न करतां रानड्यांचें श्रेष्ठत्व मुकाट्यानें मान्य करणाऱ्यांची व तें अधिकाधिक वाढविण्याचा खटाटोप करणाऱ्यांच्या वृत्तीला काय म्हणावें ? न्यायमूर्तींच्या कार्यावर, त्यांच्या जीवनावर, अजून चारशें चारशें पानांचे जाडे जुडे ग्रंथ बाहेर पडतात. मासिकांचे संचालक त्यांच्या विषयींच्या लेखांनीं भरलेले खास अंक प्रसिद्ध करतात; आणि ज्यांच्या दृष्टीला रानड्यांचें नखसुद्धां पडलें नसेल असे नवशिखे लेखक सुद्धां, आपलीं कच्चीं मतें बळेंच त्या स्वर्गस्थ आत्म्यावर लादून आपली लेखनकलेची हौस भागवतात ! रानड्यांच्या या चहात्यांच्या वृत्तीला, अंधाभिमान, अंधानुकरण अगर अंधभक्ति म्हणावी, कीं या सर्वांचें मिश्रण म्हणावें हेंच कळेनासें होतें. कबूल ! लो. टिळकांनीं त्यांची योग्यता मान्य करून, थंड गोळ्याप्रमाणें झालेल्या महाराष्ट्रांत नवचैतन्य आणून, त्याला सजीव करण्याचें महत्कार्य रानड्यांनींच केलें असे उद्गार काढले हें मी कुठें नाकबूल करतों ? परंतु लोकमान्यांनीं त्यांची प्रशंसा केली म्हणून आम्ही सर्वांनीं त्यांचीच री ओढली पाहिजे हा कुठला न्याय ? तसं पाहिलें तर " परदेशी भांडवलाचे गोडवे गाणारे माधवराव देशद्रोही आहेत, " " म्हातारचळ कीं पोरखेळ " हे रानड्यांच्या बाबतींत काढलेले उद्गारही टिळकांच्याच लेखणीनें प्रसवले होते ना ? कांहीं झालें तरी टिळक राजकारणांत आणि जनरीतींत मुरलेले पक्के मुत्सद्दी गृहस्थ ! कांहीं वेळां वारा येईल तशी पाठ फिरवली पाहिजे या मताचे ते ! न्यायमूर्तींच्या मृत्युलेखांत त्यांचेबद्दलचे आदराचे उद्गार काढणें अत्यावश्यक व जनरीतीस धरून होतें. बोलून चालून मृत्युलेख तो ! पण याच उद्गारांना चिकटून राहून, न्यायमूर्तींच्या गुणांवर महाभारत रचणें ही कुठली रीत ? त्यांच्या भक्तांनीं एवढें प्रस्थ माजविण्याएवढें त्यांच्यांत काय असामान्यत्व होतें ? अगदीं लहानपणापासून त्यांच्या आयुष्यक्रमाकडे जरी निरखून पाहिलें, तरी त्यांत डोळ्यांत भरण्यासारखी एकही ठळक गोष्ट आढळून येणार नाहीं. प्रत्येक परीक्षेंत ते वरचा नंबर पटकावीत

होते हें खरें; पण त्यांत कौतुकास्पद असें कांहींच नव्हतें. आगरकरांसारखे शिक्षण मिळविण्यासाठीं, त्यांना थोडेच त्रास काढावे लागले आहेत ! वडिलांनीं पैसे पुरवायचे, आणि यांनीं निश्चिंत अंतःकरणानें डोळे बिघडून जाईपर्यंत अभ्यासांच्या पुस्तकांची दररोज चौदा ते सोळा तास घोकंपट्टी करीत बसायची ! मग परीक्षेंत वर आले नाहींत तरच आश्चर्य होतें. सामाजिक सुधारणेच्याद्वारें देशसेवा केली म्हणायची, तर इतरांच्या मानानें तीही डोळ्यांत भरण्यासारखी, व त्यांच्याविषयींचा आदर द्विगुणित करण्यासारखी खास नाहीं. यांची समाजसेवा म्हणजे नोकरी करून राहिलेला वेळ घालविण्यासाठीं केलेली ' रिकामपणांतील कामगिरी ' असें सुबुद्ध माणसाला म्हटल्याशिवाय कधींही रहावणार नाहीं. समाजसुधारणा, धार्मिक सुधारणा, हिंदी राजकारण आणि अर्थकारण वगैरे विषयांवर त्यांनीं कांहीं तेजस्वी विचार आपल्या लेखनाच्या रूपानें प्रगट केले असतील ! परंतु त्यांच्या अगोदरच्या पिढींतील लोकहितवादींचे कांहीं विचार, यांच्यापेक्षां कित्येक बाबतींत अधिक धडाडीचे व जास्त मूलग्राही दृष्टि दिसून येणारे होते, हें कोणालाही नाकबूल करतां येणार नाहीं. आणि जेव्हां विचारांप्रमाणें कृति करण्याची वेळ आली, तेव्हां तर सामान्य माणसालासुद्धां लाजवण्यासारखें त्यांच्या हातून वर्तन घडलें. प्रथम पत्नीच्या मृत्यूनंतर, पितृभक्तीचें बुजगावणें पुढें करून, पुनर्विवाह करून लोकांना उदाहरण घालून देण्याची आलेली सुवर्णसंधी, त्यांनीं गमावली, व एका अकरावर्षाच्या कोवळ्या मुलीशीं लग्न करून बसले. बरं लोकनिंदेला धैर्यानें तोंड देण्याचा कणखरपणा अंगांत नसल्यामुळें ही गोष्ट झाली, म्हणून तरी स्वस्थ बसतात ? तसेंही नाहीं ! उलट आपल्या कृतीचें समर्थन करून वरून उजळ माथ्यानें मखलाशी काय करतात, तर म्हणे, “ ...आपणांस सत्य वाटणाऱ्या गोष्टींचा आग्रह धरून वडिलांच्या मनास दुःख देणें योग्य नाहीं. ” अहा रे सुधारक ! या वृत्तीला का तत्त्वनिष्ठा म्हणायची ? आजपर्यंत होऊन गेलेल्या सुधारकांची जर ही वृत्ति असती तर कार्यसिद्धि मुळींच झाली नसती, आणि जगाची प्रगति मुंगीच्या चालीनेंही होणार नव्हती. ‘ चहाग्रामण्य ’ प्रकरणांत तर सर्वांआधीं हे आपले प्रायश्चित घेऊन मोकळे ! सर्व तऱ्हेच्या लोकांना खुष करण्याचा प्रयत्न करणाऱ्या तट्टूवाल्या म्हाताऱ्याप्रमाणें वागून का सुधारणा होणार आहे ?

सारांश, आपल्या तत्त्वांकरितां, आपल्या मतांकरितां, सॉक्रेटीस, एकनाथ, आगरकरांप्रमाणें त्यांची त्रास सोसण्याची केव्हांच तयारी नव्हती. स्वतःच्या सुखासाठीं व प्रतिष्ठा मिळविण्यासाठीं, आपल्या तत्त्वांशीं बेईमान होण्यास त्यांस कसलीच दिक्कत वाटली नाहीं. दुसऱ्यास सांगे ब्रह्मज्ञान आपण कोरडा × × × म्हणतात ना, तशांतलीच ही गत! धार्मिक क्षेत्रांतील त्यांच्या कार्याबद्दल बोलायचें तर हेंही खरें आणि तेंही खरें असें म्हणून 'सुवर्णमध्य' गांठण्याकडे त्यांचा अधिक कल! दैवयोगानें प्रार्थनासमाजाशीं त्यांचा संबंध आला; ते सभासदही झाले. पण एकनिष्ठ सेवक झाले असें मात्र मुळींच म्हणतां येणार नाहीं. केव्हां केव्हां तर आपण 'प्रार्थना समाजिष्ट' झाल्याबद्दल पश्चाताप तर यांना झाला नसेल ना असें त्यांच्या बोलण्यावरून वाटावयाचें. 'आर्यसमाज' स्थापन झाला तर त्यांतही यांचा हात! फक्त मिरवण्यासाठीं, दिसेल त्या क्षेत्रांत ते घुसत असत, असें एखादा स्पष्टवक्ता म्हटल्याविना कदापिही राहणार नाहीं. कित्येकदां आपल्या नोकरींत, आपमानाचे व मानहानीचे प्रसंग उद्भवले तरी या शांततेच्या पुतळ्याच्या हातून स्वाभिमानाचें कृत्य घडलेलें दिसून येत नाहीं. "चित्तरंजन जें बोलतो तें करतो" असें म्हणून आपल्या लाखों रुपयांच्या बॅरिस्टरीला रामराम ठोकणाऱ्या चित्तरंजन दासासारखा एखादा देशासाठीं स्वार्थत्याग रानड्यांनीं केला आहे का? त्यांच्या बद्दल मला आदर वाटत नाहीं असें नाहीं, पण असामान्यत्वाला लागणाऱ्या, स्वार्थत्याग, तत्त्वनिष्ठा, धडाडी वगैरे गुणांचें प्राबल्य त्यांच्या अंगांत विशेष रीतिनें दिसून येत नव्हतें असें मला फक्त म्हणायचें आहे. अशी स्थिती असतानांसुद्धां, त्यांच्या भक्तांनीं एवढा त्यांचा देव्हारा कां माजवावा? शाळा कॉलेज शिवाय इतर ठिकाणीं बहुशा आगरकरांचें नांव चर्चिलें जात नाहीं. 'आधुनिक भारता'च्या अभ्यासूशिवाय इतरांच्या तोंडांतून बिचाऱ्या लोकहितवादींचें नांव ऐकूं येत नाहीं. 'काळ' कर्त्याची आठवण फारच थोड्यांना असेल. न्यायमूर्तींच्या बाबतींत मात्र सगळेंच और! अरब लोक म्हणतात त्याप्रमाणें, 'कामकरू उंटाला वाळवंटातील रखड, आणि लबाड मांजराला घरांतील दूध,' हा जगाचा नियमच आहे म्हणायचा! नाहींतर इतरांपेक्षां न्यायमूर्ति रानड्यांतच असें विशेष काय होतें म्हणून त्यांचें नांव चिरस्मरणीय, वंदनीय, आदरणीय व्हावें?"

एका विशिष्ट दृष्टिकोनांतून केलेलें न्यायमूर्तींच्या स्वभावचित्राचें वरील विवेचन जरी कंटाळवाणें असलें, आणि त्यांतील उथळपणा भरपूर दृग्गोचर होत असला तरी तें अगदींच असत्यावर आधारलेलें आहे, असें एखाद्या सामान्य माणसाच्या मनास वाटेलच असें मात्र म्हणतां येणार नाहीं. न्यायमूर्तींच्या चरित्राचें रहस्य न समजलेल्या माणसास वरील प्रमाणें वाटणें साहजिकच आहे.

खुद्द अशाप्रकारची टीका माधवरावांच्या हयातींत होत नव्हती असें नव्हे; पण ह्या टीकेनें त्यांची चलबिचल मात्र केव्हांही झाली नाहीं. "अहो प्रत्येक माणसांत कांहींतरीं दोष हे असायचेच! मग आम्हींतरीं याला अपवाद कसे ठरूं! त्यांना आमच्यांत कांहीं दोष दिसत असतील, म्हणून ते असें बोलतात. त्यांत त्यांचा काय अपराध? मात्र योग्य वाटेल तें केल्या शिवाय आम्हीं केव्हांही सोडणार नाहीं." ते धिम्मेपणानें व शांतवृत्तीनें म्हणत. [ आठवणी ]

हाल अपेष्टांशीं झगडून, बिकट अडचणींना तोंड देऊन, प्रतिकूल परिस्थितीशीं निकराचा सामना देऊन, आणि आयुष्यभर आपल्या तत्त्वांसाठीं त्रास सोसून पुढें येणें हीच जर असामान्यत्वाची कसोटी असेल, तर या कसोटीला खाचित न्यायमूर्ति उतरणार नाहींत. वरील प्रकार म्हणजे असामान्यत्वाच्या कसोटीचें एक अंग असेल, पण खरी कसोटी म्हणजेच वरील दिव्यें म्हणणें कितपत रास्त होईल? धौम्य मुनीनीं आपल्या शिष्यांची परीक्षा घेण्यांतलाच हा प्रकार! रशियन राज्यक्रांतीच्या पूर्वीं राजसत्ता उलथून पाडण्यासाठीं, अनेक गुप्त मंडळ्या स्थापन होत. त्यांतील पुष्कळांचें सभासदत्व वरील प्रकारच्या कसोटींतून पार पडलेल्यानां मिळत असे. याचा इतका कळस झाला कीं, कांहीं तरुण आपल्या अंगांतील सहनशीलत्व, त्रास सोसण्याची चिकाटी, धडाडी, शौर्य, धूर्तपणा वगैरे गुण सिद्ध करण्यासाठीं, अध्यक्षांसमोर, एका हातांत धरलेल्या पेटलेल्या मेणवत्तीवर दुसऱ्या तळहातावरील चामडी जाळून दाखवीत. झारच्या बाजूच्या किती लोकांचे मुडदे आपण कोणत्या कौशल्यानें व धूर्ततेनें पाडले हें दुसरा एखादा पुराव्यानिशीं सिद्ध करी. जीवावर उदार झालेल्या या सर्व वीरांत जो वरील गुणांत वरचढ दिसून येई, तो त्या मंडळींचा पुढारी गणला जाई. देहदण्डनोवर आधारलेल्या या कसोटीनें काय होई तर केव्हां केव्हां

अस्मल गुन्हेगारही, आपल्या पोळीवर तूप ओढण्यासाठीं, आपले नीच हेतू सिद्धीस नेण्यासाठीं, या कसोटींतून एका क्षणांत उत्तीर्ण होऊन, या मंडळींत सामील होत. अगदीं अशाच प्रकारची वर दिलेली असामान्यत्वाची कसोटी धोपटमार्गी नाहीं का? जवाहिरलालांसारखा श्रीमंत बापाचा एकुलता एक लेक, तोंडानें समतेबद्दल कितीही बोलला, तरी तो गरीबींतून समाजांतील विषमतेचे धक्के खात खात वर आलेला नसल्यामुळें, त्यांना खरेखुरे समाजवादी म्हणतांच येणार नाहीं असें म्हणणाऱ्यांच्या मताला जी किंमत तीच वरील कसोटीची! रानडे हे कांहीं एकटेच सुखवस्तू विद्यार्थी नव्हते. त्यांच्या बरोबरचे इतर सहाध्यायी चकाट्या पिटून अगर दुसऱ्या एखाद्या करमणुकींत आपल्या सुटींतील दिवस घालवीत असतांना, मोठमोठ्या गहन विषयांवरील पुस्तकांत रममाण होऊन जाणाऱ्या माधवरावांना, त्यांच्या मोठेपणाचें श्रेय देणें योग्य होणार नाहीं असें कोण म्हणेल?

एवढें मात्र खरें कीं, न्यायमूर्तींच्या सामान्यत्वांतच असामान्यत्वाचीं बीजें दडलेलीं होतीं. लहानपणापासून मुखदुर्बलवृत्ति त्यांच्यांत भिनलेली! उपजतच त्यांच्या स्वभावांत धीम्मेपणा होता. आपल्या विचारांत दंग होऊन बाह्य जगाची शुद्ध नसलेल्या तत्वज्ञासारखी पुष्कळदां त्यांची वागणूक असे. कुठल्याही विद्यार्थ्याला आपणाला परिक्षेंत यश मिळालेलें पाहून किती आनंद होतो! त्यांतून नुकतीच विद्यादेवीच्या मांडीवर बागडूं लागणाऱ्या मुलांची गोष्ट तर वेगळीच असते. परीक्षा म्हणजे एक पर्वणीच असते त्यांच्या दृष्टीनें! परीक्षेंतील यशाची बातमी सगळीकडे फैलावण्यांत किती आतुर असतात तीं! परंतु या भावी न्यायमूर्तींची मात्र सारीच गोष्ट न्यारी. त्यांच्या बाकींच्या सोबत्यांकडून घरीं कळायचें कीं हे राजेश्री ठीकठाक परिक्षेंतून उत्तीर्ण झाले आहेत. मग घरच्या मंडळीनें आपण होऊनच परीक्षेबाबत यांना कौतुकानें विचारलें, तर एखाद्या हाडाच्या तत्त्वज्ञाला लाजाविण्यायोग्य गांभीर्यानें आणि निर्विकारपणानें ते उत्तर देत, "......परीक्षा पास झाली, यांत मुद्दाम सांगण्यासारखें काय आहे? आम्ही अभ्यास करतों, पास होतों!"(प्रा. न. र. फाटक कृत 'रानडे') हीच त्यांची वृत्ती शेवटपर्यंत होती. ज्या ज्या क्षेत्रांत त्यांनीं पदार्पण केलें, तेथें जयश्रीनें व लोकप्रियतेनें त्यांना माळ घातली. त्यांच्या जागीं दुसरा कोणी असता

तर त्याला आकाश ठेंगणें वाटलें असतें. पण माधवरावजींना आपण कांहीं विशेष केलें आहे अगर करतों आहों, असें केव्हांच वाटत नसे. "मी माझें कर्तव्य बजावतों आहे झालें!" (आठवणी.) कुणी स्तुती करूं लागल्यास ते म्हणत.

न्यायमूर्तींच्या उज्वल विचारसरणीला मोहून आणि त्यांनीं केलेल्या कार्यापासून स्फूर्ति घेऊन, देशकार्य करायला कितीतरी तरुण पुढें सरसावले. त्यापैकीं कित्येक भक्त त्यांचें चरित्र लिहिण्याबद्दल परवानगी मागत. पण वरील वृत्तीमुळें, आणि उपजत अंगीं वसत असलेल्या अति विनयामुळें, या बाबतींत शेवटपर्यंत ते आपली अनुमति देऊं शकले नाहींत.

न्यायमूर्ति रानड्यांनीं समाजकारण केलें; राजकारण केलें; धर्मकारण केलें; प्रत्येक क्षेत्रांत लक्षांत राहील अशी महत्वाची कामगिरी त्यांनीं बजावली. तरीसुद्धां पुष्कळदां, त्यांनीं हातीं घेतलेल्या कार्यांत ते इतका कमालीचा थंडपणा दाखवीत व प्रत्येक बाबतींत खोल विचार करण्याच्या आपल्या संवयीला बळी पडून, इतक्या धिम्मेपणानें, एकेक पाऊल पुढें टाकीत कीं कुणालाही वाटायचें, या संशयात्म्याच्या हातून काय होणार? पुष्कळ तरुणांच्या उसळत्या रक्ताला हा 'थंडपणा' कसा मानवायचा? याचमुळें नवीन पिढी टिळकांकडे आकर्षिली गेली. आगरकरांच्या बंडखोर विचारांचा त्यांना मोह पडूं लागला.

माधवराव हा जो संथपणा दाखवीत, तो कांहीं त्यांच्या अंगांत काम उरकण्याची धडाडी नव्हती, अगर एखादी गोष्ट तडीस नेण्याची तडफ नव्हती, किंवा त्यांच्यांत बुद्धीची कमतरता होती म्हणून नव्हे. प्रत्येक बाबतींत 'सुवर्णमध्यानें' जाण्याची जी त्यांना संवय लागली होती, तिच्या मागें त्यांच्या पूर्वायुष्यांतील मनावर झालेल्या अनेक संस्कारांचें दडपण होतें. याचकरितां त्यांच्या कार्याचें खरें महत्त्व मापावयाचें असल्यास, पहिल्यांदा, त्यांचें आयुष्य घडवायला कारणीभूत झालेल्या संस्कारांकडे—त्यांच्या पार्श्वभूमीकडे—वळलें पाहिजे.

त्यांच्या अंगांत जन्मजात असलेल्या स्वाभिमानाची चुणुक इतक्या प्रखरतेनें विद्यार्थीदशेंत दिसून आली कीं ती प्रखरता सहन न झाल्यामुळें त्यांच्या हितचिंतक व्यवहारी प्राध्यापकांना तिच्यावर सक्तीनें आवरणें घालावीं लागलीं.

त्याचं असं झालं! मॅट्रिकच्या परीक्षेंतील प्रश्नपत्रिकेंत ' मनूच्या काळापासून आजपर्यंत समाजांत घडलेली स्थित्यंतरें ' हा एक निबंधलेखनाकरतां दिलेला विषय होता. आधींच इतिहास हा माधवरावांचा आवडता विषय. त्यांत वाचनही बरेंच झालेलें. आणि स्वतंत्रपणें विचार करण्याची खोड लागलेली. लिहिण्याच्या पवित्र आवेगांत त्यांनी प्रचलित इंग्रजी राज्यकारभारावर अध्यापकांना झोंबेल अशा प्रकारचा जरासा कडक मजकूर घातला. पण या स्वतंत्र प्रज्ञेची चहा परतंत्र देशांत कशी व्हायची? ' सद्‌गुण, ' ' दुर्गुण ' ठरणें हाच तर पारतंत्र्याचा मुख्य विशेष! पण या इतिहासाच्या त्रिकालाबाधित नियमाची माधवरावांना त्यावेळीं विस्मृति पडलेली होती कीं काय कुणास ठाऊक! यामुळें झालें काय तर इतिहास विषयांत त्यांना मिळायला हव्या असलेल्या गुणांना कांट लावण्यांत आला.

जन्मभर आठवण रहाण्यासारखा दुसरा एक प्रसंग असल्याच परिस्थितींतून उत्पन्न झाला. ते कॉलेजमध्यें असतांना, त्यांना एका निबंधांत शिवाजीच्या राज्यपद्धतीशीं इंग्रजी राज्यपद्धतीची तुलना करायची होती. हे त्यांच्या ऐन तारुण्याचे दिवस होते. त्यांच्या विचारांवर जगांतील कटु अनुभवांची छाया अजून पडलेली नव्हती. निर्दय परिस्थिती, त्यांच्या देशप्रेमाला, स्वातंत्र्य प्रेमाला, स्वदेशाभिमानाला, लगाम घालण्यास असमर्थ होती. सद्सद्विवेकबुद्धीनें जन्म दिलेले सगळेच विचार या स्वार्थी व कावेबाज जगांत प्रगट करायचे नसतात, हा धडा त्यांना अजून मिळायचा होता. तुलना करण्याच्या भरांत, त्यांना योग्य वाटणारे मनांतील विचार कागदावर उमटले गेले. इंग्रजी राज्यकर्त्यांच्या गळ्यांत त्यांच्याकडून बरेचसे दोष घातले गेले. एलफिन्स्टन कॉलेजचे त्यावेळचे प्रिन्सिपॉल, सर ॲलेक्झांडर ग्रँट होते. ते माधवरावजींना अत्यंत चाहत. त्यांच्या तीक्ष्ण बुद्धिमत्तेबद्दल वारंवार प्रसंशाही करीत. परंतु आपल्या रक्तबंधूंना, एका नवशिक्या पोऱ्यानें, राज्यकारभाराला नालायख ठरविलेलें त्यांना कसें खपायचें? माधवरावजींसारख्या हुशार विद्यार्थ्याच्या डोक्यांत शिरलेलें हे भलतेंच वेड त्यांना कसें सहन व्हायचें? असले खुळचट विचार—अर्थात त्यांच्या दृष्टीनें हें काय सांगायला हवें?—जर बळावले तर फुकट याच्या आयुष्याचें मातेरें व्हायचें. आपणांबरोबर बुद्धीच्या जोरावर

दुसऱ्यांना बिघडवील हीहि भीती! इंग्रजी शिक्षणप्रसार करण्याचा मॅकोले साहेबांचा हा का उद्देश होता? पुष्कळ विचारान्ती ग्रँट साहेबांनीं, आपल्या अविंडत्या शिष्याला, या अक्षम्य गुन्ह्याबद्दल चांगली आठवण राहील अशी अद्दल घडविण्याचें ठरविलें. माधवरावांची सहा महिन्यांची छात्रवृत्ती जप्त करण्यांत आली. प्रामाणिक विचार प्रदर्शनाबद्दल त्यांना यथायोग्य बक्षीस मिळालें.

लहानपणींचे बारीक सारीक संस्कारसुद्धां मोठेपणीं कायमचे टिकतात असें मानसशास्त्रज्ञ सांगतात. वरील कटु अनुभवांमुळेंच तर पुढें न्यायमूर्तींच्या पुष्कळ कृतींत सशाची सभयता दिसून येत नव्हती ना? ग्रँट साहेबांनीं दिलेल्या शिक्षेमुळें त्यांच्या स्वतंत्र विचारवारूला लगाम तर बसला नसेल? किंवा ग्रँट साहेबांच्या ठिकाणीं असलेल्या त्यांच्या निस्सीम श्रद्धेनेंच त्यांना आपलें चुकलें होतें असें दाखवून दिलें? कारण ग्रँट साहेब जेव्हां सेवानिवृत्त होऊन युरोपला जायला निघाले, तेव्हां त्यांना जें मानपत्र देण्यांत आलें, त्यांत माधवरावजींनीं पुढील शब्द घातले होते. "......महत्त्वाच्या विषयावर एखादा विद्यार्थी धिम्मेपणानें व समंजसपणानें सर्व बाजूंची पूर्ण माहिती न मिळवतां जर घाईनें मनाच्या गैरवाजवी खात्रीवर विश्वासून निश्चित अभिप्राय देण्यास प्रवृत्त झाला, तर त्याचा निरुत्साह करून आपल्या अध्यापकच्या अभ्यासावद्दल त्याच्या मनांत तिटकारा उत्पन्न होईल अशी खबरदारी ते (ग्रँटसाहेब) घेत असत......" (रानडे चरित्र–प्रा. न. र. फाटक)

जेथें जेथें म्हणून पेंचप्रसंग उद्भवले, तेथें तेथें मिळतें घेण्याचा हा स्वभाव त्यांच्या पुढील आयुष्यक्रमांत अनेकवार दिसून आला, हें काय त्यांच्या चरित्रनिरीक्षकांस सांगायला हवें? १८९० सालीं भरलेल्या औद्योगिक परिषदेचें उदाहरण घ्या ना! परदेशी भांडवलाला इकडे येऊं दिलें म्हणून हिंदुस्थानचा कांहीं तोटा होत नाहीं, या मताचे माधवराव! परंतु नव्या मनूच्या नवविचारांनीं भरलेल्या टिळक प्रभृतींना हें कुठलें पटायचें? स्वदेशी माल वापरणें म्हणजे देशाचें हित करणें, असें करतांना अर्थशास्त्राच्या सिद्धांतांना महत्त्व देऊन चालणार नाहीं, त्यांना हरताळ फासला तरी हरकत नाहीं, अशा मताचे हे तरुण! इंग्रजी भांडवलवाले कमी व्याजावर हिंदुस्थानांतील धंद्यांनां पैसे पुरवतात म्हणून त्यांचे आभारसुद्धां मानण्यास हरकत नाहीं असें

म्हणण्याची तयारी असलेल्या रानड्यांचीं मतें, ह्या तरुणांना कशीं रुचायचीं? न्यायमूर्तींच्या या मुद्यावर ते असा युक्तिवाद करीत कीं, 'हें जें भांडवल ते पुरवतात तें आमच्याच देशांतील लूट करून नेलेले! त्याचमुळें इकडे भांडवल सांचत नाहीं! हलवायांच्या घरावर तुलसीपत्र ठेवणाऱ्यांचे आभार ते कसले मानायचे?' असल्या या दोन मतानुयायांचें पटायचें कसें? परंतु एकमेकांतील ही दुही परिषदेला विघातक ठरेल म्हणून माधवरावांनीं आपलें हें मत परिषदेंत मांडण्याचें रद्द केलें. मात्र प्रतिपक्षानेंही परदेशी भांडवलाबद्दलचा उल्लेख करतां कामा नये अशी एक अट घालायला ते विसरले नाहींत. नंतर भावनातिरेकामुळें दोन्हीही पक्ष आपल्या अटी गुंडाळून ठेवून शब्दघाईवर कसे आले, हें पहाण्याचें इकडे कारण नाहीं. या सभेंत मनःस्वास्थ्य हरण करण्यासारखीं भाषणें प्रतिभाषणें होऊन सुद्धां, सरते शेवटीं समारोपाच्या वेळीं सगळ्यांच्याच मनाची समजूत घालण्यासारखें माधवरावांनीं जें भाषण केलें, तें वक्तव्याच्या इतिहासांत खरोखरच चिरस्मरणीय ठरेल. प्रतिपक्षाला दोन गोड गोष्टी समजावून सांगून, त्यांच्याशीं मिळतें घेण्याचा त्यांच्या वृत्तीचें तें खास द्योतक होतें.

न्यायमूर्ति रानड्यांच्या नांवामागें ज्या अनेक सन्मानदर्शक पदव्या चिकटविण्यांत येतात, त्या सर्व बाजूला ठेवून, फक्त 'व्यवहारी तत्त्वज्ञ' या नांवानें त्यांचा उल्लेख करणें अधिक सयुक्तिक होईल. त्यांच्या सर्व आयुष्यपटाचें जरी उडतें अवलोकन केलें, तरी तो एका तत्त्वज्ञान्याला शोभेल असा होता, हें आढळून येईल. पण हा तत्त्वज्ञानी, आत्म्यांत, अशक्यांत आणि कल्पनासृष्टींत तरंगणारा प्राणी नव्हता. त्यांच्या जीवनविषयक तत्त्वज्ञानाला व्यवहाराची जोड होती. प्रपंच साधून परमार्थ करण्याचें तें तत्त्वज्ञान होतें.

लहानपणापासूनच्या त्यांच्या जीवनपटाकडे लक्ष द्या. ज्या वयांत भपकेदार रंगी बेरंगी पोशाख घालून मिरवण्याची अनिवार हौस प्रत्येकांत दिसून येते, त्याच वयांत हा 'बालतत्त्वज्ञ' भरजरी पोशाखाचा तिटकारा करी. सणाच्यावेळीं अंगावर चढवलेले दागिने लोकांच्या दृष्टीस पडतील म्हणून ते कपड्यांच्या खालीं लपवितांना त्यांची कोण तारांबळ उडे! या त्याच्या विचित्र वागणुकीचें कारण जर कोणीं विचारलें, तर तो जें उत्तर देई तेंही तितकेंच चमत्कारिक. "......आपल्या घरीं जे भिक्षा माधुकरी वगैरे मागायला येतात,

त्या गरिबांच्या अंगावर कुठें दागिने असतात?" लहानपणापासून असल्याप्रकारचे विचार मनाशीं बाळगणारा हा गृहस्थ, मोठेपणीं न्यायमूर्तींच्या पदावर चढला, तरी आपल्या कोट्यावधी देशबांधवांना अर्धनग्न स्थितींत पाहून, पोशाखाच्या बाबतींत गबाळा आणि वेंधळाच राहिला तर त्यांत काय आश्चर्य? सरळपणाच्या बाबतींत तर विचारूंच नका. कांहीं बाबतींत या सरळपणाचें रूपांतर सरळ भोळेपणांत झालें होतें. खेळायला दुसरा जोडीदार नसल्यामुळें, खांबाला प्रतिस्पर्धी समजून व त्याला आपला एक हात देऊन, त्याच्याशीं बुद्धिबळें खेळणारा, व शेवटीं त्याच्याकडून स्वत:वर मात करून घेणारा हा विक्षिप्त गडी, 'संशयाच्या फायद्याशीं' नेहमीं गांठ असणाऱ्या न्यायमूर्तींच्या जागेला लायक नव्हता असें कोण म्हणेल? त्यांच्या वागणूकीबद्दल सर दि. ए. वाच्छांनीं काढलेले उद्गार लक्षांत ठेवण्यासारखे आहेत. ते म्हणतात:-"...... रानड्यांच्या मनाची ठेवण अक्षरश: ग्रीक पद्धतीच्या वळणावर गेली होती. त्यांच्या ठिकाणीं नेहमीं सॉक्रेटिसाची विनीतवृत्ति, अंतर्मुखता व आत्मानुभव दिसून येई. त्यांच्या मनाची ठेवणही या तत्त्वज्ञासारखी असून त्याच्याच पद्धतीनें ते कोणत्याही गोष्टींत आपली विचारसरणी ठरवीत." —[ 'स्वतंत्र भारताचे द्रष्टे' वरून ]

माधवरावांच्या पुढील आयुष्याची 'पार्श्वभूमि' योग्य रीतीनें जर केव्हां घडली गेली असेल, तर ती कॉलेजमधील जीवनांत! आपल्या आयुष्यांतील बौद्धिक, नैतिक, सामाजिक, धार्मिक आणि भावनांचे विषय याच काळांत त्यांनीं निश्चित केले. या बाबतींत आपण केलेल्या विविध विषयांवरील ग्रंथांच्या वाचनाची त्यांनीं भरपूर मदत घेतली. 'प्लेटोच्या संवादांनीं' त्यांच्या राजकीय दृष्टिकोनांनां विशालत्व दिलें. गिबन, मॅकोले प्रभृतींनीं त्यांना इतिहासाची गोडी लावली. पुढें जे ते पुष्कळदां जुन्या नव्याचा संगम घडवून आणण्याचा हेतुपुरस्सर प्रयत्न करीत, त्याच्या मागें हें इतिहासप्रेम—पूर्वकालीनांच्या कृतीबद्दलचें निर्व्याज प्रेम होतें, असें मानसशास्त्रज्ञ म्हटल्याशिवाय राहणार नाहींत. फ्रेड्रिक, लिस्ट, ॲडम स्मिथ, रिकार्डो प्रभृतींच्या ग्रंथांच्या आधारावर, त्यांचीं अर्थशास्त्रविषयक मतें उभारलीं गेलीं. भूतकालीन अनुभवांच्या पायावर वर्तमानकालीन सुधारणांची इमारत उभारायची असते, हें कार्लाइलनें त्यांना

शिकविलें. एवढें मोठें ज्ञानभांडाराचें गाठोडें व सच्छील बरोबर सोबतीस घेऊन, त्यांनीं आपल्या स्वतंत्र आयुष्यक्रमास आरंभ केला. त्यांच्या वाचनाला, अभ्यासाला, मननाला कृतीचीं सुमधुर फळें आलीं तीं पुण्यांत.

इ. स. १८७१ च्या नोव्हेंबर महिन्यांत, पहिल्या वर्गांतील, पहिल्या ग्रेडस्‌मधील सबॉर्डिनेट जज्ज म्हणून ते पुण्यांत रहायला आले. पुण्यांतील त्यांच्या या आगमनाच्या दिवसापासून पुढील तीस वर्षांच्या काळाला 'रानडे युग' म्हणून संबोधण्यास कांहींच हरकत नाहीं. या काळांत ज्या म्हणून सामाजिक, राजकीय, अगर धार्मिक चळवळी झाल्या, त्यांत प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरीत्या न्या. रानड्यांचें अंग नव्हतें, असें कधींच झालें नाहीं. सार्वजनिक चळवळींत व राजकारणांत नवचैतन्य उत्पन्न करून, त्याच्या लाटा साऱ्या भरतखंडभर पसरवून, कांहीं काळ या महाराष्ट्राच्या केंद्रस्थानाला, मुंबई इलाख्याची 'बौद्धिक व राजकीय राजधानी' बनण्याचा जो मान दिला, त्याचें सारें श्रेय न्यायमूर्तींच्या कार्यालाच दिलें पाहिजे. 'इंदुप्रकाशांतील' समतोल वृत्तीनें लिहिलेल्या आपल्या विचारपूर्ण लेखांनीं, ते महाराष्ट्राला एक अभ्यासू विद्वान गृहस्थ म्हणून परिचित होते. पण खरे कार्यकर्ते म्हणून जर लोक त्यांना कधीं ओळखूं लागले तर ते पुण्यांत आलेल्या दिवसापासून. तत्त्वनिष्ठ गणेश वासुदेव जोशी उर्फ 'सार्वजनिक काका' यांनीं काढलेल्या सार्वजनिक सभेचे ते लवकरच प्राण बनले.

सरकारी जबाबदारीच्या नोकरीचें लोढणें गळ्यांत बांधून सार्वजनिक कार्य करणें, हें कांहीं कमी दिव्य नव्हतें. न्यायमूर्तींच्या वेळची परिस्थिती अत्यंत नाजूक होती. हिंदवासीयांकडे आणि मुख्यत्वेंकरून 'लुटारूंचे वंशज' अशा महाराष्ट्रीयांकडे अजूनपर्यंत इंग्रज साशंकतेनें पहात होते. फडक्यांचे बंड, दख्खनचे दंगे, बुधवार वाड्याचें भस्मीकरण, विश्रामबागवाड्याची जाळपोळ वगैरे जनतेंत मधून मधून घेणाऱ्या असंतोषाच्या स्फोटांनीं, त्यांची ही साशंकता अधिक बळावली. याची आंच न्यायमूर्तींनां लागल्याशिवाय राहिली नाहीं. सरकारचें मन त्यांच्याविषयीं कधींच शुद्ध नव्हतें. पण रानड्यांची वागणूक इतकी चोख असे कीं, त्यांच्यावर कोणताही आळ आणणें काकदृष्टीच्या सरकारला शक्य झालें नाहीं. हिंद जनतेच्या बाबतींत फाजील सावधगिरी बाळगणाऱ्या सरकारनें त्यांच्या मागें गुप्त पोलीसांचा ससेमिरा लावण्यास मात्र कमी केलें नाहीं.

अशावेळीं न्यायमूर्ति रानड्यांनीं धारण केलेली शांततावृत्ति खरोखर अभिनंदनीय होती. पुष्कळदां सरकारचें विचित्र वर्तन, स्वाभिमानाला धक्का लागण्यासारखें होतें. परंतु जोपर्यंत आपण सत्यास धरून चालतों, तोपर्यंत या कोल्हेकुईकडे लक्ष देण्याचें काय कारण, या धोरणानें ते वागले. श्री. न. चिं. केळकरांच्या भाषेंत सांगायचें म्हणजे, " लोकमताची जशी त्यांनीं पर्वा केली नाहीं तशीच सरकारच्या अवकृपेचीही केली नाहीं. "

सार्वजनिक भानगडींपासून अलिप्त राहिल्यास आणि राजकारणविषयक लिखाण न केल्यास, नोकरींत एकसारखी बढती होत राहील, असें त्यांचे पुष्कळ हितचिंतक युरोपिअन मित्र त्यांस प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष रीतीनें सुचवीत. याबद्दल माधवरावांनीं काढलेले उद्गार सुप्रसिद्धच आहेत. " ...लिहूं नका असें मला सांगणें, म्हणजे वाचूं नका—मरा—असें सांगणें आहे. तें मला कसें पत्करेल? ज्या भावनेनें मी लिहीत आहे, ती जीवांत जीव आहे तोपर्यंत कायम राहील; बढती न मिळाली तर न मिळो. " ( 'रानडे' प्रा. फाटक ).

न्यायमूर्तींची कार्यपद्धति कोणत्या तत्त्वांवर आधारलेली होती हें खुद्द त्यांच्याच शब्दांत सांगतां येईल. " ...माझ्या तत्त्वज्ञानांतील दोन गोष्टींवर माझी अविचल श्रद्धा आहे. हा आपला देश, हीच जगाची खरी उद्धारभूमि आहे, आणि हिंदी जनताच त्या उद्धारकार्याकरतां ईश्वरानें नियोजिली आहे; याच त्या दोन गोष्टी होत." [ द. गो. कर्वे–'रानडे' ]

" आयुष्य हें काम करण्याकरितां मिळालेलें असतें; आणि मला जर काम करण्यास सवड मिळणार नसेल, तर जगण्याचीही इच्छा नाहीं." ते नेहमीं म्हणत. आपल्या या विचारांबरहुकूम ते शेवटच्या घटकेपर्यंत वागले. त्यांची प्रकृति दिवसें दिवस क्षीण होत चालली होती. परंतु आपल्या निर्याणापर्यंत ते काम करीत राहिले. विश्रांति घेण्याकरितां त्यांनीं सहा महिन्यांची रजा घेतली होती. पण विश्रांति म्हणजे कामांत बदल अशी त्यांची विश्रांतीची व्याख्या असावी. कारण या दिवसांत त्यांनीं आपल्या कार्याचा आणि अभ्यासाचा व्याप दुप्पट वाढविला. या रीतीनें, 'काम करतां करतां मरण्यांत सुख असतें,' हें त्यांचें आवडतें सुभाषित, त्यांच्या बाबतींत अक्षरश: खरें ठरल्याचा अनुभव आला.

न्यायमूर्तींच्या एका भक्ताच्या शब्दांत त्यांच्या जीवितकार्याचा समारोप करतां येईल. "......रानड्यांचें वैशिष्ट्य हेंच कीं, त्यांच्यामध्यें अनेक मोठ्या लोकांचें वैशिष्ट्य एकत्र झालें होतें......त्यांच्यामध्यें सर्वच प्रकारचें पुढारीपण आणि मार्गदर्शनाचें सामर्थ्य एकवटलें होतें......त्यांचें जीवन हें सर्वस्वीं अर्पणबुद्धीवर अधिष्ठित झालेलें होतें ... त्यांचें जीवन कर्मयोगावर, देशाभिमानावर, आणि आध्यात्मिक वृत्तीवर आधारलेलें होतें......जीवनामधील विविध बाजूंचा अनुभव घेऊन, परिस्थितीच्या सहाय्यानें, ईश्वरी हेतु म्हणून जो आपल्यास पटला आहे, त्याच्या सिद्ध्यर्थ स्वतःची सर्व प्रकारें प्रगति करून घ्यावयाची हा जो कर्मयोगाचा मार्ग, तोच त्यांचा धर्म होता......" [ द. गो. कर्वे—'रानडे']

या स्वतंत्र भारताच्या द्रष्ट्यांना भावी हिंदुस्थानचें किती भव्य उज्ज्वल चित्र दिसत होतें पहा !"......आपला हा हिंदुस्थान देश एक दिवस जगांतील राष्ट्रांमध्यें आपलें मानाचें योग्य तें स्थान पटकावणार व आपल्या स्वतःच्या प्रारब्धावर आणि परिस्थितीवर स्वामित्व मिळवणार हें निःसंशय. त्या दिवशीं सर्वांस आत्मिक स्वातंत्र्य लाभेल, आशासागरास भरती येईल, श्रद्धा कर्तव्यापासून विचलित होणार नाहीं, न्यायवृत्ति सर्वांना सारखेपणानें वागवील, बुद्धि निभ्रान्त होईल, सामर्थ्याचा संपूर्ण विकास होईल, आणि प्रेमभाव सर्व बंधनें तोडून उचंबळूं लागेल. हें आपलें ध्येय आहे; आपल्या भविष्यांतील स्वर्भूमि ती या प्रकारची आहे. ज्यांच्या मनःश्चक्षूनां हें भविष्य दिसतें, ते धन्य होत; ज्यांनां त्या करितां कार्य करण्याची व त्याचा मार्ग सुकर करण्याची संधी मिळते, ते त्यांहून धन्य होत; ज्यांना हें प्रत्यक्ष पहावयास मिळेल व अशा भूमीवर पदक्षेप करण्याचें भाग्य लाभेल, ते तर सर्वांत धन्य होत." [ द. गो. कर्वे–'रानडे' ]

त्यांची ही आशा, त्यांची ही स्फूर्तिदायक महत्त्वाकांक्षा, सत्यसृष्टींत आणण्याचा, तन–मन–धन अर्पण करून, आयुष्यभर प्रयत्न करणाऱ्या रत्नांना भारतमातेनें जन्म दिला होता.

ह्या रत्नांपैकीं, 'विवेकवादी राष्ट्रवादाचा' पाया घालून सामाजिक सुधारणेकडे साऱ्या जनतेचें लक्ष खेंचून घेणारे गोपाळ गणेश आगरकर व 'स्वाभिमानी राष्ट्रवादाचे' जनक लोकमान्य टिळक हे प्रमुख होत.

या ‘ दोन ध्रुवांच्या ’ जीवनाकडे पाहून एखादा कविहृदयाचा माणूस म्हणेल, “ रानड्यांच्या अंगांतील दोन प्रमुख गुणांची यांनीं वांटणी करून घेतलेली दिसते ! एकानें समाजसुधारणेचें वीं उचललें आणि दुसरा राजकारण घेऊन बसला. या गुणांची उत्तम प्रकारें जोपासना करण्यांत मात्र कोणीही एकमेकांना हार गेला नाहीं. ”

एखादी वीज चमकावी, भोंवतालच्या गडद अंधकाराचा नाश करून तिनें सर्वांचें लक्ष आपणाकडे वेधून घ्यावें, त्यांच्या स्मरणांत आपणाकरितां कायम जागा करून ठेवावी, आणि दुसऱ्याच क्षणीं लुप्त होऊन जावी, त्याप्रमाणें आगरकरांचें अल्पायुष्यी जीवन ठरलें.

# प्रकरण ६ वें.

## आधुनिक महाराष्ट्रांतील सुधारकांचे अध्वर्यु
## गोपाळ गणेश आगरकर

"आम्हांस जें बरें दिसत आहे तें आम्ही कां न बोलावें हें आम्हास समजत नाहीं. ज्या कारणांनीं आमच्या देशाच्या पाठीमागें आज कित्येक युगें दास्यचक्र लागलें आहे; ज्या कारणांनीं आमच्या आंगीं स्त्रैण आलें आहे; ज्या कारणांमुळें इतर राष्ट्रें आमची छीः थूः करीत आहेत, व ज्या कारणांमुळें आम्हीं बुद्धीनें नीतीनें व शरीरसामर्थ्यानें अधिकाधिक क्षीण होत असून थोड्या वर्षांत आमचा मुळींच मागमूस नाहींसा होईल कीं काय अशी भिती वाटत आहे; तीं कारणें अल्पसमजुतीच्या, कोत्या विचारांच्या, स्वार्थी भेकड किंवा मत्सरी लोकांच्या दूषणाला भिऊन, उघड सांगण्यास कचरणारे सारेच होतील, तर या भारतीय समाजाचें किंवा त्यांतील कोणत्याही व्यक्तीचें डोकें वर निघण्याचा संभव नाहीं... ...ज्याच्या मनांत समाजांत राहून आपली उन्नति करून घ्यावी अशी उत्कट इच्छा झाली असेल, त्यानें अगोदर समाजाची उन्नति करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. समाजच खालीं खालीं जात असेल, तर हाच वर कुठून येणार ?... ...ज्यांना मनुष्याच्या पूर्णावस्थेचें रूप बिलकूल समजलेलें नाहीं किंवा ती घडून येण्यास काय केलें पाहिजे हें ठाऊक नाहीं, अशांच्या पर्वतप्राय झुंडांच्या झुंडी तुटून पडल्या तरी, जो खरा विचारी आहे, ज्याला लोककल्याणाची खरी कळकळ आहे, सत्य बोलणें व सत्यास धरून चालणें यांतच ज्याचें समाधान आहे, अशानें वरच्या सारख्या क्षुद्र लोकांच्या अवकृपेला, रागाला, किंवा उपहास्यतेला यत्किंचित् न भितां, आपल्या मनास योग्य वाटेल तें लिहावें, बोलावें व सांगावें हेंच उचित होय. त्याच्या अशा वर्तनांतच जगाचें हित आणि त्याच्या जन्माची सार्थकता आहे......"

**गोपाळ गणेश आगरकर.**

" अत्युत्कृष्ट आचरण, निगर्वी आणि द्वेषरहित वृत्ति, सद्गुणांचें कौतुक, दुर्गुणांविषयीं तिटकारा, व्यंगाविषयीं अनुकंपा, प्रचंड उद्योग, सत्यान्वेषणाची तळमळ, सत्याचरणाचा दृढनिश्चय, आणि आपल्या अनेक शतकें हतभाग्य झालेल्या मातृभूमीवर अपरंपार प्रेम व तिचा सौभाग्यसूर्य उदय पावावा म्हणून तनमनधन किंबहुना सर्वस्वाची पुर्णाहूति देण्याची पूर्ण तत्परता अशा अनेक गुणसमुच्चयामुळें, आगरकरांचें चरित्र हें मोठें उद्बोधक आहे यांत शंका नाहीं......स्वदेशाच्या पारतंत्र्यानें हृदय होरपळून निघाल्यामुळें आणि त्या पारतंत्र्याची बलवत्तर कारणें शोधून काढून, त्यांचा निरास करण्यांत आयुष्य खर्चायचें असा निश्चय झाल्यामुळें, सरकारी नोकरीची रुपेरी शृंखला पायांत अडकावून न घेतां, स्वतंत्रपणें स्वजनसेवा करावयाची, केवळ अब्रूनें संसार करण्यापलिकडे द्रव्याचा लोभ ठेवायचा नाहीं, जेथें स्वदेशाला विपन्न अवस्था आली, तेथें स्वतःच्या बडेजावींत पडावयाचें नाहीं, हा मार्ग आगरकरांनीं पत्करला; आणि त्या असिधाराव्रतापासून कायेनें, वाचेनें, मनानें, कृतीनें ते अणुरेणुमात्रही ढळले नाहींत, ही गोष्ट त्यांचीं मतें मान्य करणाऱ्यांना अगर अमान्य असणाऱ्यांना सारखीच मान्य आहे.......त्यांचें वैशिष्टय राष्ट्रस्थितीच्या मूळ कारणाचें यथायोग्य निदान करून रोगबिजावर शस्त्रवैद्याप्रमाणें हल्ला करण्यांत होतें......आपली स्वतःची परिस्थिती व मनोवृत्ति यांच्यांत बदल झाला पाहिजे व तो केवळ सामाजिक किंवा राजकीय किंवा आर्थिक अशा एकाच बाबतींत नसून, सर्व बाजूंनीं झाला पाहिजे, असा त्यांच्या मनाचा निश्चय झाला होता."

प्रा. मा. दा. आळतेकर, 'आगरकर'

तारुण्य म्हणजे आकांक्षांचें माहेरघर ! ‘ आकांक्षांपुढतीं गगन ठेंगणें ’ अशी स्थिती माणसाच्या मनाची केव्हां होत असेल, तर ती वयाच्या सोळाव्या वर्षांत पदार्पण केलेल्या दिवसापासून पुढील सात आठ वर्षांच्या काळांत ! आपल्या भावी आयुष्याविषयीं मोठमोठीं मनोराज्यें करण्यांत तो रमून जातो. क्षणांत तो समाज सेवक बनतो; तर दुसऱ्याचक्षणीं आपल्या तत्त्वांसाठीं जीव देणारा हुतात्माही बनूं पहातो; मोठमोठ्या विभूतींचीं चरित्रें वाचून, आपण यांच्यासारखेंच कांहींतरी करणार, याबद्दलच्या प्रतिज्ञा करण्यासही तो मागें पुढें पहात नाहीं; ज्या ज्या क्षेत्रांत तो दृष्टिक्षेप करतो, त्या त्या क्षेत्रांत, त्याच्या मनाला विलक्षण मोह पाडण्यासारख्या गोष्टी त्याला आढळून येतात. आपल्या पुढील आयुष्यांत कितीतरी समाजोपयोगी आणि देशहितकारक गोष्टी करून, लोकांचा ‘ आदर्श ’ बनण्याचा, तो निश्चयांवर निश्चय करीत असतो. उच्च, उदात्त, पवित्र असे अनेक विचार त्याच्या मनांत थैमान घालीत असतात. पण......

खरोखरच तो जेव्हां आपल्या आयुष्याला स्वतंत्रपणें प्रारंभ करतो, तेव्हां दुर्दैवानें, त्याची ही धडाडी टिकत नाहीं. त्याच्या विद्यार्थीदशेंतील आकांक्षा, ध्येयें, उच्च विचार नि सर्व कांहीं केवळ स्वप्नसृष्टि ठरते. ध्येयभ्रष्टतेची रुखरूख लागण्याइतकें त्याचें मन जीवंत असलें, तर तो आपलें खोटें समाधान करून घेण्यासाठीं म्हणतो, “ विद्यार्थीजीवनाबरोबरच त्यांतील आकांक्षाही संपल्या. त्यावेळचे पुस्तकी विचार, व्यवहारी जगांत थोडेच टिकूं शकतात ! ”

काय मूर्खपणाची समजूत ही ! खरीच का अशी स्थिती असते ? केवळ तत्त्वनिष्ठा अंगांत नसल्यामुळें पुष्कळजण ध्येयपतित होऊन आपलें जीवन निष्क्रिय करून घेत नाहींत का ? प्रवाहांत सांपडलेल्या शुष्क काष्ठाप्रमाणें, आयुष्यप्रवाहांत गटंगळ्या खाणारे हे क्षुद्र लोक, परिस्थितीची लाट जिकडे नेते तिकडे जातात. कोणत्याही प्रकारच्या परिस्थितीला धैर्यानें तोंड देऊन, आपण निश्चित केलेल्या मार्गानें जाण्याचें कसब अंगांत नसल्यामुळेंच त्यांचें आयुष्य समाजहितास अगर देशाच्या प्रगतीस उपयोगी पडत नाहीं. कीटकांप्रमाणें ते जन्मतात, जगतात, खातात, प्रजोत्पादन करतात नि मरतात.

ध्येयावर अढळ दृष्टि ठेवून, आपण ठरविलेल्या मार्गावरून जातांना किंचितसुद्धां च्युत न होणारे जे महाभाग असतात, तेच देशाच्या सुस्थितीला, समाजाच्या प्रगतीला, आणि अखिल मानवजातीच्या हिताला सहाय्य होतात. अशा लोकानांच विभूति मानण्यांत येतें. याच व्यक्ती जनतेला पूज्य होतात.

आगरकर ही एक अशा प्रकारची व्यक्ति होती.

वर्ग चालू होता. सगळ्या विद्यार्थ्यांचें लक्ष मास्तरांकडे होतें. महाजनी मास्तर कोणतातरी विषय विद्यार्थ्यांना समजावून देण्यांत गुंतले होते. इतक्यांत वर्गाच्या दारांत एक उंचसा विद्यार्थी येऊन उभा राहिला. धांवत आल्यामुळें त्याला दम लागलेला स्पष्ट दिसत होता. शाळेंत यायला उशीर झाल्यामुळें, शरम आणि भय या दोन विकारांचा अनुकंपनीय संगम, त्याच्या तेजस्वी पण दीन डोळ्यांत दिसून येत होता. खरं पाहिलं, तर उशीर होण्यांत त्या बिचाऱ्याचा कांहींच अपराध नव्हता. घरांतील हरएक प्रकारचीं बारीक सारीक कामें करावीं लागत त्याला. मग एक दिवस असा उशीर होणें साहजिकच होतें. मास्तरांना हें ठाऊक नव्हतें असें नाहीं. पण कां कुणास ठाऊक, एक प्रकारच्या वैतागानें उपहासपूर्ण स्वरांत ते म्हणाले, " तुमचा काय अभ्यास होणार हें दिसतेंच आहे. तुम्ही असेच रखडत पडणार." या हृदयभेदी शद्बांचा अहेर करण्यांत मास्तरांचा मोठा दोष होता असें नाहीं; कारण त्या विद्यार्थ्याची घरची परिस्थितीच अशी बिकट होती, कीं कोणीही वरील प्रकारचे उद्गार खास काढले असते.

त्या विद्यार्थ्याला मात्र शिक्षकाकडून मिळालेले हे शाब्दिक टोले सहन झाले नाहींत. त्याच्या भावनावश हृदयाला हे शब्द शल्याप्रमाणें जाऊन भिडले. गरीब झाला तरी त्यालाही भावना आणि मन हें असायचेंच. त्याच्या-स्वाभिमानानें आणि आत्मविश्वासानें उचल खाल्ली.

" मी आपल्यासारखा एम्. ए. झालों तरच नांवाचा आगरकर. " गोफणींतून दगड सुटावे, त्याप्रमाणें हे शब्द एकदम त्या विद्यार्थ्याच्या तोंडून बाहेर पडले.

हें उत्तर ऐकून मास्तरांसकट सगळ्या विद्यार्थ्यांना वाटलें असेल कीं हा विद्यार्थी चक्रम् नि तापट आहे. या उत्तरांतून व्यक्त होणाऱ्या स्वाभिमानाकडे फारच थोड्यांचें लक्ष गेलें असेल. त्याच्या अंगावरील फाटक्या सद्र्याकडे पाहून

ते मनांतल्या मनांत पुटपुटले असतील, "हा कुठचा एम्. ए. होतोय! खर्डेघाशींत जन्म जायचा याचा कुठेंतरी. रामा शागीर्दाचे दिवस मागें पडले म्हणावं."

कांहीं वर्षे लोटलीं; आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे याच मास्तरांना आपल्या या चक्रम आणि तापट विद्यार्थ्याच्या आठवणी नि चरित्र लिहिण्यास मोठा अभिमान वाटूं लागला. या विद्यार्थ्यानें जरी आपल्या मास्तरांच्या अपेक्षेप्रमाणें, जन्मभर लेखणीच झिजवली, तरी ती कारकुनाचें काम करतांना नव्हे; तर अज्ञानी लोकांच्या डोळ्यांत अंजन घालून त्यांना सज्ञान करण्याच्या कामांत. एखाद्या सामान्य कारकुनाच्यापेक्षांही अधिक दारिद्र्यांत या विद्यार्थ्यानें आपलें आयुष्य काढलें, आणि त्यांतच आपला देह ठेवला. पण तो 'सुधारकाचा जनक', 'सुधारकांचे अध्वर्यु', 'तत्त्वनिष्ठ', 'स्वार्थत्यागाची मूर्तिमंत प्रतिमा', आणि 'ध्येयनिष्ठतेचा पुतळा', प्रिन्सिपॉल गोपाळ गणेश आगरकर एम्. ए. म्हणून.

दरिद्री माणसाचे मनोरथ हे हवेंत बांधलेल्या मनोऱ्यांप्रमाणें केव्हांही सत्यसृष्टींत येण्याचा संभव नसतो, असें मानण्याचा प्रघात आहे. परंतु हें म्हणणें खोटें पाडून, अशक्य असें या जगांत मनुष्याला कांहीं नाहीं, अशक्य ही चीज, मुर्खांनीं आणि अज्ञान माणसांनीं आपली निष्क्रियता झांकून ठेवण्यासाठीं शोधून काढलेली एक युक्ति आहे, इच्छा आहे तेथें मार्ग हा असतोच, हें प्रत्यक्ष आपल्या कृतीनें, अत्यंत प्रतिकूल आणि बिकट परिस्थितींत, आपल्या महत्त्वाकांक्षा सफळ करून, सिद्ध करणाऱ्याही कांहीं व्यक्ति असतात. आगरकर हे अशांच्यापैकींच होते.

आगरकरांच्या तेजस्वी, पवित्र नि कलंकरहित जीवनाकडे पाहून क्षणभर मनांत असा विचार चमकून जातो कीं हा सॉक्रेटीसचा आधुनिक भारतांतील अवतार तर नव्हता! बुद्धिवाद, विवेकवाद आणि समतावाद, या त्रयींवर आधारलेलें जीवन आणि सद्सद्विवेकबुद्धीला भजणाऱ्या सॉक्रेटिसाचें जीवन यांत किती मोठें साम्य आहे! दोघांनींही आपल्या तत्त्वांसाठीं आयुष्यभर अनेक प्रकारचे त्रास नि हाल अपेष्टा सोसल्या. आपल्या तत्त्वांशीं शेवटपर्यंत प्रामाणिक राहिल्यामुळें, दोहोंचेही तत्कालीन मूढ जनतेनें धिंडवडे काढले. आपल्या सद्-

सद्विवेकबुद्धीशीं प्रतारणा न केल्यामुळें, दोघांनांही आपल्या आयुष्यांत लोकमान्यत्व मिळूं शकलें नाहीं. मरणापूर्वींच सोंग आणून एकाचें खोटें प्रेत कांहींनीं रस्त्यांतून फिरवलें, तर दुसऱ्याची जमिनीला पाय न लावतां हवेंतून चालणारा प्राणी म्हणून, एक वेडीवांकडी मूर्ति बनवून, आणि तिला टोपलींत बसवून गांवभर मिरवणूक काढली. ध्येयनिष्ठतेसाठीं दोघांनींही स्वखुशीनें आणि आनंदानें दारिद्र्याला कवटाळलें. ईश्वरानें दिलेल्या अगाध बुद्धीचा जर त्यांनीं स्वार्थानें प्रेरित होऊन, व्यवहारिकदृष्ट्या इतरांप्रमाणें उपयोग केला असता, तर......

तर त्यांच्यांत आणि इतर सामान्य माणसांत काय फरक राहिला असता? आज त्यांचीं नांवें जनतेच्या हृदयपटलावर कायमचीं कोरलीं गेलेलीं आढळलीं नसतीं.

ज्या परिस्थितींत आगरकरांचे लहानपण गेलें, ज्या वातावरणांत ते वाढले, ज्या परिस्थितींत त्यांनीं आपल्या विद्यार्थीदशेचे दिवस घालविले, आणि ज्या परिस्थितींत त्यांनीं आपलें पुढील आयुष्य काढलें, त्या परिस्थितीची, त्या वातावरणाची; त्यांच्या जीविताची पार्श्वभूमि बनायला उपयोग झाला यांत संशय नाहीं. पण याच परिस्थितीनें, एक श्रीमंत, ऐषआरामी, गर्विष्ठ, आपल्याच सुखांत सदासर्वकाळ गुंग होऊन रहाणारा, बाहेरच्या जगाविषयीं पूर्ण बेफिकीर असणारा, असा अजब प्राणी जगाला देणें अशक्य नव्हतें हेंही तितकेंच खरें आहे.

आगरकरांचा जन्म ज्या घरांत झाला, त्या घरांत अठरा विश्वें दारिद्र्य तर मी म्हणत होतें. अशा परिस्थितीला न डगमगतां केवळ स्वप्रयत्नावर, हजारों अडचणींचे पर्वत महाप्रयासानें ओलांडून एम्. ए. पर्यंत मजल मारल्यावर एखाद्या विद्यार्थ्याच्या मनाला काय वाटलें असतें?

" आतां आपला त्रास संपला. या दिवसांत नोकरी मिळणें कांहीं त्रासाचें नाहीं. एखादी भली मोठी पगाराची नोकरी गांठीन, आणि बायकामुलांसह आयुष्य सुखानें घालवीन. विद्यार्थी दशेंतील खडतर अनुभव, सुखांत लोळणाऱ्या आपल्या भावी चिरंजीवांना अगर नातवंडांना सांगून त्यांची आपण करमणूक करीत आहे, हें भावी आयुष्याचें किती रम्य चित्र आहे!"

कदाचित् या व्यक्तीनें, आपल्या सुखांत कोणत्याही प्रकारचा व्यत्यय न येतां स्वार्थ साधून शक्य असल्यास परमार्थही साधला नसता असें नाहीं. पण तो केवळ सुखांत भर घालण्याचें साधन म्हणून. आगरकरांच्या वेळीं असले लोक समाजांत नव्हते असें नाहीं. पोटोबा नेहमीं खुशींत ठेवून, विठोबा भजतांना केवढी प्रतिष्ठा नि प्रौढी मिरवित होते ते ! पण आगरकरांना असलें दुटप्पी वृत्तीचें ढोंगी आयुष्य घालवायचें नव्हतें. " पुष्कळ बाबतींत आपले लोक अज्ञान आहेत, ही अज्ञानावस्था, आपल्या देशाला ग्रहण लावायला कारणीभूत आहे, तेव्हां त्यांना सज्ञानी करून सोडण्यासारखा कांहीं प्रयत्न करायचा," ( मनोरंजन-आगरकर अंक, आठवणी. ) हें त्यांचें ध्येय अगदीं निश्चित झालें होतें.

या आधुनिक सॉक्रेटिसानें एम्. ए. झाल्यावर आनंदाच्या भरांत आपल्या आईला कोणत्या प्रकारचें पत्र लिहिलें असेल ? आई, आतां आपले हाल-अपेष्टांचे दिवस संपले; आमच्या घरांत यापुढें लक्ष्मी राहायला येणार याबद्दल खात्री बाळग. इतके दिवस विद्या संपादण्यासाठीं मी जे त्रास काढले त्याचें आपणांस आतां फळ मिळणार; अशा आशयाचा मजकूर त्यांनीं आपल्या पत्रांत घातला असेल अशी जर कुणाची कल्पना असेल तर ती सपशेल चुकीची ठरेल. भावी सुखाचीं रम्य चित्रें न रंगवितां या महाशयांनीं आपल्या वृद्ध मातोश्रीला काय लिहिलें, ठाऊक आहे ? त्यांनीं लिहिलें होतें, " आई, एम्. ए. झाल्यावर आपला मुलगा श्रीमंत होईल अशी जर तूं अपेक्षा केली असशील, तर ती कृपा करून सोडून देशील काय ?" ( आठवणी )

आगरकरांच्या साऱ्या जीवित-कार्याचें स्पष्ट प्रतिबिंब या वाक्यांत पडलेलें आहे. कोणत्या प्रकारचें जीवन घालविण्याचा त्यांनीं विद्यार्थीदशेंत निश्चय केला असेल, हें समजावून द्यायला, हें वाक्य पूर्ण समर्थ आहे.

आपला मुलगा फार दिवसांनीं एम्. ए. तर झाला ! आतां आपणाला पैशाची ददात मुळींच पडणार नाहीं. श्रीमंती आपण होऊन चालत येईल असें आगरकरांच्या आईला वाटणें साहाजिक व मनुष्य स्वभावास धरूनच होतें. आपल्या कष्टाळू आणि दृढनिश्चयी मुलाच्या भावी श्रीमंती जीवनाचें चित्र तिनें रंगविणें सहजस्थितीस अनुसरून होतें. ती त्यांची आई होती. कोणत्या आईला

केव्हांना केव्हां तरी, आपल्या मुलानें सुखांत लोळावें, अशी इच्छा उत्पन्न होणार नाहीं? तिनें तर गोपाळरावांनीं विद्यासंपादनार्थ सोसलेले हाल प्रत्यक्ष डोळ्यांनीं पाहिलेले होते. पुढील शिक्षण घेण्यासाठीं तळमळणाऱ्या बाळ गोपाळानें मुनसफ कचेरींतील आपल्या उमेदवारीच्या नोकरीला रामराम ठोकून कऱ्हाडा पासून रत्नागिरीपर्यंत—जवळ जवळ दोडशें मैलाचें अंतर—एकटा पायीं प्रवास करून, बालवयांत आपल्या भावंडांसहित आळंदीहून पैठणापर्यंत प्रवास करणाऱ्या ज्ञानेश्वराची आठवण करून दिलेली ती माऊली विसरली नव्हती. तिकडे वाटाण्याच्या अक्षता मिळाल्यावर सुद्धां नाऊमेद न होतां अकोल्याला जाण्याच्या आलेल्या संधीचा, आपल्या हेतुपूर्ततेसाठीं महत्त्वाकांक्षी गोपाळानें कसा उपयोग करून घेतला होता, याबद्दलची तिची स्मृति अगदीं ताजी होती. कॉलेजांतील पहिल्या वर्षी तर, पैशांच्या अभावीं आपल्या एकुलत्या सदऱ्यावर त्यानें कसे हृदयद्रावक रीतीनें दिवस काढले होते, हेंही तिला ठाऊक होतें. आणि सरतेशेवटीं एवढें मोठें दिव्य करून, या सर्व कष्टांचें फळ एम्. ए. च्या रूपानें त्याच्या पदरांत पडलेलें पाहिल्यानंतर, इतरांप्रमाणें आपल्या मुलानेंही, खोऱ्यानें पैसा घरांत ओढण्याच्या कार्याला लागावें, अशी तिनें कां इच्छा करूं नये?

म्हणूनच आगरकरांनीं तिला आपल्या पत्रानें सावध केलें. कदाचित तिचा मनोभंगही होईल, याची त्यांना जाणीव नव्हती असें नाहीं. संन्यास घेऊन आत्मशोध करण्याची इच्छा धरणाऱ्या आद्य शंकराचार्यांना, आपल्या या कृत्यानें, आईच्या मनाला धक्का बसेल हें काय ठाऊक नव्हतें? मगरीनें पकडल्याच्या सोंगाचा पेंचप्रसंग उत्पन्न करून, त्या बिचारीकडून संन्यास घ्यायला परवानगी मिळवितांना का शंकराचार्यांच्या मनाला कमी क्लेश झाले असतील? आगरकरांची अशीच स्थिती होती. ज्या तत्त्वांची जोपासना त्यांनीं विद्यार्थीदशेपासून केली, जीं तत्त्वें अमलांत आणण्यासाठीं त्यांनीं कितीदांतरी मनांतल्या मनांत प्रतिज्ञा केल्या, जीं तत्त्वें कोणत्या रीतीनें आचरणांत आणावीं, याचा विचार करण्याच्या पायीं रात्रीच्या रात्री त्यांनी घालविल्या, तीं प्राणापेक्षांही प्रिय असलेलीं तत्त्वें, आपल्या बिकट आर्थिक परिस्थितीचें बुजगावणें पुढें आणून, सोडून देण्याचा विचार त्यांच्या मनाला कधींही शिवला नाहीं. आधीं

स्वतःच्या स्वार्थाकडे लक्ष पुरवून नंतर परमार्थ साधणें म्हणजे आपल्या तत्त्वांशीं बेइमानी करणें होय, असें त्यांस वाटत होतें. शिक्षण घेतांना केवढा त्रास पडला याचा त्यांना अनुभव होता. अशा महाप्रयासानें मिळवलेल्या शिक्षणाचा उपयोग, फक्त स्वतःची तुंबडी भरण्यासाठीं करणें अत्यंत लाजिरवाणी गोष्ट आहे, असें त्यांच्या मनानें घेतलें होतें. ' दुर्लभ असें शिक्षण प्राप्त झालें. या शिक्षणामुळेंच आपणाला समाजाचे दोष व त्याच्या अधोगतीचीं कारणें दिसून आलीं. देशाच्या दुःस्थितीची मीमांसा या शिक्षणानेंच आपणाला समजावून दिली. या शिक्षणानेंच देशाला सुस्थितीला आणण्याचा, समाजाला सामर्थ्यवान् करण्याचा मार्ग दाखवून दिला. या शिक्षणामुळेंच आपण खरेखुरे डोळस झालों. ' त्यांच्या मनांत विचार आले असतील. मग ह्याप्रमाणें डोळे असून आंधळ्याप्रमाणें वर्तण्याचें त्यांच्या हातून कसें झालें असतें ? इतिहासानें दिलेल्या ज्ञानाचा, तर्कशास्त्रानें प्रगल्भ केलेल्या बुद्धीचा आणि तत्त्वज्ञानानें विकसित केलेल्या मनाचा केवळ स्वतःचा स्वार्थ साधण्यासाठीं, उपयोग करावयाचा ? छेः ! हें केंव्हांच शक्य नव्हतें. गोपाळरावांना एम्. ए. व्हावयाचें होतें तें केवळ हा क्षुद्र हेतु तडीस नेण्यासाठीं नव्हे. मिल, स्पेन्सर, प्रभृतींच्या ग्रंथांचीं जीं त्यांनीं पारायणें केलीं होतीं, तीं केवळ परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठीं नव्हतीं. त्यांच्या भावी आयुष्याची ती पूर्वतयारी होती. अज्ञान हा सर्व अधोगतीचा पाया आहे हें तत्त्व समजून आल्यावर, त्याच्याकडे दुर्लक्ष करणें, अगर स्वस्थ बसणें त्यांना शक्य नव्हतें.

ज्यांना शिक्षणाचा लाभ झाला होता, त्यांपैकीं बहुतेक त्या काळीं ज्या मार्गानें जात, त्या मळलेल्या मार्गांतील दुर्गुण आगरकरांना स्पष्ट दिसत होते. असा दोषांनीं भरलेला मार्ग पत्करण्यापेक्षां, नवीन मार्ग चोखाळणेंच अधिक योग्य होतें. निबंधकार विष्णुशास्त्र्यांचें तेजस्वी उदाहरण त्यांच्या समोर होतें. त्यांच्या मतांना पाठिंबा देणारा एक मित्रही सुदैवानें त्यांना लाभला होता. हा मित्र म्हणजे, " स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे, " या मंत्राचा द्रष्टा नि हिंदुस्थानच्या राजकीय क्षितिजावर अढळपणें तळपत रहाणारा तेजस्वी तारा लोकमान्य बाळ गंगाधर टिळक. पुढें आगरकर टिळकांत मतभेद उत्पन्न झाले असतील; परंतु हे मतभेदसुद्धां जनतेला सर्व बाजूंनीं जागृत ठेवायलाच उपयोगी

पडले. पर्वतापासून निघालेल्या एखाद्या नदीनें कांहीं प्रदेश आक्रमिल्यावर, तिला दोन फांटे फुटावे व ते देशाच्या दोन विरुद्ध बाजूस पसरावें हें जसें देशाच्या सुपीकतेच्या दृष्टीनें हितावह ठरतें, त्याचप्रमाणें टिळक-आगरकरांचा विचार-ओघ कांहीं काळ एकत्र वाहिल्यावर, तो दोन विरुद्ध प्रवाहांनीं वाहूं लागला. या दोन्हींही प्रवाहांनीं लोकांत अधिकाधिक चैतन्य पसरविण्यास बहुमोल मदत केली. 'वादे वादे जायते तत्त्वबोध:' या उक्तीप्रमाणें दोघांनींही एक-मेकांशीं चर्चा करून आपलीं मतें चांगलीं तावून-सुलाखून घेतलीं होतीं. दोघांच्याही मनांत देशाला आपलें आयुष्य अर्पायचें होतें. ज्ञानप्रसार व समाज-स्थितीचें ज्ञान अज्ञ जनतेला करून देणें हें त्यांचें ध्येय ठरलेलें होतें. तें सिद्धीस नेण्यासाठीं, शाळा व वर्तमानपत्रें यांशिवाय दुसरीं कोणतीं साधनें अधिक योग्य होतीं ? शास्त्रीबुवांचा नवीन शाळा काढण्याचा हेतु आहे हें समजतांच हें मित्र-द्वय एकदम त्यांस जाऊन मिळालें. "......अवनत राष्ट्राचें भौतिक नैतिक आणि धार्मिक पुनरुज्जीवन करून, धिमेपणानें आणि शांततायुक्त क्रांतिच्या मार्गानें त्यांना बहुतेक पुढारलेल्या राष्ट्राच्या पंक्तीला आणून बसविणें, हें कार्य मानव-जातीय संस्कृतीच्या अखिल साधनांपैकीं केवळ शिक्षणानेंच घडून येत असतें आणि म्हणून सार्वजनिक शिक्षणाचें हें कार्य......" [न्यू इंग्लिश स्कूलचा १८८३ अहवाल-अळतेकर, 'आगरकर चरित्र'] अंगावर घेण्यास त्यांना हुरूप आला...

शाळेच्या रूपानें भावी पिढीची तर व्यवस्था झाली. पण विद्यालयाच्या द्वारें जनतेचें अज्ञान दूर करणें कसें शक्य होतें ? त्यांना आपले दोष कसे दाखवून द्यायचे ? राजकीय बाब सोडून दिली, तरी सामाजिक स्थितीसुद्धां किती हलाखीची झाली होती ! बालविवाह, बालवैधव्य, विधवांचें केशवपन, जाती-भेद वगैरेंच्या रूपांनीं समाजाला लागलेली कीड कशी काढून टाकायची ? या सर्वांवर 'वर्तमानपत्र' हें एकच साधन, जालिम उपाय ठरणार होतें.

लवकरच 'केसरी'ची गर्जना व 'मराठ्या'च्या ललकाऱ्या जनतेच्या कानांवर आदळूं लागल्या. त्यांना जाग येऊं लागली.

केसरीचें संपादकत्व आगरकरांच्या गळ्यांत पडलें. केसरीच्या अंकांतील 'वर्तमानपत्रें' या लेखावरून त्यांनीं वर्तमानपत्रासाठीं आपली लेखणी कां सरसावली हें समजून येईल. "......वर्तमानपत्रांचा मुख्यत: दोन प्रकारांनीं

मोठा उपयोग आहे. एक हा कीं, त्यांनीं आपलें काम निःपक्षपातानें व निर्भिड-पणानें बजावलें असतां, सरकारी अधिकाऱ्यांवर मोठा दबदबा रहातो. रस्तोरस्तीं रात्रीं दिवे लागलेले असल्यानें व पोलीसांची गस्त सारखी फिरत असल्यानें जो उपयोग होतो, तोच ज्या ज्या जागीं वर्तमानपत्रकर्त्यांची लेखणी सदोदित चालू असल्यानें होत असतो. सरकारी अधिकाऱ्यांनीं आपापलीं कामें चोख रितीनें चालविलीं असतां त्यांत प्रजेचें कल्याण असतें हें कुणास सांगावयास नकोच. पण वरील चोखपणा रहाण्यास, त्यांचा सर्व कारभार जेव्हां लोकांच्या नजरेसमोर वरचेवर येत जाईल, तेव्हां राहणार. सर्व गोष्टी सर्वांच्या समक्ष होत असल्या म्हणजे अर्थातच लांचलुचपत वगैरे जे अन्यायाचे प्रकार एरव्हीं होण्याचा संभव असतो, तो पुष्कळ अंशीं नाहींसा होतो. जुन्या एतद्देशीय संस्थानांतून वरील प्रकार किती चालत असे व अद्याप किती चालतो, हें लक्षांत आणलें असतां, पत्रकर्त्यांची गस्त लोकांस किती हितावह आहे हें कुणाच्याही लक्षांत आल्यावांचून रहाणार नाहीं.......वर्तमानपत्रांचा दुसरा मोठा उपयोग लोक-स्थितीच्या संबंधानें आहे. तिची सुधारणा होण्यास वर्तमानपत्रांसारखें दुसरें साधन नाहीं. कोणकोणत्या गोष्टी लोकांस हितकारक आहेत व कोणकोणत्या अहितकारक आहेत, जुन्या चाली टाकून देण्यासारख्या कोणत्या आहेत व नव्या घेण्यासारख्या कोणत्या आहेत, वगैरे गोष्टींचा वर्तमानपत्रांच्या द्वारें उहापोह चालला असतां किती फायदा होणार आहे ! ”

जनतेला हा फायदा देण्यासाठीं आगरकरांनीं आपली लेखणी जो चालू केली ती जीवितयात्रेच्या शेवटच्या घटकेपर्यंत तशीच चालू ठेवली.

निर्भीडपणें आपले विचार केसरीच्याद्वारें मांडणें, हळुहळू आगरकरांना अशक्य होऊं लागलें. एखाद्या जुन्या संस्थानिकाप्रमाणें केसरींत अधिक पुराणप्रियता होती. समाजसुधारणेच्या बाबतींत आगरकरांच्या विचारांची धांव जितकी दूर गेली होती, तितकी त्यांच्या सहकाऱ्यांची गेली नव्हती. कोणत्याही कारणांनीं आपल्या मतांवर दडपण येणें आगरकरांना सहन होण्यासारखें नव्हतें. ‘ केसरीचा ’ दुसरा मालक आणि ‘ मराठ्याचा जनक ’ राजकारणाकडे अधिका-अधिक झुकूं लागला होता. राजकारण आधीं मग समाजसुधारणेचें पाहूं, असें त्यास वाटूं लागलें होतें. समाजसुधारणा आणि राजकारण हातांत हात घालून

जाणें शक्य नाहीं असें त्याचें मत होतें. समाजसुधारणा म्हणजे लोकांच्या भावना दुखवणें आलेंच. सरकारला डिचवणें आणि जनतेला चिथवणें एकाचवेळीं केल्यास, आपला बोजवारा उडून जाईल असें त्याचें म्हणणें होतें.

अर्थात् आगरकरांना हें पटणें शक्य नव्हतें. आपल्या अंगांतील दोष प्रथम काढून टाकल्याशिवाय राजकारण करणें योग्य होणार नाहीं असें त्यांचें प्रामाणिक मत होतें. त्याचकरतां पुराणप्रियतेला चिकटून बसण्याची इच्छा दर्शविणाऱ्या 'केसरी'चा त्यांनीं निरोप घेतला. आणि 'सुधारका'च्या द्वारें जनतेस शिक्षण देण्याचें ठरविलें.

'सुधारका' ला खुद्द आगरकरांनीं जन्म दिला होता. त्याच्या बाबतींत दुसऱ्यांची नसती लुडबूड होण्याची कांहींच धास्ती नव्हती. त्यांच्या सद्सद्विवेक बुद्धीला जें योग्य वाटत होतें, त्याचा प्रसार करायला त्यांनीं आरंभ केला. "... इंग्रजी होईपर्यंत आमचें सारें व्यक्तिजीवित्व व राष्ट्रजीवित्व, ठशांत घालून ओतलेल्या पोलादासारखें किंवा निबिड शृंखलाबद्द बंदिवानासारखें, अथवा उदकाच्या नित्य आघातानें कठीण झालेल्या लांकडासारखें किंवा हाडकासारखें शेंकडों वर्षें होऊन राहिलें........ही आमची शिलावस्था," ('सुधारक काढण्याचा हेतु') त्यांना नाहींशी करायची होती म्हणून,"......ज्या दुर्मतांनीं दुराग्रहांनीं व दुराचारांनीं महारोगाप्रमाणें या देशाच्या बुद्धीचा, नीतीचा व शरीरसामर्थ्याचा हजारों वर्षें फडशा चालवला आहे, त्याचें यथाशक्ति निर्मूलन करण्याचा प्रयत्न करणें अत्यंत उचित असल्यामुळें," (निबंध संग्रह पृ. ४८) त्यांनीं सुधारक काढला होता. असें करतांना पुष्कळ वेळां, लोकांच्या मनाविरुद्ध जुन्या गोष्टींवर जरी टीका करावी लागली तरी सरसकट जुन्याचा कर्दनकाळ म्हणून समजूं नये व आपल्या सद्धेतूंचा विपर्यास करूं नये म्हणून ते म्हणतात, "...जें म्हणून जुनें आहे त्यावर कंटाळा येण्यासारखी टीका करीत बसणें हें आम्ही आपलें कर्तव्य समजत नाहीं. जुन्या आचारांवर जी टीका करायची ती त्यांचें अनुकरण करणारांस राग उत्पन्न करण्यासाठीं नव्हे, तर त्यांत जी असंबद्धता असेल, ती त्यांच्या नजरेसमोर आणून, ती त्यांनीं दूर करण्याचा प्रयत्न करावा, व निर्दोष अशा नवीन आचारांचा स्वीकार करावा यासाठीं होय." (निबंध संग्रह, पृ. ७६) आपणाला सुधारणा हवी; पण सुधारणेचा भलताच अर्थ करून व

आपल्या खऱ्या मतांकडे दुर्लक्ष करून, जें नवीन, जें पाश्चात्यांचें तें सर्व हवें, अशी मात्र कोणी समजूत करून घेऊं नये, याकारितां त्यांनीं जनतेला बजावलें.

"......वारंवार होतें काय कीं विशिष्ट वासनाधीन किंवा मताधीन झालेल्या मनुष्यास वास्तविक सुधारणा कशांत आहे हें नीट न समजून, जेवढें जुनें असेल तेवढें फेंकून देण्यांत व कसल्यातरी नवीन गोष्टींचा अंगिकार करण्यांत आपण सुधारणा करीत आहोंत, असा भास होतो. असल्या लोकांस सुधारक म्हणण्यापेक्षां 'दुर्धारक' म्हणणें हेंच बरें !......ज्या देशांत आपले पूर्वज जन्मास आले, वाढले, व मरण पावले, ज्या देशांतील हजारों पिढ्यांनीं अनेक गोष्टींत मोठ्या कष्टानें केलेल्या अनेक सुधारणांचें फळ आपणांस आयतेंच प्राप्त झालें,———अशा देशांतील धर्माचा, रीतिरिवाजांचा व लोकांचा सर्वथैव त्याग करणाऱ्या मनुष्यास खऱ्या सुधारकाची पदवी केव्हांही शोभणार नाहीं. स्वभूमींत, स्वलोकांत, स्वधर्मात, आणि स्वाचारांत राहून, अविचारी व अज्ञ देशबांधवांच्या निंदेस किंवा छळास न भितां, त्यांच्याशीं कधीं भांडून, कधीं युक्तिवाद करून, कधीं लाळीगोळी लावून, अथवा सामर्थ्य असल्यास कधीं त्यांना दटावून, त्यांची सुधारणा करणें यांतच खरी देशप्रीति, खरी बंधुता, खरा देशाभिमान, खरें शहाणपण व खरा पुरुषार्थ आहे"– ( अळतेकरकृत 'आगरकर'–सुधारक २७–६–१८९२ )

अक्षरशः अगदीं या प्रकारची आगरकरांची वागणूक होती. दर आठवड्यांत कटु सत्यानें भरलेले बंडखोर विचार प्रसृत करणारा हा 'सुधारकाचा जनक' आहे तरी कसा हें पहाण्यासाठीं गेलेल्या एका अनोळखी गृहस्थाच्या दृष्टीला जेव्हां, धाबळीच्या बाराबंदींतल्या व पंचांत लपेटून घेतलेल्या आगरकरांचा दम्यानें जर्जर झालेला कृश देह पडला, तेव्हां किती आश्चर्य वाटलें त्याला ! त्याची कल्पना होती कीं या सुधारणेच्या भक्ताच्या बाह्यस्वरूपाचें पूर्ण 'पाश्चात्यीकरण' झालेलें असलें पाहिजे. पण अनुभव मात्र आला वेगळाच !

आगरकरांनीं सुधारकाच्याद्वारें आपलें हृदयसर्वस्व जनतेला अर्पण केलें. जेथें जेथें म्हणून त्यांना अन्याय, अज्ञान, धर्मभोळेपणा, विषमता दिसली, तेथें तेथें त्यांनीं आपल्या लेखणीचे कोरडे ओढले. 'बालविवाहा' विरुद्ध मोठी मोहीमच सुरु केली. 'पुनर्विवाहा'बद्दल पुष्कळ लोकमत तयार केलें. जनतेंत

'विधवा केशवपनाच्या' राक्षसी रुढीबद्दल तिरस्कार उत्पन्न करण्याचा आटोकाट प्रयत्न केला. "..... ...अतिशूद्रादि लोक साहेब लोकांच्या नोकरीला राहतात; साहेब लोक आम्हांस अस्पृश्य नाहींत; असें असूनही अतिशूद्राला स्पर्श करण्यास आमची छाती होत नाहीं, हा कोण व्यामोह ?" अशा प्रकारचा युक्तिवाद करून, 'अस्पृश्यता' निवारणाचा प्रयत्न करण्यासही कमी केलें नाहीं. "ज्या तत्त्वांचें अवलंबन केल्यामुळें इतर राष्ट्रें अधिकाधिक सुधारत चाललीं आहेत, त्या तत्त्वांचा स्वीकार करावयास आम्हीं आनंदानें तयार झालें पाहिजे," ['सुधारक काढण्याचा हेतु'] हें जनतेच्या मनावर बिंबविण्यासाठीं, एखाद्या अनुभवी शिक्षकाची युक्ति अवलंबून, त्यांनीं विनवून सांगितलें, "तारवास जसें सुकाणूं, समुद्रपर्यटन करणारास जसें दिङ्निर्णायक यंत्र, सुवर्णकारास जशी निकषशीला, अंधास जशी यष्टि व इमारतीस जसा पाया, तशीं सामाजिक रचनेस, व्यवस्थेस व स्थित्यंतरास हीं तत्त्वें आहेत." [नि. सं. पृ. १०] सारांश प्रत्येक क्षेत्रांत त्यांच्या लेखणीनें, लक्षांत राहील असें नांव गाजविलें. "...त्या लेखणीरुप धनुष्याचा टणत्कार होतांच दुष्टांचें धाबें दणाणलें; दांभिकांची पांचावर धारण बसली; बलिष्ठपणाच्या जोरावर कनिष्ठांचें सारसर्वस्व हरण करणाऱ्यांच्या शरीराला कंप सुटला; शक्तिप्रमाणें आचरण न करणाऱ्या भोंदूंची गाळण उडाली; त्या लेखणीच्या प्रभावानें हजारों वर्षें दास्यपंकांत रुतलेल्या स्त्रीजातीला आशेचा हुरुप आला, आणि जातीच्या निमित्तानें ज्यांच्या पदरीं नीचपणा बांधण्यांत आला होता, त्या कोट्यावधी लोकांच्या अंगांत नवचैतन्याचा संचार झाला. ती लेखणीरुप जादूची कांडी फिरतांच दुष्ट रुढींचें सिंहासन डळमळलें, आणि धर्माच्या नांवाखालीं जुलमाचा बाजार मांडणाऱ्यांच्या दुकानदारीवर गंडांतर आलें. या लेखणीच्या प्रभावाने त्रस्त झालेल्या मूढांनीं, आगरकर मेले असें त्यांच्या मरणापूर्वीच सोंग आणून, त्यांचें खोटें प्रेत पुण्यपत्तनाच्या रस्त्यांतून फिरविलें. त्या बेत्यांना काय माहित कीं आगरकरांच्या खऱ्या प्रेतयात्रेनंतरसुद्धां आगरकर अमरच रहाणार होते. ज्या लेखणीला हे एवढे पराक्रम करण्याची शक्ति होती, तिनें आपलें सर्व बळ केवळ आपल्या पित्याला क्षणिक लोकप्रियता आणून देण्यांत खर्चिलें नाहीं......आज तीस पस्तीस वर्षांनींही आगरकरांच्या लेखणींतलें तेज पूर्वींप्रमाणेंच कायम आहे. त्यांचें चरित्र हें त्यांच्या लेखांत समाविष्ट झालेलें आहे." [अळतेकरकृत 'आगरकर']

आगरकरांनीं एवढें मोठें कार्य केलें, पण तें किती थोड्या कालावधींत! ईश्वराच्या मनांत त्यांना अधिक काळ भारतांत वास्तव्य करायला द्यायचें नव्हतें. आयुष्याचीं पहिलीं पंचवीस वर्षें विद्यासंपादनार्थ खर्चीं पडलीं; आणि अवघ्या एकोणचाळिसाव्या वर्षीं त्यांनीं आपल्या प्रिय भारताचा निरोप घेतला. कार्य करायला त्यांना फक्त तेरा चवदा वर्षेंच काय तीं मिळालीं.

आगरकरांना निसर्गानें धडधाकट शरीरप्रकृति दिली होती. पण दैवाला तिचा हेवा वाटला. विद्यार्थी दशेंत त्यांच्यावर जो अतिकष्टांचा ताण पडला, त्यानें त्यांच्या प्रकृतीचा बळी घेतला. त्यांना दम्याचा उपद्रव झाला. या दम्यानेंच त्यांची आयुष्ययात्रा लवकर संपविली.

आगरकर गेले, तरी त्यांची कृती अमर झाली होती. जनतेसाठीं त्यांनीं केलेल्या आत्मयज्ञानें, त्यांचें नांव अजरामर केलें होतें. "......बलात्कार, बळजोरी, सक्ति इत्यादि शब्दांनीं व्यक्त होत असलेल्या अर्थांच्या व्यवहारापासून मनुष्याच्या सुखास पूर्णावस्था येण्याचा संभव नसल्यामुळें, तसले व्यवहार नाहींसे होत जाऊन, त्यांच्या जागीं समय, संमति, अनुरोध, रुकार, पसंती, इत्यादि शब्दांनीं व्यक्त होत असलेल्या अर्थांच्या व्यवहाराचा प्रचार सर्वत्र पडत आहे. तेव्हां येथून पुढें, राजा व प्रजा, कुलेश व कुलावयव, पति आणि पत्नी, मातापितरें व अपत्यें, स्वामी व सेवक, गुरु आणि शिष्य, विक्रेता आणि ग्राहक, यांतील व्यवहार आणि संबंध उत्तरोत्तर बलात्कारानें न होतां संमतिपूर्वक होत जाणार आहे." [ निबंध संग्रह, पृष्ठ ३९. ] हा आपला दृढ आशावाद सत्यसृष्टींत आणण्यासाठीं ते लढले.

"देव न मानणाऱ्या या देव माणसानें," (खाडिलकर) "सत्य भाषण आणि सत्यवर्तन व ममत्वाचा यज्ञ, अशा प्रकारच्या खऱ्या भूतदयेच्या खऱ्याखुऱ्या धर्माचें सक्रीय प्रतिपादन केलें," हें प्रा. अळतेकरांनीं काढलेले उद्गार किती सार्थ आहेत!

"समाज सुधारणेसाठीं क्षणभर थांबा. आधीं पारतंत्र्यांत पडलेल्या आमच्या देशाला स्वतंत्र करा; पारतंत्र्याचे दारुण पाश सहन होत नाहींत; ते

आधीं कोणत्याही मार्गानें तोडून टाका; पारतंत्र्याच्या बेडींनीं आमचे हातपाय जखडून टाकल्यामुळें समाजसुधारणाच काय, पण कोणत्याही बाबतींत आम्हाला थोडीसुद्धां हालचाल करतां येणें शक्य नाहीं. जरी हालचाल केल्यासारखी वाटली तरी तो नुसता भ्रम आहे; बंधनांत असल्यामुळें कोणत्याही क्षेत्रांत प्रगति होणें कदापि शक्य नाहीं, हें ध्यानांत ठेवा. प्रथम स्वातंत्र्यदेवतेचा जयजयकार करा; श्रीशिवछत्रपतीमहाराजांना आठवा. विघ्नहर्त्या गणपतीला साक्षी ठेवून संघटना घडवून आणा. आणि 'स्वराज्याची तुतारी' एवढ्या जोरानें फुंका, कीं तिच्या निनादानेंच आमच्या देशाचा सौभाग्यकाळ कितीतरी जवळ येईल—" अशा प्रकारचा तेजस्वी संदेश देणाऱ्या एका महापुरुषानें त्या काळांत भारतीयांना आकर्षून घेतलें होतें.

---

# प्रकरण ७ वें.

## स्वातंत्र्य केसरी लोकमान्य टिळक

६२८३

"स्वराज्य म्हणजे दुसरें तिसरें कांहीं नाहीं. माझ्या घरचा कारभार मी पहाणें याचेंच नांव स्वराज्य. नोकरांचें राज्य जाऊन लोकांचें राज्य व्हावें, याचेंच नांव स्वराज्य........स्वाभिमान, हुरूप, स्वराज्यनिष्ठा, हाच राष्ट्राचा खरा जीव होय; आणि हा जिवंतपणा जेथें वसत आहे, त्या ठिकाणीं सुईच्या मागें जसा दोरा तद्वत् सामाजिक सुधारणाही मागोमाग येत असतात; अशी इतिहास साक्ष देत आहे. म्हणून राजकीय पक्ष, राजकीय चळवळीस जितकें महत्व देतों तितकें सामाजिक चळवळीस देत नाहीं; राष्ट्राची सामाजिक प्रगति होऊं नये, असें त्याचें म्हणणें नाहीं; पण ती राजकीय प्रगतीच्या किंवा स्वाभिमानाच्या अनुषंगानेंच झाली पाहिजे. राजकीय परवशता फारतर मुळमुळीत विरोधानें स्वीकारून जीवंत सुधारणा होणेंच शक्य नाहीं असें राष्ट्रीय पक्षाचें तत्त्व आहे." —लो. टिळक—

–केसरी प्रबोध व लो. टिळकांचे केसरीमधील लेख–

"हिंदी राष्ट्राचें पुनरुज्जीवन करणें, त्याला त्याच्या गतकालाप्रमाणेंच किंबहुना शक्य असल्यास जास्तच वैभवशाली व उज्ज्वल करणें, हा टिळकांचा जीवनोद्देश होता; व तेवढ्याकरितां त्यांना नुसती राजकीय जागृतीच करायची नसून, सुप्तावस्थेंत असलेल्या राष्ट्राच्या आत्माला खडबडून जागें करावयाचें होतें. टिळकांनीं आपल्या आयुष्यांत जे जे उद्योग केले त्यांचा साक्षात् अथवा परंपरेनें या राष्ट्रसंवर्धनाकडेच संबंध पोंचतो."

—बाबू अरविंद घोष—

"अलौकिक बुद्धिमत्तेमुळें टिळक एखाद्या पर्वत शिखराप्रमाणें भासत. पण त्यांचे पाय त्या पर्वत शिखराप्रमाणेंच इतर लोकांसारखे भूमीवरच खिळलेले असत. आपण उंच पर्वत असलों तरी भूवरच आहोंत, याची त्यांना जाणीव होती. यामुळेंच ते सर्व लोकांना आपल्यांतले वाटत. आपल्या बुद्धिमत्तेच्या गरुडदृष्टीनें ते उंचावरून परिस्थितीचें बरोबर आकलन करीत व त्याचा उपयोग आपल्या देशबांधवांबरोबर सतत काम करीत राहून त्यांना देत."

—सी. आर. दास—

एल्एल्. बी. झालेला माणूस साधी मास्तरकी करायला लागलेला पाहून कितीतरी लोकांना आश्चर्याचा धक्का बसला त्यावेळीं ! एखाद्या माणसाला सोन्याची खाण सांपडावी व त्यानें, कष्ट न करतां मिळालेल्या धनावर आपण कां हक्क सांगावा, या विचारानें त्या खाणीचा उपयोग घेणें सोडून द्यायचें, जितकें मूर्खपणाचें लोकांना वाटलें असतें, तितकेंच मूर्खपणाचें टिळकांचें हें कृत्य त्यांना भासलें.

'अलिकडच्या या पोरांचीं माथींच ताळ्यावर नाहीं आहेत.' लोक पुटपुटत. 'ह्यांना आपलें हित कोणतें, अहित कोणतें, कांहींच समजत नाहीं. चारदोन पुस्तकें पढतात, इंग्रजी का फिंग्रजी शिकतात, आणि त्यांतील कल्पना उराशीं घट्ट घेऊन बसतात झालें ! त्या चिपळूणकरांच्या निबंधांनीं तर यांचीं डोकींच फिरवून टाकलीं आहेत; नाहींतर हा गंगाधरशास्त्र्यांचा मुलगा एवढा एल्एल्. बी. होऊन, भिकार शिक्षकाचा पेशा कशाला स्वीकारता ? अतिशहाण्याचा बैल रिकामा हें ठरलेलेंच आहे म्हणा ! मास्तरकी करून किंवा वर्तमानपत्रें काढून, हे वीर काय दिवे लावणार तें दिसतेंच आहे. एखादें सरकारी लफडें गळ्यांत पडलें नाहीं म्हणजे मिळवली म्हणून समजा ! आमच्या रावसाहेब मंडलिकांकडे पहा. त्यांचें काय कमी नांव झालें ? पण केवढा अलोट पैसा करून ठेविला आहे ! वरून कीर्तिही दुमदुमतेच आहे सगळीकडून. तें कांहीं नाहीं हो. ह्या तरुणांना लागले आहेत भिकेचे डोहाळे आणि हे म्हणे देशाची सुधारणा करणार ! पहिल्यांदां स्वतःचीच सुधारणा करून घ्या म्हणावं !'

ह्या किंवा अशा अर्थाचे अनेक वार्ताप्रलाप लोकांत चालत. आणि यांत त्यांची चूक तरी काय होती ? १८७९ साल हें १९४२ सालापेक्षां फार फार भिन्न होतें. त्यावेळच्या आणि आजच्या परिस्थितींत जमीन अस्मानाचा फरक होता. आजच्या नोकरीच्या दुष्काळांत, बी. ए. एल्एल्.बी. च नव्हे तर एम्.ए. एल्एल्. बी.च्या जोडीला आणखी एक Etc च्या पुच्छासहित हातभर लांब पदव्यांचें गांठोडें बरोबर बाळगलेले कितीतरी तरुण दरमहा साठ–सत्तर रुपयांसाठीं कुणाचाही, नम्रतेनें आणि लीनतेनें 'आजन्म सेवक' होण्याचें भाग्य मिळाल्यास त्यांनीं आपणाला मोठें नशिबवान म्हणून समजणें अशक्य कोटींतलें

नाहीं. टिळक जेव्हां विश्वविद्यालयांतून बाहेर पडले त्यावेळीं ही परिस्थिती नव्हती. इंग्रजी शब्दाला शब्द जुळवण्याचें देखील पुरतें ज्ञान नसलेल्या महाभागांना मोठमोठ्या सरकारी नोकऱ्या सहजसाध्य असत. होकार आणि नकारापुरतेंच त्यांचें इंग्रजी ज्ञान असायचें. एल्‌एल्‌.बी.ला तर नोकरीकडे दृष्टी वळवण्याचा प्रश्नच नव्हता. त्यानें कोणत्याही प्रकारें वकिली चालवली तरी खोऱ्यानें पैसा ओढणें अत्यंत सोपें असे. बुद्धिमत्ता हवीच असेंही नव्हतें. फक्त आरशाच्या चौकटींत बसविलेलें परीक्षा पास झाल्याबद्दलचें लोकांच्या नजरेस सहज पडेल अशा ठिकाणीं ठेवलेलें सर्टिफिकेट, आणि अघळपघळ गोड बोलण्याची शैली असली म्हणजे बस् होतें. कायद्याचें ज्ञान यथातथाच असलें—आणि तें नेहमीं तसें असायचेंच—तरीसुद्धां तें फायद्याच्या आड येत नसे. कारण खरा कायदा ठाऊक असा फारच थोड्यांना असायचा.

म्हणूनच वकिली करण्याचा अगर नोकरी मिळविण्याचा सर्वमान्य मार्ग सोडून, टिळक शिक्षकीपेशाच्या आडमार्गात शिरलेले पाहून, त्यांच्या हित-चिंतकांनासुद्धां सखेदाश्चर्य वाटणें साहजिक होतें. ध्येयाकडे जातांना कितीही त्रास सोसावा लागला, तरी या त्रासांतच अनुपम सुखाचा ठेवा या ध्येयनिष्ठांना उपभोगायला मिळतो, हें त्या विचाऱ्यांना काय ठाऊक!

विद्यार्थी दशेंत असतांना आगरकर–टिळकांनीं आपल्या भावी आयुष्या-बद्दल जो कार्यक्रम आंखला होता, त्यांत सरकारी नोकरीचा अगर पैसा कमावण्याचा प्रश्नच मुळीं आला नव्हता. पैशाकडे पाहण्याची त्यांची दृष्टी फक्त प्रपंचाला लागणाऱ्या किमान वस्तू पुरवून देणारें एक साधन एवढीच होती. त्यांचा मुख्य भर होता तो एकाच गोष्टीवर. देशासाठीं कांहींतरी त्यांना करायला हवें होतें. आधीं समाजसुधारणा कीं आधीं राजकीय सुधारणा हा प्रश्न त्यावेळीं उद्भवला नव्हता. कोणत्यातरी मार्गानें देशसेवा करावी, हाच त्यांचा प्रमुख हेतु होता.

टिळकांची पुढील आयुष्यांतील कार्यक्रमाची स्पष्ट रूपरेखा अजून आंखून तयार व्हायची होती. अर्थात देशासाठीं कांहींतरी करावें, पण काय करावें व कोणत्या रीतीनें करावें हें निश्चित न झालेल्या मनःस्थितीला, शास्त्रीबुवांच्या नवीन शाळा काढण्याच्या कल्पनेचा मोह पडणें साहजिक होतें.

वर्तमानकाळाला अवनतीच्या गर्तेत तसाच खिचपत ठेवून, भविष्य-काळाची तरतूद करण्यांत समाधान मानणें आगरकरांप्रमाणेंच टिळकांनाही शक्य नव्हतें. देशसेवेची त्यांना लागलेली अनावर तहान, शिक्षणाच्या वाघिणीचें दूध उद्यांच्या पिढीला पाजल्यानें, शांत होण्यासारखी नव्हती. जनतेंत अस्सल मराठ्याचा बाणेदारपणा आणि सिंहाचा स्वाभिमानपणा आणायला कांहींतरी करणें अवश्य होतें. टिळक 'केसरी-मराठ्यांतून' आपलें हृदय ओतूं लागले.

अन्यायाचा प्रतिकार करून देशाला उन्नतावस्थेला आणण्याचें कंकण बांधलेल्या या उत्साही वीरांना ' कोल्हापूर प्रकरणानें ' तुरुंगाची हवा चाखायला लावली. टिळकांच्या जीवित कथेच्या पहिल्या प्रवेशाला, अशा रितीनें सुरवात झाली. त्यांना याच्यानंतर कितीदां तरी तुरुंगाच्या पायऱ्या चढायच्या होत्या. पारतंत्र्याच्या तुरुंगांत राहण्यापेक्षां या चार भिंतींच्या आड असलेल्या तुरुंगांत राहणें त्यांनीं अधिक पसंत करायचें होतें. डोंगरीच्या तुरुंगामुळें या द्वयाकडे राष्ट्राचे डोळे लागले. यांची देशभक्ती, यांना समाजोत्कर्षाची लागलेली तळमळ नाटकी अगर बेगडी नसून त्यांत अंतरीची ओढ आहे हें जनतेला समजून आलें.

परकीय सरकारची लुडबुड जोपर्यंत राज्यकारभारांत पाहिजे तें करूं शकते, तोंपर्यंत इतर कोणत्याही सुधारणा होणें अशक्य, हें टिळकांना कळून चुकलें. यासाठीं सर्वांचें लक्ष पहिल्या प्रथम देशाच्या स्वातंत्र्यावर केंद्रीभूत झालें पाहिजे. घरांतील ही तिऱ्हाइताची अडगळ आधीं काढून टाकल्याशिवाय सुव्यवस्था करण्याचा प्रयत्न करणें म्हणजे पालथ्या घागरीवर पाणी ओतण्या-इतकेंच निष्फळ आहे, असें त्यांना वाटूं लागलें. हीं त्यांचीं तडफातडफीचीं बंडखोर जहाल मतें, इतर सहकाऱ्यांना मानवणें शक्य नव्हतें. आगरकर प्रभृतींना तर मनःपूर्वक असें वाटत होतें कीं, प्रथम अंगांतील दोष टाकून दिल्या-शिवाय, आपणावर बळजबरीनें व जबरदस्तीच्या खुशीनें, अरेरावी गाजवणाऱ्या तिऱ्हाइताला दरवाजा दाखवणेंच अशक्य. तसें पाहिलें तर हे दोन्हीही मत-प्रवाह आपापल्या परीनें खरे होते. परंतु या मतांचा मनोहर संगम घडवून आणून ' सुवर्णमध्य ' गांठणारा ' महात्मा ' अजून भारतभूमीच्या क्षितिजावर तळपायचा होता.

मतभेदांचें ठराविक पर्यवसान टिळकांच्या राजीनाम्यांत झालें; आणि एथेंच त्यांच्या आयुष्याला एकदम वेगळें वळण लागलें. "शाळा सोडल्यामुळें सर्व जन्माचें ध्येय सोडलें असें मला वाटतें," या त्यांच्या राजीनाम्यांत घातलेल्या उद्गारांत, कितीतरी अर्थ भरलेला होता. अध्यापन हा त्यांचा अत्यंत आवडता विषय. अध्यापन आणि लेखन यांत उभें आयुष्य घालायला मिळावें अशी त्यांची महत्त्वाकांक्षा. पण परिस्थिती त्यांना तसें करायला देण्यास कबूल नव्हती. तीही त्यांच्या इतकीच हट्टी ! तिनें अशी कांहीं विचित्र पार्श्वभूमि तयार केली कीं, त्यांच्यानें राजकारणाच्या प्रखर वणव्यांत उडी घेतल्याशिवाय राहावेच ना. देशापुढें वैयक्तिक आवडी निवडीची किंमत त्यांना कांहींच नव्हती. "..... स्वराज्य स्थापन झाल्यावर, एखाद्या स्वदेशी कॉलेजांत प्रोफेसराचें काम पत्करीन व सार्वजनिक चळवळींतून अंग काढून घेईन. डिफरेन्शल क्यॅलक्युलसवर एक पुस्तक लिहावें असें अजून पुष्कळदां माझ्या मनांत येतें; पण काय करूं ! देशाची वाईट परिस्थिती मला माझ्या वैयक्तिक आवडीं-कडे पाहाण्यासच देत नाहीं. नाहींतर मला राजकारणाचा तिटकारा." हे टिळकांनीं आपल्या मित्राजवळ काढलेले उद्‌गार त्यांच्या खऱ्या अंतरंगाची साक्ष देऊं शकतील. याच करितां एखादी विशिष्ट परिस्थिती, व तिचे मनावर झालेले संस्कार माणसाच्या आयुष्यावर फार मोठे परिणाम करतात, हें विधान आपणाला मान्य केलें पाहिजे.

टिळकांच्या आईनें—पार्वतीबाईनें—पुत्रप्राप्तीकरितां पुष्कळ सूर्योपासना केली होती असें त्यांचे चरित्रकार सांगतात. आपली सूर्यावरील भक्ति नि निष्ठा, तिनें 'केशवाचें' 'बाळांत' रूपांतर करून व्यक्त केली. सूर्याप्रमाणेंच आपला मुलगा तेजस्वी निपजावा अशी तिची या नामांतराच्या मुळाशीं इच्छा होती कीं काय कोणास ठाऊक ? पण तशी इच्छा असल्यास ती पूर्ण सफळ झाली असें म्हणण्यास मुळींच हरकत नाहीं. मात्र सूर्याचे किरण पुष्कळांना तापदायक होतात त्याप्रमाणें टिळकांच्या तेजाचा प्रखरपणा सहन न होऊन, सरकारच्या अंगाचा जळफळाट होणें नैसर्गिकच होतें. सूर्याचा प्रकाश सहन न झाल्यास त्यापासून दूर होण्याचा सर्वमान्य मार्ग, सरकारनें अवलंबणें जरी योग्य होतें तरी तें शक्य नव्हतें. सात हजार मैलांवरून थंडी वाऱ्याची आणि अफाट समुद्राची पर्वा न

करतां आमच्या कल्याणाची इच्छा धरून आलेले ते! ते जर दूर झाले असते तर त्यांच्या प्रिय हिंदुस्थानची आणि त्यांतील अज्ञ रहिवाश्यांची काळजी कोणी घेतली असती? आतां सरकारपुढें एकच मार्ग होता. या सूर्यालाच दृष्टीआड करणें.

हिंदुमुसलमानांच्या दंग्यांत, दुष्काळांत, गव्हर्नर हॅरिसच्या बाबतींत वगैरे टिळकांनीं स्वीकारलेलें धोरण सरकारला खपण्यासारखें नव्हतें. हॅरिसला मानपत्र द्यावें अशी जेव्हां कांहीं फुरफुरीं शहाणीसुरतीं माणसें म्हणूं लागली, तेव्हां सर्वांच्या स्वाभिमानाला डिंचवून जागें करण्यासारखे जळजळीत शब्द टिळकांच्या लेखणींतून बाहेर पडले. "हिंदुस्थानसारख्या देशांत, दक्षिणेंत पेशव्यांच्या राजधानीसारख्या ठिकाणीं पोलीसांनीं झोटींगपादशाही चालवावी, उपासनेच्या ठिकाणीं काळ्या डगल्यांच्या शिपुर्ड्यांनीं जाऊन भजनें बंद करावींत व शहरांतील शहण्यासुरत्या लोकांनीं हाच छळ चालू द्यावा ही गोष्ट आमची अक्कल गेल्याचें निश्चित निदर्शक आहे."

असल्या प्रकारच्या लिखाणानें टिळक, सरकारचें भक्ष्य ठरलें गेलें यांत आश्चर्य कसलें? आतां सरकार टिळकांवर कायदेशीर दडपण आणण्यासाठीं योग्य कारणांची वाट पाहात दबा धरून बसलें. पण फार काळ वाट पाहावीच लागली नाहीं. "तूं नाहीं तर तुझ्या बापानें मला शिवी दिली असेल," या लांडगेशाही वृत्तीच्या सरकारजवळ योग्य कारणांचा काय तोटा?

प्लेगनें पुण्यांत प्रवेश केला. परंतु लोकांत हाहाकार उडाला तो प्लेगामुळें नसून प्लेगनिवारणार्थ सरकारनें केलेल्या उपाययोजनांनीं! रोगानें जर्जर होऊन मरण्याऐवजीं, वैद्यबुवांच्या जहाल औषधानें हाल हाल होऊन मरण्यासारखाच हा प्रकार होता. टिळकांनीं आपल्या नेहमींच्या धोरणांस अनुसरून, जनतेची योग्य बाजू उचलून धरली. प्लेगचे मुख्याधिकारी रॅन्डसाहेबाविरुद्ध केसरी-मराठ्यांतून लेखांची फैर झडूं लागली. याच समयाला कोणीतरी दुर्दैवानें गणेशखिंड रस्त्यावर रॅन्डसाहेबांचा खून पाडला. सरकारनें टिपण साधलें. त्याला आयतेंच कारण सांपडलें. टिळक सरकारचे कैदी बनले. लोकांना चिथावणी देण्यांत मदत केल्याबद्दल त्यांना दीड वर्षाची सक्तमजुरीची शिक्षा फर्माविण्यांत आली.

ब्रिटिश सरकारशीं पुढें होणाऱ्या अफाट लढ्याची ही एक फक्त पहिली सलामी होती. यानंतर सतत आठ दिवस चाललेला व त्यांच्या पदरांत सहा वर्षें काळें पाणी, व एक हजार रुपये दंडाची शिक्षा घालणारा १९०८ सालांतील सुप्रसिद्ध राजद्रोहाचा खटला, आणि त्याप्रित्यर्थ मंडालेंत त्यांना घडलेला तुरुंगवास, ‘ ताईमहाराज प्रकरण ’ आणि त्यापासून टिळकांना भोगावा लागलेला त्रास, सर व्हॅलेन्टाईन चिरोलवर त्यांनीं भरलेल्या अब्रूनुकसानीच्या दाव्यापासून उत्पन्न झालेला मनस्ताप वगैरे गोष्टींना टिळक चरित्रांत अत्यंत महत्व असलें तरी त्यांच्या कर्तृत्वाच्या पार्श्वभूमीचाच आपणाला प्रस्तुत विचार करायचा असल्यामुळें, त्यांकडे विषयाचें औचित्य राखण्यासाठीं, नाइलाजानें दुर्लक्ष करणें भाग आहे.

टिळकांच्या अलौकिक व्यक्तिमत्त्वाचा व त्यांच्या सर्वमान्य लोकमान्यतेचा उगम शोधावयाचा असल्यास त्यांनीं निर्माण करून ठेवलेल्या अमोल ग्रंथसंपत्ती-कडे वळलें पाहिजे. हे नुसते ग्रंथ नसून, आपल्या श्रेष्ठत्वाच्या कारणांची टिळकांनीं जनताजनार्दनाला दिलेली कैफियत आहे असें म्हणणें खास अतिशयोक्तीचें होणार नाहीं. टिळकांच्या देशभक्तीच्या मागें पांडित्य होतें, त्यामुळें ती खुलली; टिळकांच्या कर्तृत्वाच्या मागें जाडी विद्वता उभी होती, त्यामुळें लोक आकर्षिले गेले.

Stone walls do not a prison make
Nor iron bars a cage,
Minds innocent and free
Take it for hermitage.

ज्ञानी माणसाला तुरुंगाचें बंधन होऊं शकेल ? छेः ! मुळींच नाहीं ! चार दगडी भिंतींचा तुरुंग त्याला घाबरवूं शकणार नाहीं. लोखंडी भक्कम दरवाजांना तो दाद देणार नाहीं. त्याचें मन स्वतंत्र असतें. त्याच्या देहावर पाशवी अधि-काराच्या जोरावर तुम्हीं कदाचित ताबा गाजवूं शकाल. पण त्याच्या मनावर ? ती कल्पनाच सोडून द्या. एकाच नव्हे तर हजारों तुरुंगांना तें कस्पटासमान मानतें हें मंडालेच्या आपल्या तुरुंगवासांत टिळकांनीं सिद्ध करून दाखविलें.

या आत्मप्रत्ययानेंच, " मी मुळींच गुन्हेगार नाहीं: पक्कें लक्षांत ठेवा कीं, राष्ट्राचें भवितव्य ठरविणारी शक्ती, या न्यायपीठाहून श्रेष्ठ आहे; मी शिक्षा भोगल्यानें माझ्या कार्याला ऊर्जितदशा यावी व माझ्या देशाचा गौरव व्हावा अशी त्या ईश्वरी शक्तीची इच्छा असेल. " हे जिवंत शब्द वदविले. या शब्दांत त्यांची ईश्वरावरची जशी अढळ निष्ठा दिसून येते तसाच त्यांचा आपल्या ध्येयावरचा निश्चल विश्वासही पूर्णपणें व्यक्त होत होता ! या शद्बांत आत्मविश्वास ओतप्रोत भरलेला होता. आपण जें कांहीं करतों तें अगदीं योग्य आहे, त्यांत कोणत्याही प्रकारची चूक असणें शक्य नाहीं हें त्यांना या शब्दांच्या द्वारें दर्शवावयाचें होतें. त्यांचा जन्मजात निर्भयपणा या शब्दांनीं आणखी एकदां जगाच्या निदर्शनास आणून दिला. खरोखरच आपल्या हातून गुन्हा केला गेला असता तर आपण घाबरलों असतों; पण जेथें गुन्ह्याचा कांहींच संबंध नाहीं, उलट उच्च नीतिमत्तेचा आविष्कार जेथें उत्तम प्रकारें दृग्गोचर होतो, अशा प्रकारचें कृत्य केलें म्हणून का घाबरायचें ? याचकरितां वरील अमर शब्दांच्या द्वारें टिळकांनीं जगाला सांगितलें कीं, एका ईश्वरी सत्तेशिवाय आपण कोणालाही मानीत नाहीं. मनाची अशी दृढ भावना असल्यामुळेंच मंडालेच्या तुरुंगाची त्यांनीं पर्वा केली नाहीं. या तुरुंगाला खिजगणतींतसुद्धां न गणतां अत्यंत शांत मनानें डोक्यांत कित्येक दिवस घोळत असलेल्या आपल्या विचारांना त्यांनीं लेखणीच्या द्वारें वाट मोकळी करून दिली. हे विचार म्हणजे त्यांचा अप्रतिम ग्रंथ ' गीतारहस्य ' होय. गीतेनेंच त्यांना आपलें जीवितकार्य कोणतें हें समजावून दिलें होतें. भगवान कृष्णाच्या रसाळ वाणींतून निघालेल्या या गीतारूपी अमृतानें त्यांना स्फूर्ति दिली होती. भारतीयांचा हा अमोलिक छोटा धर्मग्रंथ त्यांच्या उज्ज्वल कर्तृत्वाचा प्रेरक होता. गीतेनें त्यांचा आत्मविश्वास वाढविला; गीतेनें त्यांना आत्मप्रत्यय आणून दिला; आणि गीतेनें त्यांना निरिच्छ कर्मयोगी बनविलें. "कर्मानें, मनानें व वाचेनें सर्वांच्या हितांत गढून जाऊन, सर्वांचा नित्य स्नेही बनण्यांतच साऱ्या धर्माचें सार साठविलेलें आहे, " हें गीतेनें त्यांना शिकविलें. त्यांच्या आयुष्यांत ' आत्मौपम्यबुद्धी 'चा उदयही करून दिला गीतेनेंच. " कर्म करण्यापुरताच तुझा अधिकार आहे, फळ मिळणें किंवा न मिळणें तुझ्या ताब्यांतलें नाहीं; म्हणून आपल्या कर्माचें अमुक फळ मिळावें, असा हावरेपणाचा हेतु मनांत ठेवून काम करणारा होऊं नको,

आणि कर्में न करण्याचाही आग्रह धरूं नकोस; सारांश फळाच्या ठायीं आसक्ति न ठेवतां आपलें कर्तव्यकर्म नेहमीं करीत जा. कारण आसक्ति सोडून कर्म करीत असणाऱ्या पुरुषाला परमगति प्राप्त होते." हा संदेश गीतेनें टिळकांना दिला, आणि त्याप्रमाणें त्यांना आचरण करण्यासही भाग पाडिलें. गीतेनें हें जें त्यांना अमोलिक ज्ञान प्राप्त करून दिलें त्याचा जनतेला फायदा करून देण्यासाठीं टिळकांनीं 'रहस्याला' जन्म दिला. मंडालेच्या तुरुंगाचा त्यांनीं असा सुंदर उपयोग करून घेतला. ज्ञानी माणूस नरकाचा स्वर्ग करूं शकतो म्हणतात तें याचकरितां.

टिळकांच्या जीवितकार्याचें पूर्ण रहस्य समजावून घ्यावयाचें असल्यास त्यांच्या गीतारहस्याकडेच वळलें पाहिजे. त्यांच्या प्रत्येक कृतींत गीतेंतील तत्त्वज्ञान आढळून येईल; इतका तिचा त्यांच्या अयुष्यावर परिणाम झाला आहे. अक्षरओळख होण्यापूर्वींच वडिलांनीं त्यांच्याकडून गीतेंतील कितीतरी श्लोक पाठ करून घेतले होते. यांत गंगाधरशास्त्र्यांचा हेतु फक्त मुलाला सुवळण लावावें हा होता, हें उघड आहे. त्यांना त्यावेळीं काय कल्पना कीं, अर्थ न जाणतां पाठ केलेल्या या श्लोकांचा एक दिवस आपला चिरंजीव नवीन कर्मयोगपर सुसंगत अर्थ लावून जगाच्या ज्ञानभांडारांत अधिक भर घालणारा होईल. लहानपणापासून अनेकदां गीतेचें पठण आपण केलेलें होतें असें खुद्द टिळकच गीतारहस्याच्या प्रस्तावनेंत सांगतात. साधारण संस्कृत समजूं लागल्यावर, गीतेंतील तत्त्वज्ञान समजून घेण्याची त्यांना इच्छा झाली. त्यांची ही इच्छा बलवत्तर व्हावयाला वडिलांचें आजारपण कारण ठरलें. जेव्हां आजारांतील अशक्ततेमुळें गंगाधरशास्त्र्यांना मोक्षप्राप्तिकारक असे गीतेचे अध्याय वाचणें अशक्य झालें तेव्हां त्यांना तें ऐकविण्याचें काम टिळकांवर पडलें. गीतेबद्दलच्या त्यांच्या जिज्ञासेंत अधिकच भर पडली. गीतेचा सखोल अभ्यास करण्याची आपणाला कां इच्छा झाली हें टिळकांनींच एकदां व्याख्यानांत सांगितलें होतें. ते म्हणाले होते, "......भगवद्गीतेच्या अभ्यासाकडे मी प्रथम कसा वळलों हें तुम्हांस सुरवातीसच सांगतों. मी अगदीं लहान मुलगा असतांना मला वडील माणसें सांगत कीं, खऱ्या धार्मिक व शुद्ध तत्त्वज्ञानमय जीवनाची व्यावहारिक आयुष्याशीं सांगड घालणें अशक्य होय. मनुष्यमात्राचें अत्युच्च ध्येय म्हणजे मोक्ष. तो मिळविण्याची एखाद्यानें आकांक्षा धरली तर त्यानें सर्व ऐहिक इच्छा सोडून,

जगताचा त्यागच केला पाहिजे. परमेश्वर व जगत् या दोन धन्यांची एकाच वेळीं सेवा करतां यावयाची नाहीं. ज्या धर्मामध्यें माझा जन्म झाला त्या धर्माप्रमाणेंच खऱ्या योग्य रीतीनें आयुष्य घालवायचें तर जगताचा शक्य तितक्या लवकर त्याग केलेला बरा असाच याचा अर्थ मी समजलों. यावरून मी विचार करूं लागलों. मी माझ्यापुढें सोडविण्यासाठीं प्रश्न ठेविला तो हा कीं, मनुष्यत्वाची पूर्णावस्था प्राप्त करून घेण्यासाठीं, तो प्राप्त होण्यापूर्वीं हें जग सोडून देऊन त्याचेकडे पाठ फिरविण्यास माझा धर्म मला सांगतो काय ? त्याचप्रमाणें मला बाळपणींच सांगण्यांत आलें कीं भगवद्गीता या ग्रंथामध्यें हिंदुधर्माचीं सर्व तत्त्वें व सर्व तत्त्वज्ञान हीं सर्वसामान्यपणें ग्रंथित झालीं आहेत म्हणून मला असें वाटलें कीं, माझ्या प्रश्नाचें उत्तर याच ग्रंथांत मला सांपडेल. अशा रीतीनें मी गीताग्रंथाच्या अभ्यासास प्रारंभ केला.' ( 'सह्याद्री'वरून )

त्यांची जिज्ञासा पूर्ण झाली. त्यांच्या प्रश्नाचें उत्तर त्यांना वाटल्याप्रमाणें गीतेंतच सांपडलें. या उत्तरानें त्यांचें पूर्ण समाधान केलें. आणि याचकरितां त्यांनीं शोधून काढलेलें हें उत्तर इतरांच्या सोईसाठीं गीतारहस्याच्या रूपानें जनतेपुढें ठेवण्यांत आलें.

लहानपणीं मनावर घडलेले संस्कार मोठेपणीं कोणत्या रूपानें प्रगट होतात हें समजून घ्यावयाचें असल्यास टिळकांच्या चरित्राचें अवलोकन करावें लागेल. त्यांचें लहानपण पूर्ण धार्मिक वातावरणांत गेलेलें. टिळकांच्या आईची धर्मपरायणता व व्रतनिष्ठता सर्वश्रुतच आहे. त्यांच्या वडिलांचें स्वधर्मावर एवढें प्रेम कीं, कोणत्याही प्रकारची अनुकुलता नसतांना त्यानीं संस्कृतचा अभ्यास करून, धर्मशास्त्राचा इतका अभ्यास केला कीं लोक त्यांना शास्त्री म्हणून संबोधूं लागले. असल्या मातापितरांच्या सहवासांत टिळकांचें बाल्य गेलेलें. कितीतरी धार्मिक विधी छोट्या बळवंतकडून त्यांचे वडील करून घेत. पण त्याचमुळें टिळकांच्या उपजत जिज्ञासाबुद्धीचा विकास झाला. विद्यार्थीदशेंत संस्कृत भाषेंत श्लोक रचणारे टिळक मोठेपणीं भारतीय संस्कृतीचे अट्टल भक्त बनले. त्यांच्या रोमारोमीं हिंदुधर्माचा अभिमान भरलेला होता. टिळक हाडाचे हिंदुधर्माभिमानी होते असें त्यांच्या एका भक्तानें म्हटलेलें पूर्ण सत्य आहे. पण धर्मशास्त्राला बाध येईल अशा सुधारणा होतां होईल तों टाळण्याकडे त्यांची जी प्रवृत्ति दिसून येई तिच्या

मुळाशीं हिंदुधर्मावरील हें निस्सीम प्रेम होतें; " धर्मशास्त्रांचें उल्लंघन न होतां ज्या गोष्टी करतां येतील त्या कराव्या." अशा प्रकारचें पुष्कळदां त्यांचें जें धोरण असे, त्याचा उगम, त्यांच्या या वरील वृत्तींतूनच झाला होता. हिंदु वेदांतांचें त्यांनीं सखोल अध्ययन केलें होतें; किंबहुना असेंही म्हणतां येईल कीं त्यांचें जीवितध्येय वेदांतवाचनापासून झालेल्या ज्ञानावर आधारलेलें होतें. "वेदांत हें परोपकाराचें मोठें माप व देशाभिमान हें धाकटें माप एवढाच दोहोंमधील फरक," असें ते पुष्कळ वेळां म्हणत. हा वेदांताचा आणि राष्ट्रीयत्वाचा संबंध किती सुंदरतेनें त्यांनीं व्यक्त केला आहे पहा ! ते म्हणतात, " वेदांताचें ध्येय उच्च असेल; राष्ट्रीयत्वाच्या ध्येयाला एवढें वरचें स्थान नसलें, तरी त्याचा समावेश वेदांतामध्येंच करणें भाग आहे. या दोहोंचा विरोध मुळींच नाहीं. मात्र त्यांचा संगम कसा जुळवून आणावयाचा हें समजलें असलें पाहिजे. एका ध्येयांत दुसऱ्याचा अंतर्भाव होतो ही सहजसिद्ध गोष्ट आहे. हजारांमध्यें जशी पांचशें संख्या येतेच येते, त्याचप्रमाणें यांचें आहे. दोन्हीं एकमेकांशीं अगदीं जुळतीं आहेत. व दोहोंसाठीं स्वार्थत्यागाची व आत्मसंयमाची अत्यंत जरूरी लागते. त्याखेरीज ज्या भावनेमुळें मनुष्य व्यक्तिस्वार्थाशीं बिलकूल संबंध नसलेल्या गोष्टीसाठीं झटतो व व्यक्तिस्वार्थाला गौणत्व देतो, ती भावनादेखील या दोन्ही ध्येयांना आवश्यकच आहे. मनुष्यजातीबद्दल प्रेम, परमेश्वरापुढें सर्व समान आहेत ही बुद्धी, या स्वरूपानें ही परोपकारी भावना, वेदांती व राष्ट्रीय अशा दोन्ही जीवित ध्येयांना पूर्ण व्यापून असते. " ( बापटकृत सुक्तिसंग्रह )

टिळकांच्या ग्रंथ कर्तृत्वाकडे नजर फेंकली असतां, असा एक उदास विचार मनांत येतो कीं, हा महापुरुष राजकारणाच्या धकाधकींत ओढला गेला नसता तर.........! हा महाराष्ट्राचा टागोर तर बनला नसता ? जगांतील ज्ञानांत त्यांच्याकडून केवढी मोठी भर घातली गेली असती ! देशकारणामुळें त्यांचें सारें आयुष्य धामधुमींचें गेलें. तरी सुद्धां जराशी फुरसत मिळतांच आपल्या आवडत्या लेखनविषयाकडे ते धांव घेत. मंडालेची त्यांची टिपणवही सांगते कीं, 'हिंदुधर्माचा इतिहास,' 'हिंदी राष्ट्रीयत्व,' 'हिंदुस्थानचा प्राचीन इतिहास,' 'शिवाजीचरित्र,' 'शांकर-दर्शन,' 'प्रांतिक राज्यव्यवस्था,' 'हिंदुधर्म शास्त्र,' 'शून्यलब्धि गणिताचीं तत्वें,' ( इन्फिनिटेसिमल कॅल्क्युलस् ) वगैरे कितीतरी त्यांचे संकलिपत ग्रंथ होते. हें

लिहून होत असतांना आणखी किती ग्रंथांची त्यांना स्फूर्ती झाली असती कुणास ठाऊक ! या ' जर तर ' च्या भोवऱ्यांत न पडणेंच बरें.

' जातीच्या सुंदरांना कांहींही शोभतें,' अशी एक आपल्यांत म्हण आहे. टिळकांच्या अष्टपैलू गुणांकडे पाहून, अंगांतील कर्तृत्व दाखवायला ' जातीच्या हुशारांना कांहींही चालतें,' असें म्हणण्याचा मोह आवरत नाहीं. त्यांच्या आवडत्या ग्रंथलेखनाच्या क्षेत्रांत विद्वत्ता दिसून येणें साहजिक होतें. परंतु देशासाठीं ज्या राजकारणांत त्यांनीं आपणाला बळेंच पाडून घेतलें, त्या राजकीय क्षेत्रांत, त्यांनीं वेळोवेळीं दाखविलेल्या मुत्सद्दीपणाकडे पाहून, मन चकित होऊन जातें. हरएक प्रकारें सामान्यजनांच्या भावना उत्तेजित करून, त्यांचा उपयोग देशकार्यीं करणारा टिळकांसारखा दुसरा वस्ताद सांपडणें दुर्मिळच. संघटनेच्या दृष्टीनें त्यांनीं प्रचारांत आणलेली ' गणेशोत्सव ' ' शिवाजी उत्सव ' वगैरे राजकीय महोत्सवांची क्लृप्ती किती निर्दोष आहे ! हजारों व्याख्यानांनीं, कितीही कंठशोष करून जी गोष्ट होणें शक्य नव्हती, ती गोष्ट या महोत्सवांच्या द्वारें सिद्धीस नेण्याचा प्रयत्न करणें अत्यंत मुत्सद्दीपणाचें नाहीं असें कोण म्हणेल ? खुद्द टिळकांचा कट्टा द्वेष्टा सर व्हॅलेंटाईन चिरोल यांना सुद्धां कबुली द्यावी लागली कीं... "आमच्या राजकीय चळवळीस धर्माचा पाठींबा मिळावा, म्हणून मोठ्या धूर्तपणानें, हिंदुस्थानांतील लोकप्रिय देवतांनाच त्यांनीं आपल्या चळवळीचें आधिदैवत करून टाकलें. गणपती उत्सवाच्या नांवाखालीं गणेशमंडळ्या स्थापन झाल्या; तालीमबाजांचे मेळे तयार झाले; आणि जात्याच धार्मिक वृत्तीच्या हिंदुंवर त्यांची आपोआपच छाप बसली. खरोखरच गणपती उत्सवामुळें टिळकांच्या चळवळीचें क्षेत्र फारच विस्तृत झालें. खरा युक्तिबाज गडी. " मराठे लोकांस आपल्या बाजूला ओढण्यासाठीं आणि जाती जातींत एकोपा घडवून आणण्यासाठीं शिवाजी महाराजांचा उत्सवही त्यांनीं सुरू केला.

टिळकांचीं कृत्यें ब्रिटिश साम्राज्याच्या शांततेस विघातक कशीं होतात हें रंगवून दाखविण्याच्या भरांत चिरोलनीं वर उद्धृत केलेले शब्द काढलेले असले तरी त्यांत पूर्ण सत्य भरलेलें आहे. या उत्सवाचें उद्दिष्ट जनतेला समजावून देण्यासाठीं ' राष्ट्रीय महोत्सवाची आवश्यकता ', थोर पुरुषांचे उत्सव, ' राष्ट्रीय

महोत्सवांत सुशिक्षितांनीं काय करावें' वगैरे लेखांच्या द्वारें त्यांनीं आपली उत्सवविषयक भूमिका स्पष्ट केली. ते म्हणतात "......राष्ट्रामध्यें आपलेपणाची जागरूकता रहाण्यास त्या त्या राष्ट्रांतील पूर्वी झालेल्या पराक्रमी पुरुषांचें लोकांस नेहमीं स्मरण असलें पाहिजे, किंवा दिलें पाहिजे, हें तत्त्व सगळ्या जींवत राष्ट्रांस हल्लीं पूर्णपणें मान्य झालेलें आहे. ज्याप्रमाणें आम्ही आपल्या वडिलांचें स्मरण कायम ठेवून त्याच्यायोगें आपल्या घराण्याचा पूर्वापार चालत आलेला लौकिक राखण्याचें एक साधन करून ठेवतों, तद्वतच राष्ट्रांतील महापुरुषांचें स्मरण हें राष्ट्रीयत्व कायम राहण्यास एक चांगलें साधन आहे. एकराष्ट्रीयत्व म्हणजे कांहीं दृश्य पदार्थ नव्हे; ही एक प्रकारची कल्पना असून ती सतत जागृत ठेविली तरच ती टिकण्यासारखी आहे, व ज्या ज्या राष्ट्रांनीं ती कायम राखली आहे, त्यांनीं आपल्या ऐतिहासिक थोर पुरुषांच्या इतिहासाची या कामीं योग्य मदत घेतली असें थोड्या विचारान्तीं कोणाच्याही लक्षांत येईल. श्रीशिवछत्रपतिमहाराजांचे अशाच प्रकारचें चरित्र होय. महाराष्ट्रांतील निरनिराळ्या जातींचें प्रेम एका ठिकाणीं बसण्यासारखें जर कोणतेंही स्थळ असेल, तर तें शिवछत्रपतींचें चरित्रच हें होय, हें शिवछत्रपतींचा उत्सव करणाऱ्या सर्व लोकांनीं नेहमीं ध्यानांत बाळगावयास पाहिजे. या उत्सवांत मराठे आणि ब्राह्मण, ब्राह्मण अगर परभू अशा प्रकारचा कोणताही भेद ठेवणें अगदीं गैरशिस्त आहे—" [लो. टिळकांचे केसरींतील लेख भा. १ पा. ५३२ ]

गोब्राह्मणाचें आणि धर्माचें रक्षण करण्यासाठीं या राज्यस्थापनेच्या भानगडींत आपण पडलों असें सांगून लोकांचीं मनें काबीज करणाऱ्या शिवाजींत आणि एकी, संघटना घडवून आणण्यासाठीं, ऐतिहासिक विभूतींचा उपयोग करणाऱ्या टिळकांत अंतर तें कोणतें ? गणेशोत्सवाचें महत्त्वही त्यांनीं याचप्रमाणें मुद्देसुदपणानें जनतेपुढें मांडलें. राजकीय चळवळीचा खेड्यापाड्यांतील झोंपडीपर्यंत प्रचार करायचा असेल तर ' राष्ट्रीय महोत्सव' आणि 'जत्रा' यांसारखीं योग्य साधनें दुसरीं कोणतींही नाहींत असें त्यांनीं प्रतिपादलें.

आगरकर आणि टिळक यांमधील भेद येथें स्पष्ट दिसून येतो. दोघांनींही जनतेंत जागृति केली. पण आगरकरांनीं जणूं काय आपल्या पेशालाच अनुसरून एखाद्या शिस्तीच्या भोक्त्या शिक्षकाप्रमाणें जनतेला पढविलें. शिक्षकाचा हेतु

जरी कितीही चांगला असला तरी त्याच्या हडेलहप्पी वर्तनानें व कडक शिस्तीनें विद्यार्थ्यांच्या जगांत त्याच्याबद्दल प्रेमापेक्षां, भक्तीपेक्षां भीतियुक्त आदरच अधिक दिसून येतो. तो जें करतो तें आपल्या कल्याणासाठींच आहे हें जरी त्या विद्यार्थ्यांना ठाऊक असलें तरी तीं त्याला वचकून आणि विचकून, त्याच्यापासून चार हात दूर राहण्याचा प्रयत्न करीत असतात. आगरकरांची अशीच स्थिती ! त्यांनीं लोकांना बजावलें, " बघा, वेळींच सावध व्हा ! डोळे उघडा ! तुम्ही तुमचा नाश करून घेत आहांत; विनाशाकडे जात आहांत; तुम्हाला दुर्बुद्धि आलेली आहे. ही विपरीत बुद्धी सोडून द्या. नाहींतर तुम्ही लयास जाल, हें निश्चित ध्यानांत ठेवा. " अशा प्रकारच्या कडक शब्दांनीं त्यांनीं लोकांना धमकावून, दरडावून, कठोरपणें त्यांच्यांत सुधारणा भिनविण्याचा प्रयत्न केला. आपल्या कृत्यांच्या भावी दुष्परिणामाकडे पाहून घाबरून जाऊन, त्यांनीं नवीन विचारांचा, नवीन कल्पनांचा, नवीन तत्त्वांचा, पाश्चात्यांत अनुकरण करण्यासारख्या ज्या गोष्टी आहेत त्यांचा, अंगीकार करावा अशी आगरकरांची मनोमय इच्छा. कुणालाही आपले दोष चव्हाट्यावर मांडलेले—कोणत्याही हेतूनें कां होईना—आवडणें कठीणच ! यामुळें आगरकरांना जी लोकमान्यता मिळायला हवी होती ती त्यांच्या हयातींत तरी त्यांना लाभूं शकली नाहीं. टिळकांची गोष्ट अगदींच वेगळी. त्यांनींही समाजांत नवचैतन्य खेळविलें पण तें कोणत्या मार्गानें ? एखाद्या प्रेमळ मातेप्रमाणें त्यांनीं लोकांना कुरवाळलें, समजावलें, त्यांची भावना न दुखावेल इतक्या हळुवारपणानें आपल्या मतांचा त्यांच्यांत प्रसार केला, आणि तीं मतें त्यांच्यांत पुष्कळ अंशीं उतरविलींही ! " मुलांच्या मनोगतें बोलावें। तैसें जनास शिकवावें । हळूहळू ॥" अशा वृत्तीनें ते वागले. कोयनेलच्या गोळीला साखरेची पुटें चढवून लोकांच्या गळ्यांत ती कशी उतरवावीं, हें टिळकांना पूर्ण अवगत होतें. याचमुळें त्यांच्या चळवळीला आबालवृद्धांकडून सारखेंच सहकार्य व सहानुभूति मिळाली आणि ते जनतेचे प्राण बनले.

चिरोल साहेबांनीं टिळकांना मोठ्या कुत्सितपणानें 'हिंदुस्तानांतील असंतोषाचे जनक ' म्हणून संबोधलें. खरं पाहिलें तर निंदेच्या भरांत केवढें सत्य बोलून गेले ते ! खरोखर मानवी प्रगतीचीं बीजें या असंतोषांतच दडलेलीं नाहींत का ?

डोंगरीच्या तुरुंगवासापासून टिळकांच्या सार्वजनिक आयुष्यास आरंभ झाला म्हणण्यास हरकत नाहीं. त्या दिवसापासून सतत तीन तपें आयुष्य देश-

सेवेसाठीं खर्च करून त्यांनीं ‘ टिळक युग ’ स्थापिलें. जनतेंत जागृति करण्याचें कार्य आपण केलें; देशासाठीं कांहींतरी करण्याची आपली लहानपणापासूनची इच्छा अंशतः तरी सिद्धीस गेली, याबद्दल समाधान वाटूनच कीं काय, त्यांनीं आपली इहलोकची यात्रा वयाच्या चौसष्टाव्या वर्षी संपविली. लोकांचा वाटाड्या, लोकांचा धुरीण, लोकांचा कार्यकर्ता, लोकांचा उत्साहदाता, त्यांच्यांतून निघून गेला. “ देह मातीला मिळाला. आत्मा स्वस्थानीं गेला. आणि टिळकांच्या स्मरणानें हिंदी जनतेच्या मनोमंदिरांत कायमची वसति केली.” ( न. चिं. केळकर–टिळक चरित्र )

अलौकिक गुणांचा मनोहर समुच्चय जर कुठें दृष्टोत्पत्तीस येत असेल तर तो लोकमान्य टिळकांच्या चरित्रांत. “ टिळक सद्वर्तनी होते, म्हणून त्यांच्या विद्वत्तेचें चीज झालें. ते विद्वान होते म्हणून त्यांच्या स्वार्थत्यागाचा उपयोग झाला. ते स्वार्थत्यागी होते म्हणून त्यांच्या देशभक्तीचें चीज झालें. ते देशभक्त होते म्हणून त्यांच्या उद्योगाचें चीज झालें. ते उद्योगी होते म्हणून त्यांच्या पराक्रमाचें चीज झालें. पराक्रमामुळें धैर्याचें चीज झालें. आणि टिळक स्वतः धैर्यवान होते म्हणून लोकांस उपदेश करण्याची त्यांना पात्रता आली.” लो. टिळकांच्या एका भक्तानें काढलेल्या या उद्गारांत किती कांठोकांठ सत्य भरलेलें आहे !

पण भारतमाता हट्टास पेटली होती असें दिसतें. लोभी साम्राज्यशाहीशीं निकरानें टक्कर देऊन आपला सर्वांगांनीं उद्धार करून घेण्याचा तिचा निर्धारच झाला होता कीं काय कुणास ठाऊक ! एकापेक्षां एक सरस आणि सतेज अशा प्रकारचीं नररत्नें प्रसवण्याचा तिनें धडाकाच सुरू ठेवला होता. म्हणूनच टिळकांच्या मृत्यूनें लोक जरीं कांहीं काळ शोकसागरांत बुडून गेले, तरी हताश मात्र मुळींच झाले नाहींत. भारतांत एका नवीन तत्त्वज्ञानाचा उगम झाला होता. हें तत्त्वज्ञान एवढें सुलभ होतें कीं, थोड्याच अवधींत श्रीमंत, गरीब, थोर, लहान, स्पृश्य, अस्पृश्य, हे सर्व त्यानें मोहून गेलें. मार्गदर्शकत्वासाठीं या तत्त्वज्ञानाच्या जनकाकडे जनतेनें आपले डोळे लावले.

लोकांना वाटलें, मूर्तिमंत ‘ भारतीय तत्त्वज्ञानच ’ महात्माजींच्या रूपानें तर अवतरलें नसेल ?

# प्रकरण ८ वें.

## आधुनिक भारतीयांचे हृदयसम्राट्

## — महात्मा गांधी —

" आमच्या पौर्वात्य संस्कृतीचें अंतिम ध्येय गांधींच्या रूपानें अवतरलें आहे......यज्ञाला स्वतः मनुष्यरूप घ्यावेसें वाटलें आणि तो गांधींच्या रूपानें अवतरला. "——रविंद्रनाथ टागोर——

" जगांतील सत्यज्ञानाची वृद्धि, सत्यनिष्ठेची प्रवृत्ति, आणि सत्याचरणासाठीं स्वार्थत्याग करण्याची बुद्धि जितक्या प्रमाणांत वाढेल तितक्या प्रमाणांतच जगाची धारणा होऊन जगत्कल्याण होईल. हा गांधीवादाचा पहिला सिद्धांत असून, ही सत्याची उपासना करणाऱ्यांनीं, हिंसा, परिग्रह, भीति, सुखासक्ति आणि स्तेयवृत्ति यांपासून अलिप्त राहण्याचा अहर्निश यत्न करीत राहिलें पाहिजे. या सर्व हीन प्रवृत्ति असून, त्यांतूनच सर्व वैयक्तिक व सामाजिक पापांची उत्पत्ति होत असते; या पापवृत्तींचें सामाजिक स्वरूप समजून घेणें, आणि या सामाजिक पापकर्माशीं असहकार करण्यास समाजास शिकविणें हें गांधीवादाचें वैशिष्ट्य. "

—गांधीवाद–आचार्य जावडेकर.

"मी मनोराज्यांत रमणारा नाहीं. मी व्यवहारज्ञ ध्येयवादी आहे असा माझा दावा आहे......मी सर्वगुणसंपन्न आहे असें मात्र मला कधींच वाटत नाहीं. माझ्या पुरतें बोलायचें झाल्यास मी असें म्हणेन कीं, दुर्दैवानें मी सर्वगुणसंपन्न नाहीं. परंतु सर्वगुणसंपन्नतेची योग्यता प्राप्त करून घेण्याची आकांक्षा नम्रतापूर्वक बाळगणारा मी एक मनुष्य आहे. जगांत जे क्रांतिदर्शी धर्मसंस्थापक वा महात्मे होऊन गेले त्यांच्या जोडीनें माझ्या नांवाचा उल्लेख व्हावा, अशी माझी योग्यता नसल्याची जाणीव मला आहे. मी एक सत्याचा हीन-दीन संशोधक आहे. आत्मसाक्षात्कारासाठीं मी अतिशय उत्कंठित आहे. मोक्षप्राप्ति त्वरित व्हावी, अशी हुरहूर मला लागलेली आहे. देहाच्या बंधनांतून आत्म्याची सुटका होण्याकरितां मी शिक्षण घेत आहे, त्याची देशसेवा ही एक बाजू आहे. पृथ्वीवरील नश्वर राज्याचा अभिलाष मी करीत नाहीं. मोक्ष या नांवानें ओळखल्या जाणाऱ्या दैवी राज्यासाठीं माझा उद्योग चाललेला आहे. या ध्येयाच्या साफल्या-करितां मला गुहेंत जाऊन रहाण्याची गरज वाटत नाहीं. देशाच्या—पर्यायानें अखिल मानवसमाजाच्या सेवेंत अविश्रांतपणें खपणें हाच माझा उद्धाराचा मार्ग असल्याबद्दल मला खात्री आहे. सगळ्या सचेतन वस्तुमात्रांशीं एकरूप व्हावें अशी माझी मनिषा आहे. चिरंतन स्वतंत्रता व शांति यांच्या दिशेनें चाललेल्या प्रवासांतील एक मजल म्हणजे माझी देशभक्ति होय," असें यावरून ध्यानांत येईल. याच अनुरोधानें आणखी एक गोष्ट स्पष्ट होण्यासारखी आहे व ती ही कीं धर्मरहित राजकारण मी ओळखीत नाहीं. धर्म व राजकारण यांत माझ्या मतें भेद नाहीं. धर्महीन राजकारण म्हणजे साक्षात् मृत्यू. कारण असलें राज-कारण आत्म्याचा नाश करणारें असतें."

— महात्मा गांधी —

"माझ्या अमेरिकन मित्रांनो, तुम्ही थोरोच्या रूपानें मला गुरु दिलांत, हें मी कसा विसरेन? मी दाक्षिण आफ्रिकेंत जो सत्याग्रहाचा पाया घातला त्याचें शास्त्रीय स्वरूप थोरोच्या लिखाणामुळें तर मला समजून आलें. ग्रेटब्रिटनचेंही मी आभार मानणें अवश्य आहे. या देशानेंच तर मला रस्किन पुरविला. "अर्थशास्त्र कीं अनर्थशास्त्र" ( Unto this Last ) या त्याच्या अद्वितीय पुस्तकानें माझ्या आयुष्यांत एका रात्रींत केवढी मोठी क्रान्ति घडवून आणली! माझ्या वकिलीचा मला तिटकारा आला. शहरांतील जीवन मला दुःसह वाटूं लागलें. दर्बानपासून दुरदूर कोठेंतरी खेड्यांत पळावें असा मी निश्चय केला व तो लवकरच अमलांतही आणला. दर्बानपासून बऱ्याच दूर असलेल्या एका खेड्यांत सहकुटुंब मी राहायला गेलों. माझ्या अहिंसा तत्त्वाचा शास्त्रीय पाया रशियाच्या त्या सुपुत्रानें, टॉलस्टायनें घालून दिला. कशा करितां नाहीं, तरी या कारणांकरितां, पाश्चिमात्य देशांशीं मी सदैव कृतज्ञ राहणें साहजिकच आहे". अशा अर्थाचे उद्गार, आपल्या अमेरिकन मित्रांस उद्देशून लिहिलेल्या एका पत्रांत गांधीजींनीं काढले होते. पाश्चात्य तत्त्वज्ञानाचा आपल्या आयुष्यावर केवढा मोठा परिणाम झालेला आहे, हें त्यांना सांगायचें होतें. याशिवाय येशू ख्रिस्ताचे तर गांधीजी कट्टे भक्त असल्याचें सर्वश्रुतच आहे. कॉर्लाइलच्या व मॅझिनीच्या कांहीं मतांनांही ते चाहतात हें प्रत्येकास ठाऊक आहे. परंतु गांधींनीं जाहीररीत्या मुख्यत्वेंकरून पाश्चात्य तत्त्वज्ञानाचाच आपणावर अधिक परिणाम झालेला आहे असें सांगितलेलें पाहून एखाद्या कट्ट्या हिंदुधर्माभिमान्यास जरासा विशाद वाटणें अशक्य नाहीं. तो कडवट-पणानें म्हणेल, "महात्माजींना पाश्चात्य तत्त्वज्ञानी मार्गदर्शक झाले असतील. पण त्याचा मुद्दाम उल्लेख करण्याइतकी का ही गोष्ट महत्त्वाची आहे? हिंदु-स्थानांत का गुरूंना तोटा पडला होता? कृष्ण, बुद्ध यांचें तत्त्वज्ञान काय कमी दर्जाचें होतें? व्यासांच्या महाभारतांत नाहीं असें जगांतील कोणतेंच तत्त्वज्ञान नाहीं. गांधीजींनीं, पाहिजे तर या ग्रंथशिरोमणि महाभारतालाच आपल्या आयुष्याचा वाटाड्या म्हणून संबोधायला हवें होतें. भारत ज्ञानाचें आगर असतांना महात्माजींनीं मात्र पाश्चात्य तत्त्वज्ञानां आपल्या गुरुस्थानीं मानणें कमीपणाचें नाहीं काय? टिळकांनीं काय कांट, स्पेन्सर प्रभृतींच्या पाश्चात्य

तत्त्वज्ञानाचा अभ्यास केला नव्हता ? पण गीतेशिवाय दुसऱ्या कोणत्याही ग्रंथानें आपल्या आयुष्यावर परिणाम केला नाहीं असें ते स्वच्छ सांगत. याला म्हणावा खरा संस्कृति-अभिमान ! गांधीजींचें अगदींच याच्या उलट ! त्यांनीं असें करणें म्हणजे पाण्यासाठीं सागरानें नदीकडे आणि नदीनें ओढ्याकडे जाण्यासारखेंच विचित्र नाहीं का ? गांधीजींवर सर्वस्वी भारताचा अधिकार आहे; ते भारतीय म्हणून, ते भारताचें रत्न म्हणून, आम्हाला त्यांचा अधिक अभिमान आहे; आम्हांला ते अधिक पूज्य आहेत. त्यांनीं आपल्या जीवितकार्याची स्फूर्ति पाश्चात्य संस्कृतीकडून उसनी घेतली, हें आम्हाला केव्हांही मान्य होणार नाहीं, आणि कदापि पटणार तर नाहींच नाहीं."

स्वधर्माभिमान आणि देशाभिमान या दोन सद्गुणांच्या अंधातिरेकानें वरील शब्दांनां जन्म दिला असल्यामुळें जरी ते कांहीं बाबतींत प्रशंसनीय असले तरी त्यांत सत्य असें फार थोडें असल्याचें, थोड्याशा विचारान्तीं सहज समजून येईल. खरोखर, गांधीजींनीं पाश्चात्यांना आपले गुरु मानले, किंवा केवळ पाश्चिमात्य तत्त्वज्ञानानें आपणाला कार्य करायला स्फूर्ति दिली असें म्हटलें, तरी त्यांत विशाद मानण्यासारखें काय आहे ? हें तर कुणाला नाकबूल करतां येणार नाहीं, कीं गांधींना जन्म दिला तो भारतानें. गांधी लहानाचे मोठे झाले भारतांत. गांधींचें व्यक्तित्त्व खुलतें भारतीयांमध्यें. गांधींच्या नसानसांतून जें रक्त वहातें तें अस्सल भारतीयांचें ! रस्किनच्या पुस्तकाचे काय गांधीजी एकटेच वाचक होते, म्हणून त्यांच्यावर तेवढा त्याचा परिणाम व्हावा, आणि बाकीचे इतर कोरडे पाषाण राहावे ? टॉलस्टायचें तत्त्वज्ञान जगासाठींच होतें. थोरोची शिकवण जगताला शहाणें करण्यासाठीं होती. पण या सर्वांच्या तत्त्वज्ञानाचा परिणाम झाला, तो त्याच्या उगमापासून हजारों मैल अंतरावर असलेल्या फक्त भारतांतील गांधीजींवर. त्यांच्या तत्त्वज्ञानानें इतर कोणत्याही देशांत गांधीजी उत्पन्न झाले नाहींत. उलट इमर्सनसारख्या महापंडिताचें तत्त्वज्ञान बाजूला सारून, इतर देशांत सैतानी वृत्तीच अधिक बोकाळली. गांधीजी मात्र एकटेच या तत्त्वज्ञानानें आकर्षिले गेले. या तत्वज्ञानानें त्यांच्या जीवनांत क्रांति घडवून आणली. त्यांचें जीवत आमूलाग्र बदललें. असें कां व्हावें ?

कारण अगदीं उघड आहे. जें कांहीं घेण्यासारखें हितदायक व कल्याण-कारक असेल, जें कांहीं शिकण्यासारखें असेल, तें खुशाल घ्या, तें खुशाल शिका,

त्याचा खुशाल अंगीकार करा, तें आत्मसात करून घ्यायला कोणत्याही प्रकारचें अनमान करूं नका, परकीयांचे म्हणून त्याबद्दल कांहींही विचार न करतां, तें निंद्य, तिरस्करणीय, अननुकरणीय व त्याज्य मानण्याचा मूर्खपणा तर मुळींच करूं नका, आणि त्याचा आपल्या धर्मांतही खुशाल समावेश करून घ्या, हेंच अनादिकालापासून हिंदुधर्म सांगत आलेला आहे. हिंदुधर्माच्या ह्या विश्वव्यापी पोटांत, जगांतील कुठल्याही चांगल्या गोष्टींना, विचारांना, तत्त्वांना, मतांना, सदैव जागा आहे. गांधीजींनीं तरीं दुसरें काय केलें? त्यांच्यामागें भारतीय जीवनविषयक तत्वज्ञानाचें अमर स्वरूप खडें उभें असल्यामुळेंच, इतर तत्त्वज्ञानांचा त्यांच्यावर योग्य परिणाम झाला, आणि त्यांनीं तें आत्मसात् करून घेतलें. गांधीजींचें जीवन म्हणजे भारतीय संस्कृतीला आलेलें परिपक्व फळ.

गांधीजींनीं अमलांत आणलेलें सत्याग्रही राष्ट्रीय क्रान्तिशास्त्र अपूर्व होतें. त्यांच्या अगोदर, ज्यांनीं म्हणून देशाला सुस्थिति आणण्यासाठीं प्रयत्न केले होते, त्यांच्यांतील सद्‌गुणांचा गांधींनीं आपल्या या नवीन पंथांत समावेश केला. अहिंसेवर आधारलेल्या या पंथांत, सशस्त्र क्रान्तिकारकांची त्याग, शौर्य, निर्भयता व देशामुळें जीवाची पर्वा न करण्याची वृत्ति सांपडेल; आगरकरांनीं प्रतिपादलेलीं समता, स्त्रीस्वातंत्र्य, जातिभेदांचें उच्चाटन वगैरे तत्त्वें यांत आढळून येतील. लोकमान्यांच्या धूर्त राजकारणाला यांत मज्जाव नाहीं; रानडे, गोखले प्रभृतींची सर्वांगीण नेमस्त प्रागतिक व विधायक थंडी वृत्तीही कांहीं बाबतींत यांत नाहीं असें नाहीं. पण अठरा धान्याचें हें कडबोळें करण्याचा प्रयत्न केला म्हणून गांधीजींची चळवळ इतकी सर्वव्यापी व सर्वस्पर्शी होऊं शकली असें मात्र मुळींच म्हणतां येणार नाहीं.

गांधीजींनीं पहिल्या प्रथम युरोपियन संस्कृतीकडे नजर फेंकली. बहुतेक राष्ट्रांत विद्या, धन आणि शक्ती यांची कांहीं इतरांच्या मानानें कमतरता दिसून येत नव्हती. उलट या त्रयींची वाढ करण्यास प्रत्येक राष्ट्र गुंग होऊन गेलें होतें. प्रत्येक सबल राष्ट्र, आपणांपेक्षां दुर्बल असलेल्या राष्ट्रांकडे खुनशी दृष्टीनें पहात होतें. समबलाकडे तर उघड उघड शत्रुत्वाच्याच नात्यानें ते वागत होते. त्यामुळें निर्भेळ सुख, शांतता आणि समाधानही कुठेंच दिसून येत नव्हतें. सगळीकडे साशंकतेचें व सभयतेचें भीषण साम्राज्य पसरलेलें होतें. सावजाकरितां दबा

धरून बसलेल्या शिकाऱ्याच्या मनाची अवस्था प्रत्येक राष्ट्राची झालेली स्पष्ट दृग्गोचर होत होती. याचें कारण काय ? गांधीजींना प्रश्न पडला. त्यांनीं आपले डोळे भारताच्या प्राचीन इतिहासाकडे वळविले. प्राचीन भारतीय संस्कृतीचें त्यांनीं मनन केलें. त्यांना उत्तर सांपडलें. पाश्चात्य संस्कृतींत अध्यात्माचें अधिष्ठान नव्हतें. असली संस्कृती मानवजातीला हितकारक न ठरतां घातावह ठरेल असें त्यांच्या मनानें घेतलें. भारताच्या उत्कर्षाला असली संस्कृती उपयोगाची नाहीं हें त्यांनीं जाणलें.

त्यांनीं जो नवा मार्ग दाखवून दिला तो अध्यात्मावर अधिष्ठित झालेला होता. या मार्गाची हां हां म्हणतां कोट्यवधी लोकांच्या मनावर पकड बसली.

एखाद्या झुळझुळ वाहणाऱ्या ओढ्याचें मोठ्या नदींत रूपांतर व्हावें त्याप्रमाणें गांधीजींचा चरित्रविकास आहे. वेगवेगळ्या परिस्थितींत जग काय म्हणेल याची पर्वा न करतां ते केवळ आपल्या सद्सद्विवेकबुद्धीस अनुसरून वागले. सत्य, अहिंसा वगैरे अत्युत्तम नीतितत्त्वांना चिकटून राहिले; आणि सत्याग्रहाच्या नवीन अस्त्राचा उपयोग आबालवृद्धांस शिकवून त्यांना आपल्या निर्मळ व्यक्तिमत्त्वानें दिपवून टाकलें. गांधीजींचें चारित्र्यसंघटन हें असें करतां येईल. आतां त्यांच्या या व्यक्तिमत्त्वाच्या विकासाच्या पार्श्वभूमीकडे वळलें पाहिजे.

गांधीजींचे "सत्याचे प्रयोग" त्यांच्या जीवितकार्याच्या पार्श्वभूमीवर पूर्ण प्रकाश पाडूं शकतील. त्यांनीं आपल्या आत्मकथेला नांव देतांना जें वैशिष्ठ्य दाखविलें आहे, त्याचप्रकारचें वैशिष्ठ्य, त्यांच्या आचरणांत, बोलण्यांत, वागणुकींत, नि कृतींत दिसून येतें. एखादा विज्ञानशास्त्रज्ञ आपल्या क्षेत्रांत निर्विकाररीत्या ज्याप्रमाणें प्रयोगांवर प्रयोग करण्यांत गुंग होऊन गेलेला असतो त्याचप्रमाणें आपणही आपल्या आयुष्याच्या क्षेत्रांत सत्यासंबंधीं प्रयोग करीत आलेलों आहों, असेंच गांधीजींना या नांवावरून सुचवावयाचें आहे. या आत्मकथेंत कोणत्या गोष्टींचा अधिक भरणा असेल तर तो त्यांनीं आपल्या मनावर ताबा मिळविण्याचा जो प्रयत्न केला त्या विषयींचा. कोणत्याही प्रकारचा आड पडदा न ठेवतां किती मनमोकळेपणानें त्यांनीं हे 'प्रयोग' जगापुढें ठेवले आहेत. आपणांतील दोष जगजाहीर करतांना ते डरले नाहींत. चुका करणें अगर दोष

असणें हें मनुष्य जातीस अनुसरून आहे; यांत लाज असण्यासारखें कांहींच नाहीं. खरी शरम वाटली पाहिजे, या दुर्गुणांकडे दुर्लक्ष करण्यांत, अगर त्यांच्यावर सोंवळेपणानें पांघरूण घालून तें दडविण्याचा प्रयत्न करण्यांत. असला भोंदूपणा गांधीजींसारख्या सत्याच्या पायिकाला कसा खपायचा? आपण जसें होतों आणि जसें आहों, तसें त्यांनीं स्वतःला जनतेसमोर उभें केलें! "पुष्कळांनीं आत्मचरित्रें लिहिलेलीं आहेत; परंतु या रीतीनें लिहिलेलें हेंच फक्त,' असें जें गांधीजींच्या 'सत्याच्या प्रयोगांना' उद्देशून जॉन गुंथरनें 'आशियाच्या अंतरंगांत' [ Inside Asia ] उद्गार काढलेले आहेत ते याचकरितां.

अत्यंत भावनावश स्वभाव असणें हें केव्हांही वाईटच. भावनावशतेच्या हातांतलें बाहुलें झाल्यामुळें 'काय करावें व काय करूं नये' या विचारांनींच हॅम्लेटच्या आयुष्याची जशी धुळदाण उडाली तशी तिच्या आहारीं जाणारांची होणें अशक्य नाहीं. पण या भावनावशतेला बळकट विचारशक्तीचा, विवेकबुद्धीचा आणि सद्सद्विवेकबुद्धीचा खंबीर टेकूं असला तर आयुष्याचें नंदनवन बनूं शकेल हेंही तितकेंच खरें आहे.

गांधीजींचेंच उदाहरण घ्या ना! लहानपणापासून त्यांचा स्वभाव अतिशय भावनावश. एकदां त्यांच्या वाचनांत श्रावणाचें चरित्र आलें; यावेळीं त्यांनीं बाल्याचीसुद्धां पुरती सीमा ओलांडली नव्हती. श्रावणाच्या मातृपितृभक्तीनें त्यांच्या हृदयाचा पूर्ण कबजा घेऊन टाकला. आपणही त्याच्याप्रमाणें मातापितरांची आयुष्यभर निस्सीम सेवा करायची असा या छोट्या मोहनदासानें निश्चय सुद्धां करून टाकला. हरिश्चंद्र नाटक पाहिलें. सतत नंतर कित्येक दिवस हरिश्चंद्राबद्दलचा आणि त्यानें सत्याकरितां व आपल्या वचनपूर्ततेसाठीं सोसलेल्या छळांचा विचार कांहीं यांच्या डोक्यांतून हालला नाहीं. भक्त प्रल्हादाची गोष्ट ऐकली. आणि हे प्रल्हादाचे भक्त होऊन बसले. आपल्याच विचारांत गुंग होऊन बसण्याची इतकी आवड कीं आपल्या इतर सोबत्यांत मिसळायचे नाहींत कधीं. यामुळें बारीक सारीक गोष्टींची कारणमीमांसा करण्याची खोड लागलेली. या बालवयांतील, अकाल प्रौढत्वामुळें बुद्धीला एक प्रकारचा भित्रेपणा, संशयखोरपणा व बुजरटपणा येणें साहाजिकच होतें. शाळेंत जायला लागले तरी मनांतून कांहीं भूतांसापांची भीती जाईना. भित्रेपणा शरमेची गोष्ट आहे, याची

जाणीव तर मनाला एकसारखी बोंचत असायची. हा भित्रेपणा घालवून कसा द्यावयाचा? कुणीतरी सांगितलें, अशक्तपणा हा भित्रेपणाचा जनक आहे. बाळ गांधीला तें पटलेंही क्षणांत. ते कांहीं अंगानें धडधाकट नव्हते. अगदींच किरकोळ शरीरप्रकृति. मग हा अशक्तपणा घालवायचा कसा? त्यांच्यापुढें मोठाच प्रश्न पडला. त्यांच्या कांहीं दणकट सवंगड्यांनीं याचें उत्तर दिलें. "वेड्या, आम्हीं बघ कसे धीट व बळकट आहोंत." कारण ठाऊक आहे का? आम्हीं मांस भक्षण करतों, विड्या ओढतों! हे गोरे टोपीवाले आमच्यावर कां सत्ता गाजवूं शकत आहेत? शरीरानेंही कसे धिप्पाड आहेत पहा ते! काम करण्याची तडफही किती विलक्षण आहे त्यांच्यांत! या सर्वांचें कारण म्हणजे ते मद्य पितात व मांस खातात. तें कांहीं नाहीं! आतां तूंही आमच्याबरोबर मांस खायला सुरवात कर पाहूं." मोहनदासाला हा सर्व युक्तिवाद अगदीं शंभर टक्के पटला. मनाला पटलेली गोष्ट केल्याशिवाय त्याला कुठली चैन पडते? त्यानें झटपट आपल्या मित्रांचा सल्ला अमलांतही आणला. मोहनदास नियमितपणें मांसाहार घ्यायला लागला. या बाबतींत आपल्या आई नि वडिलांना फसवायला त्याला कसलीच दिक्कत वाटली नाहीं.

गांधीजींच्या भावनानशतेंत विचारांना जर मज्जाव असता, तर ते कुठपर्यंत वहावत गेले असते कुणास ठाऊक? कदाचित् त्यांचा दुसरा हॅम्लेटही होणें अशक्य कोटींतलें नव्हतें. पण त्यांची विवेकबुद्धि आणि विचारशक्ति जागृत असल्यामुळे त्यांचा अधःपात होऊं शकला नाहीं. त्यांनीं मांसाहार केला असेल. त्यांनीं विड्या फुंकल्या असतील. पण प्रत्येक खेपेला त्यांची विवेकबुद्धि त्यांना जोरानें धक्के देऊन सांगत होती, "हें पहा मोहनदास, तूं कांहींतरी वाईट करतो आहेस. वेळींच शुद्धीवर ये. नाहींतर तूं तुझ्या आयुष्याचा पूर्ण नाश करून घेशील; तुझ्या वर्तनामुळें तुझ्या घराण्याला कलंक लागेल. तुझ्या आई-बापांना अत्यंत दुःख होईल. तुझी अपकीर्ती होईल ती वेगळीच." ही टोंचणी असह्य होऊन, धोतऱ्याच्या बिया खाऊन आत्महत्या करण्याचासुद्धां त्यांनीं प्रयत्न केला. माणसाला जेव्हां आपलें एखादें कृत्य वाईट भासूं लागतें, तेव्हां तेंच कृत्य त्याच्या हातून पुन्हां घडणें अशक्य असतें, हा मुळीं मानसशास्त्राचा सिद्धांत आहे. वाईट संगतीमुळें विद्यार्थी मोहनदासानें आपल्या भावाच्या हातचें

सोन्याचें कडें कापलें असेल. पण किती लवकर आपल्या गुन्ह्याची त्याला उपरती झाली. या लवचिक स्वभावामुळें वेश्येच्या घराची पायरीसुद्धां तो चढला. पण ऐनवेळीं त्यांच्या अंतरींचा राम जागृत झाला. 'रामनामा 'नें त्यांना बचावलें. या 'रामनामा'ची आठवण त्यांना कोणीं करुन दिली असेल तर ती त्यांच्या विवेकबुद्धीनें. तिनेंच त्यांना या पापगृहांतून बाहेर ढकलून दिलें. त्यांच्या विवेकबुद्धीचा हा जो पूर्ण विकास झाला होता, त्यामुळेंच त्यांची उपजत भावनावशता अपायकारक न ठरतां, उलट हितकारी ठरली.

आनुवंशिकता जर मान्य केली तर गांधींनीं आपल्या घराण्यापासून बरेच गुण घेतले असें म्हणण्यास हरकत नाहीं. स्पष्टवक्तेपणा, निर्भयपणा, निष्कलंक आचरण आणि सत्यनिष्ठा हे गुण गांधी घराण्यांत पूर्वीपासून दिसून येतात. महात्माजींचे वडील करमचंद उर्फ काबा गांधी हे जरी मोठे धर्मनिष्ठ म्हणून ओळखले जात नव्हते तरी कर्तव्यनिष्ठ व सत्याचरणी म्हणून मात्र त्यांची बरीच मोठी ख्याती होती. ते राजकोटचे दिवाण असतांना, त्यांनीं बजाविलेल्या कामगिरीवर खुष होऊन, राजेसाहेबांनीं त्यांना बरीच मोठी जमीन बक्षिस देण्याचें ठरविलें. पण "संस्थानांतील दिवाणगिरीबद्दल मी भरपूर वेतन घेतलें आहे. ही जमीन घेणें नीतीस धरुन नाहीं." या तेजस्वी शब्दांनीं त्यांनीं ती नाकारली. गांधीजींच्या पितामहाचा बाणेदारपणा तर सर्व काठेवाडला ठाऊक होता. पोरबंदरच्या राणीसाहेबांशीं न पटल्यामुळें हे जेव्हां जुनागडच्या नबाबापाशीं आश्रयार्थ गेले, तेव्हां दरबारांत त्यांनीं नबाबाला सर्वांच्या देखत बेधडक डाव्या हातानें सलाम केला. खुद्द नबाबसाहेब उत्तमचंदजींच्या या विचित्र आणि विलक्षण वर्तनानें थिजूनच गेले. इतर दरबारी मंडळींनां आपण स्वप्नावस्थेंत तर नाहीं ना असा भास झाला. पण उत्तमचंदजींच्या मुद्रेंत कोणत्याही प्रकारचा फरक पडला नाहीं. त्यांनीं आपल्या कृत्याचें स्पष्टीकरण केलें. "पोरबंदरच्या राजेसाहेबांची सेवा करण्यांत माझी उभी हयात गेली. आज तिथल्या राणीसाहेबांची माझ्यावर इतराजी झाली असेल, आणि त्याकरतां मला पोरबंदरचा त्यागही करावा लागला आहे, हें जरी खरें असलें, तरी पोरबंदरच्या गादीचा मात्र मी अजून स्वामिनिष्ठ सेवक आहें. माझ्या राजनिष्ठेला कोणत्याही प्रकारचा धक्का लागलेला नाहीं. माझा उजवा हात सर्वस्वीं पोरबंदरासाठीं असल्यामुळें, इतर राजांना

किंवा नबाबांना मुजरा करण्याचा प्रसंग आल्यास मी तो डाव्या हातानें करण्याचा निश्चय केला आहे. यावरून असें करण्यांत नबाबांचा अपमान करण्याचा माझा कांडीमात्र उद्देश नाहीं, हें मी पुन्हां एकदां नम्रपणें सांगूं इच्छितों." अशा या उत्तमचंदजींचे चिरंजीव काबा गांधी हेही कांहीं कमी तेजस्वी नव्हते. पोलिटिकल एजंट म्हणजे संस्थानांतील केवढें प्रस्थ! संस्थानिक म्हणजे त्याला आपले चपराशीच वाटतात. संस्थान जर लहान असलें तर त्याच्या अधिपतीशीं वागतांना याच्या उर्मटपणास अगदींच उत येतो. एकदां, करमचंदासमोर असलेच एक एजंटसाहेब, राजकोटच्या ठाकूर साहेबांना उद्धटपणानें लागेल असें बोलले. करमचंदजींना हे कुठलें सहन व्हायला? त्यांनीं आपला निषेध कडक भाषेंत व्यक्त केला. एजंटसाहेबही इतके खवळले कीं त्यांनीं काबा गांधींना रस्त्यावरच झाडाखालीं काहीं तास स्थानबद्ध करून ठेवण्यास कमी केलें नाहीं. काबांनीं आपली क्षमा मागावी ही त्यांची इच्छा. काबा वाकायला थोडेच तयार होते. शेवटीं या एजंट साहेबांनांच माघार घ्यावी लागली. असल्या तेजस्वी परंपरेच्या घराण्यांत जन्म झालेले मोहनदास हे हिंदुस्थानच्या बड्या लाटसाहेबांच्या खुर्चीला खुर्ची टेंकून, एका पंचानिशीं बसले किंवा बॅकिंगहॅम राजवाड्यांत उघडे बोडके फिरले यांत आश्चर्य कसलें?

पण महात्मा गांधींचें शील बनविण्यांत जर महत्त्वाचा कुणाचा हात असेल तर तो त्यांच्या मातोश्रींचा. जुन्या वळणाची आणि त्यांत दिवाणासारख्या मोठ्या अधिकाऱ्याची ती पत्नी. पण तोऱ्यानें व दिमाखानें वागणें तिला ठाऊकच नसे. दागिन्यांचा ती तर तिटकाराच करी. एकाच गोष्टींत मात्र ती सदासर्वकाळ दंग असायची. व्रतें! हरतऱ्हेचीं व्रतें करून, उपवासानें आपला देह दंडविण्यांत तिचा सारा वेळ जायचा. गांधीजींनीं तिच्याबद्दल आपल्या आत्मकथेंत काढलेले उद्गार पहा! "सोज्ज्वलतेची आणि साधुत्वाची मूर्तिमंत प्रतिमा असें तिला म्हणावें लागेल. तिची धार्मिक वृत्ति तर पूसूंच नका. आपली नेहमींची पूजाअर्चा झाल्याशिवाय ती तोंडांत पाणी सुद्धां घेत नसे. मला पक्कें असें स्मरतें कीं, चातुर्मासांतील आपले उपवास ती केव्हांही चुकवीत नसे. पाळण्यास अत्यंत कठीण अशीं व्रतें घेऊन, तीं पार पाडण्याची तिला नेहमीं हौस वाटे. दोनचार दिवस सतत उपवास करणें तर तिच्या अंगवळणींच पडलें होतें. पण

एवढेंही करून तिचें समाधान झालें नाहीं असें दिसतें. कारण एका चातुर्मासांत तर तिनें एका दिवसाआड उपवास करण्याचें व्रत घेतलें होतें. दुसऱ्या एका चातुर्मासांत, सूर्याचें दर्शन घेतल्याशिवाय, अन्नग्रहण करायचें नाहीं, हा तिनें आपणांवर निर्बंध घालून ठेवला होता. पण सूर्याला याची थोडीच जाणीव होती! तो मेघाच्या आड दडण्याचा आपला लपंडाव सुरू करून जणूं काय तिची कसोटीच पहात होता. आम्हीं लहान मुलें आतुरतेनें सूर्यदादा ढगांतून बाहेर केव्हां डोकावतो, याची वाट पहात असूं. सूर्य दिसतांच आम्हीं ओरडायचें आणि तिनें घरांतून धांवत बाहेर यायचें. पण छेः! सूर्य तिची वाट पहायला कुठें तयार होता! तो पुन्हा दडायचा आणि तिच्या दृष्टीस कांहीं पडायचा नाहीं. आम्ही खट्टू होत असूं. पण तिला मात्र याचें कांहींच वाटत नसे. "कांहीं हरकत नाहीं." ती धिमेपणानें स्मित करीत म्हणायची. "आज देवाजींच्या मनांत मी जेवावें असें नाहीं."

गांधीजींच्या चरित्रविकासाला कोणीतरी वामन अवताराची उपमा दिलेली आहे, ती अगदीं सार्थ वाटते. छोट्या वामनाचें चिमुकलें पाऊल पहिल्यांदा पडलें तें मृत्युलोकांतील धरणीवरच. पण या बटूनें आपल्या दुसऱ्या पावलांत सारा स्वर्गसुद्धां व्यापून टाकला. गांधीजींचेंही अगदीं असेंच झालें. विद्यार्थी दशेंतील शील घडविणारे अनेक प्रसंग, बालपणांतील लग्न, बॅरिस्टर होण्याकरतां विलायतेला गमन, वगैरे त्यांचा वैयक्तिक आयुष्यप्रवाह एखाद्या सामान्य माणसाप्रमाणें वहात होता. आफ्रिकेला जायची संधी मिळाली; तिकडे ते बॅरिस्टरी करण्याकरतां गेले. आणि तिकडील परिस्थितीनें त्यांच्या जीवनांत एवढी क्रांति घडवून आणली कीं, हिंदुस्थानांत जेव्हां ते परतले, तेव्हां 'महात्मा' पदावर त्यांचा हक्क प्रस्थापित झाला होता. आफ्रिकेंतील त्यांचे 'सत्याचे प्रयोग' जरी प्रथमावस्थेंत होते, तरी लोकांना त्यांच्यांतील जीवंतपणा जाणवला. या प्रयोगाच्या पार्श्वभूमीवरच, त्यांचें कार्य आधारलेलें आहे. हिंदी जनतेवर या प्रयोगांची थोड्याच अवकाशांत इतकी जोराची पकड बसली, कीं, त्यांनीं एकमुखानें गांधीजींच्या गळ्यांत आपल्या नेतृत्वाची माळ घातली.

इंग्लंडमधील गांधीजींच्या वास्तव्यानें, त्यांच्यावर पुढील आयुष्यांत दिसून येण्यासारखे कांहीं कमी परिणाम केले नाहींत. इंग्लंडला जाणाऱ्या बोटीवर पाय

ठरण्यापूर्वीच, मद्य, मांस, मदिरा व परस्त्री यांना स्पर्श करणार नाहीं, या आपल्या वृद्ध मातेला दिलेल्या वचनानें ते पूर्ण बद्द झाले होते.

सत्याचें जरासें उल्लंघन झालें तर हळहळणारे गांधीजी, आपलें वचन मोडणें शक्य नव्हतें. त्यांचें विलायतेला जायचें घडून आलें तें मात्र सुखासुखीं नव्हे. मातेच्या मनाची कशीबशी समजूत घातली; बायकोचे कांहीं दागिने विकून पैशांचीही तरतूद केली; पण त्यांच्या जातींत केवढें वादळ उडालें होतें! परदेश-गमन आणि तेंही समुद्र ओलांडून करणें म्हणजे केवढी धर्मबाह्य गोष्ट! गांधीजींच्या या कृत्यामुळें त्यांच्या साऱ्या कुटुंबाला वाळींत पडावें लागलें असतें, समाजापासून त्रास सोसावा लागला असता, वगैरे गोष्टी त्यांना ठाऊक नव्हत्या असें नाहीं. पण त्यांनीं कशाचीही पर्वा न करतां इंग्लंडमधें जायचा आपला हेतु तडीस तर नेला. परक्यांना जाचक होणाऱ्या शिष्टाचारांचा अतिरेक झालेल्या या सुधारलेल्या देशांत गांधीजींची वागणूक विचित्र ठरली जाणें, नवल नव्हतें. जेवणापासून त्यांच्या हालांना सुरवात झाली. शिष्टाचारांच्या बाबतींत तर त्यांची अतिशयच कुचंबणा होऊं लागली. त्यांनीं 'शिष्ट माणूस' बनण्याचा प्रयत्नही करून पाहिला. पण तो फारच महाग पडला. इंग्रजी पद्धतीचा सभ्य माणूस बनणें गांधीजींच्या आवाक्याबाहेरचें होतें. त्यांनीं निधडेपणानें निश्चय केला. 'बस्स कुणाची पर्वा करायची नाहीं! सद्सद्विवेकबुद्धीला विचारून वागायचें.' त्यांच्या मातोश्रींच्या इच्छेप्रमाणें ते शेवटपर्यंत सोवळे राहिले.

भारताला एक नवीन बॅरिष्टर मिळाला. पण बॅरिस्टरची कांहीं भारताला गरज नव्हती. भारतमातेनें या सळसळत्या रक्ताच्या बॅरिस्टर तरुणाला जगाचे कटु अनुभव आणि धक्के टोणगे कसे असतात हें अनुभावयाला आफ्रिकेला पाठविलें. गांधीजींचा खरा प्रकाश पडला तो आफ्रिकेंत. उत्तम वकील म्हणून मात्र नव्हे! वकिली करण्यासाठीं म्हणून गेले, पण त्यांनीं नांव मिळविलें तें मात्र तडजोड करण्याच्या बाबतींत. आफ्रिकेंत माजलेल्या वर्णभेदानें त्यांचे डोळे उघडले. 'काळा आदमी' म्हणून त्यांच्यावर पुष्कळ ठिकाणीं अनेक अपमानाचे प्रसंग उद्भवले. बॅरिस्टरीचा अंमल उतरूं लागला. पोटाचा धंदा करण्यासाठीं गेलेल्या हिंदी लोकांची स्थिती तर चीड आणण्यासारखी अत्यंत अपमानास्पद होती. वकिली ज्ञानाचा गांधीजींनीं या क्षेत्रांत उपयोग करण्याचे ठरविलें. लोकांत

जागृति घडवून आणणारा तरुण गृहस्थ म्हणून सगळेजण त्यांना लवकरच ओळखूं लागले. गांधीजींनीं लोकांना अन्यायाचा प्रतिकार करण्यास शिकविलें. पण हा प्रतिकार शस्त्रांच्या जोरावर नव्हता. भारतमाता आपल्या या पुत्राकडून पुढील आयुष्यक्रमाची, रंगीत तालीम, आफ्रिकेच्या रंगभूमीवर करून घेत होती. सत्याग्रहाचा पाया घातला गेला. तापलेल्या तेलांत लोटलें, कडेलोट केला, अंगावरून हत्ती घालण्याचा प्रयत्न केला, तरी आपल्या तत्त्वास, हरिनामास, शांतरीतीनें शस्त्रानें प्रतिकार न करतां चिकटून राहिलेल्या बाळ प्रल्हादाच्या सत्याग्रहाचा गांधींनीं विसाव्या शतकांत उपयोग करून घेण्याचें ठरविलें. अधिकारानें उन्मत्त झालेल्या सत्तेशीं टक्कर देण्यासाठीं, गांधीजींनीं जे हें विलक्षण अस्त्र लोकांच्या हातांत दिलें, त्या अस्त्रानेंच गांधीजींचा आयुष्यक्रम पार बदलून टाकला. या अस्त्राचें महत्व लोकांना पटूं लागलें. पण या अस्त्रापेक्षां, त्याच्या जनकांत अधिक क्रांति होत होती. गांधीजींनीं आपलें जीवितध्येय ठरविलें. अहिंसा. सत्य.

आफ्रिकेंतील त्यांच्या या वीस वर्षांतील काळांत सर्वांत महत्वाची जर कोणती गोष्ट घडली असेल,—अर्थात त्यांच्यापुढील जीवितकार्याची पार्श्वभूमि घडविण्याच्या, दृष्टीनें——तर त्यांनीं केलेले गीतेचा व बायबलचा अभ्यास. तत्त्वासाठीं मरणाऱ्या येशूनें मोहनदासांना मोहून टाकलें. पर्वतावरील प्रवचनें त्यांनीं आत्मसात् केलीं. त्या दहा आज्ञा त्यांना अमृततुल्य भासल्या. गीतेनें टिळकांना ‘ कर्म केसरी ’ बनविलें, तर त्याच गीतेनें गांधीजींना, वासनांना जिंकलेल्यांना जगास जिकणें अशक्य नाहीं, असा संदेश दिला. गीतेनें त्यांना,

ध्यायतो विषयान्पुंसः संगस्तेषूपजायते ।
संगात्संजायते कामः कामात्क्रोधोऽभिजायते ॥ १ ॥
क्रोधाद्भवति संमोहः संमोहात्स्मृतिविभ्रमः ।
स्मृतिभ्रंशाद् बुद्धिनाशो बुद्धिनाशात्प्रणश्यति ॥ २ ॥

ही धोक्याची सूचना देऊन सावध केलें. या श्लोकांना गांधीजींच्या चरित्रांत फार मोठें स्थान दिलें पाहिजे. विकारांना ताब्यांत ठेवल्याशिवाय कोणतीही भरीव कामगिरी होणें अशक्य हें त्यांना पटलें. थोरो, टॉलस्टाय वगैरे

त्यांचें शील बनविण्याच्या कामांत मदत करत होतेच; पण रस्किननें मात्र त्यांचा जीवनओघ पूर्ण बदलून टाकण्याचें श्रेय मिळविलें. अर्थशास्त्र कीं अनर्थशास्त्र या रस्किनच्या पुस्तकानें मला मुख्यत्वेंकरून पुढील तीन गोष्टी शिकविल्या." गांधीजी आपल्या 'सत्याच्या प्रयोगांत' लिहितात, "(१) सर्वांचें सुख म्हणजे व्यक्तीचें सुख असावें. (२) सर्व धंद्यांचा दर्जा एक मानला पाहिजे. धंद्यांच्या बाबतींत उच्चनीचता मानणें मूर्खपणाचें व हलक्या मनोवृत्तीचें लक्षण आहे. धंद्याची व्याख्या पोट भरण्याचें साधन अशी करावी. अर्थात सर्व धंद्यांचा हेतू एक असतो. हें आपोआपच सिद्ध होतें. मार्ग वेगवेगळे असले तरी हरकत नाहीं. या दृष्टिकोनांतून पाहिल्यास वकिलाचा, न्हाव्याचा किंवा भंग्याचा धंदा एकाच पातळीचे ठरतात. (३) शेतकऱ्यांचें आणि कलाकौशल्याचें काम करणाऱ्या कारागिराचें जीवन सर्वांत अधिक मानाचें म्हटलें पाहिजे."

बायबलानें त्यांना तत्त्वनिष्ठेचें महत्त्व पटविलें. 'उच्च विचार आणि साधी रहाणी' आत्म्याच्या अभ्युदयासाठीं असावी लागते, हें गीतेनें सांगितलें. रस्किन, थोरो, टॉलस्टायनेंही पुष्कळ गोष्टी सांगितल्या. पण हें सर्व वाचूनच गांधीजी हात जोडून थंड बसले नाहींत. किंवा कितीही इच्छा असली तरी बाकीचे असल्या गोष्टींकडे दुर्लक्ष करीत असतांना एक माणूस काय करूं शकणार असा विचारही त्यांच्या मनांत आला नाहीं. मनाला वाटेल तसें वागायला आपण स्वतंत्र थोडेंच आहोंत, आपल्या मागें बायका पोरें आहेत, आतां हा उपद्व्याप करण्यांत कांहीं अर्थ नाहीं असेंही त्यांना वाटलें नाहीं. बस्, जें पटलें तें कृतींत आणायचें; लोक हंसले तर हंसेनात बिचारे! आपण तर कांहीं शीलाला कलंक लागण्यासारखी कोणती गोष्ट करीत नाहीं ना? या विचारानें, गांधीजी आपल्याला पटलेलीं तत्त्वें कृतींत आणण्यासाठीं मोठ्या धैर्यानें पुढें सरसावले. गांधीजींचें आयुष्य म्हणजे डोक्यांतील कल्पना सत्यसृष्टींत आणण्याचा प्रयत्न करणारी प्रयोग शाळा. अजूनपर्यंत एकादी कल्पना योग्य आहे असें त्यांच्या मनाला एकदां पटलें, कीं ते मोठ्या धडाडीनें ही कल्पना सत्यसृष्टींत आणण्याच्या खटपटीला लागलेच म्हणून समजावें.

उत्तम कल्पना पुष्कळांना सुचतात. परंतु त्या कृतींत आणण्याचा प्रयत्न मात्र फारच थोडे करतात. गांधीजींचें मात्र असें नाहीं. त्यांच्या चरित्राकडे पाहिल्यास

असें दिसून येईल कीं, वाचनानें असो, किंवा ‘ आंतल्या आवाजानें ’ असो त्यांना ज्या ज्या कल्पना स्फुरल्या त्या त्यांनीं निःसंकोचपणानें अंमलांत आणल्या. आपल्या कृतींत दोष आहेत याची त्यांना पूर्ण जाणीव आहे. पण बोलून चालून प्रयोगच ते ! प्रयोगांत चुका राहणें साहजिकच आहे. हिमालयाएवढ्या चुका झाल्या तरी त्या सुधारण्यास प्रयोगांत वाव असतो. वज्रलेप अशी प्रयोगशाळेंत कोणतीच गोष्ट नसते.

आपल्या उज्ज्वल कर्तृत्वाचें गांठोडें बरोबर घेऊन गांधीजी आफ्रिकेहून मायभूमीला परतले. याचवेळीं भारतमातेला त्यांची खरी गरज होती. देशांत गोखल्यांचें सनदशीर राजकारण, लोकमान्याचें स्वाभिमानी राष्ट्रवादावर आधारलेलें अडवणुकीच्या बहिष्काराचें राजकारण, आणि सशस्त्र क्रांतिवाद्यांचें गुप्त राजकारण शिजत होतें. या तीनही पक्षांवर भारतमातेचा पूर्ण विश्वास नव्हता असें दिसतें; आपल्या तेजस्वी पुत्रानें आफ्रिकेंत केलेला सत्याग्रहाचा प्रयोग, स्वतःच्या बाबतींतही करून पहावा, असें कदाचित तिच्या मनानें घेतलें असेल. एवढें खरें कीं, या आफ्रिकेंतील यशस्वी पुढाऱ्यानें जेव्हां हिंदुस्थानांत पुनरागमन केलें, तेव्हां येथील सर्व पक्षांत एक प्रकारचें कुतूहल उत्पन्न झालें. हिंदुस्थानाचा उद्धार सत्याग्रहाच्या मार्गानेंच होईल, अशा प्रकारचे उद्गार, गांधींनीं पूर्वींच १९०९ मधील राष्ट्रसभेला पाठविलेल्या संदेशांत काढले होते. महायुद्धाच्या कात्रींत सांपडलेलें सरकारही गांधीला चुचकारूं पहात होतें. अशी परिस्थिती असतांना, सर्व जनतेचें लक्ष गांधीजींकडे कशामुळें खेंचलें गेलें असेल तर तें बनारस विश्वविद्यालयाच्या उद्घाटन समारंभाच्यामुळें. या समारंभाला हिंदुस्थानांतील सर्व प्रसिद्ध पुढारी, राजे महाराजे आणि मोठमोठे अधिकारी उपस्थित होते. पंडित मालवीयजींनीं गांधींनाही आमंत्रण दिलेलें होतें. गांधीजी असली सुवर्णसंधि गमावणें शक्यच नव्हतें. पण या समारंभांत त्यांनीं जें ओजस्वी भाषण केलें, त्यानें डॉ. बिझंट प्रभृतींना सभात्याग करावा लागला. किंबहुना असेंही म्हणतां येईल, कीं, काशीक्षेत्राच्या या पवित्र भूमीवर, देशकारणविषयक सर्वांच्या बुजऱ्या जुनाट कल्पनांना मागें सारून, गांधीजी आपल्या नवीन साधनांसहित पुढें सरसावले. याच सभेंत त्यांनीं तरुणपिढी काबीज केली. “—माझ्याविषयीं बोलावयाचें तर मी स्पष्टपणें तुम्हास सांगूं शकतों कीं, हे पुढारी काय करतील

इकडे माझें फारसें लक्ष नसून देशांतील विद्यार्थी आणि देशांतील सामान्य जनता काय करणार आहे इकडे माझें लक्ष आहे." ते म्हणाले. "काल ज्या महाराजांनीं अध्यक्षपद स्वीकारलें होतें ते हिंदुस्थानच्या दारिद्र्यासंबंधीं बोलले. इतरही वक्त्यांनीं या मुद्यावर फार जोर दिला. पण ज्या मंडपांत व्हाइसरॉयांनीं उद्घाटनसमारंभ साजरा केला, त्या भव्य मंडपांत आपणांस कोणतें दृश्य दिसलें? तें एक भपकेबाज दृश्य होतें. एखाद्या पॅरिसहून आलेल्या जवाहिऱ्याच्या नेत्रांनां संतुष्ट करणारें असें तें एक जडजवाहिरांचें प्रदर्शन होतें. बहुमोल रत्नांनीं नटलेले हे सरदार लोक आणि देशांतील लक्षावधि दरिद्री जनता यांच्या परिस्थितींची मी तुलना केली. मला असें वाटूं लागलें कीं जोपर्यंत तुम्ही या जवाहिरांचा त्याग करणार नाहीं, आपलें हें धन राष्ट्राचा निधी म्हणून धारण करण्यास तयार नाहीं, तोंपर्यंत हिंदुस्थानला मुक्तता मिळणार नाहीं, असें या सरदारांस सांगावें...आमच्या देशांतील शेंकडा ७५ लोक शेतकरी आहेत... शेतांत धान्याच्या एका ताटाऐवजीं दोन ताटें पिकविण्याचें सामर्थ्य याच शेतकरी लोकांत आहे. पण त्यांच्या श्रमानें निर्माण केलेलें सर्व कांहीं जर आम्ही त्यांच्यापासून लुबाडून घेतलें किंवा दुसऱ्यास लुबाडूं दिलें तर आमच्यामध्यें स्वराज्याची वृत्ती फारशी जागृत आहे असें म्हणतां येणार नाहीं. आमची मुक्तता या शेतकऱ्यांमार्फतच होऊं शकेल. वकील, डॉक्टर किंवा सधन सरदार हे ती आम्हांस देऊं शकणार नाहींत......अराजकांच्या देशप्रेमाबद्दल मी त्यांना मान देतों. आपल्या देशाकरितां प्राणत्याग करण्यास तयार होण्याच्या शौर्याबद्दल मी त्यांना मान देतों. पण मी विचारतों, हत्या करण्यांत मोठेपणा आहे काय? खून करण्याचा सुरा हें मानाच्या मृत्यूचें योग्य चिन्ह आहे काय? मी तें नाहीं म्हणतों. अशा मार्गास कोणत्याही धर्माचा आधार नाहीं. जर मला असें अवश्य वाटलें कीं, हिंदुस्थानाच्या मुक्ततेसाठीं इंग्लिश लोक येथून गेले पाहिजेत, त्यांना हांकलून दिलें पाहिजे, तर मी तसें जाहीर करीन आणि मला आशा आहे कीं, त्या श्रद्धेच्या संरक्षणासाठीं मी माझे प्राणही अर्पण करण्यास तयार होईन. माझ्या मतें हा मानाचा मृत्यु आहे.......ज्या साम्राज्याला परस्पर प्रेमाचा आणि परस्पर विश्वासाचा आधार आहे, असें साम्राज्य आम्हांस हवें आहे...जें आम्हांस आमच्या राजकर्त्यांस सांगावयाचें आहे तें आपण उघडपणें सांगूं या. व तें जर

त्यांस पसंत नसेल तर त्याचे परिणाम भोगावयास तयार होऊं या......आम्हांस देणगी म्हणून स्वराज्य कधींच मिळणार नाहीं. ब्रिटिश साम्राज्याचा आणि ब्रिटिश राष्ट्राचा इतिहास पाहा. ते स्वातंत्र्याचे भोक्ते असले तरी जे लोक स्वतः स्वातंत्र्य संपादन करणार नाहींत, त्यांना तें देणार नाहींत. वाटल्यास बोअर युद्धापासून तुम्ही बोध घ्या. जे या साम्राज्याचे थोड्या दिवसांपूर्वी शत्रु होते तेच त्याचे आज मित्र बनले आहेत." ('आधुनिक भारत' वरून)

गांधीजींनीं आणलेल्या नवीन तत्त्वज्ञानाकडे प्रत्येकजण उत्कंठेनें पाहूं लागला. प्रत्येक पक्षाला वाटलें, 'गांधीजी सांगतात तेंच बरोबर आहे, आम्हीही तेंच सांगत आलेलों आहोंत.' या वेळच्या गांधींबद्दल चालू असलेल्या वेगवेगळ्या विचारप्रवाहांचें वर्णन आचार्य जावडेकरांच्याच शब्दांत देणें योग्य होईल. "डॉ. बेझंट यांनीं जाहीर केलें कीं महात्मा गांधी संत दृष्टीनें कितीही मोठे असले तरी राजकारणाच्या दृष्टीनें ते एक अर्भक आहेत. जहालवृत्तीचे लोक म्हणूं लागले कीं, यांचा निःशस्त्र प्रतिकार म्हणजे पूर्वीचा बहिष्कारयोगच आहे. नेमस्त म्हणूं लागले कीं यांची अहिंसा आणि साम्राज्यनिष्ठा संशयातीत असल्यानें ते आमच्यांतलेच आहेत. सुधारक म्हणूं लागले कीं, आमच्या पारतंत्र्याचें कारण आम्हींच आहों, व आमची सुधारणा झाल्याखेरीज स्वराज्य मिळणार नाहीं असे महात्मा गांधी म्हणतात, तेव्हां ते सुधारकच आहेत. धर्मसुधारक म्हणूं लागले, महात्मा गांधी हे भागवतधर्मी संत असल्यानें, आमच्या धर्मसुधारणेचे तत्त्व त्यांना पटलें आहे. सनातनी म्हणाले कीं, हे चातुर्वर्ण्य पाळणारे हिंदु असून त्यांच्याच हातून झाली तर धर्मराज्याची अगर रामराज्याची स्थापना होऊं शकेल. नास्तिक म्हणूं लागले, 'सत्यापरता नाहीं धर्म। सत्य तेंचि परब्रह्म' असें मानणारे महात्मा गांधी एका अर्थी नास्तिकच आहेत; कारण सत्याखेरीज दुसरा कोणताच देव ते मानीत नाहींत. राजकीय सुधारणा आधीं हवी, असें मानणारे लोक महात्मा गांधींच्या चरित्राकडे बोट दाखवून म्हणूं लागले कीं, आधीं राजकारण हाच धडा त्यांनीं घालून दिला आहे. क्रांतिकारक म्हणत, हे एक क्रांतीकारकच आहेत, पण मुत्सद्दीपणानें शांततेचा व अहिंसेचा उपदेश करीत आहेत. तर याच्या उलट कांहीं जहाल म्हणविणारे व पुढारी गणलेले असेंही बोलत कीं, हा एक सरकारचा गुप्त पोलीसच असून देशांतील जहाल राजकारण व क्रांतिकारक पक्ष

मारून टाकण्यासाठीं ब्रिटिश मुत्सद्दी याचा उपयोग, महायुद्धाच्या आपत्तीत आपल्या साम्राज्यासाठीं करीत आहेत; व हा आमच्यापैकीं नव्हे."

ही स्थिती लवकरच बदलली. जनतेचा विश्वास गांधींजींवर पूर्ण बसला. देशाचें नेतृत्व त्यांच्याकडे आपण होऊन चालत आलें. गरीब जनता 'दीननाथ' या दृष्टीनें त्यांच्याकडे पाहूं लागली. हजारों वर्षें जातिभेदामुळें उच्चवर्णीयांकडून हरएक बाबतींत दुर्लक्ष केल्या गेलेल्या अस्पृश्य जनतेला तर गांधीजी पित्यासमान वाटूं लागले. हवेल्यांत बसून राजकारण करण्याचे दिवस आतां मागें पडले होते. शाई आणि कागद संपवून देशकारण होत नसतें. जागृति व्हायला, प्रत्येक सुधारणेच्छु व्यक्तीनें कंबर कसून देशकार्य करणास पुढें आलें पाहिजे, हें गांधीजींनी लोकांना बजावलें. "खेड्यांची सुधारणा करा म्हणजे भारताची भरभराट दूर नाहीं" गांधीजींनी संदेश दिला. आफ्रिकेंत, गोऱ्या लोकांची हिंदी लोकांशीं ज्या प्रकारची वर्तणूक असे, तिनें तर गांधीजींच्या डोळ्यांत अंजन घातलें होतें. त्यांना हिंदुस्थानांत उच्चवर्णीयांनीं अस्पृश्यांवर केलेला अन्याय कसा खपायचा? महारचांभारांना जोपर्यंत आपण जवळ केलें नाहीं तोंपर्यंत आपल्या देशाला चांगले दिवस लाभणें कठीणच, हें त्यांनीं जनतेस समजावून दिलें. पण ते केवळ व्याख्यानें देऊन अगर जातिभेदाविरुद्ध लेख लिहून थंड राहिले नाहींत. स्वतःच्या आचरणानें, त्यांनीं जातीभेदाला अर्धचंद्र देण्याचा प्रयत्न केला. 'हरिजन' या गौरवपर संबोधनानें या पीडित जनतेला त्यांनीं जवळ केलें. गरीब लोकांना पोटभर जेवण मिळेपर्यंत, कोणतीच सुधारणा होणें शक्य नाहीं हें त्यांनीं ओळखलें. शेतकऱ्याचा नांगर भारताचा उत्कर्ष करील! विणकऱ्याचा रहाटे भारतमातेला हंसवील. जातीजातींतील बंधुभाव, भारताला 'समर्थ राष्ट्र' बनवील. हिंदुमुसलमानांचे ऐक्य पारतंत्र्याचा शेवट करील. दारूसारख्या शरीरघातकी व्यसनांपासून अलिप्त राहिल्यास व आपल्या इतर देशबांधवांस तसें करण्यास लावल्यास, राष्ट्र सतेज व सत्त्वशील बनेल. देशांत उत्पन्न झालेल्या आणि बनवलेल्या वस्तू वापरल्यासच सर्वांस रोजगार मिळेल, बेकारीचा प्रश्न आपोआप सुटेल, आणि प्रत्येकास पोटभर भाकर सुखासमाधानानें खावयास मिळेल अज्ञानी जनतेला सज्ञान केल्याशिवाय, अशिक्षित लोकांना साक्षर केल्याशिवाय, भारतीय संस्कृति उच्च प्रकारची होणेंच

अशक्य. पाश्चात्य भाषा शिकणें चांगलें, पण राष्ट्रभाषेला नेहमीं वरचें स्थान देण्यांत आलें तरच ऐक्य लवकर घडून येण्यास फार फार मदत होणार आहे. प्रत्येकानें ' उच्च विचार व साधी रहाणी ' आचरणांत आणली तरच भारत आदर्श होईल. गांधीजींच्या शिकवणीचें हें सार आहे. म्हणूनच गांधीजींना 'समाजसुधारकांचे राजे' म्हणणें योग्य आहे.

या भारतीयांच्या हृदयसम्राटाचें जीवितध्येय, प्रस्तुत प्रकरणाच्या आरंभीच देण्यांत आलेलें आहे. ' मी साधु नाहीं आणि राजकारणी मुत्सद्दी तर नाहींच नाहीं ' ( Neither a Saint nor a Politician या मथळ्याखालीं गांधीजींनी ' यंग इंडियांत ' काढलेले उद्गार त्यांच्या जीवितकार्यावर बराच प्रकाश घालूं शकतील. ते म्हणतातः—

" माझ्या मित्रांच्या मदतीनें मी सध्यां एक नवीन प्रयोग करीत आहे. राजकारणाला धर्माचें अधिष्ठान देणें, हाच तो प्रयोग. धर्माबद्दलची माझी कल्पना काय आहे हें मला प्रथम स्पष्ट केलें पाहिजे. एवढें मात्र मला नेहमींच कबूल करावें लागेल कीं, सर्व धर्मांहून हिंदुधर्म मला अधिक प्रिय आहे. परंतु मी जो धर्म म्हणतों तो हा नव्हे. हा धर्म हिंदुधर्मापेक्षांही श्रेष्ठ आहे, असा माझा विश्वास आहे. या धर्माचें वैशिष्ट्य म्हणजे तो मनुष्याच्या स्वभावांत आमूलाग्र क्रांति घडवून आणतो. माणसाच्या अंतःकरणांत वास करीत असलेल्या सत्याशीं हा धर्म पूर्ण निगडित असतो. आणि यामुळेंच माणसाची सतत अंतःशुद्धि होत रहाते.........मानवी स्वभावांतील ही धार्मिक वृत्ति एकदां जागृत झाली, म्हणजे ती कायमची नित्यवृत्ति होऊन बसते. तिला व्यक्त दशेला आणण्यासाठीं तो माणूस मग कांहींही करील. तो क्लेशांची पर्वा करणार नाहीं. संकटांना जुमानणार नाहीं. त्याचा आत्मा या वृत्तीमुळें अगदीं बेचैन होतो. परमात्म्याचें ज्ञान होईपर्यंत त्याच्या या वृत्तीचें समाधान म्हणून होत नसतें. असा हा माझ्या धर्माचा महिमा आहे. "

# प्रकरण ९ वें.

## उत्तिष्ठत, जागृत, प्राप्य वरान्निबोधत

उद्धरेदात्मनात्मानं नात्मानमवसादयेत् ।
आत्मैव ह्यात्मनो बंधुरात्मैव रिपुरात्मनः ॥

गीता

" आजवर आपण खूपच रडारड करून घेतलेली आहे ! आतां शोक थांबवा, आणि आपल्या पायांवर उभे रहा. मर्द बना. सध्यां आपल्याला मनुष्याला मर्दपणा शिकविण्याच्या धर्माची आवश्यकता आहे. प्रमेयेंसुद्धां माणसाचा मर्दपणा वाढवितील अशीं पाहिजे आहेत. मनुष्यांत माणुसकीच्या सर्व गुणांचा विकास करणारें शिक्षण आम्हांस हवें आहे. त्यांतील तथ्यांशाची कसोटी अशी आहेः—शारीरिक, बौद्धिक आणि आध्यात्मिक दृष्टीनें तुम्हांला ज्याच्यायोगानें कमकुवतपणा येण्याचा संभव असेल तें विषाप्रमाणे झिटकारा. त्यांत कसलाच राम नाहीं, अशी खात्री बाळगा. त्या शिक्षणाला सत्याचें अधिष्ठान नाहीं याबद्दल संशय नको. सत्य म्हणजे बळ, सत्य म्हणजे पवित्रता, सत्य म्हणजे संपूर्ण ज्ञान. सत्याच्या योगानें बळाची जोपासना झाली पाहिजे, सत्याच्या योगानें ज्ञान प्राप्त झालें पाहिजे व उत्साह वाढला पाहिजे. "

— स्वामी विवेकानंद —

१८५७ साल भारताच्या इतिहासांत अत्यंत महत्त्वाचें मानलें पाहिजे. याचवर्षी, पुष्कळ दिवस कित्येक लोकांच्या मनांत येनकेनप्रकारें धुसमुसत असलेल्या असंतोषाग्नीनें भयंकर पेट घेतला. मरावें किंवा जगावें या निर्धारानें अनेकांनीं या वणव्यांत उडी घेतली. निराशेंतून निर्माण झालेली ही त्यांची शेवटची धडपड होती. वाघ म्हटलें तरी खातो, आणि वाघोबा म्हटलें तरीही मटकावतो, त्यापेक्षां वाघऱ्या म्हणून मोठ्या धैर्यानें शत्रुशीं दोन हात करून दैन्य न दाखवतां शौर्यानें नि समाधानानें मरणें अधिक श्रेयस्कर, ही भावना त्यांच्या या उठावाच्या मुळाशीं होती. स्वकीय राजकर्त्यांनीं चरचर गळे कापले तरी हरकत नाहीं, परंतु ही परकीयांची लुडबूड नको, यांना पहिल्यांदा हाकलून लावूं व नंतर आपलें आपण काय करायचें तें पाहून घेऊं, या बाबतींत मात्र सर्वांचें एकमत झाल्यासारखें दिसून येत होतें. एखाद्या विशिष्ट ध्येयानें सगळे-जण प्रेरित झाले होते, अशांतली मुळींच गोष्ट नव्हती. उच्च ध्येयें कुणाच्याच पुढें नव्हतीं. ध्येयाची त्यांना पर्वाही नव्हती. परिणामाबद्दल ते पूर्ण बेफिकीर होते. एखाद्या, मुत्सद्दी खंबीर नि कर्तृत्ववान पुढाऱ्याकडून स्फूर्ति घेऊन, त्याच्या नेतृत्वाखालीं ते एकत्र झाले होते, असेंही नाहीं. प्रत्येकानें जणूं काय पुढारीपण आपल्या स्वतःच्याच हातांत घेतलें होतें. कांहीं अस्तास जात अस-लेल्या, धूर्त, डोकेबाज राजकारणी पुरुषांनीं या संधीचा फायदा घेऊन तिला 'सुवर्णसंधि' बनविण्याचा प्रयत्न केला नाहीं असें नाहीं. परंतु सर्वसाधारणरीत्या गोऱ्या लोकांबद्दलच्या या द्वेषाग्नीच्या ज्वालामुखीनें पेट घेण्याच्या शेवटच्या घटकेपर्यंत, आपला हेतु काय, आपलें हस्तगत करण्याचें उद्दिष्ट कोणतें, तें कोणत्या डावपेचांनीं लढा चालविला असतां साध्य होईल, लढा किती दिवस पर्यंत चालवायचा, पुष्कळ दिवस लढा चालविण्याइतकी तयारी झालेली आहे, किंवा कसें वगैरेबद्दल फारच थोड्यांना कांहींशी कल्पना होती. बहुतेकांचा हेतू एकच होता. सूड ! वैतागांतून उत्पन्न झालेला हा आत्मघातकी संताप होता. धार्मिक भावना दुखावलेल्या अशिक्षीत पण कर्मनिष्ठ कडव्या शिपाई लोकांनीं हें असंतो-षाचें बीज पेरलें; इंग्रज राजनीतीमुळें पिढीजात जमीनदारीला मुकलेल्या कर्ज-बाजारी लोकांनीं या बीजाची जोपासना करून त्याला अंकुर आणला. आपलीं राज्यें गमावल्यामुळें, चवताळलेल्या लोकांनीं तें सगळीकडे पसरवून टाकून

त्याचे भलेमोठे वृक्ष केले, आणि त्यांना सूडाच्या भावनेचीं फुलें आणलीं. कृतींचीं फळें आणण्याचें कार्य, आपल्या अंगांतील शौर्य दाखवण्यास कुठेंच जागा नसल्यामुळें, निराश होऊन हातघाईवर आलेल्या लोकांनीं केले. अशा रीतीनें हा भडका उडाला. याची पार्श्वभूमि तयार करण्याचें काम दरवर्षी दुष्काळानें मरणारे कोट्यावधी लोकांनीं करून ठेवले होते. गोऱ्या व्यापाऱ्यांच्या काळ्या व्यापारी नीतीनें, निराश्रित झालेले अनेक क्षेत्रांतील धंदेवाईक लोकांनीं, या भडक्यांत तेल ओतण्याचें काम पद्धतशीरपणें केलें. सारांश सर्व अनर्थांचें मूळ हे गोरे लोक, असें या कोणत्या ना कोणत्या प्रकारें दुखावलेल्या लोकांच्या मनानें घेतलें होतें ! या सर्व दु:खांचा शेवट करण्याचा एकच मार्ग त्यांना दिसत होता. त्यांच्या पूर्वजांनीं त्याच मार्गाचें अवलंबन केलें होतें. त्यांना ठाऊक असलेले देशही, आपणांवर होत असलेल्या खऱ्याखोट्या अन्यायाचा प्रतिकार याच मार्गानें करतात, हें ते जाणत होते. लढाई, रक्तपात, रणांगणावर शत्रूला कंठस्नान घालणें! दातांला दांत, आणि डोळ्यास डोळा हा न्याय ! शत्रूशीं सशस्त्र दोन हात करून, त्यांना दांतीं तृण धरावयास लावून वठणीवर आणणें, हुसकून लावणें किंवा त्यांचा पूर्ण नि:पात करून टाकणें ! त्यांच्या बापजाद्यापासून चालत आलेला हा सर्वमान्य राजमार्ग होता. मेलों तरी बेहत्तर, पण अन्यायाच्या प्रतिकारार्थ, धर्माच्या अभिमानार्थ, दारिद्र्याच्या नाशार्थ, लढूं या, मारूं या, किंवा मरूं या, एवढेंच त्यांना दिसत होतें.

याचा परिणाम व्हायचा तोच झाला. या दुर्दैवी क्रांतिकारकांचा हा प्रयत्न फुकट गेला. त्यांची धुळदाण उडाली. कुशल नेतृत्वाची उणीव, ऐक्याचा अभाव, शिस्तीची हेळसांड वगैरे दोषांमुळें हा उठाव फुसका बार ठरला. असें कांहींजण भारताच्या निश्चल राहिलेल्या दक्षिण भागावर या अपयशाचें खापर फोडूं लागले. कित्येकांनीं, इंग्रजांबद्दल गुरखे–शिखांना अस्थानी फुटलेला स्वामिभक्तीचा पान्हा या अपयशाला जबाबदार धरला. कारणें कोणतींही का असेनात? बिचारा गृहस्थाश्रमी इतिहासकार, या लढ्यांत भाग घेतलेल्या लोकांना, बंडखोर म्हणून संबोधूं लागला. शाळेंत जाणारीं इवलीशीं मुलें, दयाळु इंग्रज सरकाराविरुद्ध मूर्ख शिपायांनीं केलेल्या इसवी सन १८५७ सालच्या बंडाचीं कारणें घोकूं लागलीं पण—

या बंडखोरांनींच भारताला जाणीव करून दिली कीं, सशस्त्र क्रान्तीनें आपला उद्धार होणें यापुढें शक्य नाहीं. क्षणिक भावनावशतेची जागा विवेक-बुद्धीनें घेतली. विचारी भारतीयांपुढें कितीतरी प्रश्न उभे रहात. हे प्रश्न सोडवायचे कसे? आपली प्रगति कशी करून घ्यायची? आपल्या देशाला पूर्वीप्रमाणें ऐश्वर्याचे दिवस कसे लाभतील? त्यांच्यांत विचारक्रांति होऊं लागली.

"आपली अशी स्थिती कां झाली? प्रत्येक क्षेत्रांत आमची पिच्छेहाटच कां दिसून येते? परकीयांवर दोषांचें खापर फोडण्यांत येतें, पण त्यांचा आमच्या घरांत शिरकाव कसा होऊं शकला? आमच्या माना त्यांच्या हातांत कशा गेल्या? हजारों मैलांकरून, कित्येक महिने गलबतांनीं पाण्यावर तरंगत, हे मूठभर लोक, एका वीतभर बेटांतून येऊन एवढा मोठा देश पादाक्रान्त करून टाकूं शकतात याचें कारण काय? आमचेंच कुठें चुकलें तर नव्हतें? आमच्यां-तील दोषांचा आपल्या फायद्यासाठीं त्यांनीं उपयोग करून घेतला नसेल ना? खास असेंच असलें पाहिजे. पण आतां रडून किंवा पश्चात्ताप करून काय उपयोग? आम्हीं मूर्खपणानें आमचीं मर्मस्थळें त्यांना दाखविलीं; त्याचा त्यांनीं उपयोग करून घेणें साहजीकच होतें. आतां त्यांना दोष देण्यांत काय अर्थ आहे! पण ही स्थिति सुधारायची कशी? मुसलमानांच्या कितीही स्वाऱ्या झाल्या तरी देशाचा अंतर्भाग पूर्वी किती शांततेंत नि सुखासमाधानांत नांदत असे. पण आतां! खेडीं ओस पडायला लागलीं आहेत. भिकाऱ्यांची संख्या फुगत चालली आहे. कितीतरी लोक भुकेनें मरताहेत. कित्येक काम करायला तयार आहेत, पण त्यांना काम द्यायला मात्र कोणींच तयार नाहींत. दिवसभर मरमर काम करणाऱ्यांना सुद्धां स्वतःचेंच पोट जेमतेम भरतांना नाकीं नऊ येतात, मग त्यांच्या कुटुंबवासियांची गोष्ट तर बोलायलाच नको. कलाकौशल्याच्या कामाला तर पूर्ण ओहोटीच लागली आहे. असें कां व्हावें? प्रत्येक वर्षी मोठमोठे दुष्काळ पडतात आणि लोक पटापट मरतात; गुरढोरें तडफडत प्राण सोडतात. यवनी लोकांनीं हिंदुस्थान पुष्कळदां लुटला; पण त्यामुळें गारिबांच्या पेजेंत खंड पडला नव्हता. आतांची परिस्थिती अगदींच वेगळी. देवा, ही स्थिती बदलण्याचा कांहींच का मार्ग नाहीं? परकीय राजसत्ता या अनर्थाच्या मूळाशीं आहे, हें कबूल. पण एवढ्या दुरून येऊन आमच्यावर वर्चस्व

स्थापणाऱ्या या लोकांत घेण्यासारखे पुष्कळ गुण नाहींत असें कसें होईल ? काय ती त्यांची धडाडी ! आगगाड्या, तारायंत्रें वगैरे कल्पनाशक्तीच्या बाहेरचीं साधनें उपयोगांत आणायला ते कसे समर्थ ठरले ? आणि आम्ही ? एकमेकांत भांडून, डोकेफोड करून घेण्याशिवाय दुसरी कोणतीच प्रगति करून घेतली नाहीं. आपापसांत भांडायचें, आणि तिऱ्हाइताला फायदा करून द्यायचा, हाच आमचा पुरुषार्थ ! आतां सुधारायचें असेल, योग्य मार्गावर यायचें असेल, तर परकीयांचे गुण पहिल्यान्दां उचलून घेतले पाहिजेत. सर्वांगांनीं आमची सुधारणा करून घेऊं. प्रत्येक क्षेत्रांत आमची प्रगति करून घेऊं. काय तो आमचा धर्म ? मूर्तिपूजा, जपतप, सगळेच वेडगळ प्रकार ! अशानें का आत्मा सुधारयाचा आहे ? आणि आधीं आत्मा सुधारल्याशिवाय इतर सुधारणा कसच्या होतात ? वर्तमानपत्रें काढूं, ग्रंथ लिहूं, लेख लिहूं, आमचे विचार सगळीकडे पसरवूं, आणि लोकांत जागृति, सुधारणा घडवून आणूं. कुठल्याही बाबतींत किंचितसुद्धां पाश्चात्यांच्या—आमच्या सुधारलेल्या राजकर्त्यांच्या—मागें रहाणार नाहीं. इतकेंही करून ते जर आपण होऊन जात नसले तर त्यांना इथून हुसकून काढूं. त्यांच्या राजपद्धतीला किंवा त्यांच्या कायद्यांना मानणार नाहीं. मात्र भारतीयांचें वैशिष्ट्य, शांततावाद, अहिंसावाद, अध्यात्मवाद, यांना आपल्या कृत्यांनीं हरताळ फासतां कामा नये, हें प्रत्येकानें लक्षांत ठेविलें पाहिजे.

ही विचारक्रान्ति तडकातडकीं घडून आली नाहीं. भारताची इतकी प्रगति करायला, पुष्कळांना आपलीं आयुष्यें वेंचावीं लागलीं ! इसवी सन १८१८ पासून १९३० पर्यंतचा कालावधि, या प्रगतीच्या मागें होता. " आत्म्याची सुधारणा आधीं करून घेऊं या. " राजा राममोहनरायांनीं संदेश दिला. रामकृष्ण परमहंस, विवेकानंद वगैरेंनीं त्यांचीच री ओढली. आर्यसमाजाचे जनक एक पाऊल पुढें गेले. स्त्रीसमाजांतील अन्याय, अनाथालयें, विधवाश्रम वगैरे संस्थांच्या द्वारें दूर करण्याचें श्रेय त्यांनीं संपादिलें. आपल्यांत मुरलेले अनेक सामाजिक दोष दूर करून, समाज सुधारल्याशिवाय, देशाला चांगले दिवस येणेंच कठिण असें लोकहितवादींनीं प्रतिपादिलें. तुम्हांस लयास जायचें नसेल तर पाश्चात्य सुधारणेंत अनुकरणीय जें असेल तें आपलें मूळचें अस्तित्व न सोडतां अंगिकारा असें आगरकरांनीं जनतेला बजावलें. स्वाभिमानाची जोपासना करून राष्ट्रीयत्वाची

भावना प्रत्येकामध्यें उद्दीपित झाल्याशिवाय भारताचा उत्कर्ष होणेंच अशक्य हें चिपळूणकर, टिळक प्रभृतींनीं सांगितलें. मध्यंतरीं सशस्त्र चळवळ फोल आहे, हें अनेक ओजस्वी क्रान्तिकारक तरुणांनीं आपल्या जीविताचा बळी देऊन, सिद्ध करून दाखविलें. आणि शेवटीं महात्माजींनीं, प्रत्येक चळवळ सदसद्विवेकबुद्धि व अध्यात्म, यांच्या मिलाफावर अधिष्ठित झालेली असल्याशिवाय, यशस्वी होणेंच अशक्य असें जनतेला पटवून देण्याचा प्रयत्न केला.

१९३० साल उलगडलें. 'नव चैतन्यमय युगा'चा शेवट तर झाला नाहीं ना असें वाटण्यासारखी परिस्थिती उत्पन्न व्हायला सुरवात झाली. आणि आज १९४२ भारताच्या प्रगतीला खंड पडला तर पडला नसेल, असें एखाद्याला वाटणें साहजिक आहे.

मी निराशावादी नाहीं. पण असा एक उदास विचार मनांत येतो कीं, भारतीय समाजाच्या निर्मात्यांची ही उज्ज्वल परंपरा स्थगित तर झाली नसेल? १८५७ पासून, प्रत्येक क्षेत्रांत जे एकापेक्षां एक रथीमहारथी होऊन गेले, तसले आज कां होऊं नयेत? आज सगळीकडे जें वातावरण दृष्टीस पडतें तें उल्हासदायक खास नव्हे. जवाहरलाल, सावरकर, बोस, वगैरे रत्नांकडे कोणी आशावादी बोट दाखवील. गांधीजींनीं तर जवाहरलाल आपली गादी पुढें चालवील अशी आशाच नव्हे तर खात्रीसुद्धां व्यक्त केली. तरीसुद्धां निःपक्षपातबुद्धीनें आणि निर्विकारपणानें विचार केल्यास, राष्ट्रांत नवचैतन्य खेळवून, नि त्याला जोमदार बनवून, त्याला पुढें पुढें घेऊन जाण्याची ताकद आहे, अशी एखादी तरी व्यक्ती आजमितीस दिसून येते काय? सगळेजण, गारुड्याच्या पुंगीनें भारलेल्या नागाप्रमाणें, गांधीवादानें अगर प्रतिगांधीवादानें भारल्याप्रमाणें दिसत आहेत. स्वतंत्रवृत्तीची तडफ कोणांतच दिसून येत नाहीं असें विधान केल्यास, ते अतिशयोक्तीचें खास ठरलें जाणार नाहीं. विचारी म्हटले जाणारे लोक सुद्धां, ज्यांच्याकडून सामान्य जनता नेतृत्वाची अपेक्षा करते, अंधपणानें एखाद्या तत्त्वाचा अंगीकार करीत नाहींत ना असा भास उत्पन्न होतो. इतकी परावलंबी वृत्तीची तीं माणसें बनलीं आहेत. देशाच्या हितापेक्षां स्वतःच्या हिताकडेच त्यांचें अधिक लक्ष असल्याप्रमाणें ते वागताहेत. हे देशासाठीं झटताहेत कीं स्वतः पुढें येण्यासाठीं, कीं स्वतःची शेखी मिरविण्यासाठीं

हें एखाद्या तिऱ्हाइताला समजणें कठिण होईल, अशाप्रकारें त्यांचें वर्तन विचित्र होत आहे. त्यांनीं केलेल्या त्यागाबद्दल मला मनःपूर्वक आदर आहे. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला मी नमतों. त्यांनीं देशासाठीं सोसलेली झीज अभिनंदनीय आहे. त्यांनीं केलेल्या देशाच्या अमोलिक सेवेबद्दल कुणाचेंही दुमत होणार नाहीं. पण गांधीजींची स्वतंत्र प्रज्ञा किती जणांमध्यें आढळेल? परवां कोणीतरी होऊं घातलेला पुढारी मोठ्या जनसमुदायासमोर भाषण करीत होता. तो कळकळीनें सांगत होता, " बंधुभगिनीनों, गांधीजी सांगतात म्हणून तुमच्या मताप्रमाणें जे वागत नसतील त्यांच्यावर बळजबरी करून तुमचीं मतें त्यांच्यावर लादण्याचा प्रयत्न करूं नका. " जबरदस्ती कां करूं नका? गांधीजी सांगतात म्हणून हिंसामार्ग कां पत्करूं नका? गांधीजींची तशी इच्छा आहे म्हणून दीनबंधूच्या स्मारकनिधीला वर्गणी द्या. कां तर गांधीजी तसें करायला सांगतात म्हणून! मला नाहीं वाटत, भारताचा उत्कर्ष ह्या बौद्धिक गुलामगिरींत आहे असें. गंमत म्हणजे, गांधीजींनीं, मात्र अजूनपर्यंत, पूर्वीचा एखादा तत्त्ववेत्ता, अगर होऊन गेलेला देशकारणी पुढारी असें असें सांगतो, म्हणून तुम्ही, त्याप्रमाणें वागा असा मुळींच उपदेश केलेला नाहीं. उलट प्रत्येक ठिकाणीं, त्यांनीं जुन्या अनुभवांवर स्वतंत्र प्रज्ञेचें कलम लावल्यामुळेंच भारत कितीतरी पुढें जाऊं शकला. माझ्या या म्हणण्याचा कोणी विपर्यास करूं नये. सांगण्याचा उद्देश एवढाच कीं, भारताची उन्नति अंधानुकरणानें खास होणार नाहीं. गांधीजी सांगतात म्हणून नव्हे तर, अंतःकरणाला पटतें, हृदयाची पक्की खात्री झाली म्हणून अहिंसा तत्त्वाचा——किंवा कोणत्याही तत्त्वाचा——अंगीकार केला तरच त्यापासून फायदा व्हायचा.

आजचा भारत उदासीनतेच्या धुक्यांत गुरफटून गेल्यासारखा दिसत नाहीं का? गांधीजींनीं आपलें विराट स्वरूप पुनः एकदां या वर्षीं दाखविलें. पण त्यांच्या या स्वरूपानें किती थोड्या जणांवर परिणाम केला. धृतराष्ट्राच्या दरबारांत शिष्टाईच्यावेळीं, पुढील अनर्थ टळावा म्हणून कृष्णानें आपलें विराट स्वरूप दाखविलें; पण त्याचा जसा कुणावरच परिणाम होऊं शकला नाहीं, त्याचप्रमाणें गांधीजींच्या या स्वरूपाचें झालें नाहीं का? याची कारणमीमांसा कशी करायची? दिवा कायमचा विझतांना एकदम मोठा होतो. त्याचप्रमाणें

आधुनिक भारताचें झालें नसेल ना? भारतमाता पुष्कळ दिवसांच्या श्रमांनीं थकून आणि वैतागून तर गेली नसेल? आपण केलेले हरएक प्रयत्न निष्फळ झालेले पाहून वैराग्य तर तिला प्राप्त झालें नाहीं ना? किंवा आपल्या पुत्रांनीं भोगलेली शिक्षा पुरी न वाटून, आणखी कांहीं शतकें ते असेच अवनतीच्या गर्तेत खिचपत पडूं दे म्हणून ती रागानें स्वस्थ तर बसली नसेल? आपलीं मुलें असुधारणीय आहेत, तीं फक्त गुलाम व्हायच्याच लायकीचीं आहेत, अशी तर तिची समजूत झाली नसेल? दास्यवृत्ति त्यांच्या अंगांत पूर्णपणें भिनली असल्यामुळें, आतां त्यांचा उत्कर्ष होणें अशक्य असें तर तिचें मत बनलें नसेल? कुणी सांगावें? हिंदु-मुसलमान एकमेकांचीं डोकीं फोडीत आहेत. जातींजातींतील वैमनस्य वाढत चाललें आहे. प्रत्येकजण आपल्या स्वार्थाशिवाय अन्यत्र कुठेही पहात नाहीं. आपल्याप्रमाणेंच दुसऱ्यांनाही भावना आहेत हे तो विसरून गेल्यासारखा दिसत आहे. स्वतःच्या प्रतिष्ठेसाठीं, आपलीं तत्त्वें बाजूला काढून ठेवणारे महापुरुषसुद्धां समाजांत वावरतांना दिसून येऊं लागले आहेत. जनतेंतील सुखलोलुपता वाढत चालली आहे. चैनीकडे लोकांचा अधिकाधिक ओढा दिसून येऊं लागला आहे. श्रीमंत आणि गरीब अशीं दोन जगें झालेलीं आहेत. एका जगाला दुसऱ्या जगाची कांहीं, कांहीं माहिती नाहीं. एकीकडे लक्ष्मीच्या ऐश्वर्योन्मादाला ऊत आलेला आहे, तर दुसरीकडे, दारिद्र्याचें भीषण तांडव नृत्य चाललेलें आहे. श्रीमंती जग अगदीं लहान पण दरिद्री जग महाअफाट. हीं दोन जगें एकत्र कशीं करायचीं? तरुणांकडे, देशाच्या भावी पिढीकडे आशेनें नजर फेंकली, तर मूर्तिमंत निराशाच पदरांत पडेल तुमच्या. भावनोत्कटता व ध्येयासाठीं पाहिजे ते त्रास सोसण्याची धमक, फारच थोड्यांमधें दिसून येतील, विलासवृत्तीचा प्रत्येकावर पगडा बसलेला आहे. देशभक्ति ही फॅशन होऊं घातली आहे. उद्यांच्या जिजाबाई होण्याची जबाबदारी ज्यांच्यावर, अशा तरुणी रंगी-बेरंगी कपड्यांत लपेटून घेऊन बाहुल्यांप्रमाणें वावरतांना दृष्टीस पडताहेत, आपल्या अंगांतील कर्तबगारी कुठें दाखवावी, याचें योग्य ज्ञान नसल्यामुळें मवालीपणा, गुंडगिरी वगैरे समाजांत बोकाळत चाललीं आहेत. लेखणीबहाद्दर लोकांत जागृति करण्याचें सोडून, आपापसांत कुरापती काढून भांडत आहेत, आणि हीं भांडणें जनतेसमोर ठेवण्यांतच पुरुषार्थ मानीत आहेत. त्यांनीं आपली

प्रतिभा, जनतेला हीन अभिरुचि लावण्याच्या कामीं खर्ची घातली आहे. वर्तमानपत्रें, मासिकें व दररोज बाहेर पडणारीं पुस्तकें यांच्यांत निंदा, कुचाळकी वगैरे वैयक्तिक गोष्टींचाच अधिक भरणा असतो. फारच थोडी उच्च दर्जाची आढळतील. पण त्यांना हाताशीं धरून त्यांचा पुरस्कार करणारेही विरळाच. जनतेला सुशिक्षित करण्यासाठीं अनेक शिक्षणसंस्था स्थापन झाल्या. त्या शिक्षण देण्याचें आपलें कार्य व्यापारी तत्त्वावर पार पाडीत आहेत. पण त्यांत आयुष्यांत उपयोगी पडणारें असें तत्त्व फारच थोडें असतें, असें म्हटल्याशिवाय रहावत नाहीं. सारांश जिकडे दृष्टी वळवावी तिकडे मन एकदम दचकून जाण्यासारखी परिस्थिति नजरेस पडते.

मनाला विषण्णावस्था उत्पन्न करण्यासारखी जरी ही परिस्थिति असली तरी त्यामुळें खचून जाण्याचें मुळींच कारण नाहीं. शेळपट झालेल्या लोकांना सिंहासारखे मर्द बनविणाऱ्या धुरंधराला ही परिस्थितीच जन्म देईल असा माझा दृढ विश्वास आहे. ही परिस्थिति, त्या महात्म्याकरितां, पार्श्वभूमि बनवित आहे. याचकरितां मी निराश होत नाहीं. गीतेंतील

यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत ।
अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम् ॥

आणि

परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम् ।
धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे ॥

या दोन श्लोकांवर माझा पूर्ण विश्वास आहे. मला खात्री आहे, कोणीतरी पुढें येईल. माझ्या भारताचें चारित्र्य मरणार नाहीं. आमच्यापैकीं प्रत्येकाला वाटूं दे, "मीच ही राष्ट्रनेत्यांची उज्ज्वल परंपरा पुढें चालविणार, त्याचकरितां माझा जन्म आहे; माझ्याच कृत्यांवर आज भारतमाता अवलंबून आहे. देवा, तिला सुखी करण्याचें मला पूर्ण सामर्थ्य दे. भारताला आदर्श बनवण्याचें मला कौशल्य दे. प्रथम माझ्या देशभाईंना, आणि नंतर अखिल मानवजातीला सुखी करण्याचें कार्य या भारतमातेच्या नम्र पुत्राच्या हातून पार पडूं दे. भारतमाते, घाबरूं नकोस; निराश होऊं नकोस; वैतागून जाऊं नकोस; अज्ञानामुळें तुझ्याकडे दुर्लक्ष करणाऱ्या तुझ्या या मूर्ख मुलांवर रागावूं नकोस. त्यांना

त्यांच्या खऱ्याखुऱ्या परिस्थितीची जाणीव करून देण्यासाठीं, आपल्या पूर्वजांनीं जतन करून ठेवलेल्या ज्ञानभांडाराचा आणि उज्ज्वल चारित्र्याची मदत घेऊन, तुझा अभिमानी, मी पुढें सरसावलों आहे. मला आशीर्वाद दे. ”

आमच्या देशाचा उत्कर्ष फार दूर नाहीं. ज्या देशाचा भूतकाल उज्ज्वल आहे, त्याचा भविष्यकालही उज्ज्वल व्हायचा हें ठरलेलेंच आहे. पाश्चात्य संस्कृतींतील अनुकरणीय तत्त्वें आपण अंगिकारूं, पण आमच्या पौर्वात्य--- भारतीय संस्कृतींतच आमचा उत्कर्ष सांठविलेला आहे, याचा आम्हाला विसर पडतां कामां नये. भारतीय संस्कृतीची तत्त्वें जर आम्हीं पूर्णपणें समजावून घेतलीं, तर आमचा उद्धार व्हायला वेळ लागणार नाहीं. अनादि कालापासून ती संस्कृति आम्हाला सांगत आलेली आहे.

सर्वेऽपि सुखिनः सन्तु । सर्वे सन्तु निरामयाः ।
सर्वे भद्राणि पश्यन्तु । मा कश्चित् दुःखभाग्भवेत् ।।

आणि हें ध्येय सिद्धीस नेण्यासाठीं

सह नाववतु । सहनौ भुनक्तु ।
सहवीर्यं करवावहै । तेजस्विनावधीतमस्तु ।

ऋग्वेदानेंही हेंच सांगितलें आहे.

संगच्छध्वम् संवदध्वम् सं वो मनांसि जानताम् ।
देवाभागं यथा पूर्वे संजानानाउपासते ।।१।।
समानो मंत्रः समितिः समानी समानं मनः सहचित्तमेषाम् ।
समानं मंत्रमभिमंत्रये वः समानेन वो हविषा जुहोमि ।।२।।
समानीव आकूतिः समाना हृदयानि वः ।
समानमस्तु वो मनो यथाः वंः सुसहासति ।।३।।

अहाहा ! किती अर्थपूर्ण ऋचा आहेत या ! किती सुंदर आणि उच्च आदर्श भारतीयांपुढें आहे हा ! एकत्र बोलावें, एकत्र चालावें, एकमतानें जाणावें मन, मंत्र, वित्त, मंत्रोच्चार, समिति या विषयींसुद्धां ऐक्य असावें. आमचे

संकल्प, व्यवसाय, धंदे, अंतःकरणें या सर्व गोष्टींमध्यें समानता असावी. सगळीकडे ऐक्याचें साम्राज्य पसरावें. समता नांदावी. हें ध्येय पुढें ठेवून आचरण केल्यावर, 'विश्वबंधुत्वा'चा उदय व्हायला कितीसा वेळ लागेल ?

असें झालें तर......खरोखर, भारतच विश्वबंधुत्वाचा धडा जगाला देईल. कविवर्यांची इच्छा पूर्ण होईल.

महात्माजींची तपश्चर्या फळाला येईल.

हें महत्कार्य करण्यास कोण महाभाग पुढें येईल ?

कोणी का येईना ? त्या उज्ज्वल भविष्यकाळाला वर्तमानकाळांत होतां होईल तो लवकर खेंचून आणण्याचा प्रयत्न तर करूं.

मराठी ग्रंथ संग्रहालय
ग्रं. क्र. ६२८३
REFBK-0006283